

लेखिका : सुलभा मोघे

# आधारवड

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# आधारवड

## कै. माधवराव देशपांडे उर्फ दादा यांचे चरित्र

लेखिका

**सौ. सुलभा मोघे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

आवृत्ती पहिली
जून, १९८८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मुंबई-४०० ०३२.

© प्रकाशकाधीन.

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
नागपूर.

[ किंमत रु. ४०.०० ]

# निवेदन

गेल्या पिढीच्या ज्या लोकांनी महाराष्ट्रात राजकीय आणि सामाजिक प्रक्रियेला वळण दिले त्यात कै. माधवराव देशपांडे यांचाही समावेश करावा लागेल. कै. माधवराव देशपांडे यांचा गांधी आश्रमाशी फार जवळचा संबंध होता. त्यांचे संपूर्ण घरच सत्याग्रही होते असे म्हटल्यास हरकत नाही. श्री. वि. स. पागे यांच्यासारखे त्यांचे सहकारी आणि श्री. बाबाजी मोघे यांच्यासारखे त्यांचे व्याही, या सर्वांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविण्यात फार मोलाची कामगिरी बजावली. सौ. सुलभा मोघे म्हणजे माधवरावांची कन्या, आणि मोघे या आडनावावरूनच दिसून येईल की, त्या (बाबाजी) मोघेंच्या स्नुषा. या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेकडे नजर टाकल्यास ध्यानात यावे की, माधवरावांचा गोतावळा केवढा मोठा आहे. श्रीमती शरयूताई धोत्रे यांनी त्यांना "अनेकांचे पाठीराखे" असे गौरविले आहे, तर शोभनाताई रानडे यांनी त्यांना "चंदनाच्या झाडाची" उपमा दिली आहे. श्री. वि. स. पागे हे तर त्यांना "सगोत्रीय" म्हणून संबोधितात. असे हे माधवराव उर्फ दादा देशपांडे हे प्रसिद्धीपासून पराङमुख राहिले तरी इतिहासावर त्यांच्या पाऊलखुणा उमटल्या आहेत. आजही त्यांच्या कुटुंबात सामाजिक कार्याची जाणीव आणि जिद्द दिसून येते. थोडक्यात कै. माधवरावजींचे चरित्र प्रसिद्ध करताना महाराष्ट्राच्या एका विशिष्ट कालखंडाचा इतिहास जीवंत होत आहे. असे ग्रंथ समाजाला स्वाभाविकपणेच "आधारवड" व्हावेत यात तिळमात्र शंका नाही. असा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात एक विधायक कार्य मंडळाने सफलपणे पुरे केले आहे, असे वाचकांना वाटल्यास या ग्रंथाची कार्यसिद्धी होईल.

४२, यशोधन,
मुंबई-४०० ०२०,
दिनांक २७ मे १९८८.

सुरेन्द्र बारलिंगे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# अनुक्रमणिका


पृष्ठ

प्रस्तावना (१)

मनीचे गूज (६)

स्वातंत्र्य सैनिक कै. माधवराव देशपांडे यांच्या संबंधातील काही संस्थांची नावे. (१०)


## कालखंड


१. ऐसी जन्मवेली धुवट ३

२. वेलु गेला गगनावरी २५

३. जो कर्म करीं सकळे, परी कर्मबंधा नाकळे १०३

४. की झाकलिये घटीचा दिवा ११०


## असे होते आमचे माधवराव उर्फ दादा


| | शीर्षक | नाव | |
|---|---|---|---|
| १. | माझ्या जीवनाचे शिल्पकार | गुलशनबी शेख. | ११७ |
| २. | अनेकांचे पाठीराखे माधवराव | श्रीमती शरयू उर्फ आक्का धोत्रे. | ११९ |
| ३. | एक झाड चंदनाचे | सौ. शोभना रानडे. | १२३ |
| ४. | आम्ही माहेरवाशिणी—आमचे दादासाहेब देशपांडे यांच्या. | सौ. सिन्धुताई मुळे. | १२५ |
| ५. | पदयात्रा सह्याद्रीच्या कुशीतील | श्रीमती सत्यभामा कुलकर्णी. | १२७ |
| ६. | ते तर कर्मयोगी होते | सदानंद देशपांडे. | १३० |

## अनुक्रमणिका——चालू


| | शीर्षक | नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ७. | जे जे मंगल, चांगले, तेथे तेथे दादा.. .. | गोविंद का. शिंदे. | १३४ |
| ८. | निर्भय, निःपक्ष, निर्वैर वृत्तीचे दादा .. | जयवंत गं. मठकर. | १३७ |
| ९. | देशभक्त, देवभक्त, साधुसंतसज्जन, सद्गुरू-भक्त श्रीयुत माधव कृष्ण देशपांडे, बांद्रा मुंबई, यांच्या काही पवित्र आठवणी. | गुरू देवानंद. | १३९ |
| १०. | माझे श्रद्धास्थान .. .. .. | डाकोरनाथ बाघ. | १४२ |
| ११. | आमदारपदाचा मोह नसलेले माधवरावजी | प्रा. ठाकुरदास बंग. | १४४ |
| १२. | 'आम्ही सगोत्रीय' .. .. | वि. स. पागे. | १४५ |
| १३. | स्वर्गस्थ माधवराव देशपांडे (एक राष्ट्रसेवक और भगवतजन) | कै. गोकुळभाई भट्ट. | १४७ |
| १४. | दादांनी मला असं घडवलं .. .. | का. दा. राऊत. | १४८ |
| १५. | "आमचे म्हातारे वकीलबाबा कसे आहेत?" | मोहनलाल रामावत. | १५२ |
| १६. | श्री. दादासाहेब तथा माधवराव देशपांडे यांचे एक स्वभाव वैशिष्टय | दामोदर वि. जोगळेकर. | १५६ |
| १७. | देशभक्त माधवराव देशपांडे | पां. वा. गाडगीळ. | १५८ |
| १८. | प्रसिद्धिविन्मुख माधवराव | श्री. रं. धामणकर. | १६१ |
| १९. | आमचे प्रेमळ दादा .. .. | सौ. विमल प्रभाकर आंग्रे. | १६२ |
| २०. | तू धैर्य सोडू नकोस .. .. | श्रीमती मालती चिचलीकर. | १६४ |
| २१. | दादांचे संस्मरण | राम देशपांडे. | १६६ |
| २२. | दिनांक ७, ८ व १० मे १९५५ साली झालेली चर्चा | मोरारजी देसाई. | १७० |
| २३. | दादांचे संकलित लेखन .. .. | माधवराव देशपांडे. | १७७ |

# प्रस्तावना

'आजच्या जमान्यात ज्यांना आदर्श मानता येईल, ज्यांच्या जीवनापासून काही बोध मिळेल अशा व्यक्तीच आढळत नाहीत' असे उद्गार वारंवार ऐकू येतात. पण हे उद्गार खरे नाहीत. ज्यांना आदर्श मानता येईल, ज्यांच्या जीवनापासून काही बोध घेता येईल अशा व्यक्ती कालपरवापर्यंत आपल्यात होत्या आणि आजही आहेत. अशाच एका जून १९८४ पर्यंत आपल्यात वावरलेल्या सत्त्यांशी वर्षांच्या दीर्घायुष्यात पन्नास-साठ वर्षे सातत्याने राजकारणात आणि विविध प्रकारच्या विधायक कार्यात, प्रसिद्धी-पासून कटाक्षाने दूर राहून कार्य केलेल्या आदरणीय माधवराव कृष्णराव तथा दादा देशपांडे यांचे हे चरित्र आहे. चरित्र लेखिका आहे त्यांची ज्येष्ठ कन्या सौ. सुलभा विनायकराव मोघे.

मुंबई उपनगरात वांद्रे पश्चिम भागातील आधुनिक आलिशान इमारतींचा आणि झगमगाटी वातावरणाचा सध्यातरी अभाव असलेल्या जुन्या बाजारपेठेच्या टोकाला असलेल्या एकमजली कौलारू बंगलीत दादा देशपांडे राहत. त्यांच्या आयुष्यातील साऱ्या महत्त्वाच्या घटना या वास्तूत घडल्या. यशस्वी वकिलीमुळे दादांना लाभलेली सुबत्ता, उपनगर जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष म्हणून सार्वजनिक कार्यात प्रवेश, १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहातील अटक, बेचाळीसच्या 'छोडो भारत' आंदोलनात आठ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर पोलिसांनी केलेली धरपकड, आमदारकीच्या काळातील कामाचा व्याप, भूदान आंदोलनात घेतलेला सक्रीय भाग, नशाबंदी मंडळातील व्यसन-मुक्तीचे कार्य, आचार्य विनोबा भावे, गाडगे महाराज, काँग्रेसचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेते व इतर माननीय व्यक्ती यांच्या भेटी, रमण महर्षींचा आश्रम, अरविंद बाबूंचा पाँडेचरी आश्रम, मानस सरोवराची यात्रा, नियमितपणे वर्षानुवर्षे चालू राहिलेल्या आळंदी, पंढरपूरच्या यात्रांचे प्रस्थान आणि अखेरीस २० जून १९८४ रोजी सायंकाळचे भोजन आटोपल्यावर हात धूत असता झालेले आकस्मिक देहावसान या सगळ्या महत्त्वाच्या घटना या कौलारू बंगलीशी निगडित आहेत.

दादांचे प्राथमिक शिक्षण गुजराथेत डाकोरला, माध्यमिक शिक्षण बडोद्याला, बी. ए. चे व वकिलीचे शिक्षण मुंबईला झाले. शिक्षणाच्या या स्थानांतरात त्यांच्या भावी जीवनाची जडणघडण माध्यमिक शिक्षणाच्या त्यांच्या बडोद्याच्या वास्तव्यात झाली. शिक्षणाच्या प्रारंभीच्या काळात माधव व त्यांचा धाकटा भाऊ केशव यांच्या शिक्षणासाठी आर्थिक परिस्थितीने नाडलेल्या त्यांच्या मातेने स्वाभिमानाने राहून जे अपार कष्ट उपसले त्याचे हृदयद्रावक वर्णन वाचले की, 'चणे खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे' या वचनाची आठवण होते. तो काळ सयाजीराव महाराजांच्या

प्रगतिशील कारकिर्दीचा होता. त्या वेळच्या बडोद्याच्या सर्वांगीण प्रगतीचे वर्णन लेखिकेनें यथातथ्य केले आहे. बडोद्याच्या ह्या वास्तव्यात शाळासोबती या नात्याने दादांचे तेव्हाचे विनायक भावे (आचार्य विनोबा), त्यांच्या सप्तर्षी मंडळातील बाबाजी मोघे, द्वारकानाथजी हरकारे, रघुनाथ धोत्रे, द्वारकानाथ लेले, आदिंबरोबर संबंध आला. हे संबंध पुढे आयुष्यभर टिकले आणि मुख्य म्हणजे त्यांच्या भावी जीवनाला देशप्रेमाची आणि विधायक कार्यात झोकून देण्याची प्रेरणा मिळाली. या बडोद्याच्या वास्तव्यात घडलेली रोमांचकारी घटना म्हणजे सयाजीराव महाराजांच्या उपस्थितीत पंधरा-सोळा मित्रांसमवेत त्यांनी गंगानाथ शिवमंदिरात घेतलेली देशभक्तीची शपथ. या प्रसंगाचे वर्णन करताना लेखिकेला शिवाजी महाराजांनी रोहिरेश्वराच्या मंदिरात स्वातंत्र्य संपादनाच्या केलेल्या प्रतिज्ञेची आठवण होते. बडोद्याच्या याच वास्तव्यात माधव आणि केशव या भावंडांच्या आईसमोर दारिद्र्यातूनच निर्माण झालेला, मुलांचे शिक्षण की शिक्षणाशिवाय ऐषआरामी जीवन असा प्रश्न उभा राहिला. माधव, केशव आणि त्यांची पालनकर्ती आई आपल्या सधन पण निपुत्रिक बहिणीकडे आश्रितासारखी राहत होती. त्या बहिणीने व तिच्या पतीने एका मुलाला दत्तक घेण्याचा प्रस्ताव मांडला. मुलांच्या आईने मुलांच्या पुढील शिक्षणासंबंधी प्रश्न विचारताच मुलांची मावशी म्हणाली, 'शिक्षण कशाला हवे, आयुष्यभर स्वस्थ बसून ऐषआरामाने राहता येईल एवढी संपत्ती त्यांना मिळेल' हे शब्द कानी पडताच त्या शिक्षणप्रेमी माऊलीने दत्तक देण्याचा प्रस्ताव मागे घेतला आणि पुढे माधवराव वकील तर त्यांचे बंधु केशव इंजिनिअर झाले.

१९२४ साली माधवरावांचा विवाह राघवेन्द्र शूरपाल या कट्टर वैष्णव गृहस्थांची कन्या विठा हिच्याशी झाला. ती कमलाबाई या नावाने देशपांडे घराण्यात आली. १९२५ सालापासून माधवरावांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला आणि लवकरच एक यशस्वी निष्णात वकील म्हणून नावलौकिक मिळवून कुटुंबाला आर्थिक सुखसमृद्धीचा लाभ मिळवून दिला. याच काळात देशात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकाराचे आंदोलन सुरू होते. १९३० साली महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारने मिठावर लादलेल्या अन्याय्य कराविरुद्ध सामूहिक आंदोलन सुरू केले. या मिठाच्या सत्याग्रहात माधवरावांकडे काम करणारे जोशीकाका यांनी भाग घेण्याची इच्छा दर्शविताच या जोशी काकांबरोबर माधवरावही गांधींच्या दांडी यात्रेच्या वेळी सुरतेला गेले, पण त्यांना व जोशी यांना अटक न झाल्याने ते परत आले व वकिलीच्या व्यवसायास पुनः सुरुवात केली.

बडोद्याला माधवरावांबरोबर हायस्कूलात शिक्षण घेतलेले विनायक भावे १९१७ सालीच महात्मा गांधींच्या आश्रमात दाखल झाले. पुढे बाबाजी मोघेही आश्रमात गेले. माधवरावांनी या काळात आपला अभ्यास पूरा करून बरीच वर्षे आर्थिक अडचणीत असलेल्या आपल्या कुटुंबाला प्रथम सुबत्ता प्राप्त करून दिली व नंतर

१९३५ सालापासून प्रथम जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून काम करून नंतर कॉंग्रेसच्या लढ्यात त्यांनी सक्रीय भाग घेतला. हे सारे त्यांनी विचारपूर्वकच केले असे म्हटले पाहिजे. 'आधी प्रपंच करावा नेटका। मग लागावे परमार्थी' या रामदासांच्या वचनाचे जणू त्यांनी आचरण केले. त्यांचा हा परमार्थ व्यापक होता. त्यात त्यांची लहानपणापासूनची अध्यात्म मार्गाची ओढ तर होतीच पण त्याच्या जोडीला राजकारणातील सक्रीय भाग आणि विधायक कार्यक्रमांच्या द्वारा केलेली समाजसेवाही होती. त्यांच्या पहिल्या कारावासाचा योगायोग असा की, महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहात पहिला सत्याग्रही होण्याचा मान त्या वेळेपर्यंत राजकारणापासून अलिप्त असलेले विनोबा भावे यांना दिला आणि त्याच वैयक्तिक सत्याग्रहात बांद्रे भागातून सत्याग्रही म्हणून निवड झालेल्या माधवरावांनी सत्याग्रह करून पहिला कारावास भोगला. त्यावेळी सत्याग्रहींची निवड प्रांतिक कॉंग्रेस कमिटी करीत असे. पण सत्याग्रहींच्या नावाला अखेरची संमती म. गांधी देत. माधवराव म. गांधींना दैवतासारखे मानीत. पण त्यांचा ओढा विनोबा भावे यांच्याकडे जास्त होता. कारण त्यांचा त्यांना वैयक्तिक सहवास व मार्गदर्शन लाभले होते. शिवाय विनोबांच्या सहकाऱ्यांशी त्यांचा घनिष्ट संबंध होता. भूदान आंदोलनात सर्व वेळ भाग घेण्यासाठी त्यांनी आमदार पदाचा राजीनामा देऊन भूदानात आपली २५० एकर जमीन दिली व त्या ठिकाणी गांधी सेवाधामचा प्रकल्प उभा केला. त्यांचा मुलगा रंगा बी. कॉम. ची परीक्षा चार महिन्यांवर आली असता परीक्षेस न बसता भूदानात सर्व वेळ कार्यकर्ता म्हणून दाखल झाला. अजूनही तो सर्वोदयाचे काम सर्व वेळ देऊन करीत आहे. माधवराव तेव्हा मुंबईच्या भूदान कमिटीचे प्रमुख होते. त्यांचे म्हणणे होते की, रंगाने प्रथम बी. कॉम. व्हावे व नंतर सर्व वेळ कार्यकर्ता म्हणून काम करावे. ही सारी हकीकत विनोबांना कळल्यावर ते म्हणाले, 'माधवरावांनी केले ते योग्यच होते. मी रंगाचा पिता असतो तर असाच सल्ला दिला असता.' ही सर्व हकीकत लेखिकेने आत्मीयतेने दिली आहे. त्या काळात अनेक घरांतील तरुण बुद्धीवान मुले भूदान आंदोलनात आली. त्यांच्या घरी पसंती नापसंतीचे खटके उडाले असतील त्यापैकी रंगाचे हे उदाहरण प्रतिनिधिक मानावे लागेल. विनोबांनी एकदा आपल्या या बालमित्राच्या घराला भेट दिली. विनोबा घरी येणार म्हणून हरखून गेलेल्या माधवरावांनी स्वतः घराचा परिसर स्वच्छ केला व स्वागताची तयारी करून ते विनोबांची वाट पाहत होते. विनोबा आले. घरात प्रवेश करून उंबरठ्यावर उभे राहिले. दादा त्यांना बसा बसा म्हणत असता विनोबा, 'विटेवरी उभा कटेवरी हात' असे म्हणाले नि तडक घराबाहेर गेले. त्यावेळी दादांचा चेहरा पडला असे त्यांची कन्या लिहिते. 'माझा भोळा, भाविक, चतुर मित्र' असे विनोबा दादांबद्दल उद्गार काढीत.

दादांच्या सार्वजनिक जीवनाकडे पाहिले तर एक गोष्ट चटकन ध्यानात येते की, ह्यांची प्रवृत्ती संघर्षमय राजकारणापेक्षा विधायक कार्यसंस्था संघटनांच्या द्वारे जनसेवा

करण्याकडे जास्त होती. या सेवेचे बीज त्यांच्या बडोद्याच्या वास्तव्यात, आपल्या सहकारी मित्रांसमवेत विश्वामित्री नदीवरील पुलाचे बांधकाम चालू असता केलल्या श्रमदानात आहे. १९३३ साली त्यांनी आपले सार्वजनिक कार्यातील सहकारी जोशी काका यांना वर्धा इथे विनोबांकडे विधायक कामांचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. दोन वर्षांनी ते परत आल्यावर आपल्या इनामगांवी आरळे येथे सेवाश्रमाच्या कामासाठी त्यांची योजना केली. बोरिवलीच्या कोरा ग्रामोद्योग केंद्रात दादा प्रारंभापासून होते. १९४६ साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र सेवा संघ समितीचे ते पदाधिकारी होते. महाराष्ट्र राज्य खादी बोर्डाचे काम ते पाहत. भूदान आंदोलन सुरू झाल्यावर तर त्यांच्या उत्साहाला भरते आले. भूदानाबरोबरच संपत्ती दान, सर्वोदय पात्र, शांती सेना, ग्रामदान अशा अनेकविध कामात त्यांनी उत्साहाने लक्ष घातले. आरळे येथे गांधी सेवाधाम प्रकल्प निर्माण केला. पण त्यात त्यांना यश लाभले नाही. नशाबंदी मंडळाच्या कामात भजनी मंडळे स्थापून धार्मिक प्रवृत्ती वाढवून दारूबाजांना व्यसन-मुक्त करण्याच्या मार्गावर भर दिला. सांताक्रुझ येथील श्रमकरी धोब्यांची सहकारी संस्था स्थापन केली. ती आजही त्यांचे चिरंजीव बापूसाहेब यांच्या प्रयत्नाने चालू आहे. वांद्रे तलावासमोर गांधी सेवा मंदिराची टुमदार वास्तू उभारून तेथे काही कार्यकर्त्यांच्या राहण्याची व महाराष्ट्र सेवा संघाच्या कचेरीची सोय करून दिली. आता याच इमारतीत रुग्णांच्या रोग निदानाची व जरूर तर औषधोपचार करण्याची सोय करण्यात आली आहे. दादा अध्यात्मनिष्ठ होते. रमण महर्षींच्या रमणाश्रमात त्यांनी ध्यान करणाऱ्या साधकांसाठी बांधलेली छोटी छोटी कुटिरे पाहिली होती. अशीच सोय आळंदीला इंद्रायणीकाठी असलेल्या सिद्धबेटांत करण्याची योजना त्यांनी आखली. काही दातेही त्यांच्या मदतीस आले. जागा मुकर झाली. पण जागा ताब्यात घेताना असंख्य अडचणी आल्या व त्यांची ही योजना साकारली नाही. दादांचे हे सारे कार्य कमालीच्या प्रसिद्धी पराङ्मुखतेने चालू होते. आधुनिक कालात सार्वजनिक स्वरूपाची कामे जनता जनार्दनाच्या सहाय्याने पार पडतात. ते सहाय्य मिळविण्यासाठी थोडेफार प्रसिद्धीचे तंत्र अवलंबावे लागते. पण ते तंत्र स्वीकारणे दादांच्या अध्यात्मप्रवण स्वभावाला जुळणारे नव्हते.

या चरित्रातील दादांच्या संसाराचे वर्णन विलोभनीय आहे. आई हे दादांचे परम दैवत होते. दादांचा संसार सुखसमृद्धीने भरभराटला तो वांद्र्याच्या त्यांच्या कौलारू बंगलीत. त्यांचे कुटुंब संयुक्त होते. घर माणसांनी गजबजलेले असे. त्या काळात सोवळे-ओवळे फार कडक असे. दादांचे सासरे राघवेन्द्र शूरपाल हे कडक वैष्णव. त्यांचा स्वयंपाकही सोवळे नेसून ओलेत्याने करावा लागे. दादांनी ओला पंचा नेसून त्यांच्यासाठी सोवळपाने स्वयंपाक केला आहे. पण या वडिलधाऱ्या सोवळ्या माणसांची जेवणं उरकली की दादांच्या घरात स्वयंपाकघरापर्यंत मुसलमानांसह अस्पृश्यांचाही प्रवेश असे. दादा स्वतः स्पृश्यास्पृश्य भेद पाळीत नसत. पण वडीलधाऱ्या मंडळींच्या

सोवळयात आड येत नसत. मोठया माणसांच्या मनाचा आदर राखणारी, त्यांच्याशी जुळते-मिळते घेण्याची वृत्ती हे दादांच्या स्वभावाचे एक वैशिष्टय होते. ते तुरुंगात असतानाही त्यांच्या बंगलीत राजकीय कार्यकर्त्यांना–यात भूमिगत कार्यकर्तेही असत–आश्रय मिळत होता. एक वृद्ध दूरचे नातेवाईक आजारपणामुळे त्यांच्या घरी राहत. त्यांच्या जेवणात त्यांना भरपूर भात मिळे. ते दिवस रेशनिंगचे असल्याने आपणास मिळणारा भरपूर भात हा काळया बाजारात खरेदी केलेल्या तांदळाचा तर नसेल ना ? अशी त्यांना शंका येताच त्यांनी ती जेवताना बोलून दाखविली. त्यांच्या शंकेला सौ. कमलाबाईंनी, दादांच्या पत्नीने, लगेच उत्तर दिले. त्या म्हणाल्या, 'तुम्ही आजारी असल्याने इतरांच्या वाटणीचे रेशनिंगचे तांदूळ तुमच्या भातासाठी आम्ही वापरतो. माझी मुले लाल ज्वारीच्या भाकरी खातात. आमच्या घरात काळया बाजाराच्या वस्तू येत नाहीत.' दादांनी मुलांचे शिक्षण व्यवस्थित केले व त्यांना मार्गाला लावले. पण त्यांचे अवास्तव लाड मात्र कधीच केले नाहीत. तसेच त्यांच्या समाजातील प्रतिष्ठेचा, अधिकारपदाचा लाभ मुलांना मिळाला नाही. त्यांच्या घरचे लग्न मुंजी-सारखी मंगलकार्ये डामडौलाशिवाय आळंदीसारख्या तीर्थक्षेत्री होत. त्यांच्या मोठया मुलीचे (चरित्र लेखिकेचे) लग्न महात्मा गांधींच्या उपस्थितीत अगदी साधेपणाने वर्धा सेवाग्राम येथे झाले. त्यांचे स्नेही बाबाजी मोघे हेच त्यांचे व्याही. दादांनी यशस्वी संसार केला पण तो विरक्त पुरुषाचा होता. त्यांच्या घरच्या आणि बाहेरच्या कार्यात अकृत्रिम अशी एकात्मता होती. त्यात भेद नव्हता.

सध्याच्या काळात राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातही नैतिक मूल्यांचा झपाटयाने ऱ्हास होत असून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार वाढत आहे. राजकारणात तर त्याचा कळस झाला आहे. सार्वजनिक कामे ही पदराला खार लावून करावयाची असतात अशी मागच्या पिढीतील, स्वातंत्र्यपूर्वीच्या काळातील कार्यकर्त्यांची धारणा होती. आजकाल सार्वजनिक कामे करण्यास पुढे येणाऱ्या बहुतांश कार्यकर्त्यांस ही कामे म्हणजे आपणांस बहुविध स्वार्थ साधण्याची संधिच आहे असे वाटू लागले आहे. सामाजिक बांधिलकीची जाण असलेली वैयक्तिक सदसद्विवेक बुद्धी बधीर झाली आहे. अशा ह्या परिस्थितीत माधवराव देशपांडे यांच्यासारख्यांची चरित्रे सर्वसामान्य माणसांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आहेत. सौ. सुलभा मोघे यांनी हे चरित्र ओघवती व चटकदार भाषेत लिहून पितृऋण तर फेडलेच आहे नि त्याचबरोबर समाज प्रबोधनाचे कार्यही साधले आहे. महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाने या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी पतकरून साहित्य आणि संस्कृती यांतील अभेदत्व सिद्ध केले आहे.

कटारा मॅन्शन, वरळी नाका
मुंबई, ४०० ०१८,
१ मे १९८७.

द. म. सुतार

## "मनीचे गूज"

दोन वर्षांपूर्वी जर मला कुणी सांगितले असते की, तुझ्या हातून चरित्र लेखन होणार आहे; तर मी ते बोलणे हसण्यावारी घालवले असते. मनात म्हटलं असतं, "आज समोरील व्यक्तीला माझी फिरकी घेण्याची लहर आलेली दिसत आहे."

दादांचं निर्वाण होऊन वर्ष उलटलं २० जून १९८५ ला, काही संस्था, त्याचप्रमाणे वैयक्तिकरीत्या काही जणांनी सुचवलं की, दादांचं चरित्र लिहावं. त्यांच्या अबोल, प्रसिद्धिपराङ्मुख, अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या पिढीला परिचय व्हावा. दादांच्या चरित्रापासून काही स्फूर्ति घेता आली तर घेऊन स्वतःची टिमकी न वाजवता रचनात्मक कार्याच्या कुठल्याही क्षेत्रात सहभागी व्हावे.

दादांच्या दीर्घायुष्याकडे नजर टाकली तर अनेक पदर असलेल्या त्यांच्या जीवनातील किती तरी पैलू त्यांच्याबरोबर काम करणाऱ्यांना अज्ञात होते. ज्या कार्यक्षेत्रात हे सहकारी काम करीत त्या क्षेत्रापुरते दादा त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहत. ते उत्तम शिक्षक होते तसेच शिक्षणाबद्दल नुसती पोकळ आस्था न बाळगता, शाळांची स्थापना करून, मुंबई उपनगरातच नव्हे तर शिराळे पेट्यात शाळांचे जाळे विणणारे कुशल संघटक होते.

विनोबांचे "वुई आर सेव्हन्" चे हे सप्तर्षि मंडळ—मित्रमंडळ राजकीय पुढारीपणाची अभिलाषा न बाळगता तत्वज्ञानाची कास धरणारे बुद्धिवादी देशभक्त होते. कुठल्याही प्रकारच्या प्रलोभनाला बळी पडून, कर्तव्यच्युत होऊन त्यांतील एकही तारा निखळला नाही.

वर्डस्वर्थच्या कवितेतील आई व छोटा मुलगा आपल्या जिवलगाला श्रद्धांजली वहायला गेले असता पाचजण तेथे चिरनिद्रा घेत होते. अजाण मुलाला मृत व जीवंत यांतील फरक न कळल्याने, तो स्वतः, त्याची आई व स्मशानातील पाच असा हिशोब करून आपण सात जण आहोत असे आईला वारंवार सांगत असतो. विनोबाजींच्या सात मित्रांपैकी आता दोघंच उरली.

दादांनी वकिली केली तीही १०-१५ वर्ष, त्या काळातसुद्धा व्यवसायाकडे गडगंज पैसे मिळविण्याचे हुकमी साधन म्हणून एकांगी दृष्टीने न पाहता, त्यांच्याशी संबंधित असलेल्या अनेक संस्थांच्या घटना तयार केल्या, त्या सरकारमान्य करून घेतल्या. मंडळांचे व्यवहार कायद्याच्या चौकटीत बसवले. अडीअडचणीला कायद्याचा काटेकोर सल्ला दिला. संस्थेच्या विश्वस्तनिधिसाठी विश्वस्त नेमण्याबद्दल कुणी तरी आपल्या पश्चात् आपला मुलगा विश्वस्तपदी नेमला जावा असे सुचवल्यावर——

'विश्वस्तपद ही काही वंशपरंपरा गादी नाही. हे पद त्या व्यक्तीपुरते मर्यादित

असते ' असे परखडपणे सांगायला ते कचरले नाहीत. ही सर्व कामे दादांनी विनामूल्य केली, प्रसंगी पदरचा पैसा घातला.

दादा मुंबई महानगरपालिकेचे "नगरपिता" होते, आमदार होते. पण मला वाटते ह्या पदांचा समाजोपयोगी कामासाठी उपयोग व्हावा ही त्यांची मनिषा होती. ह्या पदांचा त्यांना हव्यास नसल्याने, विनोबांच्या हाकेसरशी ह्या चमकदार पदापासून ते दूर राहिले. त्यांनी राजीनामा दिला. आत्मस्तुति, परनिंदा विषसमान मानली. द्वेष, मत्सराच्या आहारी न जाता प्रसिद्धिपासून दूर राहून अनेक रचनात्मक, विधायक कार्यात स्वतःला झोकून दिले. कर्मफलाची अपेक्षा न करता अविरत श्रम करून मला वाटते यामागे त्यांचे भगवत्गीता, ज्ञानेश्वरीचे वाचन, मनन, चिंतन असावे.

एखाद्या वारकऱ्याप्रमाणे त्यांनी आयुष्यभर वारकऱ्याची भगवी पताका एका खांद्यावर तर देशप्रेमाचा तिरंगा दुसऱ्या खांद्यावर वागवला. तोही सहज स्वभाव धर्म म्हणून कुठल्याही तऱ्हेचा भार वाटून न घेता. म्हणूनच स्वतःला जिवलग मित्र म्हणवून घेणाऱ्यांनी सूडबुद्धीने विश्वासघात केला हा हल्लाही त्यांनी शांतपणे पचवला.

"ब्रूटस् ऽ यू टू" मनांत म्हणून लीनपणा स्वतःकडे घेतला. मतलबासाठी खालच्या पातळीवर येऊन स्पर्धा करणे त्यांच्या रक्तात नसल्याने हे सहज जमू शकले.

ह्या चरित्रलेखनासाठी मी पू. मोरारजीभाई देसाई यांचेकडे आशिर्वाद घेण्यासाठी गेले असता, त्यांनी आशिर्वाद तर दिलाच शिवाय केव्हांही भेटायला यावे असे सौहार्दपणे सांगितले. व्यक्तीपेक्षा परमेश्वराचा आशीर्वाद श्रेष्ठ आहे, असे स्वतःचे मत दिले. ते मुख्य मंत्री असता भूदान पत्रांच्या वितरण समारंभासाठी २½, ३ मैलांचा चढ चढून, तेही पायी गांधीसेवा धामला दादांचे बरोबर गेल्याची आठवण करून दिल्यावर त्यांना ठाणे जिल्ह्यातील हरिचंद्रगडाला जातांना ५० मैल चालल्याचे स्मरण झाले. सच्च्या गांधीवादी निष्ठेने ते अजूनही सूतकताई करीत असल्याचे सांगितल्यावर तर काय बोलावे, हे मला सुचेनासे झाले. त्यांच्या तेजस्वी, निकोप व्यक्तिमत्वाने मी भारून गेले.

या चरित्रलेखनाच्या कारणाने अनेक ज्येष्ठ, वयोवृद्धांना मी भेटले. त्यांत काहींनी प्रत्यक्ष स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेतला होता. त्यासाठी आजन्म ब्रह्मचर्य पत्करले. काहींनी प्रपंच केला पण "अवघे विश्वची माझे घर" हे तत्त्व मनी बाळगून उतारवयात आपलं कसं होईल! याची चिंता न करता. त्याच विकलांग शरीर, आर्थिक कोंडी, नव्या पिढीची, सरकारची त्याच्याबद्दलची बेपर्वा व उपेक्षा पाहिल्यावर माझे मन आतून ढवळून निघाले. पण ही मंडळी त्यांच्या आनंदात कुठल्याही तऱ्हेची खंत, रुखरुख वाटून न घेता राहत आहेत. त्यांचा असीम त्याग, प्रसंगी जिवाची बाजी लावून केलेला, डोळस होता. मला वाईट वाटल्याचे लक्षात आल्यावर उलट त्यांनीच माझी समजूत घातली, म्हणाले—

"आमच्या जुन्या आठवणींना तू उजळा दिलास, तुझ्यामुळे आम्हाला पुनःप्रत्ययाचा आनंद उपभोगता आला."

मी पत्राद्वारे केलेल्या विनंतीला दाद देऊन दादांच्या सहवासातील त्यांना आलेले अनुभव लिहून पाठवले आणि पुस्ती जोडली.

"चरित्र लेखनाचं काम म्हणजे प्रबंध लिहून पी. एच्. डी. करण्यासारखं! तू एवढा वेळ ह्या कामाला दिलास हे कौतुकास्पद आहे. नाही तर आता आम्हाला विचारतं कोण? आजच्या बदलत्या मूलभूत जीवनमूल्यात आम्ही 'मिस्‌फिट्' आहोत."

नव्वदीच्या घरातील विनोबांचे बालमित्र द्वारकानाथजी हरकारे यांचेकडे चरित्र-लेखनाच्या कामानिमित्त मी गेले. मी त्यांच्या घरीं पोचण्यापूर्वी त्यांच्या बाल्कनीत येरझारा चालल्या होत्या ते चुटपुटत होते, काळजी करीत होते.

"अर्धवट पत्त्यावर ही पोर कशी येणार? पत्ता चुकली, फिरावे लागले तर?"

आतां ही 'पोर' पन्नाशी उलटलेली, परदेशवाऱ्या करून आली होती, तिने द्वारकानाथजीची काळजी करण्याऐवजी, द्वारकानाथजीच्याच जिवाची घालमेल होत होती.

वर्ध्याचे द्वारकानाथजी लेले प्रकृती अस्वास्थ्यामुळे स्वतः लिहू शकत नाहीत. त्यांनी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. कमूताई यांच्या मदतीने बडोद्याच्या दादांच्या बाल-पणाच्या रसाळ आठवणी लिहून पाठवल्या.

अशाप्रकारे चारी बाजुंनी, अनंत हातांनी या लेखनाला मदत झाली आहे. त्यांच्या आशिर्वादाने हा ग्रंथसिद्धीचा प्रयत्न तडीला गेला आहे. दादांच्या बहुरंगी जीवनाचा पट, बारिकसारिक बारकाव्यांनिशी उलगडून दाखवण्याचा व वाचकांसमोर ठेवण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न आहे. यातील उणिवा माझ्या मर्यादित शक्तीच्या, बुद्धीच्या आहेत. एक मात्र सांगावेसे वाटते की, चरित्रलेखन करताना माधवराव देशपांडे, माझे वडील म्हणून त्यांचा उदो उदो, खुशामत केलेली नाही. जे काही घडले ते प्रांजळपणे वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच पुस्तकाला नाव देतांना "ज्योतिने तेजाची आरती", "माधवाय नमः" असं नाव द्यावं असं क्षणभर मनांत आलं तरी त्या नावांचा एकांगीपणा जाणवल्याने नाव रहित केलं. आणि 'आधारवड' हे पुस्तकाचं शीर्षक विचारांती मुक्रर केलं. दादांच्या चरित्राला एवढ योग्य नाव दुसरे नाही असं मला वाटतं. स्वतःची वाढ, प्रगति करून घेता घेता, सभोव-तालच्यांना आधार देत देत त्यांची प्रगतिपथाकडे वाटचाल करवून घेत घेत त्यांच्यातील एक होऊन राहणारा आधारवड म्हणजे दादा!

मार्गा घोर वर्तावे। विश्व हे मोहरें लावावे।
अलौकित न व्हावे। लोकांप्रति।।

या माउलीच्या ओवीत सांगितल्याप्रमाणे होण्याची आस बाळगणारा आधारवड!

चरित्र लेखन तेही सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांचे करायचे असले—मग तो कितीही उच्चपदस्थ असो, त्याच्या उणिवा, स्वभाव दोष दाखवावेत एवढ्याचसाठी की, वाचकांतील

सामाजिक जाणीव असलेल्या होतकरू, शिकाऊ कार्यकर्त्यांनि ते टाळण्याचा प्रयत्न करावा. दादांच्या उणिवा त्याच दृष्टिकोनांतून दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्येष्ठ पत्रकार, स्वातंत्र्य सैनिक द. म. सुतार यांचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. त्यांनी वेळोवेळी उत्तेजन दिले, मार्गदर्शन केले म्हणूनच--

काय बहु बोलो सकळा। मेळविलो जन्मफळा।।
ग्रंथ सिद्धीचा सोहळा। दाविला जो हा।।


पुन्हा एकदा सांगावेसे वाटते की, हा प्रयत्न शेवटला जाण, हा ज्ञानेश्वर माउलीचा कृपाप्रसाद आहे--मी फक्त एक माध्यम! आता शेवटची विनवणी रसिकजनी परिसावी--

न्यून ते पर ते। अधिक ते सरते।।
करूनि घेयावे हे तुमचे। विनवितु असे।।

-- सौ. सुलभा मोघे.

## स्वातंत्र्य सैनिक कै. माधवराव देशपांडे यांच्या संबंधातील काही संस्थांची नावे

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थी मंडळ .. .. .. | १९१६, विनोबाजींनी वडोद्याला स्थापन केले, "वई आर सेव्हन" पैकी माधवराव एक. |
| २. | ग्राम सेवा मंडळ, आरळे .. .. | १९३५, स्थापन केले. १९४८ मध्ये सातारा जिल्हा ग्रामोद्योग संघात विलीन केले. |
| ३. | वान्द्रा म्युनिसिपालिटी .. .. | १९३५ मध्ये निवडून आले. शिक्षण समितीचे अध्यक्ष. |
| ४. | सातारा जिल्हा ग्रामोद्योग समिती .. | १९३५ ते १९५६ सभासद, घटना तयार केली. |
| ५. | मुंबई उपनगर जिल्हा .. .. | १९४७, जिल्हा (उपनगर) बोर्डाचे अध्यक्ष. |
| ६. | नोटीफाईड एरिया कमिटी .. | १९४५. |
| ७. | भूदान यज्ञ समिती .. .. | १९५५, स्थापना. सचिव होते. १९५७ मध्ये बरखास्त. महाराष्ट्र सर्वोदय मंडळात विलीन. |
| ८. | महाराष्ट्र सर्वोदय मंडळ .. .. | १९५७, स्थापना. |
| ९. | मल्टीपरपज सोसायटी .. .. | १९४६, संस्थापकांपैकी एक. |
| १०. | नशाबंदी मंडळ .. .. | १९४८, स्थापना. मुंबईत प्रत्यक्ष काम १९६० पासून. प्रमुख संघटक. |
| ११. | आदिवासी सेवा संघ. .. | |
| १२. | धोबीघाट .. .. .. | १९३८-३९, स्थापना. आवश्यक सुविधा पुरवल्या. दांडा-वाकोला-सांताक्रूजला. |
| १३. | महात्मा गांधी सेवा मंदिर, वांद्रे .. | १९४६. |
| १४. | कोरा ग्रामोद्योग केंद्र .. .. | कार्यकारी मंडळाचे सभासद. |
| १५. | गांधी स्मारक निधी, मुंबई .. | कार्यकारी मंडळाचे सभासद. |
| १६. | महाराष्ट्र सेवा संघ .. .. | १९५६, घटना तयार केली. सेक्रेटरी १९६०, अध्यक्ष-अखेरपर्यंत. विश्वस्त. |
| १७. | विनोबा ग्राम सहकारी सोसायटी .. | १९५६, संस्थापक. |



स्वातंत्र्यसैनिक वै. माधवराव उर्फ दादा देशपांडे

जन्म ७ ऑगस्ट १८९७ मृत्यू २० जून १९८४

# काल खंड

A-75—1-B

# १. ऐसी जन्मवेली धुवट

## "अडली गाय फटके खाय"

"अन्नासाठी दाहीदिशा आम्हा फिरविशी जगदीशा", एकीकडे अगतिकतेने, संतापाने बडबडत डाकोरची एक असहाय्य तरुण विधवा आपल्या किडूकमिडूक सामानाची आवराआवर करीत होती. मनात काही विशेष हेतु बाळगून. ही विधवा म्हणजे चंद्रभागा सोलापूरकर उर्फ राधाबाई देशपांडे. तिच्यावर चारी बाजूने आघात झाले होते पण त्या आघातांनी ही खंबीर विधवा खचून गेली नाही. त्या प्रसंगीही तिच्या अशिक्षित पण धोरणी बुद्धीने ठरविले.

"आता मलाच या मुलांच्या पाठीशी भक्कम पाय रोवून ठामपणे उभं राहिलं पाहिजे, त्यांना वाढवलं पाहिजे."

ही तरुण विधवा म्हणजे माधवराव देशपांडे यांची आई. आमची कर्तबगार, तितकीच शीघ्रकोपी आजी. सखारामपंत सोलापुरकरांची मुलगी. काळी, स्थूल बांध्याची, घरांत अठराविश्वे दारिद्र्य म्हणून डाकोरच्या कृष्णराव देशपांडे यांना दुसरेपणावर दिलेली.

गुजराथेत डाकोरला जी काही तुरळक महाराष्ट्रीय कुटुंबे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात होती त्यापैकी देशपांडे हे एक कुटुंब. या कृष्णरावांची आई तांबवेकर घराण्यातील. म्हणजे माहेरची तांबवेकर. अनेक राजघराण्यात, सरदार घराण्यात आजही अशी प्रथा आहे की त्या गादीवर किंवा त्या संस्थानावर वंशपरंपरेने पहिल्या मुलाचाच हक्क, बाकीची अपत्ये इतर सामान्य मुलांप्रमाणे. हीच प्रथा ह्या तांबवेकर घराण्यात आहे. हे संस्थान आणि त्यातील डाकोरनाथाचे धनाढ्य देऊळ या घराण्याच्या वारसाच्या मालकीचे. पिढ्यान्‌पिढ्या ही प्रथा चालली. पण आता मात्र संस्थानचा व देवळाचा ट्रस्ट केला आहे. सध्या विद्याविभूषित भालचंद्र उर्फ बाबूराव तांबवेकर हे मुख्य विश्वस्त असून इतर तांबवेकर मंडळी इतस्तत: विखुरली गेली आहेत. अनेक वेगवेगळ्या ठिकाणी, देशी विदेशी ती स्थाईक झाली आहेत.

कृष्णराव देशपांडे यांची आई तांबवेकरांची माहेरवाशीण, परिस्थितीने आपल्या पाचही मुलांना घेऊन डाकोरला आपल्या वडिलांच्या आश्रयाला आली. मुलं आपल्या आंजोळी वाढू लागली––रामचंद्र, पांडुरंग, वामन, कृष्णा आणि धोंडू, या पांच मुलांपैकी कृष्णराव हे डाकोरला स्थाईक झाले. डाकोरच्या शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून काम करू लागले. ही शाळा तांबवेकरांच्या वाड्यात भरे. कृष्णराव या भल्या-मोठ्या वाड्यातील एका भागात राहात. पहिली बायको वारल्यावर कृष्णरावांचा

दुसरा विवाह चंद्रभागा सोलापुरकर हिच्याशी झाला. ह्या जोडप्याला चार मुलं झाली. पहिल्या दोन मुली आणि नंतर लागोपाठ दोन मुलगे. थोरला माधव, धाकटा केशव, दोन वर्षाच्या अंतराने. ह्या मोठ्या बहिणी आपल्या लहान भावंडांना कडेवर घेऊन फिरवत, हिंडवत व कौतुकाने सांगत, हे आमचे भाऊ खूप शिकणार आहेत. आमचा एक भाऊ 'इंजिनेर' होणार आणि दुसरा 'बालिष्टर'. आजुबाजूची माणसं हसत, कुचेष्टा, टिंगल करीत. त्याना वाटे ह्या मराठी शाळा मास्तरची मुलं काय उजेड पाडणार. पण नियति ह्या बहिणींच्या तोंडून जणु भविष्य वर्तवीत होती. ही दोन्ही भावंडे, माधवराव व केशवराव खरोखरच वकील व इंजिनिअर झाले.

ह्याच नियतीचा जबरदस्त फटका देशपांडे कुटुंबाला बसायचा होता. प्लेगची साथ डाकोरला आली आणि ह्या घराचा एकुलता एक पोशिंदा कृष्णराव आणि दोन मुलींना उचलून घेऊन गेली. घर उजाड झालं. मागे उरली एक अशिक्षित तरुण विधवा, पाच आणि तीन वर्षाची दोन अजाण लेकरं.

दुपारची वेळ आली की आपली स्वतःची सावलीही आपली साथ करीत नाही. अशा परिस्थितीत डाकोरला दिवस काढणं आमच्या आजीला अवघड झालें "थोडासा आधार दिला आणि आपल्याच गळचांत सगळी जबाबदारी पडली तर काय घ्या" अशा विचाराने कुणी जवळ उभे करीना. आणि थोडीफार मदत देऊ केली तर ती घेणे स्वाभिमानी राधाबाईंना रुचेना, पटेना. मुलांचे जेमतेम प्राथमिक शिक्षण झाल्यावर तिने विचार केला, आपली मुलं त्या मानाने जाणती झाली आहेत. जाणती म्हणजे किती. तर एक १० वर्षाचा, दुसरा ८ वर्षाचा. असं मिंध जिणं जगण्यापेक्षा आपल्या हक्काच्या वतनी गावी, आरळचाला का जाऊ नये? त्या ठिकाणी आपल्या हक्काची शेतं आहे, घर आहे. निदान पोटाला काय खावे, ही भ्रान्त तर पडणार नाही. पण धीर होईना. कुठे गुजराथेतील डाकोर गाव तर कुठे सातारा जिल्ह्यातील शिराळे पेटचातील आडवळणी खेडे आरळ, शिवाय भाषेचा प्रश्न. डाकोरची भाषा गुजराथी तर आरळचाची अस्सल सातारी मराठी भाषा. शेवटी मोठचा मुलाने माधवने आईला धीर दिला. आई व मुलगा धाडसी, हुषार तर खरेच. कसं जायचं माहित नाही. प्रवासाच्या सोयी अगदी तुटपुंज्या. "अन्नासाठी दाही दिशा" असं मोठचानं बडबडत बांधाबांधी तर केली. डाकोर सोडायचं ठरवलं. आरळचाला त्यांचे सख्खे व नंतर दत्तक गेलेले दीर राहात होते.

हे आरळे गाव म्हणे देशपांडे यांच्या पूर्वजांना इनाम दिलं होतं. मोगल सैन्य संभाजी महाराजांना संगमेश्वरी बेहोष अवस्थेत पकडून तुळापूरला नेत होते. येळापूर खिडीमार्गे सैन्य आपल्या छत्रपतीला घेऊन जात असल्याची दुर्वार्ता देशपांडे व येळापूरचे इनामदार, थोरात यांना समजली. आपल्या राजाला सोडवावे

या सदिच्छेने त्यांनी आसपासची शेतकरी, कामकरी माणसं गोळा केली. महाराजांच्या बरोबरच्या मोगल सैन्यावर हल्ला केला. महाराजांना सोडवण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करूनही बलाढ्य मोगल सैन्यापुढे देशपांडे-थोरातांचा निभाव लागला नाही. प्रयत्न असफल झाला, धुमश्चक्रीत अनेक मारले गेले तर काही नाईलाजाने वाट फुटेल तिकडे पांगून गेले. औरंगजेबाने संभाजी महाराजांचे अनन्वित हाल करून त्यांची क्रूर हत्या केली. पुढे शाहू महाराज मोगलांच्या कैदेतून सुटले व मराठ्यांचे छत्रपती झाले. त्यांच्या कानावर देशपांडे व थोरात यांनी गाजवलेल्या पराक्रमाची वीरगाथा आली. महाराजांना मराठ्यांच्या पडत्या काळातील या राजनिष्ठेचे कौतुक वाटून त्यांनी देशपांडे यांना आरळे गाव इनाम दिले. पालखीचा मान दिला. होळीच्या उत्सवाला देशपांडे यांच्या वंशजाना नेण्यासाठी साताऱ्याहून पालखी येई. हे देशपांडे म्हणजे कृष्णराव देशपांडे यांचे पूर्वज. ह्या इनामी आरळे गांवी त्यांचे वंशज, माधवराव व केशवराव देशपांडे वय वर्षे १० व ८ आपल्या विधवा आईसह आश्रयाला निघाले. अशा परिस्थितीत सगळीकडे जे होतं तेच इथेही झालं. आरळ्याचं त्यावेळचं १९०८-०९ चं जाणं मृगजळ ठरलं. कुणीही मदतीचा हांत पुढं केला नाही. उलट सगळ्यांनी मिळून ह्या हतभागी जीवांना हुसकावून लावलं. हिरमुसल्या चेहऱ्याने ही मंडळी परत गुजराथला आली.

परत ही मंडळी गुजराथला आली पण डाकोरला नाही, तर बडोद्याला. बडोद्याला या मुलांच्या मावश्या राहत होत्या. त्यावेळी बडोद्यात सुबत्ता होती. प्रजेचे हित जपणारे सयाजी महाराज संस्थानचे अधिपती होते. आपलं संस्थान लोकाभिमुख असाव असे त्यांना फार वाटे. आदर्श संस्थान होण्यासाठी ते अनेक योजना आखीत आणि त्या कार्यवाहीत आणण्यात धन्यता मानीत. शिक्षणाच्या जास्तीत जास्त सोयी त्यांनी आपल्या संस्थानात उपलब्ध करून दिल्या. सक्तीचे प्राथमिक शिक्षण भारतात या संस्थानने प्रथम केले. स्त्री शिक्षणाची तळमळ असल्याने मुलींना निम्मी फी असे. दरवर्षी थंडीच्या मौसमात वैयक्तिक व सांधिक खेळांच्या स्पर्धा होत. ऑलिंपिकच्या सध्याच्या धर्तीवर स्त्रिया त्यात हिरीरीने भाग घेत. रात्री अपरात्री निर्धास्तपणे वावरत तेही १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात. कलावंतांना या संस्थानात महाराजांचा उदार आश्रय होता. त्यांच्या गुणांची कदर केली जाई. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विद्यार्थी दशेत महाराजांची निरपेक्ष मदत लाभली. केरळदेशीय राजा रवि वर्मा यांची चित्रकला येथेच दिमाखाने तळपली. विख्यात गायक पैगंबरवासी फैय्याजखां हे सयाजी महाराजांचे दरबारी गायक होते. संगीत व वादन शिकविण्यासाठी बाबजी-पुऱ्यात संगीत विद्यालय स्थापन केले होते. कुठल्याही प्रकारची फी न घेता हे शिक्षण मिळे. रियासतकार सरदेसाई बडोद्यातच संशोधन करीत. त्यांना महाराजांचा सक्रीय पाठिंबा होता. याच सरदेसायी यांच्या पुतण्याला श्रीनिवासला माधवराव पुढे भगवत्गीता शिकवायला जात. अरविंदबाबू सारखे राष्ट्रीय वृत्तीचे तत्ववेत्ते बडोदा

विश्वविद्यालयातील उपप्राचार्यपद भूषवीत होते.

गायन, वादन, खेळ, शिक्षण केव्हा सुचतं, पोटाची खळगी भरल्यावर ना! गरीबांबद्दल कळवळा असणाऱ्या या उदार राजाने आपल्या संस्थानात कुणी उपाशी राहू नये या हेतूने डाळ-तांदळाची कच्ची खिचडी गरजूंना रोज फुकट द्यायला सुरुवात केली. दान करावे पण ते सत्पात्री याचा अनुभव सयाजी महाराजांना यायचा होता. गरजूंबरोबर फुकट मिळतंय, मग का घेऊ नये, असा विचार करून चांगल्या सुस्थितीतील प्रजेने त्याचा गैरफायदा ऊठवायला सुरूवात केली. इतकंच नव्हे तर ही कोरडी खिचडी विकायचा धंदा सुरू केला. सयाजी महाराजांच्या कानावर हा गैरव्यवहार आला आणि खिचडी बंद झाली. ओल्याबरोबर सुकं जळालं.

आरळ्याला नकार मिळून बडोद्याला येण्याची बुद्धि आमच्या आजीला झाली हा फार मोठा सुयोग पुढील आयुष्यात ठरला. नाही तर हे दोघे भाऊ नांगर ओढीत शेती करीत आरळ्यात राहिले असते. पण ह्या बडोद्यात माझे वडील दादा ऊर्फ माधवराव व काका ऊर्फ केशवराव यांना जिवाभावाचे मित्र मिळायचे होते. शिक्षणाचे संस्कार ह्या शहरात त्यांच्यावर व्हायचे होते. संस्कारक्षम वय असल्याने देशासाठी अबोल त्याग करण्याच्या मनोभूमीची मशागत विनोबाजींच्या त्या वेळेच्या विनूच्या सहवासात इथे व्हायची होती. प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या विनोबाजींचा कायमचा ठसा इथे बडोद्यातच दादांच्या बालपणी त्यांच्या हृदयावर ऊमटला.

"अवघे विश्वचि माझे घर" हे म्हणणं सोपं आहे पण तसं वागणं म्हणजे तारेवरची कसरत. परिस्थितीने ज्यावेळी आपल्या नातेवाईकांकडे नाईलाजाने राहावं लागतं त्यावेळी स्वाभिमानी पण अगतिक झालेल्यांना ते किती मनाला डागण्या देणारे ठरतं, ते त्या परिस्थितीतून गेलेल्यांनाच कळेल. एक एक दिवस ढकलणं म्हणजे एक एक युग पार करणं याची प्रचिती आमच्या आजीला येथे आली. मुलांच्या मावशांच्या आधाराने दिवस निघतील या आशेने आजी बडोद्याला बहिणीकडे आली. काही दिवस बरे गेले. मावशी स्वयंपाक करतांना भाजी, आमटीमध्ये गुळ घालायला लागली की मुलं काही वेळा मावशीच्या भोवती भोवती घोटाळायची. गुळाचा खडा खायला मागायची. लहान मुलंच ती! काही दिवसांनी मावशी चिडून म्हणाली, "रोज गूळ कसला खायला मागायचा, ही तर भिकेची लक्षणं आहेत". हे मावशीचं करवादणं आजीच्या कानावर गेलं. फार वाईट वाटलं. साधा गुळाचा खडा तो काय, आणि त्यासाठी जर इतकं बोलणं ऐकून घ्यावं लागलं तर इथे कसं काय निभणार! गप्प बसली, पण विचारचक्र चालू होतं.

या मुलांची दुसरी मावशी बडोद्यालाच महंमदवाडीत राहत होती --बाई मावशी खुर्चीकर. या मावशीचे यजमान बाळासाहेब खुर्चीकर तसं बडोद्यातील बडं प्रस्थ होतं. असं म्हणतात की, महंमदवाडी त्यांच्या मालकीची होती. तेथील दत्त मंदिर जे आजही तेथे आहे, ते त्यांचं होतं. या दत्त मंदिराचं दादांना फार प्रेम. बडोद्याला गेले आणि

दत्त मंदिरी गेले नाहीत असं कधी झालं नाही. बडोद्यातील नातेवाईक गोळा करून दत्त मंदिरात प्रसाद करणं ही त्यांची वहिवाट होती. बाळासाहेब खुर्चीकर दादांच्या मावशीचे यजमान, सयाजी महाराजांच्या दरबारचे एक मानकरी होते. दरबार भरे त्यावेळी दरबारी सजवलेला घोडा त्यांच्या दाराशी त्यांना न्यायला येई. पण या वैभवात एक उणीव होती. त्यांना मूलबाळ नव्हते. या जोडप्याने राधाबाईंना आधार दिला. राधाबाई ऊर्फ चंदू आपल्या बहिणीच्या आश्रयाला आली. मुलं हळूहळू मोठी होऊ लागली. राम-लक्ष्मणाच्या जोडीप्रमाणे. ही राम-लक्ष्मणाची जोडी शेवटपर्यंत अभंग राहिली. दादांच्या प्रत्येक कामात काका त्यांना मूकपणे साथ देत. कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे ऊभे राहत. त्याचप्रमाणे दादांनी मी मोठा आहे, धाकट्या भावचं मला करायला हवं याचा विसर पडू दिला नाही. कपडा, खायच्या वस्तू काही असलं तरी सांगत, "मला नको, आधी केशवला द्या." डोक्याला त्रास झाला की, एकटे शंकराच्या देवळात जाऊन बसत. या त्यांच्या समजूतदारपणाने आजीचं मायेचं झुकतं माप नेहमी दादांना मिळे. दादांच्यावर आजीचा पूर्ण विश्वास असे.

"माझी दोन मुलं म्हणजे माझे दोन डोळे आहेत."

या बाई मावशीचा ओढा आमच्या काकांकडे जास्त होता. आंघोळ घालण्यापासून सगळं स्वतः करण्याचा ती प्रयत्न करी. बाई मावशीच्या मनांत हळूहळू एक आशा मूळ धरू लागली. आपल्याला मूलबाळ नाही. चंदूला–आपल्या धाकट्या बहिणीला चंद्रभागेला ती चंदू म्हणे–दोन मुलगे आहेत. त्यातला तिच्या धाकट्या मुलाला केशवला दत्तक घेतलं तर! दोघांचं हित होईल. चंदूचा बोजा कमी होईल. आपला निपुत्रिकपणाचा डाग जाऊन इस्टेटीला वारस मिळेल. नाही तरी केशवला आपला लळा आहेच. मावशी आणि आई. नात्यात काय फारसा फरक पडणार आहे. हळूहळू बाई मावशीने विचार पक्का करून चंदूच्या कानावर घातला. आधीच अडलेली. त्यातून ह्या बहिणीने ऐन अडचणीच्या वेळी मदतीचा हात दिला आहे. अशा वेळी कसं वागावं हे चंदूला सूचेना. बाई मावशी धाकट्या मुलाला दत्तक घेणार हे वृत्त इतरत्र पसरले. या मंडळींनी चंदूला एकीकडे गाठून सल्ला दिला. हे बघ, निपुत्रिकाच्या घरी मुलगा दत्तक देण्यापूर्वी विचार कर बरं! ही दोन मुलं तुझा आधार. हीच मुलं उद्या तुझे पांग फेडतील. ही दोन मुलं म्हणजे तुझे दोन डोळे आहेत. हेही दिवस निघून जातील. हे पुढे तंतोतंत खरे ठरले. दोन्ही मुलांनी आजीला सुखासमाधानाचे, स्वास्थ्याचे दिवस दाखवले. तिचं मन सांभाळलं. आजीला सल्ला मानवला आणि दत्तक योजना बारगळली. ही दत्तक योजना बारगळण्याचं दुसरंही एक कारण होतं. दत्तक विधानाचा ज्यावेळी विचार चालला होता तेव्हा आजीने बाई मावशीला केशवच्या शिक्षणाचं काय करणार म्हणून विचारल्यावर तिने उत्तर दिले की, शिक्षणाची आवश्यकता नाही. घरी गडगंज आहे. बसून चार पिढ्यांनी खाल्लं तरी सरणार नाही. शिकून

काय करायचं. हे बहिणीचे मत ऐकलं मात्र, चंदूने केशवला दत्तक न देण्याचं पक्कं ठरवून टाकलं. इतक्या बिकट परिस्थितीतही तिला आयतं बसून खाण्याची कल्पना रुचली नाही. विद्या धन हे असे धन आहे की, ते चोरून चोरलं जाणार नाही, देऊन सरणार नाही, ऊलट वाढेल याची तिला जाणीव होती. शिक्षणासाठी तिचा आटापिटा असे. मुलांना परिक्षेसाठी दुसरीकडे राहावे लागले तर ती स्वतः त्यांचेबरोबर जाई. स्टोव्ह, शिधा या साधनसामुग्रीसकट. स्वतःच्या हाताने स्वयंपाक करून मुलांना वेळेवर खाऊ घाली. मुलांच्या खाण्या-पिण्याचे हाल होऊ नयेत, परीक्षेवर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये यासाठी ती जागरूक राही. मुलंही त्याचं चीज करीत.

नाही म्हटलं तरी थोडीशी रुखरुख, थोडासा किंतु या दत्तक प्रकरणाने काही काळ दोघी बहिणींच्या मनात राहिला. चंदूने आपल्या मोठ्या बहिणीला, मुख्य म्हणजे मेहुण्यांना बाळा साहेबांना न दुखवता गोडीने वेगळं बिऱ्हाड केलं. रावपुऱ्यात सरकारी छापखान्यामागील शिर्के यांचे वाड्यात. म्हटलं तर दोघांच्या आधाराने, म्हटलं तर अलग, ह्या खंबीर विधवेने न डगमगता या लहान मुलांना कसं वाढवलं ते तिचं तिलाच माहीत. घरात मिळवतं कुणी नाही, दोन शिकणारी मुलं. पण रडत बसली नाही. बाई मावशीचे पूर्ण लक्ष यांच्यावर असे. काही तरी निमित्त काढून ती आपल्या यजमानांना चंदूकडे पाठवी. "चंदू उद्या जेवायला मुलांना घेऊन ये" असे बोलावणे नेहमी येई. मावशीकडे केव्हाही जायला मुलं खुश असत.

## विनूचें सप्तर्षी मंडळ

### विनू-विनायक भावेचे विद्यार्थी मंडळ

दोन्ही भावांचं पुढील शिक्षण बडोद्याला व्हायचं होतं. सूरसागरावर असलेल्या महाराणी चिमणाबाई हायस्कूलमध्ये दादा जाऊ लागले व तेथून बडोदा हायस्कूलमध्ये. ह्या बडोदा हायस्कूलमध्ये विनायक भावे, द्वारकानाथ हरकारे एकाच दिवशी १९१० साली दाखल झाले. इथेच बाबाजी मोघे, गोपाळ काळे, द्वारकानाथ हरकारे, विनायक भावे, रघुनाथ धोत्रे, माधव देशपांडे, अभ्यंकर हे मित्र मंडळ जमले. क्रिकेटपटू त्यात परांजपे, द्वारकानाथ लेले, शंकर तगारे सामील झाले. या मित्रांनी, एक मित्र सोडून विनोबांना शेवटपर्यंत सक्रिय साथ दिली. या मित्रमंडळाचे पुढे १९१२ मध्ये विद्यार्थी मंडळात रूपान्तर झाले. विनोबांच्या ऋषितुल्य साध्या राहणीचा परिणाम म्हणूनच की काय त्यांचे हे सच्चे मित्र साधे, निगर्वी आणि प्रसिद्धीच्या झोतांतून स्वतःस दूर ठेवणारे निघाले. प्रसिद्धीच काही वेळा त्यांच्यामागे अनुनय करायला आली.

गोपाळराव काळे, ज्यांना विनोबाजी गमतीने गोप्या म्हणत ते दादांचे त्यांच्या आयुष्याच्या अंतापर्यंत जवळचे मित्र राहिले. नागपूरचे अन्नमंत्री होऊनही त्यांच्या सरळ स्वभावात फरक पडला नाही. आमच्या कुटुंबियातील ते एक आहेत असं आम्हाला वाटे. आम्हा

भावंडांचे ते काळे काका होते. त्यांच्या पत्नी त्या आमच्या शांताताई होत्या. विनोबांच्या मित्र मंडळातील साबरमती आश्रमात जाणारे हे पहिले जोडपे. गांधीजींच्या आश्रमात जाणाऱ्या शांताताई या पहिल्या महिला. गोपाळराव वादविवादपटु होते. आपला मुद्दा कधी सोडीत नसत. नेहमी बचावात्मक पवित्रा असे. अेल्. अेल्. बी. होते ना ते! दुसरे मित्र म्हणजे बाबाजी मोघे. सर्व मित्रांत वडील. विनोबांवर पूर्ण विश्वास, श्रद्धा ठेवणारे. फार बुद्धिमान नाहीत पण मेहनती, चिकाटीने काम करणारे. इतर मित्रांचे बोलणे, वाद, चर्चा, श्रोत्याची भूमिका घेऊन ऐकण्याचे काम ते करीत. हेही दादांचे शेवट-पर्यंत मित्र तर राहिलेच पण पुढे त्यांचे व्याही झाले. दादांनी आपली मोठी मुलगी शान्ता त्यांच्या मुलाला विनायकला देऊन मैत्री दृढ केली. हे व्याही-व्याही दादा व बाबाजी मोघे अनेक वेळा एकत्र प्रवास करीत. प्रवासाची सर्व व्यवस्था दादा करीत. बाबाजींचे अंथरूण घालून देणे, पाय दाबून देणेसुद्धा त्यांत अंतर्भूत असे. आपल्या मुलीचे सासरे म्हणून नाही तर वडिलधारे म्हणून. बाबाजी नेहमी म्हणत, "माझा विठोबा बरोबर असल्यावर मला कसली काळजी ?"

विनोबांच्या ह्या विद्यार्थी मंडळामुळे आणखी एका मित्राचा दादांना लाभ झाला. तो मित्र म्हणजे द्वारकानाथ लेले. खरं पाहिलं तर माझे काका केशवराव, द्वारकानाथजी आणि आबा उर्फ शिवाजी महाराज भावे विनोबांचे धाकटे बंधू हे वर्ग मित्र. तिघांचे अगदी मेतकूट. पण हे त्रिकूट पुढे कारणपरत्वे फुटले आणि द्वारकानाथजी व दादांचे संघटन वाढले. विशिष्ट कारणाने जवळ येणारी माणसं दूर जातात तर दूर वाटणारी माणसं जवळ येतात. याचा अर्थ जिव्हाळा कमी होतो असा नाही. नवे व्याप, नवी व्यवधानं मागे लागली किंवा लावून घेतली की हे सर्व अपरिहार्य ठरतं. खादी ग्रामोद्योगाच्या कामासाठी द्वारकानाथजी जवळ जवळ १८ वर्षे मुंबईला येत होते. अनेक वेळा ते वान्द्र्याला दादांना भेटायला येत. काका तळ मजल्यावर तर दादा पहिल्या मजल्यावर रहात. द्वारकानाथजी ओटीवरून सटकत व वर येत. दादा नसले तर बाईशी, आईला आम्ही बाई म्हणतो, मोकळे-पणाने बोलत ओटीवर बसलेली चष्माधारी, खादीच्या कपड्यांवर खादीची शाल पांघरलेली त्यांची गोरीपान देखणी मूर्ति, माझ्या डोळ्यासमोर अजून जशीच्या तशी आहे. द्वारका-नाथजी दादांच्या आईला चांगले ओळखत. संकटांना न डगमगणारी, मुलांनी शिकावं अशी स्वप्नं पाहणारी आणि ती स्वप्नं सत्यसृष्टीत आणण्यासाठी शिस्तीने, जरबेने वागणारी बाई असं चित्र त्यांच्या डोळ्यासमोर होतं. ह्या शिस्तीच्या धाकाने द्वारकानाथजी दादा-काकांच्या घरी बडोद्याला फारसे गेले नाहीत. पण त्यांना आठवतं की काका मॅट्रिक पास झाल्यावर मित्रमंडळातील सगळ्यांना बोलावून आमरस पुरीचे जेवण आजीने दिले होते. विनोबाजी-सकट सर्व मित्र जेवायला आले होते. विनोबांच्या या विद्यार्थी मंडळात फक्त मानसिक, बौद्धिक वाढ व्हावी याची काळजी घेतली जात होती असे नव्हे तर मुलांनी शारीरिकदृष्ट्या मजबूत, काटक असावे, चिवटपणा अंगी यावा या हेतूने त्यांनी व्यायाम शाळेत जाण्यावर विनोबांचा कटाक्ष असे. त्यांच्या सल्ल्याने द्वारकानाथजी व माधवराव शास्त्री पोळेतील

गजाननराव टिळक यांच्या नारायण गुरू आद्य व्यायाम शाळेत जात. दोघंही अनेक वेळा फरीगदगा खेळल्याचं द्वारकारनाथजीना आठवतं. दादा वारल्याचे जेव्हा द्वारकानाथजींना कळले तेव्हा त्यांना भरून आले. विनोबाजी नेहमी म्हणत, 'We are seven' त्या सप्तर्षींतील एक एक गळून पडला. "आम्ही आता दोघंच राहिलो. मी आणि हरकारे" असं ते म्हणाले.

आणखी एक मित्र दादांना ह्या विद्यार्थी मंडळातून मिळाला. रघुनाथ धोत्रे. ह्या धोत्रेचा टापटीपीचा हिशोबी, म्हणून बोलबाला होता. दादा शालेय शिक्षण संपवून कलाशाखेचा अभ्यास करीत होते त्यावेळची गोष्ट. रघुनाथ उर्फ भाई धोत्रेंच्या बहिणीचे लग्न ठरले. मित्राच्या बहिणीचे लग्न म्हणून कार्यक्रमाला लेलेजी, दादा वगैरे विद्यार्थी मंडळातील सर्व होतकरू मुलें हजर होती. वाङ्‌निश्चयाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. वधूच्या व वराच्या गोत्राचा उच्चार गुरुज़ींनी केला आणि निमंत्रितांच्या लक्षात आले की वधु-वरांचे गोत्र एकच आहे. जवळ जवळ ६०-६५ वर्षापूर्वीचा काळ, सगोत्रीय विवाह त्यावेळी समाजाला संमत नव्हता. कायदेशीरही नव्हता. एकच गोंधळ माजला. लग्न मोडले, हळद लागलेल्या मुलीशी आता कोण लग्न करणार ह्या धसक्याने भाईना सणसणून ताप भरला. ह्या पेचप्रसंगातून सुटका होण्यासाठी लग्नासाठी जमलेल्यापैकी चाणाक्ष मंडळी मांडवातच होतकरु योग्य मुलगा शोधू लागली. त्याच मुहुर्तावर मुलीचे लग्न लागल्यास बरे म्हणून. त्यांच्या नजरेत माधव देशपांडे हा तरूण, होतकरू शिकलेला मुलगा भरला. सर्वजण त्याला त्या मुलीशी लग्न करण्याचा आग्रह करू लागली, गळ घालू लागली. पण, त्या तरुणाने मित्र प्रेम, प्रसंगाची निकड हे असतानाही नम्रपणे ठाम नकार दिला. कारण हा संबंध आईला पटणारा नव्हता आणि आईचे मन मोडण त्या तरुणाला पटणारे नव्हते. पुढे त्या मुलीचे लग्न सरस ठिकाणी झाले हा भाग वेगळा.

या भाई धोत्रे यांचे भाई हे नाव इतकं प्रचारात आलं की, त्याचं रघुनाथ हे नाव अनेकांच्या विस्मृतीत दाखल झाले. ह्या भाईनी आपल्या एका मित्राला विद्यार्थी मंडळात दाखल करून घेतलं. हा मित्र म्हणजे आताचे डॉ. द्वारकानाथजी हरकारे. द्वारकानाथजींना व्याख्यानं, चर्चा, पूर्वपक्ष उत्तर पक्ष करणे यापेक्षा व्यायामात जास्त रस होता. हे विद्यार्थी मंडळात त्यामानाने उशीरा दाखल झाले. तोपर्यंत विद्यार्थी मंडळाला शिस्त आली होती. दर रविवारी व्याख्याने होत. मंडळाने स्वत:साठी जागा घेतली होती, वाचनालय काढले होते, तेही ज्याने त्याने आपापल्या घरची पुस्तकं मासिक वाचनालयासाठी आणून टाकून घरोघरी फिरून पुस्तकं, मासिकं गोळा करून. एकही पै खर्च न करता. गणपती उत्सवात विनोबा भावे यांचे व्याख्यान होते. विषय होता 'मृत जीवन व जीवंत मृत्यू' मित्रामित्रात बोलणं चाललं होतं, 'अरे द्वारकानाथ, तो भावे काय सुंदर बोलतो. विषयही चांगला आहे. आमचं विद्यार्थी मंडळ ऐकायला जाणार आहे. तू येऊन तर बघ,' रघुनाथच्या मित्राच्या आग्रहाने द्वारकानाथने व्याख्यान ऐकले व प्रभावित होऊन विद्यार्थी मंडळात दाखल झाले १९१६ साली. विनोबांच्या मित्रांपैकी त्यांच्याबरोबर साबरमती आश्रमात प्रथम दाखल होणारे हेच द्वारकानाथजी हरकारे. १९१९ साली. हे द्वारकानाथजी

बडोद्याला सिद्धबेटी रहात. विश्वामित्री नदीच्या काठी गंगनाथाचे शंकराचे देऊळ आहे. त्या नावाने काढलेल्या गंगनाथ विद्यालयात शिकत. हे गंगनाथ विद्यालय राष्ट्रीय बाण्याचे होते. अरविंद बाबू घोषांच्या पुढाकाराने ही शाळा निघाली होती. काका कालेलकर, मामा फडके यांची या शाळेला मदत होई. द्वारकानाथजी हरकारे यांचे वडील राष्ट्रीय वृत्तीचे असल्याने त्यांनी आपल्या मुलाला या शाळेत दाखल केले होते. पण पुढे जहाल क्रांतिकारक बीरेन्द्र घोष आले आणि ही शाळा बंद पडली. इंग्रज सरकारला भीती पडली, ह्या शाळेत तयार झालेले क्रान्तिकारक आपल्या विरोधात उभे राहतील आणि लवकरच भारतातील गाशा आपल्याला गुंडाळावा लागेल. सयाजी महाराज इंग्रजांचे मांडलिक होते तरी इंग्रज सरकारची फारशी पर्वा न करता राष्ट्रीय शाळांना, व्यायाम शाळांना खूप मदत करीत. भारतांबद्दल, भारतीयाबद्दल त्यांना कळकळ होती. लह्रीपुऱ्यावर बडोद्याच्या केन्द्रबिंदूवर भगवा झेंडा ते निर्धास्तपणे फडकवीत ठेवीत, मराठ्यांच्या जाज्वल्य इतिहासाची याद बडोदेकरांनी विसरू नये या हेतुने. तरी त्यांना राष्ट्रीय वृत्तीने भारलेल्यांना उघड उघड पाठिंबा देता येत नसे. ब्रिटिश सरकारच्या दडपणाने गंगनाथ शाळा बंद पडली पण व्यायाम शाळा चालू राहिली. एके दिवशी गंगनाथाच्या शंकराच्या देवळात ही विद्यार्थी मंडळाची १५–२० मुलं जमली. अरविंदबाबू घोष त्यावेळचे बडोदा कॉलेजचे उपप्राचार्य. यांचा या मुलांना पाठिंबा असे, मार्गदर्शन असे. त्यांच्या उपस्थितीत शंकरासमोर देशसेवेची प्रतिज्ञा घ्यावी असे ठरले. या प्रसंगासाठी सयाजी महाराजांना खास आमंत्रण करावे अशी सूचना आली. विनायक भावे, गोपाळ काळे, द्वारकानाथ हरकारे, रघुनाथ धोत्रे, माधव देशपांडे, अभ्यंकर, शंकर तगोरे वगैरेनी पाठिंबा दिला. आमंत्रण गेले आणि सयाजी महाराजांनी यायचे कबूल केले. मुलांनी ही गोष्ट अरविंदबाबूंच्या कानावर घातली. अरविंदबाबूंनी मुलांची समजूत घातली, पटवून दिलं. सांगितलं की, " महाराज, आपले राजे, मी त्यांचा नोकर. मी या प्रसंगी हजर राहणं दोघांना गैरसोयीचे होईल. महाराज येणार हे स्वागतार्ह आहे ". सयाजी महाराज, कबूल केल्याप्रमाणे आले. गंगनाथाच्या साक्षीने महाराजांच्या उपस्थितीत मुलांनी शपथ घेतली. सर्वप्रथम देशाचा विचार करण्याची, कुठल्याही प्रकारच्या त्यागात मागे न सरण्याची. या विद्यार्थी मंडळाच्या मुलांना महाराजांनी सांगितलं, " पोरांनो, आता तुम्ही देशसेवाच करायची आहे. इकडे तिकडे कुठे जायच नाही. कुठे लक्ष ठेवायचे नाही. " ही हकीकत श्री. हरकारे यांच्या तोंडून ऐकतांना मला शिवाजी महाराज व त्यांच्या मावळ्यांनी रोहिडेश्वराच्या शंकराच्या देवळात ३०० वर्षापूर्वी घेतलेल्या शपथेच्या ऐतिहासीक प्रसंगाची आठवण झाली. वाटले, —त्या मानाने हा नवा प्रसंग—साधारण ७० वर्षापूर्वीचा. इतिहासात नोंद न होता काळाच्या उदरात गडप तर होणार नाही ना ! ह्या घटनेचे साक्षीदार आता जगात जवळ जवळ नसल्यातच जमा आहेत.

ह्याच विद्यार्थी मंडळाच्या मुलांनी १९१६ च्या सुमारास विश्वामित्री नदीवरील पूल बांधला. श्रमदानाने पुलाच्या कामातील तज्ञ महाराजांनी दिला. बाकी सगळी मेहनत

मुलांची, सध्या पूल कोसळणे--तेही १२-१५ वर्षाच्या अल्पावधीत, क्वचित बांधकाम चालू असतांना या अंगचोरपणा, लाचलुचपतीमुळे घडलेल्या दुर्घटना नित्य कानावर येत असता, ताठपणे उभा असलेला ७० वर्षापूर्वीचा विश्वामित्री नदीवरील बडोद्याचा पूल कौतुकास्पद वाटतो. ह्या काळात पुलाने किती पूर पाहिले. अंगावरून पाणी वाहू देऊन परत आपला स्थितप्रज्ञासारखा हा उभा !

पुढे १९१९ मध्ये बडोद्याचा व विद्यार्थी मंडळाचा ऋणानुबंध संपला. या मुलांना आकर्षून घेणारा त्यांचा सूर्यासारखा प्रखर बुद्धिमत्तेचा मित्र, गुरू, मार्गदर्शक विनू–विनोबा बडोदा सोडून निघून गेला. विद्यार्थी मंडळातील मित्र पांगले. या मित्रांचे कार्यक्षेत्र जरी अलग झाले तरी बडोद्याला मिळालेली शिदोरी त्यांना जन्मभर पुरली. विनोबांचे ते जसे शेवटपर्यन्त जिव्हाळयाचे मित्र राहिले तसे त्यांचे सच्चे पाईक होऊन त्यांच्या हाकेला ओ देऊन कार्यात सहभागी झाले. कुणीही देशसेवेच्या शपथेशी प्रतारणा केली नाही. सत्ता, संपत्ती यांच्या जीवघेण्या रस्सीखेचीत भाग घेतला नाही. निष्ठा विकली नाही. भारताला स्वतंत्रता मिळाल्यावर झगझगाटाच्या चालू जगात मानमरातबाच्या मागे न धावता विधायक कार्य करीत एखाद्या पणतीप्रमाणे तेवत राहिले. प्रसंगोपात दूर राहिले. पण जुळलेला स्नेहबंध कायम टिकवला. गोपाळराव काळे, बाबाजी मोघे, द्वारकानाथजी हरकारे, द्वारकानाथजी लेले, भाओ धोत्रे ही मंडळी नागपूर, वर्धा, सेवाग्राम, पवनार या ठिकाणी काम करू लागली. आश्रमवासी झाली तर दादांनी मुंबई व त्यांचे मूळ गांव आरळे ही कर्मभूमि निवडली.

बाबाजी मोघ्यांचं लग्न झालं होतं १९२० साली. सगळा प्रपंच वाऱ्यावर सोडून नव्हे तर बायको, तीन मुलांचा सगळा भार आपल्या वृद्ध वडिलांच्या वाकलेल्या खांद्यावर टाकून ते आश्रमांत निघून गेले. अंताजी पंताना, त्यांच्या वडिलांना सून आणि तीन नातवंडांसाठी नबाबाच्या मुनीमाची नोकरी करावी लागली. ते उठल्या बसल्या महात्माजींचा, विनोबांचा उध्दार करीत. या नबाबाकडे जटाशंकर नावाचा दुसरा एक मुनीम काम करी. पुढे १९३८ मध्ये अंताजीपंत वारल्यावर या जटाशंकरने मोघ्यांच्या घरी येऊन सगळे जुने कागदपत्र मागून नेले. कागदपत्रं नेतांना सांगितलं की, काही येणं असलं तर ते पैसे मी तुम्हाला नबाबाकडून देववतो. काही दिवस गेले. नबाबाकडून मोघे यांचे घरी नोटीस आली. आम्ही तुमचं काही देण लागत नाही. उलट उचल केलेल्या तिनशे रुपयांचा तुम्ही तावडतोब भरणा करा. सगळी सुन्न झाली. १९३७-३८ सालची गोष्ट. बाबाजींनी आश्रमातून मुंबईला दादांना पत्र पाठवून खरं काय आहे ते बघायला सांगितलं. दादा त्यावेळी नाव कमवून असलेले खंदे वकील होते. या कामासाठी ते खास बडोद्याला गेले. घरातील उरलेसुरले कागदपत्र चाळले आणि नबाबालाच उलट नोटीस पाठवली.

"मोघे तुमचं काही देणं लागत नाहीत उलट तुम्हीच तुमच्याकडील बाकी असलेले पैसे तावडतोब पाठवून द्यावेत" त्यावेळी दादांचे व बाबाजींचे निव्वळ मित्रत्वाचे नाते होते. व्याही नंतर झाले. आपला निष्णात वकिली सल्ला विनामूल्य देऊन, प्रसंगी पदरमोड

करून अनेकांना वैयक्तिकरीत्या दादांनी अशी मदत केली आहे. याच मोघे कुटुंबियांवर घरातील एकमेव मिळवते अंताजी पंत वारल्यावर घरातील दागिने विकण्याची वेळ आली. तराजुने मोजण्याइतके, तोलण्याइतके दागिने होते. बाबाजींनी घरी पत्र पाठवले. सांगितले, "माधवरावांच्या सल्ल्याने सर्व व्यवहार करावा." दादा परत बडोद्याला गेले. दागिने विकून दिले. त्या दागिन्यात अेक बाळलेणं होतं—वाघनख—ते बाजूला काढून ठेवायला मोघ्यांच्या मडळींना सांगितलं. "बाळ लेण विकू नये", सल्ला दिला. बाळलेणं घरात राहील आणि योगायोग बघा, काय होता तेच वाघनख पुढे त्यांच्या आणि मोघ्यांच्या नातवाच्या अनीलच्या गळयांत बारशाच्या दिवशी घातलं गेलं. वाघनखं जुनी आठवण म्हणून मी जपून ठेवलं आणि त्यांच्या पणतवाच्या चैतन्याच्या गळयांत बारशाच्या दिवशी घातलं. जवळ जवळ ५० वर्षांनी. बाबाजींनी आश्रमीय आयुष्य एकदा जे पत्करलं ते शेवटपर्यंत निभवलं. त्यांचे निर्वाण पवनारला झाले त्यांच्या बाल मित्राच्या विनोबांच्या सान्निध्यात.

गोपाळराव काळे सहकुटुंब आश्रमात आले. घरचा कडवा विरोध पत्करून. वकिलीची परीक्षा पास झाल्यावर. खरं पाहिलं तर गोपाळरावांची घरची मंडळी शांत, सात्विक वृत्तींची. पण वकील झाल्यावर मुलगा घरादारावर तुळशीपत्र ठेऊन आश्रमात जातो हे त्यांना सोसलं नाही. घरच्यांनी शान्ताबाईंना त्यांच्या पत्नीला सांगितले, "नवऱ्यामागे आश्रमात जायचं आहे तर खुशाल जा, पण अंगावरचे दागिने तेवढे जाण्याआधी उतरवून ठेवा". त्याही लंकेची पार्वती होऊन नवऱ्यामागोमाग आश्रमात गेल्या. पहिल्या आश्रमवासी महिला त्या नेहमी वान्द्र्याला आमच्याकडे येत. आश्रमातील गंमतीजमती सांगत. भाओ धोत्रे यांच्या घरी विरोधाचा फारसा प्रश्न नव्हता. ते आश्रमात सपत्निक गेले. शरयूताई अुर्फ आक्का व भाओ यांनी हा काट्याकुट्याचा मार्ग स्वेच्छेने पत्करला, शेवटपर्यंत निभवला. द्वारकानाथजी लेले, त्याच्या सुविद्य पत्नी कमूताई यांनी सिध्द करून दाखवले की, घतले व्रत नाही आम्ही अंधतेने'. सतीचे वाण घेऊन नवऱ्याबरोबर आश्रमीय जीवन जगणाऱ्या शान्ताताई, शरयूताई काय किंवा कमूताई काय, सर्वांनी आत्मीयतेने स्वतंत्र्य लढ्यात भाग घेतला. जंगल सत्याग्रहापासून ते ४२ च्या अखेरच्या लढ्यापर्यन्त अनेकवेळा कारावास भोगला. द्वारकानाथजी हरकारे ब्रह्मचारी राहिले. विनोबाजी गणिती डोक्याचे, भाषाप्रभु, श्रेष्ठ तत्वचिंतक. त्यांचे दोन्ही भाऊ—शिवाजी महाराज उर्फ आबा, बाळकोबा मोठ्या भावाच्या पावलावर पाऊल ठेऊन आजन्म ब्रह्मचारी राहिले.

गोपाळराव काळे अन्न मंत्री होते तर दादा आमदार. मनांत आणलं असंत तर जन्माचं "कल्याण" होईल इतका पैसा त्यांनी संग्रही ठेवला असता. पण अशा मार्गाल दाराने येणाऱ्या लक्ष्मीकडे त्यांनी निर्धाराने पाठ फिरवली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या बदलत्या परिस्थितीचे चटके सोसले.

दादांनी लग्न केले. प्रपंच केला. पण कमलपत्राप्रमाणे प्रपंचापासून अलिप्त राहून, उदासीन राहून, एखाद्या साधकाप्रमाणे. घरच्या अडचणीसाठी ते कधी गुंतून राहिले

नाहीत. दादांची ओळख करून देताना विनोबा सांगत, 'हा माझा भोळा, भाविक, व्यवहार चतुर मित्र'. दादा घर सोडून आश्रमात गेले नाहीत. पण मी, माझी बायको आणि मुलं अशा संकुचित वृत्तीने वागावं असं त्यांच्या स्वप्नातही आलं नाही. आमचं वान्द्रयाचं घर म्हणजे आश्रम व गृहस्थाश्रम याचं मजेदार मिश्रण होतं. आश्रमवासीयांची, आरळे गावाकडील माणसांची, साधूबैराग्याची सतत वर्दळ आमच्या घरात चाले. आश्रमवासीयांचे नियम, त्यांची व्रतं, गाईचंच दूध, तूप, हातसडीचे तांदूळ, घरी दळलेलं पीठ, बिनमिठाच्या, बिनफोडणीच्या भाज्या, अशाप्रकारचे सगळे नियम साग्रसंगीत त्यांच्यासाठी पाळले जात. वेळी अवेळी पाहुणे येत. हॉटेलमध्ये मुक्काम करून जेऊन खाऊन भेटायला येण्याची ५०-६० वर्षांपूर्वी पद्धत नव्हती. त्यासाठी खर्च करायला लोकांकडे पैसाही नव्हता. दादा घरी नसले तरी पाहुण्यांना संकोच वाटत नसे. त्यामुळे आमचे आम्ही जेवलो असं क्वचित घडे. दादांचा बाहेरचा कार्यक्रम, त्यांचे सामाजिक, राजकीय कार्यक्षेत्र याबद्दल दादा घरात काही सांगत नसत आणि आम्ही विचारीत नसू. त्यामुळे आम्ही घरची मंडळी त्याबद्दल अंधारात असू. त्याबद्दल विचारण्याची आमच्यात हिंमत नव्हती. आम्हाला त्यांचा दरारा वाटे. मला तर कधी त्यांनी अंगाला बोट लावल नाही. पण पाहुणे जेवायला घरी असले, दादा घरी असले की, जेवतांना त्यांची आपसात चर्चा चाले त्यांतले चार शब्द आमच्या कानी पडत. अंधुकशी कल्पना येई. आमच्या आजीला माणसांचा कंटाळा नव्हता पण आश्रमांतील पाहुणे घरी आले की तिला राग येई. रागापेक्षा तिला भीती वाटे. तिला वाटे की ही आश्रमातील माणसं स्वतः घरदार सोडून त्या गांधी, विनोबाच्या भजनी लागली आहेत, आता माझ्या मुलाला त्यांत खेचू पहात आहेत. हो आश्रमवाल्यांची वर्दळ सतत चालू राहिली तर माझ्या मुलाचे मन पालटेल, तो आश्रमात निघून जाईल. एखादे वेळी म्हणे "माझ्या मुलाला पळवून न्यायला तुम्ही कशाला येता ?" आजीचं बोलणं कुणी मनावर घेत नसत. येणं सोडीत नसत.

१९१९ साली विद्यार्थी मंडळाची समाप्ति झाली. त्यानंतर काही दिवस दादा बडोद्याला होते. कॉलेजला जात होते. वाडीतून बडोदा कॉलेजला जायला जवळ जवळ ६०-७० मिनिटं लागत. दादा अनवाणी अर्धी चड्डी घालून कॉलेजला जात, परिस्थितीने. पण त्याची त्यांना खंत नव्हती. विद्यार्थी मंडळातील मंतरलेल्या दिवसांची ही पुण्याई होती. याच सुमारास दादांचे मुंबईत राहणारे एक काका धोंडोपंत यांची बायको वारली. त्यांना मुलबाळ नव्हतं. मुंबईला गिरगावात विद्यारामजीच्या चाळीत ते एकटे रहात. या भोवताली असलेल्या चाळींच्यामधील प्रांगणात अेक दत्ताचे देऊळ होते. बायको गेल्यावर त्यांना आप्तेष्टांनी सल्ला दिला,"तुम्ही अेकटे राहता,तुमच्याच भावाची मुलं बडोद्याला हालांत दिवस काढीत आहेत. मुलं हुशार, गुणी आहेत. त्यांना तुम्ही का मदत करीत नाही ? त्यांना इथे बोलावून घ्या. तुमची भावजय–राधाबाई बाईमाणूस घरी आल्यामुळे घराला घरपणा येईल. मुलं शिकून मार्गी लागतील." आमच्या आजीला हाच सल्ला देऊन बडोद्याहून मुंबईला यायला प्रवृत्त केलं. बडोद्याच्या दाणापाण्याचा शेर संपून राधाबाई आपल्या मुलांबरोबर

गिरगावात रहायला आली. विद्यारामजीच्या चाळीत. मुलांच्या शिक्षणाचा विचार करून सत्य संकल्पाचा दाता भगवान, धोंडोपंत काकांच्या रूपाने मुलांच्या पाठीशी उभा राहिला.

" मुलं परमेश्वर स्वरूप असतात ".

हे धोंडोपंत काका पोष्टात नोकरी करीत. (Dead Letter Office) खात्यात ते एक अधिकारी होते. विरागी वृत्तीचे अवलिया म्हणून त्यांना परिचीत ओळखीत. बायकोच्या पाठी त्यांचा हा स्वभाव विशेष आणखी वाढला. कुणी काही सांगितलं की भोळ्या स्वभावामुळे त्यांना ते खरं वाटे. कुणीही खऱ्याखोटया अडचणींचा पाढा त्यांच्यापुढे वाचून त्यांचा खिसा हलका करी त्यामुळे घरी येईपर्यंत किती पैसे उरतील याची शाश्वती नसे. लहर लागली तर मिठाई घेऊन येत आणि आपल्या भावजयीला सगळ्या चाळीत ती वाटायला सांगत. मनात आलं तर वेण्यांचा ढीगचा ढीग आणून टाकीत आणि सांगत, " राधाबाई चाळींतल्या सवाष्णींना वेण्या वाटून टाका ". आपल्या विकेशा तरुण भावजयीला वेण्या वाटायला सांगताना तिच्या मनाला त्रास होत असेल असा विचार काही धोंडोपंतांच्या मनात येत नसे. ते ह्या गोष्टी मुद्दाम करीत, असंही नव्हतं. मनात आलं करून मोकळं झालं, असा त्यांचा अेकंदरीत खाक्या होता. पण ह्या स्वभावाचा काही विघ्नसंतोषी शेजारी गैरफायदा घेत. काही बायका धोंडोपंत काकांच्या जेवणाखाणाची चौकशी करीत. राधाबाई खाण्यापिण्याची आबाळ करतात असं मनांत भरवून देत. सांगत, " आम्ही तुम्हाला चांगलं चुंगलं, नीटनेटकं जेवायला घालू. आम्हाला खाणावळ द्या, म्हणजे झालं ". दादांच्या काकांना ते खरं वाटे. घरी येऊन सांगत, " राधाबाई, उद्यापासून मी घरी जेवणार नाही ".

चाळ म्हणजे उघडं बातमीपत्र. लगेच ही बातमी सगळ्या चाळीत कर्णोपकर्णी पसरे. चाळीत कांही विघ्नसंतोषी माणसं होती तशीच काही भली माणसं होती. त्यापैकी डाह्याभाई हे एक शेजारी. बडोदा, डाकोर येथे राहिल्याने आजी व दादा, काकांना अस्खलीत गुजराथी येई त्यामुळे भाषेचा प्रश्न या दोन्ही शेजाऱ्यांत अडसर म्हणून आला नाही. मुलं हुषार, एक मार्गी, शिकणारी म्हणून डाह्याभाईना या कुटुंबाबद्दल आपुलकी वाटे. ते दादांच्या काकाची समजूत काढीत, " ह्या चाळीतल्या बायकांचं मनावर घेऊ नये. घर असतांना बाहेर जेवण गैर आहे ". काकांना ते पटे. घसरू पाहणारी गाडी परत रुळाला लागे. डाह्याभाई धोंडोपंतांना जसं समजावून सांगत, चांगला सल्ला देत त्याचप्रमाणे आजीलाही चार समजुतीच्या, हिताच्या गोष्टी सांगत. चुकत असेल तर चूक निदर्शनास आणून देत. ह्या चाळीतल्या दत्ताच्या देवळात मूर्तीसमोर बसून आजीचं देव देव करणे वाढलं होतं. एकदा दिराला जेवायला वाढलं, ते कामाला निघून गेले की, आजी मोकळी होई. प्रपंचातून मन काढून घेऊन परमेश्वर चिंतनात उरलेलं आयुष्य घालवावं असं काही तरी तिच्या मनांत असेल. तिचा जास्तीत जास्त वेळ देवळात जाई. मुलांची आबाळ होई. मुलांच्या वेळेला स्वयंपाक केला तर केला, नाही तर नाही असं होई. दिरान चौकशी केली, मुलं जेवली कां तर पुरावा असावा म्हणून ती ताटांना वरणभात पुसून ठेवी आणि मुलांची जेवणं झाल्याचे सांगे. दादा कांही खरं खोटं करीत नसत. पण काका काही वेळा

फितूर होत आणि आजीच सगळं बेंड फुटे. ह्या गोष्टी डाह्याभाईच्या लक्षात येत. त्यांनी आजीला बहीण मानले होते. ते आजीला पटवून देत, "मुलांना उपाशी ठेऊन देवाचं करण्याने पुण्य लागत नाही. मुलांमध्ये देव बघावा. त्यांच नेटकं केले म्हणजे देवाला पोचतं. काम करतांना नामस्मरण करावं. त्यासाठी घर सोडून, जबाबदारीपासून पळून जाऊन देवळात जाणं अयोग्य आहे." ही डाह्याभाईची शिकवण आजीने मनोमन मानली, तेव्हा व पुढे उरलेल्या आयुष्यात आजी कर्मठ धार्मिक प्रवृत्तीची होती. तरी रुढीचे, सोवळ्याओवळ्याचे फाजील अवडंबर मुलांच्यापुढे तिने माजवले नाही. मुलांना प्राधान्य दिले जाई. आमच्या घरी सणवार, व्रतवैकल्य, धार्मिक उत्सव, काहीना काही नेहमी चाले. पण देवाला नैवेद्य दाखवल्याशिवाय कुणाला काही खायला द्यायचं नाही, मुलांनी उपाशी शाळेत जायचं असं होत नसे. सगळं साग्रसंगित होईपर्यंत शाळेची वेळ केव्हाच होऊन जाई. गोडाचा पदार्थ आदल्या दिवशी करून वाटेवेगळा ठेवला जाई. पण त्या-पूर्वी तो पदार्थ आजी एका हाताने देवासमोर ठेवी, दुसऱ्या हाताने लाडू, वडी, करंजी जे असेल ते मुलांच्या हातावर ठेवी. दुसऱ्या दिवसाची वाट बघत नसे. ती म्हणे 'मुलांच्यासाठीच तर सगळं करायचं, मग मुलांना नाराज करून कसं समाधान मिळेल"? ह्या डाह्याभाईनी आणखी एक अमोल सल्ला आजीला दिला. पगाराच्या दिवशी धोंडोपंत काका घरी येईपर्यंत त्यांच्या खिशात किती पैसे टिकतील याचा भरवसा नसे. हे डाह्याभाईना माहित होतं. त्यांनी सुचवलं की, राधाबाईनी पोष्टात जाव, सगळी परिस्थिती साहेबाच्या कानी घालावी, साहेबाच्या व दिराच्या संमतीने पगाराची रक्कम ताब्यात घेऊन घरी यावे. पगाराची ही अकारण होणारी लूट थांबवावी. हा व्यवहार्य सल्ला राधाबाईनी मानला. सही करण्यापुरते जेमतेम लिहिता येणारी ही धाडसी विधवा बाई पगाराच्या दिवशी गिरगावातून घोडागाडी करून पोष्टात जाई, दिराचा पगार ताब्यात घेऊन घोडागाडीने परत घरी येई. हात खर्चासाठी लागणारे पैसे दिराला देऊन उरलेल्या पैशांत घर चालवी. धोंडोपंत काकाही मुलांचा अभ्यास, अभ्यासातील प्रगति, खाण्यापिण्याची व्यवस्था या व्यति-रिक्त चौकशी करीत नसत. ह्या विद्यारामाच्या चाळीत डाह्याभाईचे व आजीचे भावा-बहिणीचे नाते जुळले ते शेवटपर्यंत टिकले. विद्यारामजींच्या चाळीत राहणारे देशपांड्यांचे कुटुंब पुढे वान्द्रयाला रहायला गेले. पुढे काही वर्षांनी स्वतःच्या मालकीच्या घरात राहू लागले, मुलं स्वतंत्र व्यवसाय खंबीरपणे चालवू लागली. ह्या सगळ्या उत्कर्षाचे डाह्याभाई एक साक्षीदार होते. आजीला काही खास सल्ला हवा असला तर मुलं कर्तीसवरती झाल्या-वरही ती आपल्या ह्या मानलेल्या भावाला बोलावून घेई. भाऊही अगत्याने येऊन योग्य तो सल्ला देई. माधवराव व केशवराव यांची लग्न झाल्यावरही दर दिवाळीला भाऊ-बिजेच्या दिवशी डाह्याभाई गिरगावातून वान्द्रयाला येत. ओवाळणीचे तबक तयार कर-वून आजी बाजुला बसलेली असे. बाई किंवा काकू त्यांना ओवाळीत. ओवाळणीत घातलेली ओवाळणी आजीच्या स्वाधीन करीत. विधवा बहिणीने भावाला ओवाळणं त्या काळी समाजाला संमत नव्हत, म्हणून हा द्राविडीप्राणायाम करावा लागे. आम्हा मुलांनाही

काळी गोल टोपी घातलेले, घोडागाडीतून येणारे डाह्याभाई अंधुक आठवतात.

ह्या धोंडोपंत काकांचा आधारही दादांना फार दिवस मिळाला नाही. कृष्णाकाठी शांतपणे काही दिवस घालवावे म्हणून गेलेले काका परत आलेच नाहीत. आली ती त्यांच्या निधनाची वार्ता. आपल्या भावजयीची किंवा स्वावलंबी होण्याच्या मार्गावर असलेल्या पुतण्यांची सेवा न घेता. दादा बी. ए. झालेले ऐकण्यापूर्वीच ते गेले. पुनश्च हरिओम्. दादा बुद्धिमान तर होतेच. त्याला मेहनतीची जोड देऊन चांगले यश संपादन करणारे होते. बी. ए. ची परिक्षा दिली आणि नौकरीच्या शोधात त्यांची वणवण सुरू झाली. शेवटी पुण्याजवळील वानवडीला मिलिटरी अकाउंटस् खात्यात दादांना नोकरी मिळाली. १९२२ मध्ये पगार फारसा नव्हता. स्वतःचा खर्च भागवून मुंबईला राहणाऱ्या आईला व शिकणाऱ्या भावाला पैसे पाठवणे आवश्यक होते. पण आता जमेची बाजू सुरू झाली. परावलंबनाचे पर्व संपले होते. मिठभाकरी का होईना, हक्काची होती. विनोबाजींच्या मित्रमंडळातील काही मित्र १९२०-२२ च्या सुमारास घरदार सोडून आश्रमात दाखल झाले होते. घरी असणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांपैकी काही बायकांना पोटासाठी पोळपाट लाटणं हाती घ्यायची वेळ आली. त्याचे जेवण एक बाहेर पडले तरी इतर खर्चाचं काय? अशावेळी स्वतःच्या तुटपुंज्या मिळकतीतून दादा मित्रांच्या कुटुंबियांना जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करीत. स्वतः चणेकुरमुरे खाऊन दिवस काढीत. नोकरीसाठी वानवडी ते पुणे पायी जात येत. तेवढाच वाहन खर्च कमी, असं त्यांना वाटे. त्यांच्या आईच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर तिने आपल्या धाकट्या मुलाला शहानिशा करायला अचानक पुण्याला पाठवले. आपसात मायलेकांनी खर्चाची कशी तोंडमिळवणी केली ते त्यांच त्यांना माहित. पण हा चण्याकुरमुऱ्याचा आहार थांबला. पदवी मिळाल्याने दादांना समाधान नव्हते. एलएल.बी. होऊन वकिली करावी अस त्यांना अंतर्मनात तिव्रतेने वाटे. पुण्याला असतांना ढमढेरे यांचे खानावळीत दादा जेवायला जात. तिथं त्यांना कळलं की शिराळे पेटचांतील हसबनीस नावाचे तरुण गृहस्थ वकिलीच्या अभ्यासासाठी पुण्याला आले आहेत. दादाही शिराळे पेटचातीलच. पत्ता मिळवून, कोण हे हसबनीस म्हणून चौकशी करीत करीत दादा त्यांच्या मुक्कामी गेले तर हे व्यंकटेश उर्फ पिलोबा हसबनीस परिचित निघाले. या व्यंकटेश हसबनिसांचे आजोबा हे बकील होते आणि ते आमच्या आजीचे भाऊबंदकीत अडकून पडलेल्या जमिनीचे वगैरे काम वकिल म्हणून पहात. आजी अशी सहजासहजी हार जाणारी बाई नव्हती. ती आरळचाला कोर्ट कचेऱ्याच्या कामाला जाई त्यावेळी तिचा एक मुक्काम विष्णुपंतांचेकडे शिराळचाला असे. आतासारखी जेवणाची व उतरण्याची आराम-स्थानं गावोगावी ७५ वर्षापूर्वी नव्हती. एखादा अनोळखी पाहुणा जरी गावात आला तरी देवळात उतरे, राही. जेवणाची व्यवस्था एखाद्या प्रतिष्ठिताच्या घरी अवेळी सुद्धा होई. प्रवासाच्या आतासारख्या सुविधा नव्हत्या. रेल्वे, बस, बैलगाडी, घोडा अगर पदयात्रा अशा प्रकारचा प्रवासाचा अनुभव घेत घेत, मुक्काम करीत करीत, मुक्कामाला पोचावे लागे.

आरळ असंच कुग्राम होत. आता मात्र धरणामुळे त्याचा कायापालट झाला आहे. पण १९२०-२१ साली घरदार सोडून 'दूर' आलेल्या या दोघांची रास बघता बघता जुळली. मैत्री जी घट्ट झाली ती शेवटपर्यंत हसबनीस सांगतात की, ते दोघंही भावाभावाप्रमाणे रहात एकदा दादांच्या सहवासात मनुष्य आला की, दादा त्याला सर्व गुणदोषासकट सांभाळीत. गुणांचे कौतूक करीत, दोष पोटात घालीत. वेळेला तापटपणे पटकन बोलत आणि लगेच विसरून जाऊन आपणहून पाठीवर थाप मारून बोलायला जात. दुसरं कुणी बोललं तरी मनावर घेत नसत. खुनशीपणाने सुडबुद्धीने वागणं त्यांच्या स्वभावात बसत नव्हत. त्यामुळे त्यांचा लोकसंग्रह जबरदस्त होता. सगळ्या थरांतली माणसं त्यांच्या या लांबलचक साखळीत दुव्याप्रमाणे गुंफलेली असत. दादा त्यांची पारख करुन त्यांच्याकडून त्यांना जमेल, झेपेल, अशी कामं करवून घेत. कमी पडले तर त्याची भरपाई स्वतः करीत, पैशाने, कष्टाने. पुढे पुढे दादांचा तापटपणाही कमी झाला.

## चांदण्या रात्रीचे पर्वतिभ्रमण

हे दोघे मित्र बऱ्याच वेळा जोडीने फिरायला जात. बोलता बोलता बडोद्यातील दिवसाच्या गोष्टी निघत. बडोद्यात गंगनाथी घेतलेल्या शपथेचा दादांना विसर पडला नव्हता. विनोबांच्या सहवासात उमटलेला देशभक्तीचा ठसा पुसट झाला नव्हता. त्यांच्यात रुजलेलं बीज हळूहळू अंकुरू लागलेलं होतं. मित्रांच्या बोलण्यात हे सर्व प्रतिबिंबित होई. आपलं घर, आपलं कुटुंब अशा संकुचित वृत्तीने वागणे योग्य नाही. सामाजिक ऋण मानल पाहिजे. आपल्या शक्तीचा ज्ञानाचा उपयोग देशासाठी करायला हवा, असे दादा बोलण्याच्या ओघात पिलोबांना सांगत. हसबनीसांच्या मनात सुप्तावस्थेत असलेल्या बीजाला खतपाणी घालून दादांनी एक प्रामाणिक, चिकाटीने काम करणारा निष्ठावंत सहकारी मिळवला. पिलोबा अण्णांच्या स्वभावात आत बाहेर नव्हतं. पिलोबांनी सांगून टाकल, "मला घर सोडून तुरुंगात जाणं काही जमणार नाही, मी मागे राहून होईल ते काम करून तुम्हाला मदत करीन". एके दिवशी चांदणं पडलं आहे, "चला फिरायला जाऊ" म्हणून दादांनी मित्राला बाहेर काढलं. आणि "सार्वजनिक कामात शेवटपर्यंत साथ देईन" अस वचन त्यांच्याकडून घेतलं. वचन दिलं, वचन घेतलं या क्रियेपेक्षा वचन पाळलं हे जास्त आदरणीय नाही का, नुसत्या शाब्दिक फुलोऱ्याने माणसं काही काळ भुलतात पण निकट सहवासानंतर संबंध टिकवू शकत नाहीत. पुढे १९३५ पासून शिराळा पेट्यातील अनेक भरीव काम दोघांनी जोडीने केली. विशेषतः शिक्षण क्षेत्रात शाळांचं जाळ पसरून. त्याचप्रमाणे ग्रामोद्योग, गृहोद्योग, मधुमक्षिका पालन, सूतकताई, हातसाडीची केंद्र यासारख्या योजना खेडोपाडी राबवून दादांनी पुणं सोडलं, मुंबईला जाण्यासाठी. पण मित्राचे मन वळवून त्यालाही आपल्याबरोबर मुंबईला यायला लावलं. वकिलीचा अभ्यास करण्यासाठी मुंबईला राहणं, जेवणं, अभ्यास या सगळ्याची सोय करण्याची हमी घेऊन ही पुण्याची मित्रांची जोडी मुंबईला आली. दादा मुंबईला आल्यावर

आजी व काकाही गिरगांव सोडून वान्द्रयाला रहायला आले. सध्याचे जे घर आहे तिथे ३५, नारायणदास डाह्याभाई रोड या घरी. हसबनीस इथेच राहू लागले. मित्राच्या कुटुंबियाबरोबर एक कुटुंबीय म्हणून. हे घर १९२२ साली भोजने यांच्या मालकीचे होते. काही दिवस इथे राहिल्यावर डिमोटो स्ट्रीटवरील शनवारवाडा म्हणून ओळखले जाणारे जे जुने घर आहे तिथे बिऱ्हाड हलवले. आजही त्या घरात फारसा बदल झालेला नाही. रस्त्याच्या बाजुला उघडली जाणारी जी खिडकी आहे त्या बाजूची छोटीशी जागा दादांनी भाड्याने घेतली. गावठाण म्हणून नगरपालिकेने घोषित केलेला हा रस्ता आजही सुधारणेचा स्पर्श झाल्याविना राहिला आहे.

दादा पुण्याहून मुंबईला आले ते मामलेदार कचेरीत अव्वल कारकून म्हणून. सुरुवातीचा पगार होता ८० रुपये फक्त. ही कचेरी अंधेरीला होती पण आता आजी, दादा, काका तिघेही एकत्र रहात असल्याने दोन-दोन ठिकाणी होणारा खर्च वाचला. बापूसाहेब ओक त्यावेळी अंधेरी कचेरीत मामलेदार होते. दोघांची बिऱ्हाडं जवळ असल्याने दादांची वर्तणूक, मेहनती स्वभाव, प्रामाणिकपणा यांच त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले होतं. दादा त्यावेळी एल्‌एल्‌.बी. चा अभ्यास करीत. वयाची पंचविशी काही उलटली नव्हती. त्या काळात बापूसाहेबांनी दादांना सर्वतोपरी सहाय्य केलं. जमतील तितक्या सवलती दिल्या. दादांनी त्याचं चीज केलं. विश्वास संपादन केला. बापूसाहेबांनी दादांच्या वडिलांची उणीव भरून काढून त्यांना वडिलांचं प्रेम दिलं. अडचणीच्या प्रसंगी मार्गदर्शन केले. बापूसाहेबांचा कांही निरोप असला तर मुली धावत "म्हादूकाकांना" बोलवायला येत. गोरेपान, उंच, घारे, झिरमिळ्यांची कुसुंबी रंगाची पगडी घातलेले बापूसाहेब निवृत्तीनंतर अनगावला रहायला गेले. मुंबईस येत त्यावेळी वान्द्रयाच्या घरी येऊन दादांना भेटल्याशिवाय त्यांना राहवत नसे. दोघांचा आंतरिक जिव्हाळा नंतरच्या काळात कमी झाला नव्हता. बापूसाहेबांनी पुढे दादांच्या लग्नात मध्यस्थ राहून लग्न जमवले, पुढाकाराने सगळी व्यवस्था केली. दादांना नोकरी मिळाली पण काकांचे इंजिनिअरिंगचे शिक्षण, स्वतःला एल्‌एल्‌. बी. चा खर्च, घरची जबाबदारी या सगळ्यांसाठी मिळणारा पगार अपुरा पडे. त्यासाठी ते वान्द्रयाला सोमनाथ लेनमध्ये राहणाऱ्या पाटकर बहिणींना शिकवायला जात. अवघड वाटणारा विषय सोपा करून दादा सहजपणे समजावून सांगत. इंग्रजी व गणित, संस्कृत शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता याचा अनुभव आम्ही मोठे झाल्यावर, शिकायला लागल्या-वर आम्हाला आला. क्वचित ते घरी असले की, आम्हाला शिकवीत. त्यावेळी त्यांच्या स्वभावाला मृदुपणा येई. तेवढ्यापुरता आम्हाला त्यांचा दरारा वाटत नसे. शिकवणी, नोकरी, अभ्यास ही त्रिस्थळी यात्रा चालू होती. आता स्वतंत्र लहान का होईना, भाड्याचे घर मिळाल्याने आश्रमातील मंडळींची आवक जावक हळूहळू सुरू झाली. दादांची आई--चंदू--राधाबाई आता ताई या उपनावाने आजूबाजूला ओळखल्या जावू लागल्या. वकील, इंजिनिअर होणाऱ्या मुलांची कर्तबगार आई म्हणून तिचा दबदबा वाढला होता आठवड्यातून एकदा गुरुवारी आमच्या घरी भजनाचा कार्यक्रम होऊ लागला. खुर्चीकरांचे दत्त मंदिर,

विद्यारामजीच्या चाळीतील दत्त मंदिर यामुळे दत्त या दैवताची ओढ आजीला वाटत असेल. या गुरुवारच्या भजनाने त्याला सजगता आली. या भजनाच्या निमित्ताने आजूबाजूची चार माणस घरी यायला लागली. पण आश्रमवासी आले की, तिचा जीव कासावीस होई. तिला वाटे, आताच कुठे बरे दिवस यायला लागले आहेत, जर मोठा मुलगा घरदार सोडून गेला तर पुन्हा येरे माझ्या मागल्या. पण दादा कुठल्याही प्रकारे आईचे मन दुखवणार नव्हते. आईचे जे एकमेव स्थान त्यांच्या मनांत होते ते अढळ राहणार होते. आपल्या वागण्याने पावलोपावली ते आईला पटवून देत.

पाहता पाहता १९२३ साल उजाडले. दादा पहिली वकिलीची परीक्षा पास झाले. आईला सुनमुख पहावेसे वाटू लागले. मुली सांगून यायला सुरुवात झाली. दोघांच्या चिकित्सक चाळणीतून मुलगी काही पसंत पडेना. १९२४ साल उजाडले. राघवेन्द्र शूरपाल या अस्सल वैष्णव ब्राम्हणाची मुलगी विठाबाई सांगून आली. मुलगी एकुलती एक होती. शूरपाल स्वत: इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पास झालेले स्वाभिमानी गृहस्थ होते. ह्या स्वभावामुळे त्यांना कुणी फट म्हटलेले खपत नसे. लगेच शूरपाल राजीनामा देवून मोकळे होत यामुळे अनेक ठिकाणी भ्रमंती करावी लागे. त्यांच्या बिऱ्हाडाला उतारकरूची अवस्था येई, कायम स्वरूपाच्या सोयी करणं जमत नसे. या वैशिष्ट्याने चांगल्या चांगल्या नोकऱ्या मिळूनही अनिश्चितपणाची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर कायम लटकत असे. प्रामाणिकपणा असूनही या परखड बोलण्यामुळे माणसं तुटत. आमची आजी–सीताबाई–बाईची आई शांत, प्रसंगावधानी, तितकीच कर्तबगार बाई होती. त्याकाळी ती महिला मंडळाची अध्यक्षा म्हणून काम करी, भाषण करी, ज्ञानेश्वरीवर प्रवचन करी. तिच्या सुगरणपणाने तिने पाककलेच्या स्पर्धात बक्षिस मिळवली. आमच्या दोन्ही आज्या तोडीस तोड होत्या. पण एक तापट तर दुसरी शांत. बाईची आई कुठलाही प्रसंग मनाचा तोल जावू न देता सांभाळून नेई. बाईची आई बालगंधर्वासारखी दिसे. या नवराबायकोत एकमेकाबद्दल नितांत आदरांची, विश्वासाची भावना होती. त्यांच्या कानावर ह्या स्थळाची माहिती आली. 'मुलं सालस, शिकलेली आहेत, प्रयत्न करून बघा.' नोकरीचा राजीनामा दिल्याने दुसऱ्या नोकरीच्या शोधात पार्ल्याहून देवळालीला जायचं म्हणून सामानाची आवराआवर शूरपालांनी केली होती. जाता जाता सहज म्हणून मुलगी सांगून गेले. मुलगी दाखवायला आणा, असा निरोप आल्यावर वान्द्रयाला डिमांटो स्ट्रीटवर शनिवार- वाड्यात मुलीला घेवून आले.

### वरघोडा हवाच आमचा मुलगा पायी येणार नाही.

५०–६० वर्षापूर्वी मुलीचं शिक्षण फारसं विचारात घेतलें जात नसे. मुलीची पत्रिका, घराण, रूप, मानपान, हुंडा या गोष्टींचा त्या काळी उहापोह होई. समाजाला त्यात कांही गैर वाटत नसे. सरळ सरळ बैठक होऊन लग्नातील देण्याघेण्याचा व्यवहार ठरे. मुली सहसा नोकरी करीत नसल्याने नोकरीच्या ठिकाणी परस्पर मुलगी पाहणे वगैरे अप्रत्यक्ष

वधूपरीक्षा होत नसे. अमक्या तमक्या घरी मुलगी दाखवायला आणणार आहे म्हटल्यावर आसपासची कुटुंब, बायका, पुरुष त्या घरी जमत, मुलीची चिकित्सा करीत. या वधू-परिक्षेला कानिटकर, श्रोत्री, बापूसाहेब ओक, बंडोपंत नातू वगैरे मंडळी हजर होती. बापूसाहेब ओक, बंडोपंत नातू यांच्या हातात वधूपरीक्षेची सूत्रं होती. कुणी सांगितलें की, मुलीच्या काकांनी तिला इंग्रजी लिहायला, वाचायला शिकवलं आहे. शेक्सपिअरची नाटकं तिनं वाचली आहेत. लगेच बूट निघाला की मुलीकडून इंग्रजी वाचून घ्यावं. काही वेळा काय होई, मुलीला वरवर जेमतेम वाचता येई. एखादा परिच्छेद पाठ करवून घेवून मुलीकडची माणसं मुलीला तेच वाचायला सांगत. अशिक्षितपणाचं सगळं सोंग लपलं जाई. पण या परीक्षा मंडळावर एक मामलेदार आणि एक होऊ घातलेला वकील असल्याने त्यांनी त्यांच्याकडील पुस्तकांचे पान उघडून वाचायला दिले. ते पान निघाले शेक्सपिअरच्या Taming of the shud या नाटकांतील, व्यवस्थित वाचता येत असल्याने बाईला वाचतांना अडचण पडली नाही. वधूपरीक्षा आटोपली. लग्न पाल्यांला वधूपक्षाने करून द्यावे. दोन हजार रुपये वरदक्षणा व मुलाला करवतीकाठी धोतर व अस्सल पितांबर देऊन रीतीचे मानपान करावे असे बैठकीत ठरवून लग्न पक्के झाले. मुहूर्त धरला ज्येष्ठ शुद्ध दशमीचा. बाईच्या आईने बाईची संमति घेतल्यावर लग्न पक्के केले होते. देवळालीला जायचं म्हणून आवरलेले, सामान शूरपालांनी सोडलं, लग्नाच्या तयारीला सुरुवात केली.

दादांची एलएल.बी. ची दुसरी परीक्षा होण्यापूर्वी हे लग्न ठरलं. टर्नर रोडला राहणारे बाबुराव सामंत व दादा एल्एल्.बी. चा अभ्यास वांद्रयाला एकत्र करीत. ह्या बाबुरावांची भर दादांच्या मित्रमंडळात पडली. एक दिवस अभ्यास करतांना बाबुराव सामंत म्हणाले, "आमच्या घरी चला, माझ्या आईची व तुमची ओळख करून देतो". त्यांच्या घरचं सुधारकी, शांत वातावरण दादांना आवडलं. त्यांच्या आईच्या, भिकीताईंच्या व्यवस्थित वागण्या-बोलण्याने दादा खूप प्रभावित झाले. जाणं-येणं, घरोबा इतका वाढला की भिकीताईंना दोन मुलगे असूनही दादांना त्यांनी आपला मानसपुत्र मानून ममतेने वागवले. बायकी अडचणी, व्यवहार याबाबत दादा त्यांना विचारीत. त्याही आपलेपणाने मार्गदर्शन करीत. दादांनी पुढे त्यांना घरच्या अडचणीच्या वेळी वृद्धापकाळी मानसिक धीर दिला आहे. दादांचे व भिकीताईंचे हे संबंध फक्त घरगुती स्वरूपाचे नव्हते. अनेक सामाजिक, राजकीय चळवळीत दोघांनी बरोबर काम केले. १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात भिकी-ताईंनी काही महिने आधी तुरुंगवास भोगला. दादांनी नंतर काही महिन्यांनी.

लग्न तर ठरलं पण त्यासाठी लागणाऱ्या पैशाचं काय ? भिकीताईंनी लग्नासाठी उसने पैसे देऊन गरज भागवली. दादांनी कर्जफेडीला प्राधान्य देऊन लग्न झाल्यावर लवकर कर्ज फेडून टाकले. घरची लक्ष्मी येणार, सुवासिनीचा वावर अनेक वर्षांनी घरात होणार, यामुळे शेजारील वरच्या मजल्यावरील श्रोत्री, कानिटकर ताईंच्या सुनांनी, देशपांडे ताईंचे घर चकाचक करून टाकले. त्यांच्या घरी ठेवायला दिलेले

नक्षीचे लाकडी कपाट ताईंच्या घरात आणून, सामान लावून टाकलं. नोकरी करून पैसे मिळवण्याचं शुक्लकाष्ठ मागे नसल्याने बायका घरकामांत रस घेत. शेजारीपाजारी मदतीला धावून जात. कार्य कंत्राटी पद्धतीने उरकत नसत. हळद, तिखट, कुटणं, पापड, लोणची घालणं, भाजणी, दळणं आणि इतर कामं बायका एका ठिकाणी जमून, गप्पा गोष्टी करीत करमणुकीने झपाट्याने उरकून टाकीत. तशी ती इथेही उरकली गेली.

लग्नाचा दिवस उजाडला. पार्ले पूर्वेला असलेला डोंगऱ्यांचा बंगला वरपक्षाला जानोशाला दिला होता. वधूपक्षही पूर्वेला होता. रुखवताच्या पंगतीचे खाद्यपदार्थ वधूपक्षाने वरपक्ष जिथे उतरला असेल तिथे नेऊन रुखवताची पंगत उरकून, नवरदेवाला त्याच्या इष्टमित्र, नातेवाईकांसह वधूगृही लग्नाला न्यायची प्रथा होती. त्याप्रमाणे शूरपालां-कडील पुरुष मंडळींनी डोक्यावरून शिजवलेल्या पदार्थांची भांडी जाळीदार रुमालांचे आच्छादन घालून वरपक्षाकडे वाजतगाजत नेली. तेथे गेल्यावर बायकांनी पाट रांगोळ्या करून रुखवताची पंगत वाढली. इथपर्यंत कार्यक्रम ठीक झाला. ज्या बाईमावशीने पडत्या काळात मदत केली ती खास भाच्याच्या लग्नासाठी बडोद्याहून आली होती. ती सहसा घराबाहेर पडत नसे. घरात सुवासिनी नाही म्हणून दादांचे मामा मामी देवदेवक ठेवायला खास गुजराथेतून आले होते. इतर नातेवाईक आप्तमित्र लग्नाला जमली की कुरापती निघायला संधी मिळते. विशेषत: बायका यात रस घेतात. मानापानाच्या चुकीच्या कल्पनेने. आता मानाचा नारळ नवऱ्या मुलाच्या हाती देऊन लग्नाचा वरघोडा निघायचा. एवढ्यात कुणाच्या तरी लक्षात आलं की नवऱ्या मुलाला न्यायला कुठलंच वाहन दाराशी नाही. वधूपक्षाने वर-घोड्यासाठी सजवलेला घोडा सांगितला होता. तो यायचा होता पश्चिमेकडून. त्यावेळी हाय वे नसल्याने पश्चिमेकडून पूर्वेला येण्यासाठी रेल्वे लेव्हल क्रॉसिंग ओलांडायला लागे. त्याला दुसरा पर्याय नव्हता. पश्चिमेला सजवलेला घोडा घेऊन मोतद्दार उभा होता पण तो पूर्वेला आणता येत नव्हता. कारण त्याचवेळी एक मालगाडी एखाद्या वैरिणीसारखी कडमडली. ती शांतपणे तिच्या गतीने रुळावरून चालली होती. फाटक बंद होतं. सगळं वऱ्हाड एकीकडे पूर्वेला तर घोडा पश्चिमेला. "आमचा एवढा शिकलेला मुलगा पायी लग्नाला जाणार नाही" म्हणून बायका हटून बसल्या. लग्नाचा मुहूर्त जवळ जवळ येऊ लागला. पण वरमाय अडून बसली तर इतर बायका ढिम्म्, हलेनात. पार्ले तसं खेडेवजा होतं. ऐनवेळी दुसरी सोय होण्यासारखी नव्हती. शेवटी सीताबाई आपल्या जावयाला भेटली. प्रसंगाची कल्पना दिली. दादा उठले. पायांत जोडे घालून चालू लागले. बापूसाहेब ओक, बंडोपंत नातू वगैरेंनी समजावून सांगून ज्या बायका बधल्या नव्हत्या त्या दादा चालायला लागल्यावर मुकाट्याने उठल्या आणि चालू लागल्या. लग्न लागलं. शूर-पालांची विठाबाई, देशपांड्यांची कमलाबाई होऊन वांद्र्याला राहायला आली.

काकांना बहीण नाही, बाईला भाऊ नाही. अशा परिस्थितीत दीर-भावजयीपेक्षा भावा-बहिणीचं नातं या दोघांत घट्ट झालं. देशपांडेच्या घरात दुर्वास आणि जमदग्नी गोत्रांचा मिलाफ झाल्याने सर्व मंडळी संतापी, तापट होती. त्याला अपवाद फक्त काकांचा. काही वादविवाद झाले की सगळ्यांना समजावण्याचं काम काका कसोशीने पार पाडीत. त्याना इंजिनिअरिंगला प्रवेश मिळत नव्हता. वहिनी घरात आली आणि काकांना कराचीला प्रवेश मिळाल्याची तार आली. दादांची एल्एल्.बी. ची शेवटची परीक्षा व्हायची होती. सगळी म्हणत, आता कसली परीक्षा आणि कसलं काय? पण तेही दुसरा वर्ग मिळवून पास झाले. सगळ्यांची तोंडं आपोआप बंद पडली. नवी सून पायगुणाची ठरली. काकांची कराचीला जायची तयारी सुरू झाली. माहेरून गर्भादान विधीत अंथरूण, पांघरूण, गाद्या बाईच्या माहेरून आल्या होत्या. कराचीला थंडी फार. आपला दीर लांब एकटा जाणार म्हणून बाईने कौतुकाने गरम ब्लँकेट काकांना दिलं. त्याचं त्यांना कोण अपरूप वाटलं. काका कराचीला निघून गेले आणि परत राहिलं त्रिदळ--आई, मुलगा आणि नवी सून.

आजीने परिस्थितीने टक्केटोणपे खाऊन, मुलांना शिकवून, स्वावलंबी करून या स्थितीला आणले होते. नुकतीच सुखाची झुळूक येऊ लागली होती. बरेच भलेबुरे अनुभव घेतल्याने ती माणसांची पारख केल्याशिवाय विश्वास ठेवत नसे. साध्या केरवारे करणाऱ्या मोलकरणीची ती तिच्या पद्धतीने परीक्षा घेई. कुठे तरी जमिनीवर नाणं टाकून देई. केर काढल्यावर नाणं त्या बाईने आणून दिलं तर तिला विश्वासू हे प्रशस्तीपत्र आजीकडून मिळे. मोलकरणीवर लक्ष ठेवण्याच्या तिच्या दुसऱ्या युक्त्या असत. काही तरी काम काढून आजी कामवालीच्या आसपास ठाण मांडी, कुठे निवडणं कर, कुठे भाजी नीट कर. कामवालीशी एकीकडे तिच्या सुखदु:खाच्या गोष्टी चालत. कामवालीला कल्पना येत नसे की ताई देशपांडे आपल्यावर लक्ष ठेवण्यासाठी बसल्या आहेत. कामवाली खूष, आजी खूष. बाई त्याच्या अगदी विरुद्ध परिस्थितीत १४ वर्षं वाढली होती. एकुलती एक मुलगी. तिचे आईवडील कशाचीच कमतरता तिला पडू देत नसत. काजू, बेदाणे खाऊन कंटाळा आला की बाई हा खुराक कावळे चिमण्यांना भिरकावून देई. आजी सौम्य कानपिचक्या देई तेवढ्याच. सासू सुना एकत्र आल्यावर दोघींना सुरवातीला एकमेकींशी जमवून घेतांना जड गेलं. आजी म्हणे इतक्या मुली बघितल्या की माझे मणभर पेढे संपले. सरतेशेवटी हे ध्यान सून म्हणून आमच्या घरात आले. मुलगी बघितली की मुलगी पसंत पडो न पडो, मुलीच्या हातात पेढ्याचा पुडा द्यायची प्रथा होती. आईच्या पुढे दादा काही बोलत नसत. थोडे खट्टे, थोडे मीठे असे दिवस चालले होते. आरळ्याच्या खेपा चालू होत्या. आणि दादांच्या मनात आलं, नोकरी सोडून वकिलीचा व्यवसाय सुरू करायचा.

नोकरी सोडून द्यायची म्हणजे नवख्या वकिलीच्या क्षेत्रात उडी मारायची होती.

समजा, गटांगळ्या खायची वेळ आली तर सावरायला कुणी नव्हतं. उसने पैसे फिटले तरी शिलकीच्या नावाने नन्ना होता. दुसरा मिळवणारा हात नव्हता. एक दिवस बायकोला विचारलं, "मी नोकरी सोडून देण्याच्या विचारात आहे, वकिली सुरू करावी असं म्हणतो. व्यवसाय चालला तर प्रश्नच नाही पण उलटा प्रकार झाला तर आरळ्याला जाऊन शेती करावी असं म्हणतो. तुझी खेड्यावर यायची तयारी आहे ना ?'' कुलदेवतेच्या घोडावलीच्या पाया पडायला बाई लग्न झाल्यावर गेली होती. आरळ्यापर्यंतच्या प्रवासाचं 'सुख' तिनं अनुभवलं होतं. आरळ्याची अंधुक कल्पना आली होती. "तुमच्याबरोबर मी सात समुद्रापार यायला तयार आहे'' वगैरे वगैरे नाटकी संवाद न करता दादांच्या अर्धांगीने अनुमती दिली आणि दादांनी मामलेदार कचेरीतील नोकरीचा राजीनामा देऊन टाकला.

लग्नाचा आहेर म्हणून त्यांच्या मित्राने बाबाजी मोघ्यांनी खादीचे कापड दिले होते. तेव्हापासून दादा खादीधारी झाले ते आमरण. दादांच्या वकिलीची सुरवात शनिवार वाड्यातील भाड्याच्या घरापासून झाली. पक्षकार आले तर कुठे बसणार, कशावर बसणार ? खुर्च्या, सोफा, कोच कुठले आले आहेत ? ऑफिस म्हणून बाहेरची खोली मुक्रर केली. दोन आठ-आठ आण्याच्या चटया बैठकीसाठी विकत घेतल्या आणि एक बैठे टेबल. ऑफिस तर सजले. दादांचं बालपण कष्टात गेलं होतं. पण त्यांचा जन्म मात्र चांगल्या मुहूर्तावर झाला असावा. दादांच्या या धुवट जन्मवेलीला पुढे अचाट फळं लागणार आहेत आणि तिचा वेलु गगनावरी जाणार आहे हे फक्त काळाच्या पोटातील गुपित होतं १९२५ साली वकिलीच्या शुभारंभी.

***

## २. वेलु गेला गगनावरी

### लक्ष्मीची रुणझुणती पाऊले

१९२५ साली दादांनी वकिली सुरू केली. लक्ष्मीची पावलं घरात हळूहळू रुणझुणु लागली. पुढील १२--१५ वर्षात, १९४० पर्यंत दादांच्या वकिलीच्या व्यवसायाची कमान वरवर चढतच गेली. शनिवारवाड्यातील दादांच्या 'ऑफिस' मध्ये पहिली केस आली ती आपसात झालेल्या मारामारीत डोके फुटलेल्या अशिलाची. बैठकीवर बसलेल्या रक्तबंबाळ असामीला बघून आजी आणि बाई गांगरल्या, शेजारी-पाजारी डोकावून बघू लागले. ती केस दादा जिंकले. पण त्याच क्षणी मनोमन ठरवून टाकले की, शक्य तो फौजदारी खटले चालवायचे नाहीत. त्यानंतर एका मारवाडी बाईच्या तर्फे चालवलेल्या दिवाणी खटल्यात दादा जिंकले. त्या बाईने तळहातावर मावेल इतकं मोठ पदक, मधोमध असलेली पुतळ्यांची माळ फी म्हणून दादांना दिली. तीही धनत्रयोदशीच्या दिवशी. सोन्याच्या पावलांनी लक्ष्मी घरात चालत आली. हा आजीला मोठा शकुन वाटला. धनत्रयोदशी व लक्ष्मीपूजन या दिवाळीच्या दोन्ही दिवशी त्या माळेची आवर्जून पूजा होऊ लागली. त्यावेळी दिवाणी खटले अंधेरीच्या कचेरीत व ठाणे येथील जिल्हा कचेरीत चालत. पाच हजार रुपयांपर्यंतचे खटले अंधेरी येथील कचेरीत व त्याहून जास्त रकमेचे खटले ठाण्याच्या कोर्टात निवाड्यासाठी येत. जास्त करून दादा दस्तऐवजाचे, जमिनीचे त्याचप्रमाणे मालमत्तेचे व्यवहार याबद्दलचे खटले चालवीत. साहजिकच त्यांच्या अशिलात मारवाडी व गुजराथी मंडळी जास्त असत. आपसात दोन्ही पक्षांनी तडजोडीने तंटा मिटवावा याकडे दादांचा कल असे. त्या तऱ्हेचे प्रयत्न ते करीत. समजुतीने घेतल्यास पैशाचा अपव्यय टळेल हे पटवून देण्याची कोशीस वकील असून ते करीत. मारवाडी अशिलाइतकेच मुस्लीम अशील त्यांच्याकडे विश्वासाने येत. विशेषत: मुस्लीम कसाई. मुख्यत्वेकरून भावा-भावातील, नवरा-बायकोतील वैमनस्य असलेले झगडे त्यांच्या-पुढे पेश होत असत. वकील या नात्याने त्या दाव्यांचा दादा अभ्यास करीत. शिवाय न्यायाधिशाच्या दृष्टीकोनातून सत्य-असत्याचे विश्लेषण करून दोन्ही पक्षांना बोलावून घेऊन आपसात जमवून घ्यायला सांगत. हे खटले कोर्टात गेले असते तर वकील म्हणून दादांना लाखो रुपये कमावता आले असते. या वकिलीच्या व्यवसायामुळे ठाण्याचे माधवराव हेगडे, वामनराव ओक, पार्ल्याचे देशपांडे, बोरिवलीचे व्ही. डी. वाघ अशा अनेक वकील मंडळीचा संबंध आला व पुढे त्याचे मैत्रीत रूपांतर झाले. काही माधवराव हेगडे यासारखे त्यांना ज्येष्ठ तर काही वाघ, देशपांडे यासारखे त्यांच्या मानाने होतकरू! सोईप्रमाणे दाव्यांची आपसात देवाणघेवाण या मित्रांत आपसात होऊ लागली. गोरेगावचा

बैरामजी जीजीभाई ट्रस्ट, दहिसरचा हाजी कासम ट्रस्ट, त्याचप्रमाणे वांद्रयाचा वाडिया ट्रस्ट अशा मोठमोठ्या ट्रस्टची कामे दादा वकील या नात्याने पहात. तेही अनेक वर्षे. १९४० पासून वकिली सोडल्यातच जमा असली तरी वरील ट्रस्टची कामे ते शेवटपर्यंत करीत. या कामानिमित्त दहिसरपर्यंत त्यांची भ्रमंती चाले. गोरेगावच्या ट्रस्टचे मॅनेजर बाळकृष्णपंत गुप्ते, वांद्रयाचे कानक व दहिसरचे मॅनेजर केसकर यांच्याशी दादांची मैत्री जमायला वेळ लागला नाही. हे सर्व ट्रस्ट खाजगी असून खोताच्या मालकीचे होते. त्यातील गुप्ते व दादा यांची वारकरी पंथावर निष्ठा असल्याने त्यांची खास दोस्ती झाली. हे खटले काही वेळा अंधेरीला न्यायाधीश गुप्ते यांचेसमोर चालत. बोलण्यावरून बोलणे निघाले आणि पंढरपूरच्या निळयाची दोघांना असलेली समान आर्त ओढ, ज्ञानेश्वर माऊलीबद्दलची पराकोटीची श्रद्धा, या दोघांच्या मर्मबंधातल्या ठेवी, दोघांनी उघडया केल्या. हे वारकरी अनेकवेळा वारीला बरोबर जाऊ लागले. न्यायाधीश गुप्ते यांना प्रसन्न व्यक्तीमत्व लाभले होते. गोरेपान गुप्ते व गडद सावळे दादा यांची चर्चा ऑफिसमध्ये वांद्रयाला होऊ लागली. दादांच्या वकिलीच्या सुरुवातीच्या चार-पाच वर्षातच हे दोघे जीवश्च कंठश्च मित्र बनले. या वकिलीच्या भरभराटीच्या बारा-पंधरा वर्षाच्या काळात, कोर्टाच्या कामासाठी म्हणूनही असेल, दादांचा पोशाख टापटीपीचा इस्त्रीचा असे, पांढरी कडक इस्त्री केलेली पँट, तसाच शर्ट व कोट, रंगीत टाय ते वापरीत. डोकीवर पगडी असे. पुढे पगडीची जागा खादीच्या घडीच्या टोपीने घेतली. दादांचा वकिलीचा काळा कोट लॉकरमध्ये कोर्टात ठेवलेला असे. धुऊन इस्त्री केलेल्या कपडयांचा गठ्ठा धोबी ठराविक दिवशी घरी घेऊन येई. त्यात हातरुमालही असत. धुवायचे कपडे तो घेऊन जाई. बऱ्याच वेळा कुणाची तरी गाडी दादांना कोर्टात घेऊन जाण्यासाठी दारात उभी असे. ४०—४५ वर्षापूर्वीच्या त्या काळात गाडी ठेवणारी माणसं फार कमी होती. तरी अशिलांच्या चार-चार, पाच-पाच गाडया दारात सतत तिष्ठत उभ्या असत आणि गाडयांचे मालक ऑफिसमध्ये आपल्या नंबराची वाट बघत ओटीवर ! काम इतकं वाढलं की मदतनीस ठेऊनही काम आटपेना, तेव्हा होतकरू वकीलांना कामे देऊन टाकली.

वकिली चांगली चालली होती. शनिवारवाडयातील जागा पुरेना, म्हणून मोठी जागा घेण्याची दादांची खटपट सुरू झाली. दादांच्या व्यवसायाची भरभराट त्यांचे मित्र विनायक भावे, बाबाजी मोघे यांच्या कानी गेलीच होती. मित्राची खुशाली कळावी म्हणून दोघं मित्र दादांना प्रत्यक्ष भेटायला आले पण त्या दिवशी आजीचं काय बिनसलं होतं, तिलाच माहीत. दादांच्या उपस्थितीत तिने दोन्ही मित्रांवर शनिवारवाडयातील घरात यथेच्छ तोंडसुख घेतलं. बाई तर बोलून चालून सासुरवाशीण. तिची बाहेरच्या खोलीत यायची प्राज्ञा नाही तर "आलेल्यांना तुम्ही असे का वागवता" असं विचारण्याची काय शामत होती ? तिघांनी चुपचाप वाक्ताडण सहन केलं. संधि मिळताच दादा म्हणाले, बाबाजी चला आपण तिघं बाहेर जाऊ, १९२६ साली दादांनी पंचविशी ओलांडली तरी आईला गप्प बसवण्याची प्राज्ञा नव्हती. तिचं मन दुखावेल म्हणून त्यांनी एकही

शब्द उच्चारला नाही. शनिवारवाड्याच्या घरात परत यापैकी कुणाला जावं लागलं नाही. कारण दादांच्या जागेच्या खटपटीला यश आलं. त्यांना मानसपुत्र मानणारे बापूसाहेब ओक हे निवृत्त होऊन त्यांच्या गावी जाणार होते. ते ज्या बंगल्यात राहत तो बंगलाच दादांनी भाड्याने का घेऊ नये असं सुचवल्यावरून तोच संपूर्ण बंगला भाड्याने घेतला. बंगला भोजने यांच्या मालकीचा होता. भाडं ठरलं दरमहा ५० रुपये फक्त. केव्हा? १९२८ मध्ये. त्यावेळी जागेची टंचाई नसल्याने ठिकठिकाणी "जागा भाड्याने देणे आहे" असे फलक लागलेले असत. तोच बंगला, जुना, ३५ बझार रोड चा. ह्या बंगल्यात अजून तसा फारसा बदल झालेला नाही. कंदील, वासलेटच्या चिमण्या जाऊन वीज आली. शेणामातीची जमीन आता कोब्याची, लादीची झाली. हे घर दोन मजली आता आहे. तसेच बाहेरून ओटीवरून असलेल्या जिन्याचे. ह्या आताच्या घरात येण्यापूर्वी काकांचे लग्न झाले. कोरेगावच्या थिटयांची अनुसूया सौ. इंदिराबाई होऊन देशपांड्यांच्या घरी नांदायला आली. १९२७ मध्ये. मोठी सून कमलाबाई घरची लक्ष्मी घरात असल्याने देवदेवक ठेवण्यासाठी परगोत्रीय जोडपं खास आमंत्रित करावं लागलं नाही. हळूहळू देशपांडे कुटुंबियांची संख्या वाढू लागली.

शनिवारवाड्याचं घर सोडण्यापूर्वी एके दिवशी एक १८--२० चा गोरा, देखणा तरुण, देशपांडे वकिलांच्या घराची चौकशी करीत करीत वाड्यात आला. १९२८ मध्ये. त्याच असं झालं. कोकणातील केळशी गावचा हा मुलगा रामचंद्र महादेव जोशी इतर कोकणी माणसांप्रमाणे घरच्या गरिबीला कंटाळून पोटासाठी मुंबईला आला. पण मुलगा शाळेत असल्यापासून टिळकांचा चाहता, राष्ट्रीय बाण्याचा. प्रथम काही दिवस या रामभाऊ जोशींनी ठाण्याला मास्तरकी केली. पण त्यात त्याचं मन रमेना. ठाण्याचे जठार वकील दादांना ओळखीत. त्यांनी सांगितले की, "देशपांडे नावाचे एक वकील वांद्र्याला राहतात, राष्ट्रीय वृत्तीचे आहेत. तुमच्या स्वभावाशी जुळणारे आहेत. त्यांना एक मदतनीस हवा आहे. तुम्ही त्यांच्याकडे का जात नाही? पगार खूप मिळणार नाही. पण तुमच्या आवडीची काम तुम्हाला करता येतील. तुमच्या अल्प शिक्षणाबद्दल तुम्ही मनात आणू नका, ते तुम्हाला तरबेज करतील". परिस्थितीने रामभाऊ शिकू शकले नाहीत. पण ते बुद्धीमान व कष्टाळू होते. पुढे त्यांनी इंग्रजी मुळाक्षरापासून शिकण्यास सुरुवात करून, संशोधन करून ताडापासून साखर तयार करण्याचे यंत्र तयार करून राष्ट्रपती पदक मिळवले. हिरा कुठेही वळचणीला पडला तरी त्याचे तेज फाकल्याशिवाय राहत नाही, हे त्यांच्या बाबतीत तंतोतंत खरे आहे. ते जे आले ते आमचे एक कुटंबीय होऊन राहिले, आजही. आम्हा सर्वांचे ते जोशीकाका झाले. फक्त बाई त्यांना रामभाऊ म्हणते. गाणी फार छान म्हणायचे. "रामभाऊ एखादं गाणं म्हणा" बाईने सांगितले की "बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा" हे त्यांचं आवडतं गाणं म्हणायचे. आजीला ते धार्मिक ग्रंथ, ज्ञानेश्वरी, वर्तमानपत्र वाचून दाखवीत. ती कुठे परगावी गेली की मुलाप्रमाणे तिच्याबरोबर जात.

दादा निर्धास्त असत. आरळ्याला ते आजीबरोबर कोर्टाच्या कामासाठी जात. वडिलोपार्जित शेती कज्जा, आजीने चिकाटीने, हिकमतीने तडीला नेला होता. भाऊबंदांच्या तावडीतून जमिनी सोडवल्या होत्या, शिराळ्याच्या विष्णुपंत हसबनीस यांच्या मदतीने. हे आजीचे वकील होते. आजीने २०—२० घागरीची मोठमोठाली तांब्या-पितळेची भांडी ताब्यात घेऊन तेथील घरात बंदोबस्तात ठेऊन दिली होती. या सर्व घटनेचे साक्षीदार होते रामभाऊ जोशी. त्यांना आजीबद्दल आदर होता. ती रागावली तरी ते मनावर घेत नसत. तिच्या प्रेमळपणाचा त्यांनी अनुभव घेतला होता. ती स्वतःच्या मुलाप्रमाणे रामभाऊंच्या जेवणा-खाण्याची काळजी घेई. या जोशीकाकांच्या अंगाखांद्यांवर मी आणि श्रीनिवास—म्हणजेच बापू—वाढलो. दादांना आणि जोशीकाकांना गाण्याची—सर्व प्रकारच्या शास्त्रोक्त, नाटयसंगीत, भक्तीसंगीत—फार आवड. दोघांनी कितीतरी मैफली बरोबरीने जागवल्या. बगलेमध्ये शाल घेऊन दादा निघाले की समजावे आता रात्रीची निरात. पहाटे गाण्याची मैफल संपल्याशिवाय काही ही जोडगोळी परतणार नाही. प्रवचनं, किर्तनं, व्याख्यानं असली की चालले परत दोघं.

इतकं सगळं होत तरी जोशीकाका सारखे बेचैनी असायचे. सारखे त्यांच्या मनात गांधींच्या आश्रमात जाण्याचे विचार फेर धरून पिंगा घालीत. एक पाय तळ्यात, एक पाय मळ्यात, अशी त्यांची अवस्था होती आणि ३० साल उजाडलं. उजाडलं तेच गांधीजींनी इंग्रजाविरूद्ध फुंकलेल्या रणशिंगाचे पडसाद उमटवीत. हा सत्याग्रह "मिठाचा सत्याग्रह" म्हणून प्रसिद्ध आहे. हवा, पाणी, निसर्गनिर्मीत आहे, तसेच समुद्राच्या पाण्यापासून तयार होणारे मीठही, या मिठावर इंग्रज सरकारने कर बसवला आणि गांधीजींनी भारतवासीयांना पटवून द्यायला सुरूवात केली की, या अन्यायाविरूद्ध भारतीयांनी आवाज उठविला पाहिजे. कार्यकर्ते प्रचार करू लागले. हवा तापू लागली. भारतातील समुद्राजवळील अनेक जागा या सत्याग्रहासाठी मुक्रर झाल्या. त्यासाठी स्वयंसेवकांचा, त्याचप्रमाणे सत्याग्रहींचा जथ्था तयार झाला. अहमदाबादजवळील साबरमती आश्रमातून गांधीजींच्या बरोबर सत्याग्रहींची तुकडी सुरतेला जाण्यासाठी निघणार होती. सुरतेहून पुढे दांडीपर्यंतचा प्रवास होता. या सत्याग्रहाचे कल्पक गांधीजी दांडीला जाणार असल्याने या जागेला एखाद्या तीर्थस्थानाचे महत्त्व आले होते. या तापलेल्या वातावरणात जोशीकाकांना काही स्वस्थ बसवेना. शेवटी एक दिवस दादांना सांगून टाकलं, "मी दांडीला मिठाच्या सत्याग्रहात भाग घ्यायला जाणार." त्यावर दादांनी जोशीकाकांना अनपेक्षित असलेली प्रतिक्रिया व्यक्त केली. म्हणाले, "आपण दोघंही बरोबरच जाऊ." सुरतेला तर जत्रचे स्वरूप प्राप्त झाले होते. वेगवेगळ्या ठिकाणाहून जथ्थेच्या जथ्थे धडकत होते. पण सरकार काही कमी बिलंदर नव्हतं. गांधीजींच्याबरोबर असलेल्या सत्याग्रहींना पकडून तुरूंगात टाकलं. बहुसंख्यांना लाठीने झोडपून पिटाळून लावले. या सत्याग्रहात सत्याग्रहींची निवड करुन निवडलेल्या सत्याग्रहीनेच भाग घ्यायचा असा काही दंडक नसल्याने कुणीही भाग घ्यावा

असा थोडासा प्रकार झाला. या सत्याग्रहाच्या अनेक सुरस कथा, वेगवेगळचा रसाला परिपोषक अशा ऐकायला येत. स्वातंत्र्यासाठी होणाऱ्या लढचात अत्याचारांचे जे हिंसक प्रकार होत त्याची आवृत्ती या अहिंसक लढचातही झाली. बेदम लाठीमाराने काही हुतात्मे झाले तर शंकरराव देवांसारखे काही या लाठीमाराचा प्रसाद जन्मभर वागवीत राहिले. बायका तुडविल्या गेल्या. सत्याग्रहींच्या बरोबर बघ्याची भूमिका घेणारे काही जण अंगावर सोडलेल्या घोडयांच्या टापाखाली चिरडले गेले. गंभीररित्या घायाळ झालेल्या वीरांना उचलून पिछाडीला नेणाऱ्या स्वयंसेविका, परिचारिकाही यातून सुटल्या नाहीत. नि:शस्त्र सत्याग्रहींवर असे भीषण अत्याचार करणाऱ्या इंग्रज सरकारबद्दल सामान्य जनतेला प्रेम, आपुलकी कशी वाटेल? या मिठाच्या सत्याग्रहात मध्यमवर्गीय, त्याचप्रमाणे गर्भश्रीमंत बायका उतरल्या, घराबाहेर पडल्या. दांडी-प्रमाणेच पार्ल्याच्या घोडबंदर रोडला व वडाळचाला छावणी होती. पार्ल्याच्या छावणीचे नेतृत्व धर्मानंद कोसंबी यांनी केलं. या छावणीवर सरकारने घाड घातली. सगळी छावणी जप्त करीपर्यंत प्रार्थनेची वेळ झाल्याने "प्रार्थना झाल्यावर बाहेर आणलेल्या गाडीत बसू" असे धर्मानंद यांनी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले आणि प्रार्थना झाली. पोलीस पहाऱ्यात. "भक्त ऐसे जाण जे देही उदास। गेले आशापाश निवारुनी।। तुकाराम महाराजांनी या अभंगाचा शेवट केला होता. "सत्य कर्मा व्हावे साहचे".–– ह्या अभंगाने उपस्थितांची मनं हेलाविल्याशिवाय कशी राहतील? या वाढत जाणाऱ्या गांधींच्या जमातीला याचा अनुभव वारंवार आला. प्रत्यक्ष लढचात भाग न घेणाऱ्यांनी या सत्यकर्माला सतत मदत केली. अनेक प्रकारांनी. त्यात पोलीस, पोलीस अधिकारी-सुध्दा आले.

या मिठाच्या सत्याग्रहाने चार भिंतीआड सगळं जग असलेल्या स्त्रियांच्या विचारांना चालना मिळाली. गांधीजींनी या कोंडलेल्या स्त्री-शक्तीचा स्वातंत्र्य लढचात उपयोग करून घेतला. या बायका सुशिक्षित, अशिक्षित, खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्याच्या सत्त्याग्रहात हिरीरीने भाग घेऊ लागल्या. खादी वापरणे, परदेशी साखर सोडणे तर सहज होऊ लागलं. दारूच्या दुकानासमोर बायका निरोधनं करू लागल्या. त्यात नेहरू कुटुंबातीत बायका आल्याच. पण पार्ल्याच्या विकेशा, सोवळचा, गोऱ्या-गोऱ्या, धिप्पाड गर्भश्रीमंत गंगाबाई फाटक दारूच्या दुकानासमोर निरोधनासाठी हात जोडून ऊभ्या रहात. आत जाणाऱ्यांना दारू न पिण्याबद्दल विनंती करीत. हे दृष्य वयातीत पार्लेकरांच्या आजही स्मरणात आहे. आता अशा सोवळचा बायका फक्त सिनेमांत पहायला मिळतील. या लाल किंवा पांढऱ्या अलवणाशिवाय, तेही खादीच्या, दुसरं वस्त्र न वापरणाऱ्या गंगाबाईचे धैर्य किती असामान्य? गांधीजीच्या लोहचुंबकीय व्यक्तिमत्वाचा हा परिणाम होता. सामान्यातील सामान्य माणूसही देशाच्या स्वातंत्र्या-साठी, कुठल्याही लाभाची अपेक्षा न करता, अबोल, असीम त्याग करायला उद्युक्त झाला.

सैन्य असल को, त्यांत बाजारबुणगे आलेच. गावोगावी प्रभातफेऱ्या निघू लागल्या.

गळयात पेटी अडकवून "चरखा चलाचलाके, लेंगे स्वराज्य लेंगे" किंवा "गांधी नेहरू लढति मिठागरी स्वातंत्र्यासाठी" अशी गाणी तबला पेटीच्या तालासुरावर म्हणत ही मिरवणूक रस्त्यावरून जाई. पांढऱ्या साडया नेसून बायका या प्रभात फेरीत हौशीने सामील होत. आपण ही राष्ट्र सेवा करतो असं काहीसं समाधान त्या मिळवित. रस्त्याने गाणी म्हणणं दादांच्या स्वभावात बसत नव्हतं ते त्यापासून अलिप्त होते. ज्या ज्या ठिकाणी हा सत्याग्रह केला त्या ठिकाणी मिठागरं तयार केली होती. त्याचप्रमाणे मोठमोठ्या काहिली समुद्राचे पाण्याचे मीठ करण्यासाठी उकळत असत. समुद्रातून भांड्याने पाणी आणून ते मिठागरात ओतायचं आणि तेथे झालेल्या मिठाच्या पुडया विकणाऱ्या मुलांकडून मीठ विकत घ्यायच हे राष्ट्रप्रेमाचे लक्षण समजले जाई. त्यावेळी शंकरराव देवांचं, पार्ल्याच्या टिळक मंदिरात व्याख्यान झालं. व्याख्यानाला बायका हजर होत्या. व्याख्यान संपल्यावर शंकररावांनी जुहूला त्यांच्याबरोबर सत्याग्रहासाठी येण्याचं श्रोत्यांना आवाहन केलं. चालत जायला दहा-पंधरा मिनिटं पुरेशी होती. चालायला बायका घाबरणाऱ्या नव्हत्या. तशा त्या तयारीनीशी आल्या होत्या. बहुतेकींनी समुद्रातील पाणी भरायला लहान मोठी भांडी आणली होती. एकीने शंका काढली. आपण शंकरराव देवांबरोबर गेलो, समुद्राच्या पाण्याने भरलेले भांडे मिठागरात ओतण्यापूर्वी आपल्याला पोलिसांनी पकडलं तर? एक प्रकारचा साहसयुक्त आनंद उपभोगावा असं तर वाटत होत, पण दुसरीने शंकेचे चटकन निरसन केलं. ती म्हणाली, "त्यात काय मोठंसं, पोलीस जर आपल्याला पकडायला आले तर पाण्याने भरलेलं भांडं झटकन पालथं करून, पाणी ओतून द्यायचं, मग पोलीस कशाला पकडणार ? "

पण आर्यविन हा विलिंग्डनच्या जागी ब्रिटीश अधिकारी आल्यावर सगळा रंग पालटून गेला. त्याने कडक धोरण स्वीकारले. प्रभात फेरीत मजा म्हणून भाग घेणाऱ्यांनाही तुरुंगात टाकण्याचा सपाटा लावला आणि या बाजारबुणग्यांची संख्या झपाटयाने कमी झाली ही एकदम आलेली सूज ओसरली. उरले तळमळीचे सच्चे कार्यकर्ते. ह्या अहिंसक सत्याग्रहाची हवा हळूहळू कमी झाली. पण राष्ट्रप्रेमाची हळूहळू विझवण्याच्या मार्गाला लागलेली ज्योत भारतीयांच्या हृदयात प्रज्वलीत करून.

पुन्हा दावे, कोर्ट, सब-रजिस्ट्रार, ऑफिस, हे दादांचे दैनंदिन चक्र सुरू झालं. छगनभाई ठकर, नथमल वाघमल, मुगुटलाल भट, लक्ष्मीचंद मारवाडी, गिरिधरलाल मारवाडी वगैरे अशिलांच्या दाव्याच्या कामानिमित्त खेपा होऊ लागल्या. पुढे १९४६ मध्ये ज्यावेळी दादांनी गांधी मंदिरासाठी जागा मिळवून इमारतीचे काम सुरू केले त्यावेळी या मंडळींनी स्वतः तर देणग्या दिल्याच पण इतरांकडूनही देणग्या मिळवून देऊन भरीव मदत केली. हे महात्मा गांधी सेवा मंदिर स्वामी विवेकानंद रोडवर तळयासमोर आजही दिमाखाने उभे आहे. पण वकिलीच्या व्यवसायात सन १९२८ पासून दादांना मदत करणारे जोशीकाका; दांडीच्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्यापासून दादांच्या मागे भुणभुण लावीत. "मला इथे काम करण्यात गोडी नाही, मला गांधीजींच्या आश्रमांत जायंच आहे". त्यांना देश-

कार्यात पूर्णपणे झोकून द्यावेसे वाटे. आदर्श राष्ट्रसेवक व्हावेसे वाटे. दादांनाही आरळ्याला काही भरीव विधायक कार्य करण्यासाठी तिथे राहणारा सचोटीचा कार्यकर्ता हवाच होता. ते जोशीकाकांची समजूत घालीत. मी स्वत: तुला माझ्या मित्राकडे, भावेकडे घेऊन जातो. ते माझे बालमित्र आहेत. तसेच गांधीजींचे सच्चे अनुयायी आहेत. मी स्वत: तुझी ओळख करून देईन म्हणजे तुझ्या मनातील इच्छा जास्त चांगल्या रीतीने पुरी होईल. पण तू मला तुझ्याऐवजी दुसरा माणूस वकिलीच्या व्यवसायात मदतनीस म्हणून आणून दे. तुला जसं शिकवून तयार केलं तसं त्यालाही मी तयार करीन. दुसरं म्हणजे आश्रमातून तयार होऊन आल्यावर तू आपलं कार्यक्षेत्र आरळे निवडावेस. जोशी-काकांनी त्यांच्या धाकट्या भावाला यशवंत महादेव जोशी यांना बोलावून घेतलं--दादांना वकिलीच्या व्यवसायात मदत करायला म्हणून. जोशी काकांनी दादांना मदतनीस दिला आणि दादा जोशीकाकांना घेऊन वर्ध्याला गेले. १९३३ मध्ये त्यावेळी पवनार आश्रमाची स्थापना झालेली नव्हती. त्यांचा बालमित्र अजून विनोबा या पदवीने ओळखला जात नव्हता. त्यांचं वास्तव्य नालवाडी या ठिकाणी असे. मित्रांच्या भेटी झाल्या. "विनोबांनी माझा भाविक, श्रद्धाळू, व्यवहारचतुर मित्र" 'अशी दादांची ओळख करून दिलेली जोशीकाकांना स्मरते. दादांनी आरळ्याच्या कामासाठी तिथे वास्तव्य करण्यास तयार असणाऱ्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांची काही दिवसांपूर्वी मागणी केली होती. तेव्हा "तुम्ही तुमचा माणूस आणा. तयार करू." असे आश्वासन विनोबांनी दिलं होतं. त्याचं स्मरण दादांनी करून दिलं आणि जोशीकाकांना विनोबांच्या स्वाधीन केलं. पण एका अटीवर. दोन वर्षांनी हा प्रशिक्षित कार्यकर्ता परत नेईन या अटीवर. विनोबांनी ते मान्य केलं. १९३३ ते ३५ हा काळ विनोबांच्या सूचनेनुसार आश्रमात जमनालाल बजाज यांच्या देखरेखीखाली काढल्यावर दादा जोशीकाकांना परत आणायला गेले. इतका प्रामाणिक, मेहनती, सचोटीचा कार्यकर्ता हातचा जाऊ द्यायला जमनालालजी तयार होईनात. पण विनोबांनी दादांना दिलेला शब्द पाळला. जोशीकाका दादांच्या बरोबर आरळ्याला जाण्यासाठी परतले. शब्दांच्या वजनाला पैशाच्या वजनापेक्षा जास्त वजन असण्याचा तो स्वराज्यपूर्व काळ होता. दोन वर्षे आश्रमात राहून जोशीकाका आरळ्याला परतले ते गांधीजींच्या आदर्शवादी, स्वावलंबी खेड्याचे स्वप्न मनाशी बाळगून. दोघं मिळून योजना आखीत, नव्या नव्या कल्पना राबवीत. दादा पैसा गोळा करून आरळ्याला पाठवीत. जोशीकाका तो विधायक कामासाठी सत्कारणी लावीत. आरळ्याचं राहतं घर हे अशा कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचं एक केंद्रच झालं. ती आता देशपांड्यांची खाजगी मालमत्ता राहिली नाही. आरळ्याचा कायापालट व्हायला हवा असेल तर तेथे तरुण कार्यकर्त्यांची अभेद्य फळी तयार व्हायला हवी, हे दोघं मनोमन जाणून होते. तेथील तरुण पिढीशी जवळीक साधणं, त्यांना सुदृढ, निरोगी करणं याच एक माध्यम म्हणून आरळ्याच्या राहत्या घराच्या चौकाचे तालमीच्या आखाड्यात रूपांतर केलं. लाल मातीने आखाडा सजला. त्या मातीत ओतायला तेलाचे डबे हवेत म्हटल्यावर तेलाचे डबे आणवले गेले. आखाडा आणि लाल माती हे समीकरण मला माहित होतं.

पण त्यांत डबेच्या डबे तेल ओतायला लागतं हे समजल्यावर तेल पिणाऱ्या मातीची मला गंमत वाटली. आता या तालमीत आरळ्याची आणि जवळपासच्या गावची तरुण मुलं कुस्तीच्या निमित्ताने एकत्र जमू लागली. पारावर, देवळांत तंबाखू मळत, पानाच्या पिचकाऱ्या मारण्यात वाया जाणारा त्यांचा वेळ व्यायामात जाऊ लागला. इतिहासातील, त्याचप्रमाणे चालू घडामोडींची माहिती या तरुणांना सोप्या, त्यांच्या भाषेत सांगून त्यांची बौद्धिक कुवत त्यांच्या मनावर दडपण न आणता वाढवली जाऊ लागली. विझलेल्या स्फुलिंगात हळूहळू तेज झळाळू लागले. आपल्या गावकऱ्यांसाठी आपण झीज सोसली पाहिजे. पारतंत्र्य झुगारून देण्यासाठी वेळी प्राणाची बाजी लावली पाहिजे याची जाणीव तरुणांना होऊ लागली. याचा प्रत्यय पुढे आरळ्यात आलेल्या कॉलऱ्याच्या साथीत आला. जोशीकाका आणि ही तरुण मुलं कुठलीही भीती न बाळगता, घाण, किळस न मानता, साथीने पछाडलेल्या, रोग्यांची शुश्रूषा करीत. प्राणाच्या भीतीने नवरा-बायको एकमेकांना सोडून जात, आई-वडील मुलांना टाकून जात. माया, आतड्याचं प्रेम हे शब्द जीवाच्या भयापुढे या साथींत फोल ठरले. अशा भयाण ठिकाणी जाऊन ही मुलं रोग्याची आसपासची स्वच्छता करीत, सेवा करीत. त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? साथ आटोक्यात आली. गावकऱ्यांची मनं जिंकली गेली. वाईटातून चांगलं निष्पन्न झालं. गावकऱ्यांच्या मनात या मंडळीबद्दल प्रेमाची, आदराची, आपुलकीची भावना निर्माण झाली. दादा व जोशीकाका यांनी एकमेकांना पूरक राहून एकजुटीने काम केले. शेतात बी पेरण्यापूर्वी जमीन नांगरून तयार करावी लागते, राब काढावा लागतो. तेव्हा मेहनत करणाऱ्याच्या हाती सकस, अमाप, दृष्ट लागेल असं पीक हाती येतं. तीच प्रक्रिया आरळ्यात, शिराळेपेटच्यात सुरू झाली. कार्यकर्ता म्हणजे कुठल्याही पक्षाचा कणा, पायातील दगड, तो जर मजबूत असेल तर कळस डौलाने मिरवतो. आणि हीच शिकवण गांधीजींनी त्यांच्या जमातीवर बिंबवली होती. दादा व जोशीकाका गांधीजींच्या शिकवणीचे सच्चे शिष्य होते.

### ग्राम सेवा मंडळ, आरळे--स्थापना--प्रगतीची घोडदौड

विधायक कार्याला ठोस चालना मिळावी म्हणून लगेच १९३५ मध्ये "ग्राम सेवा आश्रम आरळे" या संस्थेची दादांनी स्थापना केली. ही संस्था हातसडीच्या तांदळाचे केंद्र चालवी केंद्र आमच्या घरात चाले. जवळ जवळ ६०--७५ बायका तांदूळ सडण्याचे काम करीत. गावातल्या गावात त्यांना रोजगार उपलब्ध होई. त्यांतील काही उखळी आजही त्या घरात आहेत. जुन्या आठवणीचे मूक साक्षीदार म्हणून, जवळ जवळ ५० वर्षानंतर आता जरी हातसडीची केंद्र कालबाह्य वाटली तरी त्या काळात त्यांनी गरीब संसाराला हातभार लावला होता हे निश्चित. सूत कातणं. त्यासाठी चरखा घरात बाळगणं, खादी वापरणं, स्वातंत्र्यपूर्व काळात प्रतिष्ठेचं, देशभक्तांचं प्रतिक मानलं जाई. वस्त्रस्वावलंबनाचं महत्त्व खादीमुळे पटवून दिलं जाई. या सर्वांचा प्रचार आश्रमातर्फे होऊ लागला. सूतकताई केंद्र सुरू झाले. गृहउद्योगाला उत्तेजन मिळावे म्हणन जोशीकाकांचे भाऊ जयराम

महादेव जोशी यांना खास कोकणातून दादांनी बोलावून घेऊन प्रशिक्षित करण्यासाठी होनावरला पाठवले. ते शिंगापासून कंगवे, फण्या, बटनं यासारख्या गरजेच्या वस्तू, त्याच-प्रमाणे वेगवेगळे पक्षी व इतर सुशोभनाच्या वस्तू तयार करण्यात वाकबगार होऊन परत आले. मधुमक्षिका पालनाच्या उद्योगात निष्णात झाले. जयराम अण्णा परतल्यावर घरात या वस्तू तयार करण्यांच नवे गृहोद्योगी केन्द्र सुरू झाले. मुंबईतील ग्रामोद्योग बाजारपेठा मिळाल्याने माल कसा खपेल ही चिंता नव्हतीच. गावाला रोजगार मिळण्याचे एक नवे साधन मिळाले. गाव सुधारू लागला. मधुमक्षिका पालनामुळे १६-१६ लिटरचे डबेच्या डबे मध उपलब्ध होऊ लागला.

गाव स्वावलंबी व्हावे, प्रगतिशील असावे म्हणून चाललेल्या अनेक प्रयत्नांच्या जोडीला, गावकऱ्यांवर धार्मिक संस्कार व्हावेत, मानसिक जडणघडण राष्ट्रप्रेमाच्या दृष्टीने पक्की व्हावी, शिक्षणाचे, स्वच्छतेचे महत्व पटवावे म्हणून दादांनी आत्मारामजी देव उर्फ गुरू देवानंद या आपल्या कारवारच्या मित्राला आरळच्याला बोलावून घेतले. त्यांचा भगवत-गीतेचा, गीताईचा व्यासंग होता. सोप्या भाषेत प्रवचनाच्या माध्यमातून ते गावकऱ्यांना रोजच्या दैनंदिन व्यवहारातील पटणाऱ्या गोष्टी सांगत. श्रद्धा, भक्ति, प्रेम, त्याग एक-मेकांवर अवलंबून आहे. भक्ति, प्रेम असलं की आपोआप, सहजरित्या मोठ्यात मोठा त्याग केला जातो. आई स्वतः उपाशी राहते, फाटके कपडे घालते पण मुलांना खाऊ घालते, नेटका कपडा देते. कारण मुलांवरील तिच्या प्रेमाने तिच्या हातून हा त्याग नैसर्गिकरीत्या होतो. भारतमाता आपली आई. तिच्यावर तुम्ही प्रेम केलं की तुम्ही अतुलनीय त्याग सहजपणे कराल. गावकऱ्यांना ते पटे. प्रवचनासाठी ते आसपासच्या खेड्यात हिंडत, सन १९३९ पासून ५ वर्षं ते आरळच्याला होते. दादा आणि गुरू देवानंद. हे गुरुबंधू-तिरूवन्नमलई या तामिळी राज्यातील थोर साक्षात्कारी संत रमण महर्षींमुळे ज्या आरळच्याला औषधोपचाराची प्राथमिक सोय नव्हती तेथे दादांच्या प्रयत्नाने प्रसूतिगृह सुरू झाले. प्रशिक्षित परिचारिका रूग्णांची तपासणी, औषधोपचार करू लागली.

दादांचे एक मित्र व्यंकटेश हसबनीस आतां वकिलीचा अभ्यास संपवून, पदवीधर होऊन आपल्या गावी शिराळच्याला कायमचे राहण्याच्या इराद्याने परतले होते. आजोबा वकील असल्याने व्यवसायामध्ये उमेदवारी करण्याचा प्रश्न त्यांच्या पुढे येत नव्हता. दादांनी व त्यांनी वकीलीचा अभ्यास एकत्र केला होता, एकत्र राहिले होते. पुण्याला पिलोबांनी दिलेल्या वचनाची दादांनी त्यांना आठवण करून दिली. १० वर्षांपूर्वी दिलेले वचन विस्मृतीत गेलं नव्हतं. दोघांनाही शिक्षणाची आत्यंतिक तळमळ असल्याने गावागावात शाळा काढावी, साक्षरता प्रचाराला चालना द्यावी अशी योजना आखली. कऱ्हाडच्या हर्षे मास्त-रांना या संदर्भात विसरून चालणार नाही. या सर्वांनी मिळून ४०-५० शाळांचं जाळं शिराळेपेट्यात विणलं. अगदी एक शिक्षकी शाळपासून. हर्षे मास्तर, हसबनीस खेड्या-खेड्यातून फिरून शाळांच्या प्रगतीचे आलेख पहात. दादांना कळवत. लागणाऱ्या आवश्यक वस्तुंची यादी दादांना पाठवीत. त्या यादीबरहुकूम वस्तू रवाना होत. गावी

न मिळणारी पुस्तकं, इतर शैक्षणिक गरजेचे साहित्य अनेक वेळा दादांनी डोक्यावरून वाहून नेलं आहे. या शाळा १९४७ पर्यन्त व्यवस्थित चालल्या. स्वराज्य १९४७ साली मिळाले आणि या शाळा लोकल बोर्डाला सुपूर्द केल्या. मुलीचे पालनपोषण करून, लहानाची मोठी करून सासरी पाठवणी केल्याप्रमाणे.

"सातारा जिल्हा ग्रामोद्योग संघाची" स्थापना याच वर्षी १९३५-३६ मध्ये झाली. शंकरराव देव, माणिकचंद दोशी, भाऊसाहेब सोमण, रामभाऊ जोशी, माधवराव देशपांडे हे या संस्थेचे आद्यसंस्थापक होते. या संस्थेने अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली. खादी उत्पादनाला प्रोत्साहन दिले, ग्रामोद्योग भांडार चालवले, कताई केंद्र सुरू केली, जंगलकूपचे काम केले. याच संस्थेने पोलिसांच्या चपलांचं कंत्राट घेऊन त्या व्यवस्थित तयार करून कंत्राट पुरे केले. अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. नव्या शाळा काढल्या इतकंच नव्हे तर सातारा जिल्हयातील सर्व हेडमास्तरांचे रिफ्रेशर्स कोर्सचे खटाव जिल्ह्यातील वडगावला शिबीर भरवले. काशीनाथपंत देशमुख हे १९३५-३६ ला या ग्रामोद्योग संघाचे अध्यक्ष होते. हे काशीनाथपंत वारकरी असल्याने दादांचे आणि त्यांचे गोत्र मस्तपैकी जुळे. पुढे औंधला या संस्थेची सभा झाली. १९५५-५६ पर्यन्त व्यवस्थित चालणारी ही संस्था आपसातील मतभेदामुळे मोडीत निघाली. हा दुहीचा शाप आपल्याला जिथे तिथे नडतो. दुसऱ्यांना समजून घेऊन, पुढील कार्यावर लक्ष ठेऊन पड खाणं आपल्या रक्तात नाही. या संस्थेचे आणि "ग्राम सेवा आश्रम, आरळे" हिचे संबंध पालक व पाल्य यासारखे होते. "सातारा जिल्हा ग्रामोद्योग संघाला माल मिळे, आरळ्याच्या मालाला बाजारपेठ मिळे"

सातारा जिल्हा ग्रामोद्योग संघ या संस्थेचे तीन-तेरा झाले पण १९४६ मध्ये "सहकारी सोसायटी, आरळे" ह्या नावाने स्थापन केलेली संस्था मल्टीपरपज सोसायटी या नावाने अजून काम करीत आहे.

आरळ्याच्या होणाऱ्या कायापालटाने तिथे राहणारी सुलोचना जोशी ही तरूण मुलगी भारून गेली. तिला या चालणाऱ्या विधायक कामात गोडी वाटू लागली. धीट, चुण-चुणीत सोनूताई जोशीकाकांच्या व्यक्तीमत्वाने, निष्ठेने काम करण्याच्या तळमळीने प्रभावित झाली. त्यांना कामात मदत करू लागली. दादांच्या, जोशीकाकांच्या उत्तेजनाने १९६७ साली ही मुलगी वर्ध्याच्या महिलाश्रमात राष्ट्रीय शिक्षणासाठी गेली. दोन वर्षे तिथं राहून, अभ्यासक्रम पुरा करून, निष्ठावंत सैनिक बनून परत आरळ्याला आली. कार्यकर्त्यांच्या साखळीत एका दुव्याची, स्त्री कार्यकर्तीची भर पडली. या मुलीने पुढे जोशीकाकांशी विवाह केला. राष्ट्रकार्यात जोडीने सक्रिय भाग घेतला.

या कार्यकर्त्यांच्या संचात सांगलीचे रहिवासी नेमिनाथ अण्णा कत्ते हे या काळात सामील झाले. यांना कत्तेकाका म्हणून आमच्यासारखे संबोधणारे फार कमी आहेत. कत्ते गुरुजी म्हणून ते सर्वत्र ओळखले जातात. दादांचा व कत्तेकाकांचा परिचय गाडगेबुवांमुळे झाला. १९३७ साली गाडगेबुवाबरोबर, त्यांच्या इतर शिष्यगणांबरोबर कत्तेकाका

आमच्याकडे कांही दिवस रहायला आले. पुढे भजनं, किर्तनं या मार्गे जनजागरणाच्या गाडगेमहाराजांच्या कार्यक्रमाचा त्यांना कंटाळा आला. बुवाच्या बरोबर राहणं त्याना रूचेना. त्यांनी आपल्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली. मी हे विनोबांचे, गांधीजींचे रचनात्मक कार्याचे ब्रीद सोडणार नाही, माझी हाडं या कर्मभूमीत आरळयांत पडतील असं आश्वासन त्यांनी दादांना दिलं होतं. त्यांच्या गरजा फार कमी, राहणी साधी होती. गीताई व विनोबांच्या साहित्याचा प्रचार व विक्री या कार्यात त्यांना विशेष रस होता.

या सर्व उलाढालीचं केंद्रबिंदू असणारं आमचं आरळयाचं घर आता अपुरं पडू लागलं म्हणून घर वाढवायचं ठरलं. मागील बाजूला भली मोठी पडवी जुन्या घराला लागून बांधली त्यामागे मोठया खोलीची भर घातली पडवीतून वर गेल्यावर दुसरी खोली व पुढे पत्र्याची गच्ची असा घराचा विस्तार केला. मध्ये तळमजल्याला तालमीचा चौक होताच. यासाठी लागणारं सीमेंट, पत्रे वगैरे सामान मोठया जिकीरीने दादांना मुंबईहून आणावं लागलं. तेही बैलगाडीतून. विटा पाडण्यासाठी विटाळं मुंबईहून आणलं. विटा आरळयाला पाडल्या. अशा विटा कुणाच्याही घराच्या भिंतीसाठी त्यावेळेपर्यंत वापरल्या नव्हत्या. पडवीतून वर जाणारा जिना बैलगाडीतून आरळयापर्यन्त नेता यावा म्हणून दोन भागात तयार केला. आरळयाला पोचल्यावर जिन्याचे दोन भाग नटबोल्टने एकत्र करून तो सलग झालेला जिना पडवीत उभा केला. जिन्याचे माप एकदम बरोबर झाले. आता ऐसपैस मोकळया पडवीत हातसडीची, सूतकताईची केंद्रं नव्या उमेदीने चालू लागली. त्यावेळी देशपांडे यांचे इनामदारी शेतीचे उत्पन्न ५००-६०० रूपये सहज येई. त्यावेळी ही रक्कम लहान वाटत नसे. पण दादांनी, काकांनी त्यातला एकही तांबडा पैसा आपल्या वैयक्तिक घरासाठी वापरला नाही. उलट स्वतःच्या कमाईची त्यात भर घालून गावाच्या उन्नतीसाठी त्याचा विनियोग केला. काकांनी "माझा वाटा हवा" म्हणून तंटाबखेडा केला नाही. दादा जे काही करतील त्याला त्यांचा सक्रिय पाठिंबा असे, जरी त्यांनी दादांसारखे आरळयाला वारंवार हेलपाटे मारले नाहीत तरी.

**आरळयात देशपांडयांचा उदोउदो.**

भाऊबंदांनी २५-३० वर्षापूर्वी राधाबाईंना, आमच्या आजीला आणि तिच्या दोन अजाण लेकरांना थारा दिला नव्हता. त्यावेळी आरळयाच्या ज्ञानूदादा पाटलांनी आजीला त्यांच्या ओसरीवर टेकण्यासाठी जागा दिली होती. आजी, जोशीकाका तिथे अन्न शिजवून खात. भाऊबंद झिडकारीत. म्हणत, "आले मोठे वाटा मागायला गुजराथेतून. इतकी वर्षे आम्ही राखलं ते देण्यासाठी थोडंच" ज्ञानूदादा समजावून सांगत, "हा पण देशपांडयांचा वंशच आहे ना! त्यांच्याशी असं दुजाभावाने वागणं शोभादायक नाही. या भाऊबंदांनी आता बदलती परिस्थिती जाणली. एक मुलगा वकील, एक मुलगा इंजिनिअर, दोघंही गावच्या भलाईत रस घेणारे. राधाबाईंचा भाव वधारला. एक पाट सात ठिकाणी होऊ लागला. चहाफराळाची, जेवणाची आमंत्रणावर आमंत्रणं येऊ लागली. वकिली चालली नाही तर आरळयाला स्थानिक होऊन शेती करण्याची दादांची मनाची तयारी होती

पण वकिली उत्तम चालल्याने ती वेळ त्यांच्यावर आली नाही. अधून मधून बाई, मी बापू आरळयाला जात असू. त्यावेळी आमचा वट पडे. आम्हा शहरी मुलांना बघायला तिथली मुलं, त्यांचे आई-वडिल येत पण बैलगाडीच्या प्रवासाने आमचा पार खुळखुळा झालेला असे. बेदम ताप भरे. या आमच्या नाजुकपणाचा त्यांना वाटणारा अचंबा त्यांच्या चेहऱ्यावर दाटून येई. ४-२ दिवस गेल्यावर आमचा प्रवासाचा शीण जाई. त्यांच्याबरोबर उनाडक्या करण्यात आम्ही सामील होत असू. त्यांच्याबरोबर पोहायला नदीवर जाणं, नदीकाठच्या शेतातील मक्याची कणसं तिथल्या चघळात भाजून खाणं, करवंदाच्या जाळ्या ओरबाडणं, पळत पळत वाघजाईचा डोंगर चढण-उतरणं कशात म्हणून त्यांच्यापेक्षा उणे पडत नसू. घोड्यावरच्या माचणीने घरात पाणी भरलं जाओ, तरी मजा म्हणून लहानशी कळशी घेऊन झऱ्यावरून, नदीवरून पाणी आणतांना आम्हा मैत्रिणींच्या गप्पांना भलताच रंग चढे. आजी आमच्याबरोबर असली की, तिला भेटायला, तिच्या पायावर स्वतःची लहान मुलं घालायला बायका येत. भाऊबंद येत. आजी मग 'फुल फार्मात' येई. देशभक्त, समाजसेवक अशा प्रतिष्ठित मुलांची ती प्रतिष्ठित माता होती. त्यावेळी विनोबांनी भगवत्गीतेचे मराठी भाषांतर 'गीताई' नुकतेच केले होते. गीताईच्या अनेक प्रती आमच्याबरोबर वाटायला नेलेल्या असत. अशावेळी आजीला भलताच हुरूप येई. एक प्रत ती भेटीला येणाऱ्याच्या हाती देई. मला हाक मारी आणि पहिला श्लोक म्हणायला सांगे. लगेच सुरू होई, 'त्या पवित्र कुरूक्षेत्री, पांडुचे आणि आमुचे जमतेम ६-७ वर्षाची असलेली मी अितक्या स्पष्ट उच्चारात घडाघडा संबंध श्लोक, तोही पुस्तकात न बघता म्हणते म्हणजे काय? याचं कौतुक ऐकणाऱ्याच्या मुद्रेवर दाटुन येई. प्रथम प्रथम मला मजा वाटली. मी फुशारून गेले. पण दिवसाकाठी त्याच्या आवृत्यावर आवृत्या व्हायला लागल्यावर मी कंटाळून गेले. पण 'मी कंटाळले, आता म्हणत नाही' असं आजीला सांगण्याची माझी हिंमत नव्हती.

१९३५ पासूनच्या कालखंडात शिराळे पेटा आरळे येथे विधायक कामाची घोडदौड चालली. दृष्ट लागण्याजोगा कार्यकर्त्यांचा संच जमला होता. मार्गदर्शनासाठी तितक्याच तोलामोलाची माणसं उपलब्ध होती. त्याच काळात दादांच्या मुंबई व उपनगर येथील कामाची मुहूर्तमेढ उघड उघड रोवली गेली. अबोलपणे केलेली अनेक कामं लोकांच्या नजरेत भरू लागली. देशस्थ-ऋग्वेदी ब्राह्मण संघ, पार्ले शाखा, यांनी मासिक काढायचं ठरवलं. नांव दिलं 'समर्थ'. या मासिकाचे संपादकपद स्वीकारण्याची गळ मंडळाने दादांना घातली. दादांनी संघाच्या प्रेमाखातर ती जबाबदारी स्वीकारायला होकार दिला. समर्थ मासिकाचे दादा पहिले संपादक झाले. ही जबाबदारी त्यांनी ४१ पर्यन्त, ते तुरुंगात जाईपर्यन्त पार पाडली. पुढे हे मासिक दादर मध्यवर्ति मंडळ येथून निघू लागले. नुकताच मासिकाचा रौप्य महोत्सव झाला आहे. मासिकाच्या मुखपृष्ठावर लंगोटी लावलेल्या, कुबडी घेतलेल्या जटाधारी रामदासांचे तेच चित्र आजही आहे.

पार्ले टिळक विद्यालय या राष्ट्रीय बाण्याच्या शाळेबद्दल दादांना फार प्रेम. येथील

शिक्षकांत वेतनश्रेणीवरून, त्याचप्रमाणे मोठ्या रजेत शिक्षकांना नोकरीवरून दूर करून, परत शाळा सुरू झाली की त्यांची भरती करून कायम न करण्याच्या धोरणाबद्दल, रजेचा पगार वाचवण्याबद्दल असंतोष होता. शिक्षकांनी त्यांच्या मागण्या पदाधिकाऱ्यांना सादर केल्या होत्या. त्या मागण्या व पगारवाढ दादांनी मध्यस्ती करून, खटपट करून शिक्षकांना मिळवून दिल्या. या कामासाठी तारकुंडे व उद्‌गीरकर हे दोघे शिक्षक आमच्या घरी वारंवार येत. दादांनी हे काम निरपेक्ष बुद्धीने केलं तरी शिक्षकांना आपली कृतज्ञता कशी व्यक्त करावी हे सुचत नव्हतं. शेवटी त्यांनी चंदनी नक्षीदार चौकटीत बसवलेला गांधीजींचा भला मोठा फोटो आणि मानपत्र समारंभपूर्वक दादांना दिले.

## चौफेर घोडदौड

याच काळात मुंबई उपनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे स्व. बाळासाहेब खेर अध्यक्ष व दादा चिटणीस होते. दादा वान्द्र्याचे रहिवासी तर बाळासाहेब खारचे. रोज सकाळी दादा आणि बाळासाहेब फिरायला बाहेर पडत. दादा वान्द्र्याहून तर बाळासाहेब खारहून. भेटण्यासाठी दोघांना सोईची जागा म्हणून टर्नर रोडचा कोपरा. वान्द्रे व खार या दोन्ही गावांपासून तसा समदूर असलेला ठरलेला होता. दोघांची गाठ पडल्यावर ते पुढ एकत्र चालत जात. यावेळी अनेक योजनांचा तपशीलवार उहापोह होई. रूपरेषा आखली जाई. स्वस्त धान्याच्या दुकानांची योजना ही अशीच साकारली. ही दुकाने सुरळीत चलतात का, हे पाहण्याची जबाबदारी दादा चिटणीस असल्याने त्यांच्यावर येई. चांगल्या चांगल्या सुखवस्तु घरची सुशिक्षित तरुण मुलं-मुली हे काम स्वेच्छेने करीत. धान्यांचं वजन करण, विक्री करणं, पैशाचा हिशोब ठवणं ही कामे मजेत होत. धान्याच्या गोणीच्या गोणी पाठीवरून वाहून आणून दुकानात आणून टाकल्या जात. सध्या कोरा ग्रामोद्योग केंद्राची पुष्पवाटिका सांभाळणाऱ्या दत्तूभाऊ हट्टंगडी या ध्ययवाद्याची व दादांची ओळख या निमित्ताने झाली. हा परिचय कोरा ग्रामोद्योग केंद्र १९४६ मध्ये स्थापन झाल्यावर जास्त दृढ झाला. हे दत्तूभाऊ एकटे ६—६- दुकानांना माल पुरवण्याचे काम करीत. खादीचा प्रसार व विक्री घरोघरी फिरून या कार्यकर्त्याकरवी होई. हातगाडीवरून खादी विकली जाई. ही सगळी कामं घरचं खाऊन स्वयंसेवक, स्वयंसेविका आनंदाने करीत. असं एक विक्री केंद्र हिल रोडला रतनचंद सेमलानी यांच्या दुकानाच्या रांगेला कोपऱ्यावर होते. या केंद्राचे उद्‌घाटन करायला सरोजिनी नायडू आल्या होत्या. दत्तोबा नथोबा वांद्रेकर, सदाशिव गोपाळ जोशी, नलूताई सबनीस, रतनबेन मेहता, भिकीताई सामंत, उस्मानचाचा, रचनचंद सेमलानी दादांच्याबरोबर काम करीत. सूत काढणं, खादी वापरणं तर बहुसंख्यांचा धर्म झाला होता. काँग्रेस हा पक्ष बहुजन समाजाने त्याचप्रमाणे सुशिक्षित वर्गाने स्वीकारला होता, आपला मानला होता. स्वतःचा व्यवसाय, नोकरी सांभाळून अप्रत्यक्षपणे मागे राहून मदत करणारी मंडळी बहुसंख्येने तितकीच होती. वान्द्र्याच्या खाटिकखान्यात प्रचारासाठी असह्य घाण, दुर्गन्धी सहन करून ही मंडळी गेली की तिथे काम करणाऱ्यांना वाटे, ये अमीर घरके पढे लिखे लोग,

लडकिया यहाँ किचडमें आते हैं। उनका सुनना होगा, सांगितलेले पटवून घेत. मुस्लीम जमातीत वकील म्हणून पैसा गाठो बांधण्याच्या मागे न लागणारा एक यशस्वी वकील म्हणून दादांची प्रतिमा तयार झाली होती. दादा वांद्रा नगरपालिकेसाठी निवडणुकीला उभे राहिले १९३५ साली. त्यावेळी ही लोकप्रियता त्यांना उपयोगी पडली. या समाजाने दादांना भरघोस पाठिंबा दिला. दादांचे प्रतिस्पर्धी श्री. डिमोंटे यांच्यापेक्षा पाच-सहाशे मते अधिक मिळवून दादा निवडून आले. त्यावेळचे मुस्लीम नेते रमजू कालू ख्वाजा इस्माइल, उस्मान-चाचा यांनी प्रचारकार्यात जिवापाड मेहनत केली. वान्द्र्याच्या कसाई जमातखान्यात श्री. रमजू कालू यांच्या अध्यक्षतेखाली सहा-सातशे उपस्थितांच्या सभेत माधवरावांचा विजय साजरा करण्यात आला. ख्वाजा इस्माइल हे मुस्लीम नेते सभेला आवर्जून उपस्थित होते. निवडणुकीतील जयामुळे दादांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र मिळाले. शिक्षण समितीचे ते अध्यक्ष झाले. पण पुढे काय झाले? ज्या कसायांनी त्यांना निवडून दिले, त्यांच्यात दोन तट पडले. खुनाखुनीपर्यंत पाळी आली. आपसात प्रकरण मिटेना. शेवटी कोर्टातर्फे दादांना हे भांडण मिटवावे लागले. दादांचा कल जुन्या मंडळीकडे होता.

त्यावेळी प्रत्येक उपनगराचे वेगळे लोकल बोर्ड होते. सर्वांचा मिळून उपनगर जिल्हा होई. प्रत्येक लोकल बोर्डाचा स्थानिक कारभार वेगळा असे. जवळजवळ पंधरा वर्षांनी, १९५० मध्ये, उपनगरे मुंबई नगरपालिकेत विलीन झाली. मुंबई नगरपालिका, मुंबई महानगरपालिका म्हणून विस्तारित केली गेली.

१९३५ मध्ये दादा निवडून आले, त्यावेळी वान्द्र्याचे लोकल बोर्ड वान्द्र्याचा कारभार पाही. शिक्षण समितीचे अध्यक्ष झाल्यावर दादांनी एक गोष्ट केली. विनोबांची गीताई मराठी शाळेत लावली, मुलांवर संस्कार व्हावेत, शब्दोच्चार स्पष्ट असावेत, पाठांतराची सवय मुलांना लागावी या हेतूने.

बाळासाहेब खेर, शांतीलाल शहा, मुजुमदार, माधवराव देशपांडे यांनी पुढाकार घेऊन ३०–३२ मध्ये दांडा येथे धोबी सोसायटीची स्थापना केली. पण पुढे ३८–३९ मध्ये सरकारने टाऊन प्लॅनिंग स्कीमसाठी दांड्याचा धोबीघाट पाडायचा हुकूम दिला. त्यावेळी दादांनी खटपट करून सरकारकडून मुदत वाढवून घेतली. धोबी सोसायटीवरील गंडांतर तात्पुरते टळलं. पुढे वाडिया ट्रस्टकडून वाकोला येथे धोबीघाटाकरता जागा मिळवून घाट तेथे नेला. ५०–६० धोब्यांची सोय केली. दांडा येथील धोबीघाटाच्या वाढवलेल्या मुदतीच्या आत हे काम पुरे करायलाच हवं होतं. ते पुरें झालें. या जमातीचे पोट त्यांच्या धंद्यावर. अनेक वेळा नगरपालिकेच्या पाण्याच्या व इतर बिलांचे पैसे भागवायचे या गरीब लोकांना जमत नसे. पालिकेकडून पाणी तोडण्याची नोटीस येई. मग दादांची धावपळ सुरू होई. आमचे गाववाले नगरसेवक बाबूराव जाधव त्यांना मुलासारखे. तेही दादांना वडिलधारे म्हणून मानीत. दादा त्यांना भेटून पाणी कपातीची मुदत वाढवणे, बिल भरण्याची मुदत वाढवणे यासाठी खटपट करायला सांगत. यावेळी दोघांचे वेगवेगळे पक्ष त्यांच्या मनात येत नसत. गरिबांची कणव त्यांना ही सर्व खटपट करायला भाग पाडी. धोबी

सोसायटीचे संकट तात्पुरते टळे. बाबूरावांच्या दुकानावरून त्यांची चौकशी केल्याशिवाय दादा कधी पुढे गेले नाहीत. पुढे काही वर्षांनी बाबूरावांनी कर्ज घेतल्याचे दादांच्या कानी आले. लगेच दादांनी कर्ज कां घेतलं याची चौकशी बाबूरावकडे केली. कर्ज पैसे उडवायला न घेता जागेसाठी घेतलं याची जेव्हा खात्री पटली तेव्हा त्यांच्या जिवाला शांतता मिळाली. बाबूरावांनाही दादा चांभारचौकशा करतात असे वाटले नाही. बाबूराव जनता पार्टीचे तर दादा अस्सल गांधीवादी. पण निवडणुकीला उभे राहण्यापूर्वी बाबूराव बाई–दादांच्या पाया पडायला यायला विसरत नसत.

१ ऑगस्ट १९३९ साली दारूबंदीचा कायदा झाला. त्यापूर्वी जुलै महिन्यात विचार-विनिमय करण्यासाठी त्यावेळेचे खेर मंत्रीमंडळातील गृहमंत्री कन्हय्यालाल मुन्शी यांनी एक सभा बोलावली होती, कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात. या सभेला येण्याबाबत नाशिकच्या बॅ. डोंगरे यांच्या सहीचे एक पत्र दादांना आले होते. दादा व उस्मानचाचा जुन्या सचिवालयात गेले. तेथे बैठकीत बाळासाहेब खेर, वान्द्रेकर, भानु-शंकर याज्ञिक वगैरे होते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रोहिबिशन गार्ड नियुक्त कर-ण्यात आले. दादा एस्.डी.ओ.(सबर्बन डिव्हिजनल ऑफिसर)झाले. त्यांच्या हाताखाली दहा गार्डस् असत. या गार्डनी दारुच्या गुत्यांची माहिती पुरवावयाची आणि एस.डी.ओ.ने ते पोलीस खात्याच्या मदतीने बंद करायचे असे सूत्र होते. त्याबद्दल एक दैनिक वृत्तपत्र निघत असे. दारूबंदीच्या प्रचारासाठी दादांनी अनेक सभा आयोजित केल्या, भित्तिपत्रकांचे सहाय्य घेतले. या विरोधाने दारू गुत्तेवाले दादांवर चिडले. मारण्याची धमकी दिली. पण ज्याच्या-पाठी परमेश्वर आहे त्याचा केसही कोण वाकडा करणार? या दारूबंदीच्या अंमलबजावणीत पत्की नावाचे एक गार्ड मदत करीत. त्यांनी एका ख्रिश्चन कोळी मुलीशी लग्न केले. हे आंतरधर्मीय लग्न गोरेगावच्या मसुराश्रमात झाले. या लग्नाला दादा आवर्जून हजर राहिले होते.

काँग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ मुंबई राज्यात निवडून आले १९३७ मध्ये. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री, मुरारजीभाई महसूल मंत्री तर कन्हैय्यालाल मुन्शी गृहमंत्री झाले. मर्यादित स्वातंत्र्य खेर मंत्रीमंडळाला होते. अंतर्गत कारभारात इंग्रज सरकार ढवळाढवळ करणार नव्हतं. बाळासाहेब उपनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व दादा चिटणीस म्हणून काम करीत असल्याने दोघात खूप जवळीक होती, वैयक्तिक पातळीवरही. बाळासाहेब खास महत्त्वाची कामं दादांच्यावर विश्वासाने सोपवीत. स्व. यशवंतराव चव्हाण त्यावेळी सुशिक्षित उदयोन्मुख कार्यकर्ते होते. साताऱ्च्या भाऊ सोमण यांचेकडून ओळखपत्र घेऊन येणाऱ्या यशवंतरावांना घेवून येण्यासाठी बाळासाहेबांनी दादांना खास पाठवले होते. याचा उल्लेख यशवंतरावांच्या आत्मचरित्रात आहे. पुढे अधिकाराच्या उच्चासनावर असलेले यशवंतराव दादा भेटले तर गाडी थांबवीत. तुम्हाला जिथे जायचे तिथे सोडतो म्हणत, दादा नम्रपणे नकार देत. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. साम्राज्याच्या हितासाठी या युद्धाला काँग्रेसने विरोध केला. युद्धाला मदत करू नये अशी भारताने भूमिका

घेतली. युद्धाबद्दल तात्त्विक भूमिका मांडण्यांचे भाषण स्वातंत्र्य भारताला हवं होते. या सरकारविरोधी धोरणाचे भाषण स्वातंत्र्य इंग्रज सरकारने काँग्रेसला नाकारले. निषेधाप्रित्यर्थ खेर मंत्रीमंडळाने राजीनामा देऊन टाकला. या मर्यादित स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह होणार होता, तो गांधीजींच्या कल्पनेनुसार.

बाळासाहेब मुख्यमंत्री पदावर असताना या दोघा मित्रांच्या गाठीभेटी वारंवार होत असत. दादांच्या मुंबईतील सामाजिक, राजकीय चढत्या आलेखाचे बाळासाहेब जवळचे साक्षीदार होते. शिराळे पेटचात चाललेल्या अनेकविध विधायक कामाबद्दल अधून मधून त्यांच्या कानावर बातम्या येत. दोन्हीकडे सारख्याच तळमळीने काम करणाऱ्या दादांचे शिराळे पेटचातील काम प्रत्यक्ष बघावे असा सूप्त विचार त्यांच्या मनात घोळत असावा. दादांनी तेथील कार्य बघायला येण्याचे आमंत्रण मुख्यमंत्र्यांना दिले. खेर साहेबांनी आढेवेढे न घेता ते स्वीकारले. सर्व प्रकारच्या प्रवासातील गैरसोयी सोसून मुख्यमंत्री शिराळे पेटचात आले. कुठल्याही प्रकारच्या प्रवासाच्या खास सुविधा त्यांनी उपभोगल्या नाहीत. ते खरे जनतेचे सेवक होते, रक्षक होते, भक्षक नव्हते. शिराळचाच्या पिलोबा हसबनीसांकडे दादांच्या मित्राकडे त्यांची उतरण्याची व्यवस्था केली होती. त्यावेळेचे बारीकसारीक तपशील आज जवळजवळ ५० वर्षांनी हसबनीस सांगतात. शाळांचं विणलेले जाळे, हातसडीची, कताईची केंद्रे, हरिजनोद्धार, शब्द न वापरता चाललेले जातिनिरपेक्ष काम बघून बाळासाहेबांनी समाधान व्यक्त केले. कार्यकर्त्यांचे कौतुक केले. दादांनी बाळासाहेबांना आणले आणि बाळासाहेब, एक मुख्यमंत्री, आपुलकीने आले. शाबासकीची नजर टाकली, त्यामुळे स्थानिक कार्यकर्ते आणखी जोमाने काम करण्याची जिद्द बाळगू लागले.

दादांच्या कर्तृत्वाचा वारू चौफेर धावत होता. मुंबई व आरळ्याचे काम यापैकी कुठलही काम दुर्लक्षित करून चालणार नव्हतं. कर्तृत्व कुणाच्याही नजरेत भरण्याइतकं घणसर होतं. याच्या जोडीला वकिली उत्तम चालल्यानं आर्थिक स्वास्थ्य होतं. जे घर भाड्यानं राहण्यासाठी १९२८ मध्ये घेतलं तेच भोजन्यांच्या मालकीचं घर दादांनी १९३६ मध्ये विकत घेतलं, याला जोडून असणाऱ्या चाळीसकट. त्यावेळी बंगला व चाळ अलग होती. नंतर त्यांना जोडणारा छोटा जोडपूल बांधला. घरात आजही फारसा फरक झालेला नाही. बाह्यत: तेच कौलारू छप्पर, तीच अर्ध्या भिंतीवरील ग्रीलऐवजी लाकडी चौकटीने बंदिस्त केलेली ओटी. नवीन भेटीला येणाऱ्यांना आजही आम्ही घर ओळखण्याची तीच खूण सांगतो. विकत घेतलेल्या घराची डागडुजी व्हायला ३७ साल उजाडलं. तेव्हा जागेची चणचण नसल्याने चाळीतील १ ल्या मजल्यावरील ४ खोल्या रिकाम्या होत्या, सध्या बापू, माझा भाऊ राहतो त्या. एकदा गाडगेबुआ आपल्या शिष्यगणांसह वांद्राला आले होते. दादांना गाडगेबुवाबद्दल आदर होता. बहुजन, रुढीप्रिय, अशिक्षित समाजाला गाडगेबुवा त्यांच्या सोप्या बोलीभाषेत समजावून सांगत. "दगडाच्या देवाल्ये नवस करू नोका, कोंबडं वाहू नोका, नवसाले देव पावत नाही." स्वच्छतेचे, साक्षरतेचे, शारीरिक श्रमाचे महत्त्व पटवून सांगत. आयतं

खाणं पाप आहे. आंधळ्या, पांगळ्या, बहिऱ्यांना आळसात वेळ न घालवता एक-मेकांच्या सहकार्याने काम करायला लावत. अधून मधून कीर्तनात डोक्यावर हात घेऊन टाळ्या वाजवायला सांगून देवकीनंदन गोपाळाचा गजर करायला लावीत. त्यांनी अनेक धर्मशाळा बांधल्या. लोकोपयोगी कामे केली. गाडगेबुवा नेहमी दादांच्या-कडे ऑफिसमध्ये भेटायला येत. दादा त्यांना यथाशक्ती मदत करीत. वांद्र्याला ते आल्याचं कानावर आल्यावर दादांनी त्यांना घरी रहायला येण्याचं आमंत्रण दिलं. वरच्या मजल्यावरील खोल्या त्यांना वापरायला दिल्या. या संताचे पाय आपल्या नुकत्या विकत घेतलेल्या वास्तुला लागले, त्यांचा आशीर्वाद मिळाला. आता वेगळी वास्तुशांत, सत्यनारायण करायचा नाही असा निर्णय दादांच्या भाविक मनाने घेतला. गाडगेबुवा राहिले अल्पकाळ पण ते आमच्याकडे मुक्कामाला असल्याचे कळले आणि माणसांची नुसती रीघ लागली. दर्शनाला येणाऱ्या बायकांना कुणाला भाकरी, कुणाला कढी असंच काहीबाही ऊरलंसुरलं आणायला सांगून, त्याचा काला करून गाडगेबुवांनी आपली भूक शमवली. घरातील बायकांना त्यांच्यासाठी किंवा त्यांच्या शिष्यपरिवारा-साठी वेगळा स्वयंपाक रांधावा लागला नाही. या अनेक शिष्यांपैकी एक नेमिनाथ अण्णा कत्ते. पुढे कत्ते विनोबा, गांधीजींचे अनुयायी झाले. हीच त्यांची व दादांची पहिली ओळख. आम्ही शाळेतून घरी आलो तर घरासमोर ही भली गर्दी. आम्ही तितकच आमच्या मित्रमैत्रिणीत भाव खाऊन मिरवून घेतलं. गाडगेबुवावरील सेवक मासिकातील दादांचा लेख, या पुस्तकाच्या परिशिष्टात दिला आहे.

दादांचा व्याप चारी बाजूंनी इतका वाढला की, एकटे यशवंतराव ऊर्फ तात्या जोशी त्याला पुरे पडेनात. डाकोरनाथ वाघ ह्या सावळ्या, नाकेल्या, चुणचुणीत मुलाला दादा १०-१२ वर्षे बघत होते. हा मुलगा शनिवारवाड्यात राहणाऱ्या आपल्या मित्रा-कडे येई. दादा त्यावेळी शनिवारवाड्यात राहत होते. डाकोरनाथ हे वारकरी संप्रदाय असलेल्या घराण्यातील. १९३६ साली मॅट्रीक झाले. वय सुमारे २० वर्षांचे. घरची अत्यंत गरिबी. पण प्रामाणिकपणा, सचोटी, शुचिर्भूतपणा जपणाऱ्या कडक शिस्तीच्या वडिलांच्या देखरेखीखाली डाकोरनाथांचं बालपण संपलं. त्याच्या कुटुंबाला पैसे मिळविण्याची आत्यंतिक गरज होती पण नोकरी काही मिळेना. डाकोरनाथांना जुजबी टंकलेखन येत होते. कागदोपत्री प्रशस्तिपत्राची, प्रमाणपत्रांची चिकित्सा न करता दादांनी त्यांना टंकलेखक म्हणून ठेऊन घेतलं. गरीब होतकरू मुलांबद्दल दादांच्या मनात अपार माया होती. अशा मुलांना ते सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करीत. सकाळी सकाळीच स्वच्छ काच्याचे धोतर, शर्ट, काळी टोपी, कपाळी ऊभे गंध, नाम लावलेले, प्रसन्न व्यक्तीमत्वाचे डाकोरनाथ टंकलेखनाच्या कामासाठी येत. दादांनी सांगितलेले काम करीत, निघून जात. हे काम सध्या जिथे ऑफिस आहे तिथेच चाले. टंकलेखन करता करता दादांचे त्यांच्या अशिलांशी, मित्रांशी चालणारे बोलणे डाकोरनाथांच्या कानी पडे. दादा त्यावेळी ४० च्या घरात होते. पंढरपूर, आळंदीच्या वारीला जात.

अनेक वेळा पायी. त्यांचा मूळ पिंड आध्यात्मिक होता. त्यांच्या सहवासात कुठल्याही भूमिकेतून येणाऱ्यांना वारकरी पंथाची दीक्षा दादांकडून मिळे. न्यायाधीश गुप्ते, गोरेगावचे मॅनेजर गुप्ते दादा बरोबर वारीला जात. जाऊन आल्यावर त्यासंबंधी त्यांची चर्चा चाले. हे सर्व वातावरण डाकोरनाथांच्या पिंडाला पोषक होते. "हे अमोल विचार धन मला ह्या नोकरीत मिळालं. नोकरी हा शब्द इथे अयोग्य आहे, कारण दादांनी मला घरच्यासारखं सांभाळलं," हे सांगतांना त्यांचे डोळे पाणावतात. त्यांना रेल्वेत नोकरी मिळाल्यावरही ते दादा बोलावीत तेव्हा येत, दादांचा शब्द खाली पडू देत नसत.

ह्या सगळ्या व्यापातून आम्हा मुलांच्या, बाईच्या वाट्याला दादा फार कमी येत असत. पायाला चक्र लावल्याप्रमाणे त्यांची सतत भ्रमंती चाले. घरी मुक्काम असा थोडा असे. मागेपुढे कामानिमित्त माणसं असत. घरी असले की देवपुजा करीत. गंध ऊगाळता ऊगाळता आम्हा मुलांना देवघरात बोलावीत, श्लोक शिकवण्यासाठी. संस्कृतचं त्यांचं प्रेम आणि पाठांतर यावेळी दिसून येई. भर्तृहरीच्या नीति वैराग्य शतकातील किती तरी श्लोक त्यांनी आमच्याकडून पाठ करून घेतले. आमचे संस्कृत सुभाषितांमधील अनेक श्लोक अशाच प्रकारे मुखोद्गत झाले. भर्तृहरीच्या पहिल्या श्लोकाची शेवटची ओळ 'स्वानुभुत्येक मानाय नमः शान्ताय तेजसे.' ही पाठ झाल्यावर मला दादांनी सांगितलं. "शांता हे नांव तुला आवडत नाही हे मला माहीत आहे. या श्लोकात वर्णन केलेल्या सौम्य, शान्त, दिशा काळाचे बंधन पार करणाऱ्या तेजासारखी तू व्हावीस म्हणून हे नाव ठेवलं." मी तशी झाले नाही तो भाग वेगळा.

मुलांनी खूप शिकावं, चौफेर ज्ञान मिळवावं हे तत्त्व मनात बाळगून दादांची आम्हा मुलांना वागवण्याची पद्धत सगळ्यांना परिचित होती. देशसेवेसाठी, त्यात समाजसेवा आलीच, ते बाहेर असले तरी, आमच्या शिक्षणाची आबाळ त्यांनी केली नाही. बौद्धिक क्षेत्रात आम्ही चमकावे, संगीतात पुढे यावे असं त्यांना फार वाटे. मी त्यांचे पहिले अपत्य म्हणता येणार नाही. माझ्या आधीचा मुलगा जन्मला तो मृतावस्थेत. त्यानंतर बाईची प्रकृति तशी बेतास बात असे. माझ्यासाठी त्यांनी किती प्रकारचे शिक्षणोपयोगी साहित्य आणावे म्हणून सांगू. माझे हस्ताक्षर चांगले व्हावे म्हणून खास पाटी, आकार, ज्ञानासाठी वेगवेगळ्या आकारांचे रंगीबेरंगी ठोकळे, अंकगणित पक्के व्हायचे तर अंक मोजता यायला हवेत म्हणून रंगीबेरंगी बोराएवढे चकचकीत मणी, कार्ड-बोर्डस् भोक पाडलेली, कशासाठी तर लोकरीने भरतकाम करण्यासाठी, तीही पशुपक्षांची. एकाच दगडात दोन पक्षी मारले दादांनी. मला लिहायला, वाचायला यायची खोटी, दादांनी भली मोठी इसापनीति आणून दिली. मी पण त्यांचीच मुलगी. मुंबई-आरळ्याच्या प्रवासांत, जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी इसापनीतिच्या वाचनाचा ध्यास घेतला. प्रवास पुरा व्हायच्या आधी मी त्या पुस्तकाचा फडशा पाडला. पुन्हा आपलं वाचायला काय देता, द्या म्हणून रिकामी. वाचनाचं मला अपरंपार वेड होतं. वाचायला काहीही

चाले. दादांना ते आवडत, पटत नसे. मला समजायला लागल्यावर ते पटवून देत. बकरी जशी दिसलं झुडुप की घातलं तोंड, असं वाचू नये. निवडक चांगलं वाचावं. पण मी कसली, एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत असे. सहाव्या वर्षी मी शेजारच्या नगरपालिकेच्या शाळेत दाखल झाले. आमच्या चाळीत राहणाऱ्या वाईरकर हेडमास्तरांना दादांनी सांगितलं, "शान्तीची परीक्षा घ्या आणि योग्य त्या वर्गात तिला बसवा." दादा त्यावेळी शिक्षण समितीचे अध्यक्ष होते. पण त्यांनी कुठल्याही प्रकारची हुकमत प्रवेशासाठी गाजवली नाही, दडपण आणलं नाही. सध्याच्या के. जी. सिनीअर के. जी. प्रमाणे बिगारी होती. त्यानंतर १ ली, २ री चे वर्ग सुरु होत. मास्तरांनी परीक्षा घेतली. जोडाक्षरासकट काही शब्द, काही वाक्य घातली. ती सगळीच्या सगळी बरोबर आली. मग घातलेले हिशोब आणि पाढे बरोबर आले. मग त्यांनी पलाखे घातले. पलाखे म्हणजे सात चोक किती असा सरळ प्रश्न न विचारता किती चोक अठ्ठावीस असा ऊलटा प्रश्न विचारायचा. पलाखा हा प्रकार मला माहित नव्हता, शब्द कानावरून गेला नव्हता. ह्या पलाख्यावर माझी विकेट पडली आणि माझी रवानगी ३ रीत झाली. वर्गात बसले खरी पण मला पाटीवर सरळ रेघा मारता येत नव्हत्या. मग कुणीतरी मोठ्या मुलाला माझ्या पाटीवर रेघा मारून द्यायला मास्तर सांगत. मग आमची स्वारी अभ्यास करी. वर्गात सगळ्यात लहान म्हणून कौतुक होई. देशपांडे वकिलांची मुलगी म्हणून रूबाब होता. पण बेशिस्त वागण्याला अभ्यासात अळंटळ करण्याला सूट नव्हती. आम्ही सर्व भावंड घराशेजारच्या नगरपालिकेच्या शाळेत शिकलो.

आमच्या शालेय जीवनात दादांच्या मागे अनंत व्याप होते. वकिलीचा व्यवसाय चरितार्थासाठी, मुंबई हे राजकीय, सामाजिक कार्यक्षेत्र, आरळे-शिराळे येथील कार्यामागे असलेली त्यांच्या वतनी गावाची ओढ, आळंदी, पंढरपूर, पवनार, रमण महर्षींची तिरुवन्नमलई येथील मूलभूत ओढ, यांचा मेळ ते कसा घालीत ते त्यांचं त्यांनाच माहीत. 'Change of work is rest' हे त्यांच्या बाबतीत खरं होतं. मुंबईत असले की ८ च्या ठोक्याला कपडे करून तयार होऊन खालच्या मजल्यावरील कचेरीत ते जात. घाई असली तर धोतराच्या निऱ्या करीत ते जिना उतराना आम्ही पाहिलेलं आहे. अशीलं येऊन ओटीवर बसलेली असत, नंबर लावून. तात्या जोशी भारतीय बैठकीवर लाकडी बैठी पेटी पुढ्यात घेऊन दादांच्या आधी ओटीवर हजर असत. आम्ही आमची प्रगती पुस्तकं दादांच्या कचेरीतील टेबलावर ते तेथे जाण्यापूर्वी त्यांना दिसतील अशा बेताने ठेवत असू. दादा रात्री उशिरा घरी येत असल्याने त्यावेळी बहुधा आम्ही झोपलेले असू. शाळेत जाण्याच्या आधी दहा वाजता तात्या जोशींच्याकडे प्रगतीपुस्तकं सही झाली असली तर ती घेऊन आम्ही शाळेत जात असू. प्रगतीपुस्तकं जर कचेरीतच असली तर तात्या जोशी दादांची सही घेऊन ती आम्हाला बाहेर आणून देत. जर कमी मार्क मिळाले तर दादा आम्हाला कचेरीमध्ये बोलावीत. कमी मार्क कां मिळाले याची चौकशी करीत. एरवी कचेरीमध्ये

जायची आमची टाप लागली नव्हती. काही वह्या, पुस्तकं, पेन्सिली, फीचे पैसे लागले तर आम्ही तात्यांच्याकडे मागत असू. तेही आमची मागणी चटकन् पुरी करीत असल्याने 'तात्या किती चांगले आहेत' असं आमच्या बालमनाला वाटे. घरचा हिशोब ते ठेवीत, बाहेर आम्ही जत्रेला, खरेदीला जाणार असलो तर वडिलधाऱ्याप्रमाणे आमच्यांबरोबर येत. प्रगतीपुस्तकं पाहून शिकवणी अगर क्लासची आवश्यकता वाटली तर ती व्यवस्था दादा करीत. आम्ही आणखी प्रगती करावी असं त्यांना वाटे. तसं पाहिलं तर दादांनी आमच्या अंगाला बोट लावल्याचं आठवत नाही. तरी त्यांच्या अबोलपणाने आम्हाला त्यांचा दरारा वाटे. जिन्यावर त्यांचं पाऊल वाजलं की आम्ही चिडीचूप होत असू. आम्हा भावंडांचा दंगा, हसणं, थट्टामस्करी एकदम थांबून जाई. कधीतरी व्यग्र असले तर विचारीत "काय चाललं आहे ? आम्हाला घ्या की तुमच्यात." पण आम्हाला त्यांच्याशी बोलण्याची सवय नसल्याने आमचं मौन सुटत नसे. एकाक्षरी उत्तर देऊन आम्ही वेळ मारून नेत असू. बाईची आई, विजापूरची, अस्सल कानडी वैष्णव, तर दादा, दादांची आई गुजराथी-कम-महाराष्ट्रीयन. माझे आजोबा मराठीचे ज्वलंत अभिमानी. इतर भाषेचा एकही शब्द मराठी बोलताना घुसडलेला त्यांना खपत नसे. माझ्या काकूची भाषा अस्सल सातारी. आमच्या घरात छोट्या प्रमाणात आंतरभारतीचे संमेलन होतं. हरतालिकेला, महाशिवरात्रीला बाईच्या माहेरी पुरण-पोळीचा बेत, तर दादा 'देशपांडे' स्मार्त शैव, शिवभक्त म्हणून सगळी उपवास करीत. पुढे वारकरी विचारसरणीमुळे हे बरीक सारीक मतवैचित्र्य दूर झाले. बाईचे मामा किंवा इतर माहेरचे नातेवाईक आले की, साहजिकच कानडीत बोलत. आम्हाला समजे. कामचलाऊ बोलता येई. पण दादांना कानडी समजत नसे. मस्करीने म्हणत, "मला माहीत आहे तुम्ही मला कानडी कां शिकवत नाही, तुम्ही बोललेलं मला कळेल म्हणून ना"? दादांच कानडी शिकणं मात्र शेवटपर्यन्त राहून गेलं. या अनेक पदरी वातावरणामुळे आमचं बालपण एकांगी, संकुचित झालं नाही. त्यात मोलाची भर म्हणजे दादांनी पार्ले टिळक विद्यालय या राष्ट्रीय बाण्याच्या शाळेत आम्हा सख्ख्या आणि चुलत भावंडांना घातलं. या शाळेत राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन, प्रोफेसरच्या नोकऱ्या सोडून, संस्कारक्षम वयात मुलांवर संस्कार करावेत या ध्येयाने कितीतरी शिक्षक विद्यार्जनाचं काम करीत. सर्व मुलं दादरला किंग्ज् जॉर्ज अगर छबिलदास शाळेत घोळक्याने जात, तर आम्ही पार्ल्याला उलट्या दिशेला जात असू. 'एकला चलो रे' या उक्तीप्रमाणे एखादे वेळी एकटं जाण्याचा आम्हाला कंटाळा येई. पण आता मात्र टिळक विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून सांगताना मूठभर मांस आमच्या अंगावर चढतं.

याच सुमारास दादांच्या मनात आलं, 'मुलांना गाणं यावं.' त्यांनी माझ्यासाठी आणि बापूसाठी गाणं शिकवायला भानू चरणकर यांना बोलावलं. ही शिकवणी केव्हा बंद झाली काही आठवत नाही. बापू लवकर कंटाळून गेला. मास्तरांनी ताल धरायला सांगितला की तो वैतागे. एक दिवस बाईला सांगून टाकलं, "हे तेल तुपडी, तेल तुपडी कोण करील ?

मी उद्यापासून गाणे शिकायला बसणार नाही." मग राहिले मी, मी गायिका म्हणून नाव कमवावं असं दादांना खूप वाटत असलं तरी त्यांचं ते स्वप्न मी धुळीला मिळवलं. आम्हा मुलांना तीव्र बुध्दीमत्तेचं वरदान जरी नसल तरी मेहनती, सरळमार्गी नम्र मुलं, असं आमच्यांबद्दल बोललं जाई. एकदा माझ्या भावाला दिलीपला वर्गशिक्षिका म्हणाल्या, "दिलीप, तू वाचता येण्यासारखं नीट अक्षर काढत जा." त्यावर दिलीपने स्वतःचा चष्मा बाईना दिला व चष्मा लावून वाचा असा वर सल्ला दिला. बाई चक्रावून गेल्या. "अरे, तू देशपांडयांच्या घरचा मुलगा ना? तू असा उद्धटपणाने वागशील अशी अपेक्षा नव्हती." मुलांनी कमावलेल्या पतीच्या विरुद्धचे हे दिलीपचे वागणे घरी समजल्याशिवाय राहिले नाही.

शिस्तीने, नियमितपणे वागावे हे आमच्या मनावर बिंबवले असले तरी आमच्या घरचे वातावरण रुक्ष, शुष्क नव्हतं. आमची उत्सवप्रिय आजी धार्मिक, शिवाय थोडी-फार कर्मठ होती. बडोद्याला तिच्या बहिणीचे दत्त मंदिर होते. त्या मंदिराबद्दल तिला खास आकर्षण होतं. मुंबईला विद्यारामाच्या चाळीच्या मध्यभागी असलेले दत्त मंदिर तिच्या सोबतीला होतं, त्यामुळे दत्तांवर तिची विशेष श्रध्दा होती. दर गुरूवारी भजन होई, आजीच्या स्वतंत्र खोलीत. बायकांच्यामागे तेव्हा नोकरीचा ससेमिरा नसल्याने आसपासच्या बायका जमत. भजनं सुरेल म्हणणाऱ्या सौ. चंपूताई तांबवेकर आल्या-शिवाय भजनाचा कार्यक्रम सुरू होत नसे. 'सदा माझे डोळा, जडो तुझी मूर्ति' या भजनाने सुरुवात झालेला कार्यक्रम एक-दोन तास सहज चाले. मधून मधून गप्पांचं तोंडी लावणं असे. दादांना हे महिला मंडळ आवडत नसलं तरी आजीला आनंदात ठेवण्यासाठी ते या कार्यक्रमाला विरोध करीत नसत. आमच्या घरी गोकुळाष्टमी, ऋषीपंचमी फार मोठ्या प्रमाणात साजरी होई. गोरेगावच्या खोतांचे मॅनेजर गुप्ते न चुकता हारे भरभरून फुलं, भाज्या, आंब्याच्या डहाळ्या पाठवीत. ज्या ठिकाणी कृष्णजन्म होई तो वरच्या मजल्यावरील जिन्याजवळचा चौक तात्या जोशी मोठ्या हौशीने पानफुलांच्या साह्याने सजवीत. शाळा सुटल्यावर आसपासची मुलं आमच्या घरी जमत. फुलांच्या माळा करणं, हजार आठ तुलसी दळं मोजणं, सुंठवडा पंजरी इतर प्रसाद करण्यात मदत करणं ही कामं आम्ही मुलं हौसेने करीत असू. एकीकडे भेंड्यांचा कार्यक्रम चाले. आसपास वावरणारी वडिल नातेवाईक यात अधूनमधून भाग घेत. एरवी कडक असलेली आजी अशावेळी मृदू होई. तिची खुशी तिच्या हालचालीत प्रगट होई आणि तिची खुशी म्हणजे दादांचे सर्वस्व होते. मुलं रात्रभर जागायला हजर असत. फुगड्या, झिम्मा, गोफ यासारख्या मंगळागौरीच्या खेळांचा धुमाकूळ चाले. रात्र संपे पण भेंड्यांचा खेळ संपत नसे. दोन्ही पक्षांत कुणी हरत नसे. कुणावर भेंडी चढत नसे. मुलांचं पाठांतर जबर-दस्त असल्याचा तो एक पुरावा होता. उपाध्याय आले की आम्ही मुलं वरच्या मजल्या-वर कृष्णजन्माची तीच कथा ऐकायला मोठ्या गोडीने जात असू. जरीची कुंची घातलेल्या बाळकृष्णाची मूर्ती उपाध्यायांनी पाळण्यात घातली, कृष्णजन्माचा पाळणा म्हणून गुलाल

तुळशी कृष्णावर उधळल्या की कृष्णजन्माचा सोहळा संपे. आमचे खेळ परत नव्या दमाने सुरू होत. दादा घरी असोत की नसोत, या कार्यक्रमांत कधी खंड पडत नसे. पुढे दादांनी वकिली सोडली तरी या गोरेगावच्या ट्रस्टचे काम ते करीत.

जी गोष्ट गोकुळ अष्टमीची, तीच कथा गणपतीची, ऋषीपंचमीची या व्रतवैकल्य घेऊन आलेल्या उपासाच्या, सणावाराच्या दिवसात सोवळ्याच्या बारीकसारिक कारणावरून आजी बिनसे. त्यावेळी दादा तिचं उपवासाचं शिंगाड्याचं पीठ दळून देत, तिचं सोवळ्याचं लुगडं स्वतः धुवून सोवळ्यात वाळत घालीत. त्या लुगडं वाळत घातलेल्या काठीला हात न लावण्याबद्दल सर्वांना बजावीत. आजीच्या दोन्ही कर्त्या सुना, मोलकरीण यांच्या-वर ते विसंबीत नसत. कुणाच्या हेटाळणीने हसण्याची पर्वा करीत नसत. "न मातुः परदैवतम्" असं शाब्दीक बोलणं, कृती वेगळी करणं दादांच्या स्वभावात बसणार नव्हतं. आई म्हणजे दादांचा बहिश्चर प्राण होता. ऋषीपंचमीचं व्रत, बैलाच्या कष्टाचं न खाणं याला प्राधान्य असलेलं व्रत दादांच्या बुद्धिवादी मनाला पटणार नव्हते. आईचा या व्रतासंबंधी विशेष आग्रह असे. गोरेगावचे गुप्ते या दिवसासाठी टोपल्या भरभरून "ऋषीच्या भाज्या", ऋषीचे काळे मीठ पाठवीत. घरच्या नारळाच्या झाडाचे नारळ या दिवसासाठी खास राखून ठेवले जात. खोबऱ्याचे तुकडे, मीठ, भाज्या न्यायला बऱ्याच बायका येत. आजीच्या देखरेखीखाली आम्ही मुलं, त्यांचं वाटप करीत असू.

दुपारी ऋषीपंचमीचा उपास असलेल्या बायकांची खास पंगत माजघरात होई. २०–२५ बायका सहज असत. त्यांची गाणी, कहाणी वाचन होईपर्यंत शाळेची मधली सुटी होई. मधल्या सुटीत आम्हा मुलांची पंगत होई. सगळं स्त्रीराज्य असे. ऋषीपंचमी झाली की हलक्या पावलाने अनंतचतुर्दशी येई. दादांचे मोठे मामा यशवंतराव सखाराम सोलापूरकर यांची ही अनंताची पुजा आमच्या घरी होई. त्यांना आम्ही भाऊमामा म्हणत असू. डाकोरला हे विधुर मामा एकटेच रहात. बडोद्याला असलेल्या एकुलत्या एक मुलाशी त्यांचे जमत नसे. भाऊ मामांनी आपल्या पाठच्या बहिणीला तिची दोन्ही मुलं मोठी होऊन स्वावलंबी होईपर्यंत मदतीचा हात दिला होता. एकटेपणाला कंटाळलेले भाऊमामा आले की, ४––६ महिने वांद्र्याला आनंदाने रहात. आजीने डाकोरनाथाला नवस केला होता, "माझी दोन्ही मुलं कर्तबगार निघाली की ताट भरून पेढे मी अर्पण करीन. सुना, मुलं, नातवंडासह पाया पडायला येईन". डाकोर सोडताना केलेला हा नवस आजीने जवळजवळ २५ वर्षांनी फेडला. त्यावेळी भाऊमामा, आमची आजी भारा-वून गेली नसती तरच नवल होतं. भाऊमामाच मुलाशी जमत नव्हत तरी नातवावर त्यांचा जीव होता. दुधापेक्षा दुधाची साय जास्त प्रिय असते, नाही का! नातवाच्या शिक्षणासाठी भाऊमामांनी ९०० रुपये ठेवले होते. तांत्रिक अडचणीमुळे भाऊमामांच्या पश्चात ती रक्कम किती वर्षे गेली तरी मिळत नव्हती. दादांनी चिकाटीने खटपट करून ते पैसे मिळवून दिले. नातवाबद्दल इतकी माया असलेले भाऊमामा मुलाच्या नुसत्या उल्लेखाने बिथरत. अशाच एका मनोभूमीमध्ये स्वतःच्या मालकीचे घर मुलाला,

आनंदरावांना मिळू नये म्हणून खास दस्तऐवज केला. आपले मित्र सावंत यांचे नावे घर केले. भाऊमामांच्या पश्चात दादा सावंतांना भेटले. परिस्थितीची कल्पना देऊनही सावंत बधेनात. आयतं मिळालेलं घर सोडायला कोण हरिश्चंद्राचा अवतार लागून गेला आहे? गोड बोलून, धमकावून, आपल्या वकिली ज्ञानाचा उपयोग करून ते घर आनंदरावांच्या नावावर करण्यात दादा यशस्वी झाले. मुलावर रुसणारे भाऊमामा वांद्र्याला मजेत असत. दादा त्यांची मर्जी सांभाळीत.

सणवार, व्रतवैकल्य, धार्मिक उत्सव या निमित्त आमच्या घरी सतत वर्दळ असे. तितकीच आश्रमवासी, वर्धा, पवनार येथील कार्यकर्त्यांची ये-जा चाले. आरळे, शिराळे येथील कार्यकर्ते, कुळ उपचारासाठी आलेली मुलीच लग्न जमवण्याच्या इराद्याने आलेली घरोब्याची मंडळी कारणाकारणाने येत. एकीकडे धार्मिक, कर्मठ वातावरण तर दुसरीकडे सुधारकी, जात, धर्म न मानणारे, रोजच्या दैनंदिन जीवनातील वागणं. दोन्ही टोकं घरी समन्वयाने गुण्यागोविंदाने आमच्या घरी नांदत. आजीच्या सोवळ्यामुळे मुकटा नेसल्याशिवाय स्वयंपाक घरात कुणाला प्रवेश नसे. पण एकदा का नैवेद्य दाखवला की पोळी-भाकरी मुसलमान, हरिजन बाईने केलेली चाले. गुलशनबेन, मुक्ताबाई, अनुसयाबाई यांच्या हातच्या भाकरी आम्ही खाल्ल्या, त्यांच्या पंक्तीला जेवलो तरी मुलाच्या दादांच्या प्रेमापोटी आजी चालवून घेई. आश्रमवासीयांचे आहारातील नियम कपाळाला आठ्या न घालता पाळले जात. बिन तिखटामिठाच्या, अळणी भाज्या, हातसडीच्या धान्याचा वापर, गायीचे तूप, दूध सगळे पदार्थ आमच्या पानावर पडत. 'उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' या तत्त्वाचे अवडंबर न माजवता पालन केलं जाई. चवदार पदार्थ कुणालाही समजतो पण चवीढवीचें फाजील स्तोम घरात माजवलं नव्हतं. नावडता पदार्थ पानात पडू द्यायचा नाही, आवडीचा पदार्थ ताव मारून खायचा, असं कौतुक करण घरच्या शिस्तीत बसत नव्हतं. नावडता पदार्थ पाण्याच्या घोटाबरोबर कुणी गिळत असलं आणि दादांच्या ते लक्षात आलं की दादा विचारीत, "पदार्थ घशाला कुठे टोचतो का, बघू बरं, तुझ्या घशाच भोक लहान दिसतयं". पानात न आवडणारा पदार्थ चुकून टाकला की सांगत "तुम्हाला अन्नाची किंमत नाही, टाकून माजू नये" इतकी सरबत्ती ऐकल्यावर कुणाची बिशाद होती पानात टाकायची, जेवायला बसतांना आपापलं ताट, पाट, वाटी, भांडं प्रत्येकाने घ्यायचं. जेवण झाल्यावर पाट उभा करून ताट, वाटी, भांड ज्याचं त्यानं मोरीत टाकायची, आमच्या घरी शिस्त होती. दादा स्वतः ही शिस्त आधी पाळीत. भाज्या निवडायचं काम असलं की त्यांचा ढीग जमिनीवर मध्ये घातला जाई, आम्ही भावंड भोवताली बसून बोलता बोलता त्या वस्तू स्वच्छ करण्याच्या कामाचा फडशा पाडीत असू. दादा घरी असले की, तेही सामील होत. घरची, नातेवाईक. आजारी, शिकायला आलेले विद्यार्थी अशी सगळी मिळून १५–२० पानं तर रोजच होई. त्या कारणाने आमचे आम्हीच जेवायला बसलो की चुकल्यासारखे वाटे. संध्याकाळची जेवणं लवकर आटोपण्यावर दादांचा कटाक्ष असे, मुलांना अभ्यासाला सलग वेळ मिळावा

या हेतूने. बाईला मुलांनी शिकावं असं फार वाटे. तिचेहीं या कामी पूर्ण सहकार्य असे. कविता, स्पेलिंग, वाचन ती आमच्याकडून करवून घेई. मुलगामुलगी हा भेदभाव आमच्या घरीं नव्हता. दोघांना सारखी संधी मिळे, सवलती मिळत. अभ्यास करतांना मुलांना कामासाठी उठवायचे नाही, अशी सक्त ताकीद घरच्यांना असे. भेदभाव नसल्याने मुलांनी घरकाम करायचं नाही असं चालत नसे. स्वयंपाक करणे, वेळेला केर-वारे, कपडे, भांडीं आम्हीं बहीणभावंडं सहकार्याने, मजेने करीत असू. आम्ही पाठो-पाठची भावंड. सोवळं-ओवळं, पाहुण्यांचा सतत राबता असल्याने बाई एकटी काय काय करणार होती ? अशा पाहुण्यांपैकी दादांच्या निकट परिचयाचे मित्र आले कीं, दादा आम्हाला ओटीवर बोलावून घेत. नमस्कार करणं, नाव सांगणं ह्या प्राथमिक उपचारा-नंतर पाहुणे मुलगी काय शिकते म्हणून दादांना पृच्छा करीत. दादा मलाच, "तू कितवीत आहेस म्हणून विचारीत". मीं उत्तर देत असे, पण मनाला एकीकडे खूप वाईट वाटे, थोडा राग पण येई. आमच्या कुवतीप्रमाणे अभ्यास करून आम्ही वरच्या वर्गात जात असू. दादांनी स्वतःचं व्यक्तीगत वजन खर्च करून "माझ्या मुलाला अमुक टक्के मार्क्स तुम्हीं दिलेच पाहिजेत, अमका नंबर दिला पाहिजे असा दबाव आणला नाही" परीक्षकांनीही अध्यक्षांची मुलं म्हणून कुठलीही सवलत न देता आम्हाला झुकतं माप दिलं नाही.

ह्या धांदली धावपळीच्या जीवनात पुलाखालून १४-१५ वर्षाचे पाणी वाहून गेलं. दादांना वकिली सुरू करून एक तप उलटून गेले.

सार्वजनिक, राजकीय जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला लागून एक दशक मागे पडले १९४१ साल उजाडलं तेच वैयक्तिक सत्याग्रहाची नौबत वाजवीत.

या सत्याग्रहाचा शुभारंभ करण्याचा मान गांधीजींचे अध्यात्मिक वारस समजल्या जाणाऱ्या विनोबांना मिळाला. विनोबांच्या निवडीने या सत्याग्रहाच्या कार्यक्रमाला आपोआप नैतिक अधिष्ठान मिळाले. तत्त्वचिंतन, लेखन, अध्यापनात रमणाऱ्या विनोबांना गांधीजींनी या निवडीने एकदम जनतेसमोर प्रकाशझोतात आणले. गांधीजींमुळे ते सर्वांचे विनोबा झाले. दादांनी या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घ्यायचे ठरवले. गांधीजींपेक्षा त्यांना विनोबांची अधिक जवळीक वाटे. सत्याग्रहात भाग घ्यायचं ठरवल्यावर दादांनी आपली प्रॅक्टिस हळूहळू कमी करत आणली. दावे आपल्या वकील मित्रांना, मदतनीस मित्रांना चालवायला देऊन टाकले. वाडिया, जिजीभाई बैरामजी, हाजी कासम अशा मोठमोठ्या विश्वस्त निधींची कामे तेवढी ते करीत. खरेदी खतं, गहाण खतं, दस्तऐवजाची कामं, जमिनीसंबंधी मालकी अशी कामं, नंतर कुटुंबाच्या भरणपोषणासाठी त्यांनी निवडली. यासाठी उपनिबंधकांच्या ( City Survey ) कचेरीत जावं लागे. दिवाणी खटल्याप्रमाणे येथे तारखा पडण्याचा प्रश्न नसल्याने ताबडतोब काम होऊन जाई. वेळ जात नसे. आरळ्याचे उत्पन्न त्या गावाच्या प्रगतीसाठी खर्च होत असे. परावलंबन किती मानहानिकारक, जीवघेणं असतं याचा कटु अनुभव स्वतः घेतल्याने आपल्या बायको मुलांना अन्न,वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसाठी कुणापुढे

हात पसरावा लागू नये इतकी तरतूद करायला हवी, हे त्यांच्या मनावर खोल कोरलं गेलं होत. त्यामुळे आम्हाला चैनीचे, ऐषआरामी बाळपण मिळाले नाही, तरी लाचारी पत्कारावी लागली नाही. आवश्यक तोच खर्च करण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. पावडर लावली तरी भस्म कशाला फासायला हवं, म्हणून ते रागावत. वेण्या, फुलं आणली तरी आवडत नसे. हेच चार आणे भाजीसाठी खर्च केले असते तर जास्त संयुक्तिक झाले असते असे म्हणून पटवून देण्याचा प्रयत्न करीत. शिक्षणासाठी होणाऱ्या खर्चासाठी ते मागेपुढे पहात नसत. सर्वतोपरी उत्तेजन देत. याचा परिणाम असेल, दादांची सर्व मुलं, मुली, सुना, पुतण्या, नातवंडं उच्चविद्याविभूषित आहेत. त्याचे सगळे श्रेय दादांनाच द्यावे लागेल. शिक्षणामुळे स्वावलंबन पाठोपाठ आलेच. एवढं मात्र निश्चित की, शिकत असताना दोन पैसे मिळवून शिक्षण पुरं करायला हवं अशी वेळ दादांनी मुलांवर येऊ दिली नाही. उत्तम चालणाऱ्या वकिलीच्या धंद्याकडे, त्यापासून मिळणाऱ्या लक्ष्मीकडे पाठ फिरवून, फकिरी पत्करून स्वातंत्र्य लढ्यात झोकून देणं आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर अधिकार, सत्ता, मानाचे केंद्रबिंदू या मलिद्यापासून निग्रहानं दूर राहणं, मनाची ठाम तयारी असल्या-शिवाय होणार नाही. विनोबांची आणि त्यांच्या मित्रांची ही ठाम तात्विक बैठक होती. "वुई आर सेव्हन" या विनोबांच्या सप्तर्षी मंडळातील कुणीही भौतिक प्रलोभनाला बळी पडले नाही.

या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेणाऱ्यांची अंतिम निवड गांधीजी स्वतः करीत. एकदा निवड झाल्याचे कळले की, स्थानिक पातळीवर त्या सत्याग्रहींची सत्याग्रह करण्याची जागा, तारीख, वेळ ठरवली जाई. सरकारला याची पूर्वसूचना दिली जाई. ठरलेल्या दिवशी सत्याग्रही सरकारविरोधी भाषण करी. सभेला व्हावी तशी गर्दी सत्याग्रहीच्या लोक-प्रियतेनुसार भाषण ऐकायला होई. फुलांचे आणि सुताचे हार गळ्यात घालीत. हा हारतुऱ्यांचा सत्कार संपला, भाषण झालं की बाजूलाच आधी येऊन तयार असलेल्या पोलीसव्हॅनमधून सत्याग्रहीला पोलीसस्टेशनवर नेण्यात येई. कोर्टात खटला चाले. शिक्षा होई. शिक्षा भोगण्यासाठी सरकारच्या सोईप्रमाणे जवळपासच्या तुरुंगात सत्याग्रहींची रवानगी झाली की एक अंक संपे. सरकारच्या मर्जीप्रमाणे व सत्याग्रहीच्या आर्थिक, राजकीय इभ्रतीप्रमाणे सत्याग्रहीला अ, ब किंवा क वर्ग मिळे. या वर्ग मिळण्यावर आप्तेष्टांना पत्र लिहिण्याच्या संख्येचे, त्यांच्या भेटीचे अवलंबून असे. कैद साधी किंवा सक्तमजुरीची असे.

## दादांचा वैयक्तिक सत्याग्रह

दादांनी सत्याग्रह करण्यापूर्वी त्यांना मातृस्थानी असणाऱ्या भिकीताई सामंत यांनी सत्याग्रह केला. "६४ वर्षे वयाच्या वृध्द महिलेचा सत्याग्रह" अशा शीर्षकाखाली त्यांच्या सत्याग्रहाची बातमी छापून आली होती. स्वतः सत्याग्रह केला नाही तरी सत्याग्रहींच्या भाषणाला हजर राहणं एक देशभक्तीचं चिन्ह मानलं जाई. थोडी सहज होणारी देशसेवा.

दादा भिकीताईच्या सत्याग्रहाला सुरवातीपासून त्या तुरुंगात जाईपर्यन्त हजर होते. काही जणानी टीका केली "आईच्या ठिकाणी असलेल्या वृध्द बाईला तुरुंगात पाठवून आपण बाहेर राहिले". या टीकाकारांना दादांची त्या दिशेची वाटचाल माहीत नव्हती इतकंच. दादांच्या नांवाला गांधीजींची संमती आल्यावर दादांनी तारीख, जागा व वेळ सरकारला कळवली. आपल्या आईला सत्याग्रह पाहण्यासाठी लांब चालत यावं लागू नये यासाठी आमच्या चाळीसमोरील रस्त्यावर सकाळी सत्याग्रह करण्याचे ठरले. चाळीची हद्द संपल्या संपल्या समुद्रखाडी असल्याने रहदारीचा उपद्रव त्या गल्लीला नव्हता. सत्याग्रह करून दादांनी तुरुंगयात्रा करावी हे आजीला पसंत नव्हतं. पण यावेळी तिचं कांही चाललं नाही. सत्याग्रहाची तारीख मुंगीच्या पावलाने जवळ येऊ लागली तसा तिच्या मनाने ठाव सोडला. "माधवराव तुरुंगात गेल्यावर माझं कसं होईल? तो सुटून येईपर्यन्त मी कसेबसे दिवस ढकलीन झालं". मुलं मोठी झाल्यावर आजीने त्यांना एकेरी नावाने संबोधणे सोडून दिलं होतं. तिला वाटे आपणच आपल्या मुलांना मानसन्मानाने वागवावे. आपल्या वागण्याने बाकीच्यांना धडा घालून द्यावा. वास्तविक पाहता तिच्या दोन्ही सुना, धाकटा मुलगा तिची आपुलकीने, जबाबदारीने काळजी घेणारी होती. पण तिचा निदानीचा पांडुरंग म्हणजे तिचा माधवराव होता. तिचा खंबीरपणा तिला सोडून गेला होता. ती थोडीशी हरवल्यासारखी झाली.

हा सत्याग्रह होण्यापूर्वी, तीन आठवडयापूर्वी आमची आजी, बाईची आई सीताबाई हिचे आमच्या घरी निधन झाले. तिच्या आजारात तिची देखभाल करायला तिचे यजमान माझे आजोबा आमच्याकडे आले होते. बाई त्यांची एकुलती एक मुलगी. आजी बरी झाली की आळंदीला आपल्या घरी परत जावं, असं त्या दोघाच्या मनात होतं. पण आपण ठरवतो एक, परमेश्वरी योजना कांही वेगळीच असते. त्यातून बाईला माझ्या बहिणीच्या, सुधाच्या वेळी दिवस गेले होते. घरचे वातावरण खिन्न होते. पौषातील शाकंबरीचे नवरात्र पौर्णिमेला संपलं. आजीचे दिवस होईपर्यन्त माघ महिना उजाडला. सत्याग्रह करण्यापूर्वी आराध्यदैवत पांडूरंगाचे दर्शन घ्यावं म्हणून दादा पंढरपूरला जायला निघाले. आजीच्या मनाने घेतलं, "तुरुंगात जायला निघालेल्या मुलाचे तोंड गोड करावे. आपल्या हातच्या चकल्या मुलाला खाऊ घालाव्यात". दुपारी जरा लवंडलेल्या काकूला उठवून भाजणी भाजायला लावून आजीने ती दळवून घेतली. काकांनी चांदीची नवी भांडी करून घेतली होती, ती काकूला काढायला लावली. खीर केली. येणाऱ्या-जाणाऱ्या गडी-नोकरांसकट सगळ्यांना खीर आणि स्वत: केलेल्या चकल्या खाऊ घातल्या. संध्याकाळी दादा घरी आल्यावर आपल्यासमोर बसवून चकल्या, खीर त्यांना खायला लावली. चाळीशी ओलांडलेल्या दादांनी तिचं ऐकलं, तिला राजी राखण्यासाठी. रात्री पंढरपूरला जायला दादा निघाले तर जैन मंदिराच्या नाक्यापर्यन्त आजी ४-२ मिनिटं त्यांच्याबरोबर चालत जाऊन त्यांना पोचवून परत आली. परत आली ती जप करीतच. "माधवराव गेला, आता मी पाणी प्यायला पण जीवंत राहणार नाही." चाळीत तिची म्हणण खास दोन

खोल्यांची जागा होती. तिथे ती जाऊन झोपली. सकाळी लवकर ऊठून गडयाला उठवायला बंगल्यात आली. "रामा, अंगावर ऊन्हं आली, अजून उठायचं नाही का ?" म्हणत म्हणत माजघरातून मागच्या भागात आली. काकू तेथे पाठमोरी ऊभी होती. तिला धक्का लागल्याने ती मागे वळून बघते तो आजी जमिनीवर वेडीवाकडी पडलेली. पडली ती न उठण्यासाठी. तिचं म्हणणं तिनं खरं केलं. दादा गेल्यावर तिने पाण्याचा घोटही घेतला नाही. डॉक्टर आले,पण सगळा कारभार आटोपला होता. तो दिवस होता माघ शुध्द दशमी. बाकी सगळी घरी होती. दादा पंढरपूरच्या वाटेवर होते. कुठपर्यन्त पोचले होते याची घरी कल्पना नव्हती ? शेवटी ते नेहमी ज्या ज्या ठिकाणी जात त्या त्या ठिकाणी तारा केल्या, लगोलग परतण्याबद्दल. चोवीस तासात उलथापालथ होऊन होत्याचं नव्हतं झालं. दादांच्या हे ध्यानीमनी नव्हतं. दादा घरी धावत आले पण आईचे शेवटचं दर्शन घ्यायचं त्यांच्या नशिबी नव्हतं. आईला परमदैवत मानणाऱ्या दादांना हा धक्का सोसणं कठीण गेलं. ते आईच्या खोलीत गीता आणि चरखा घेऊन गेले. दारं, खिडक्या आतून लावून बसले ते कांही केल्या दार उघडेनात. जेवणखाणं नाही, झोप नाही. आम्हाला भीती वाटायला लागली. कुणीतरी हळूच तावदानामधून खोलीत डोकावून बघितलं. दादा शांतपणे चरख्यावर सूत कातत होते, तोंडाने गीता म्हणत होते.

तीन आठवडयात लागोपाठ आमच्या दोन्ही आज्यांना आम्ही अंतरलो. दादांचा पुढे ढकललेला सत्याग्रह आईचे दिवस झाल्यावर व्हायचा होता. बाईच्या आईने दादांच्याकडून माझ्या आजोबांना अंतर न देण्याचं वचन मृत्यूपूर्वी घेतलं होतं. आजीचे दिवस होईपर्यंत ४१ सालीचा फेब्रुवारीचा शेवटचा आठवडा आला. लगेच दुसऱ्या दिवशी आजोबा आळंदीला जायला निघाले. दादांनी त्यांना घरातील अडचणींची कल्पना दिली. दोन लागोपाठ घरात झालेले मृत्यू, बाईची अवघडलेली परिस्थिती, १३ ते ३ दरम्यानची आम्ही ४ भावंड, दादांचं सत्याग्रह करून तुरुंगात जाणं. आजोबांना राहण्याची गळ घातली. घरी वडील माणूस असलं की, कारागृहात घरची काळजी वाटणार नाही असं म्हटल्यावर आजोबांनी आपला बांधलेला बाडबिस्तरा निमूटपणे खाली ठेवला.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात ४१ साली दादांनी चाळीसमोरच्या गल्लीत सत्याग्रह केला. पहाटेपासून माणसांची नुसती रीघ लागली होती. दादांची मोठी चुलत भावजय लक्ष्मीबाई खास सत्याग्रहाला हजर राहण्यासाठी आपल्या मुलाला घेऊन गुजराथेतून आली होती, स्वतः कातलेल्या सुताचा हार घेऊन. घराचे दोन्ही मजले स्त्री-पुरुषांनी नुसते फुलून गेले होते. भिकीताई सामंत तुरुंगातून तीन महिन्याची सजा भोगून आल्या होत्या. त्यांचा मुक्काम आदल्या दिवसापासून आमच्या घरी होता. बाईची एकंदर परिस्थिती जाणून, तिला एकाकी वाटू नये या हेतूने. दादांनी नुकतीच वकिलीची प्रॅक्टीस कमी करीत आणल्याने अशिलांचे व त्यांचे निकट संबंध ताजे होते. मारवाडी, पारशी, गुजराथी, ख्रिश्चन, मुस्लीम सगळया जातीधर्माचे जणू सम्मेलन भरले होते. प्रत्येकाच्या हातात भल्यामोठ्या

हाराची टोपली किंवा कातलेल्या सुताचा हार होता. दादांची, बाईची, दोघांची आई नुकतीच कायमची दुरावल्याने वातावरणाला सहानुभूतीची कडा असली तरी एकंदर वातावरण चैतन्यमय, प्रसन्न होते. लढाईवर निघालेल्या वीराला गावकरी निरोप द्यायला वेशीपर्यंत येतात तसं काहीसं हजर असणाऱ्यांच्या मनांत दाटून आलं होतं. टेबल, खुर्ची, बसण्याची व्यवस्था कुणी केली कळलं नाही. इतके हार घातले गेले की टेबल तुडुंब भरून चारी बाजूंनी जमिनीवर त्यांचा खच पडला. दादा तर हारात बुडून जाऊन दिसत नव्हते. शेवटी टेबलावर उभं राहून इंग्रज सरकारविरोधी घोषणा करून दादांनी आपलं छोटेखानी भाषण संपवलं. पोलिसांनी दादांना अटक केली, बझाररोडला गल्लीसमोर उभ्या असलेल्या काळ्या पोलीस व्हॅनमध्ये बसवलं. हिल रोडवरील वांद्रा पोलीस स्टेशनवर नेलं. तेथून कोर्टात नेण्यापूर्वी काकांच्याबरोबर जेवणाचा डबा घेऊन आम्ही भेटायला गेलो तर तेथे दादांचा रुबाब दिसला. पहिल्या मजल्यावर गेलो तर दादा पांढऱ्या शुभ्र बिछायतीच्या गादीवर लोडाला टेकून बसले होते. रतनचंद्र सेमलानी यांनी दिलेली चांदीची तकली शेजारी पडली होती. दुसऱ्या बाजूला प्यायच्या पाण्यासाठी चांदीचं तांब्याभांडं होतं. माणसं भेटून जात होती. माझ्या बालमनाला वाटलं, "हा कसला सत्याग्रह ? ही तर चैन आहे". कोर्टात नेल्यावर "गुन्हा कबूल आहे का" ? न्यायाधीशाने विचारल्यावर, गुन्ह्याची कबुली देऊन दिलेली शिक्षा निमूटपणे भोगायची अशी या सत्याग्रहाची शिस्त होती. दादांना ६ महिने साधी कैद व १०० रुपये दंड झाला. दंड न दिल्यास आणखी १ महिना कैद भोगायची होती. दादांना "ब" वर्गाचे कैदी म्हणून तात्पुरते ठाण्याच्या तुरुंगात नेले. ज्या ठिकाणी फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यांना ठेवीत तिथे दादांना ठेवलं. तेथून मग येरवड्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. या अटकेची बातमी नवाकाळचे वार्ताहर सरमळकर यांनी नेऊन दिली. ती वर्तमानपत्रात आली. याच नवाकाळचे अेक हिंदी स्वरुपांतले "स्वाधीन भारत" पत्रक होते. त्यांत व कोल्हटकरांच्या प्रभातमध्ये ही बातमी प्रसृत झाली होती. साधी कैद असल्याने तुरुंगात काही काम करावं लागत नसे. विधानसभेचे माजी सभापती वि. स. पागे, जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते एस. एम्. जोशी, ना. ग. गोरे, साने गुरुजी याच काळात येरवड्याच्या तुरुंगात शिक्षा भोगत होते. बहुतेकांच्याबरोबर पेटीचरखा, सुतकताईसाठी पेळूची बंडल असत. ही कारागृह या राजबंद्यांमुळं एखाद्या वसतीगृहासारखी म्हणण्यापेक्षा विद्यापीठासारखी भासत. आवडत्या विषयाचा अभ्यास, मनन, चिंतन, चर्चा व काव्यशास्त्र विनोदात सत्याग्रहींचा वेळ भरकन जाई. दादांनी या काळात बंगाली शिकायला सुरुवात केली. ज्ञानेश्वरीबद्दल प्रेम असणाऱ्यांचा एक समानधर्मी गट तयार झाला. ही मंडळी ठराविक वेळी एकत्र येऊ लागली. "ब" वर्ग मिळल्याने पुस्तकं मागवण्याची या सत्याग्रहींना सूट होती. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या नव्या प्रती मागविल्या. प्रवचनं, निरुपणं होऊ लागली. महत्वाचे संदर्भ अधोरेखित होऊ लागले. या अध्ययनामुळेही असेल, दादांना ज्ञानेश्वरीचे गुजराथी भाषांतर करावे असे वाटले. गुजराथी येत असल्यानेही ही कल्पना सुचली असेल.

साधी कैद "ब" वर्ग मिळणे हे सामाजिक, राजकीय इभ्रतीचे द्योतक होतं. या सत्याग्रहींना घरचे कपडे वापरण्याची सवलत असे. स्वतंत्र खोली, दिवा, पलंग, टेबल, खुर्ची, वाचायला वर्तमानपत्र तुरुंगात साध्या कैदेची शिक्षा भोगताना मिळे. पाव, लोणी, दूध, जेवणात बऱ्यापैकी भाजी, पोळी याचा समावेश असे. देशाच्या उपयोगी पडणाऱ्या या जमातीबद्दल जेलर, वॉर्डर यांना आदर वाटे. ते नियमांचे काटेकोर पालन न करता सहृदयतेने वागत. गुन्हेगार व राजकीय कैदी अलग अलग ठेवल्याने त्यांचा फारसा संबंध येत नसे. तरी गांधीबाबांची माणसं म्हणून गुन्हेगारीसाठी तुरुंगवास भोगणारी माणसं दबकून वागत. १½ वर्षाच्या मर्यादित सत्तेचे खेरांचे मंत्रीमंडळ राजीनामा देऊन सत्तेपासून आपखुशीनं दूर झाले होते. हे कालचे मंत्री आजचे सत्याग्रही होऊन तुरुंगात दाखल झाले होते. वाटत होतं, लढा यशस्वी झाला तर हेच सत्याग्रही उद्या परत मंत्री कशावरून होणार नाहीत ? आजच्या रात्रीच्या गर्भात असणाऱ्या उद्याच्या उषःकालाची सर्व आतूरतेने वाट बघत होते. वर्तमानपत्रे, नव्याने येणारे राजबंदी बाहेरील जगातील बातम्या आतल्या बंदिस्त जगात आणीत होते.

दादा तुरुंगात होते तरी काका, आजोबा घरी असल्याने आमची तशी परवड झाली नाही. देशासाठी विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन तुरुंगवास भोगणाऱ्यांची बायको मुलं म्हणून समाज आमच्याकडे आदराने पाही. अधूनमधून आमची चौकशी करण्यासाठी कुणी ना कुणी येई. त्यात तुरुंगातून सुटून आलेल्या भिकीताई मुख्यत्वेकरून असत. बाई अवघडलेली, तिला धीर देत, अडचणीच्या वेळी सल्ला देत. आर्थिक व्यवहार, बाहेरचं नेणं आणणं आजोबा पाहत. आरळचाला नवजीवन देणारे रामभाऊ जोशी आणि त्यांच्या पत्नी सुलोचना उर्फ सोनुताई ही दोघंही वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे तुरुंगात होती. जोशी काकांच्या आधी सोनुताई सुटणार होत्या. जोशी काका सुटून येईपर्यंत त्यांनी आमच्याकडे राहावे असे ठरले होते. तुरुंगातून सुटल्यावर त्या आमच्याकडे राहायला आल्या. त्यांच्या आनंदी, मनमिळावू स्वभावामुळे त्या आमच्या घरातल्या अेक होऊन गेल्या. अडचणीचे दिवस होते तरी आमच्या घरावर निराशेचे, उदासपणाचे सावट आलं नाही. दादा येरवड्याला असताना काकांच्याबरोबर आम्ही त्यांना भेटायला गेलो. त्यावेळी धाकटचा ३-४ वर्षाच्या रवींद्रला सोनुताईनी हौसेन सांभाळलं. ४१ सालानं मध्य गाठला. ११ जुलै १९४१ ला आमच्या घरी एका नव्या माणसाची भर पडली. तीन भावांच्या नंतर मला बहीण मिळाली. बाईला प्रसुतिगृहात पालर्याला पोचवायला मी आणि तात्या जोशी गेलो होतो. आमच्या दोन्ही आज्यांच्या निधनानंतर मुलगी झाल्याची बातमी दादांना तुरुंगात कळवली गेली. त्यांनी कळवल्याप्रमाणे नाव सुधा ठेवलं. दादा सुटून आले तेव्हा सुधा दोन-सव्वादोन महिन्यांची होती. या वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीचा जोर जरी हळूहळू कमी झाला तरी इंग्रज सरकारच्या युद्धविषयक धोरणाला काँग्रेसचा किती तीव्र विरोध आहे हे राज्यकर्त्यांना कळले. सरकारचे तुरुंग अपुरे पडले पण सत्याग्रही येतच राहिले. सरकारला तुरुंगाच्या आवारात तंबू उभारावे लागले, सभोवताली तारेचे कुंपण घालून.

या तुरुंगात परिचय झालेल्या साने गुरुजींचं पत्र दादांना घरी आलं होतं. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांना खुले व्हावे म्हणून ज्यावेळी साने गुरुजींनी उपोषण केले होते तेव्हा मुद्दाम दादा पंढरपूरला गेले होते. पण साने गुरुजींचा आत्यंतिक हळवेपणा जो त्यांच्या भलेपणावर, मातृहृदयावर मात करी तो दादांना रुचत नसे. दादांचे, त्यापेक्षा विनोबांचे विद्यार्थी मंडळ सत्याग्रहात मागे नव्हते. सत्याग्रहाची हाक आल्यावर बाबाजी मोघे, गोपाळराव काळे, भाई धोत्रे, द्वारकानाथजी हरकारे, अकोला, नागपूर या वर्ध्याच्या सेवाग्रामच्या आसपासच्या तुरुंगात शिक्षा भोगीत, तर दादा येरवडा, नाशिकच्या. या विद्यार्थी मंडळातील आकर्षणाचा केंद्रबिंदू विनोबा होते. चुकलेला फकीर जसा मशीदीत आढळणार तशी ही मंडळी विनोबांच्या जवळपास दिसणार याची संबंधितांना बालंबाल खात्री होती.

## 'विटेवरी उभा कटिवरी हात'

हे विनोबा २२ फेब्रुवारी १९४२ ला आमच्या घरी येणार होते. हा दिवस उजाडला तो दादांच्या दृष्टीने सोनेरी पावलांनी. दादांना या आपल्या मित्रासाठी, गुरुसाठी काय करू किती करू असं झालं होतं. घरातील विनोबांच्या स्वागताची तयारी तर त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली करवून घेतलीच पण घरासमोरील नगरपालिकेचा रस्ता स्वतः झाडला, सडा घातला. दारासमोर आमच्याकडून रांगोळी घालून घेतली. ठरलेल्या वेळी विनोबाजी ओटीवरील जिना चढून वर आले. बाहेरच्या खोलीत मध्यभागी उभे राहिले. आम्ही सर्वांनी भराभरा वाकून त्यांना नमस्कार केला. दादांनी त्यांना हात जोडून नम्रपणे विनंती केली, "आपण बसावे". खोलीच्या मध्यभागी उभे असलेल्या विनोबांचे हात कमरेवर होते विठ्ठलासारखे. हात तसेच ठेवून म्हणाले, "विटेवरी उभा, कटिवरी हात" आणि जिना उतरून चालू लागले. स्वागताची केलेली जय्यत तयारी खिन्न होऊन गेली. दादांचा पडलेला चेहरा विनोबांच्या लक्षात आला की नाही कुणाला ठाऊक.

या मर्यादित स्वातंत्र्याच्या लढ्यातून डोकं वर काढतो न काढतो तोच मुंबईवर एक अरिष्ट कोसळलं.

## 'चले जाव-१९४२'

ते होतं १९४२ साल. मुंबईच्या दैनंदिन जीवनात चलबिचल करणाऱ्या अफवा उठू लागल्या. "दुसऱ्या जागतिक युद्धाची व्याप्ती वाढून ते हिंदूस्थानला भिडणार आहे. शत्रुचा मुंबईवर रोख आहे". जो तो कुजबुजू लागला. परिणाम एक झाला, मुंबई सोडून जो तो आपल्या गावी किंवा अेखाद्या सोयीच्या ठिकाणी स्थलांतरित होऊ लागला. आजोबा, बाई व आम्ही मुलांनी बडोद्याला अेखादं वर्ष काढावं असं ठरलं. बडोद्याची स्वस्ताई, शिक्षणाच्या सोयी, दादांना बडोद्याबद्दल वाटणारं प्रेम हे सर्व या निर्णयाच्या मुळाशी असण्याची शक्यता होती. आम्ही बडोद्याला गेलो ते ऐन मे महिन्याच्या उन्हाळ्याच्या झळा खायला. जागेची चणचण नसल्याने दादांचे मित्र गोविंदराव जोशी यांच्या

जवळपास रावपुऱ्यात भाड्याने ४ खोल्या घेतल्या. आमची सोय लावायला दादा स्वतः आले होते. शाळेतील प्रवेश, महत्त्वाच्या विषयांच्या शिकवण्याची व्यवस्था करून दादा परत वांद्रयाला आले. बडोदे संस्थानासारख्या शिक्षणाच्या स्वस्त सुविधा कुठेच नव्हत्या. अनामत रक्कम ठेवून अभ्यासाची पुस्तकं वर्षभर वापरायची, वर्षअखेर पुस्तकं परत केली की ¼ पैसे कापून घेऊन बाकीचे पैसे परत मिळत. वाडीतील वाचनालय विनाशुल्क. रोज दोन पुस्तकं वाचायला देई. जर तुमचा वाचनाचा वेग जास्त असला तर सकाळी नेलेली पुस्तकं संध्याकाळी बदलून मिळत. वाचनालयात थेटपर्यंत प्रवेश असे. आपल्या हाताने हवं ते पुस्तक निवडून घेता येई. शाळेत प्रवेश मिळाल्यावर उरलेली रजा पोहणं, सायकल शिकणं या अुपद्व्यापात मी घालवली. दादांची अेखादी दुसरी चक्कर होते न होते तोच ऑगस्ट महिना उजाडला तो स्वातंत्र्य लढ्याची पेटती मशाल घेऊन. मुंबईला गोवालिया टँकला काँग्रेसचे तीन दिवसांचे अखिल भारतीय अधिवेशन होते. दादा त्यावेळी उपनगर जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष होते. काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी, सर्व श्रेणीचे नेते अधिवेशनाला हजर राहणे अपरिहार्य होते. अधिवेशन ७ ऑगस्टपासून सुरू होणार होते. दादा एक उच्च पदाधिकारी म्हणून हजर राहणं संशयातीत होतं. ४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीची फलनिष्पत्ती निराशाजनक होती. गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह मागे घ्यायची घोषणा करतांना, "माघार घेण्याचे" स्पष्टीकरण करतांना सावरून घेतलं. "मी कसलेला सेनापती आहे, माझ्या निष्ठावंत अनुयायांना मी प्रतिपक्षाच्या तोंडी देऊ इच्छित नाही, त्यांची शक्ति मी अधिक परिणामकारक कारणी लावू इच्छितो". सत्याग्रह करूनही इंग्रज सरकार कुठल्याही प्रकारचं निश्चित आश्वासन देत नव्हतं. या अनिश्चिततेचा एकदा कायमचा सोक्षमोक्ष लागावा असे गांधीजींना वाटले. काँग्रेसने त्यांना लढ्याचे स्वरूप ठरवण्याचे व त्यासाठी कार्यक्रम आखण्याचे संपूर्ण अधिकार बहाल केले होते. अखेरचा स्वराज्य मिळवण्याचा प्रयत्न सर्व शक्तीनिशी करावा असे सर्वानुमते ठरले. हे अधिवेशन भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यातील तेजस्वी, स्फूर्तिदायक, तप्त ताम्रवर्णी पान ठरले. स्वातंत्र्याचे ४७ चे सोनेरी पान दृष्टीपथात यायला चेतावणी देणारे ४२ चे युद्धपर्व अटळ झाले. या अधिवेशनांत अंतिम निर्धाराने झालेले गांधीजींचे भाषण कार्यकर्त्यांच्या अंतःकरणाला भिडले, चेतवून गेले. इंग्रजांना "चले जाव" असे गांधीजींनी परखडपणे सांगितले. आमचं आम्ही पाहून घेऊ. आमच्या देशात ढवळाढवळ करून तुम्ही कारभार करू नका असे स्पष्ट बजावले. 'करेंगे या मरेंगे, कुणी कुणाचा नेता नाही, कुणी कुणाचा अनुयायी नाही अशा तत्त्वावर हा लढा लढायचे आवाहन फक्त काँग्रेसजनांना नाही तर भारतीय म्हणवणाऱ्या प्रत्येकाला केले' आणि संपूर्ण भारताने स्वराज्य मिळवायचेच अशी ईर्षा मनात बाळगली. खंडप्राय देश मरगळ झटकून उभा ठाकला. या लढ्याला सत्य, अहिंसा, साधनशुचिता या तत्त्वाच्या पालनाचे बंधन नव्हते. ८ ऑगस्टला महात्मा गांधींचे भाषण झाले. अधिवेशनाला हजर असलेल्यांनी आदेशानुसार कृती करायचे मनोमन ठरवले. या भाषणाचे पडसाद अधिवेशनाबाहेर झिरपायला वेळ लागला नाही. ह्या

भाषणाने संमोहनावस्थेतील भारतीयांना खडबडून जागे केले. हे भाषण मृतप्राय भारताची संजीवनी ठरले. भारताचा चेहरामोहरा धगधगीत दिसू लागला. फक्त काँग्रेसजनच नाहीत तर इतर पक्षीय, कधीही राजकारणात भाग न घेणारे व्यावसायिक, नोकरदार, सुशिक्षित, अशिक्षित, स्त्रिया, अजाण मुलं झाडून सगळी या स्वातंत्र्याच्या लढयाच्या धगधगत्या यज्ञकुंडात आपल्या प्राणांच्या समिधा टाकायला सरसावली, सज्ज झाली. कसल्याही प्रलोभनाला बळी न पडता, कुठल्याही मतलबाची आशा न करता. दृष्टी होती समोर दिसणाऱ्या स्वातंत्र्याच्या ताऱ्याकडे. तोंडातून शब्द निघत होते, "समोर आहे अकच तारा, पायतळी अंगार, गर्जा जयजयकार क्रांतीचा, गर्जा जयजयकार".

हा जादूच्या कांडीचा प्रताप चाणाक्ष सरकारच्या लक्षांत आल्याशिवाय कसा राहील. "ज्याचा तो नेता" हे परवलीचे वाक्य ठरले आणि ९ ऑगस्ट १९४२ च्या उगवत्या सूर्याने वेगळेचदृश्य पाहिले. बरेचजण मुक्कामाच्या जागी परत जाण्याच्या फंदात न पडता भूमिगत झाले. काही समाजवादी कार्यकर्ते पुढे काय करावे याचा विचारविनिमय करण्यासाठी दादरला गोळा झाले. अधिवेशन संपल्यानंतर घरी परतलेल्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची दारं मध्यरात्री पोलिसांनी ठोठावली आणि सांगितलं की तुम्हाला स्थानबद्ध करण्यांत आलं आहे. दादा अधिवेशन संपवून असेच बांद्राला घरी आले होते. उपनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे ते उच्च पदाधिकारी असल्याने अटक होणे अपेक्षित होते. फक्त केव्हा हा प्रश्न होता. घरी फक्त दादा व काका होते. मिळालेल्या तुटपुंज्या वेळात आक्षेपार्ह वाटणारे फोटो, डायऱ्या, पत्रव्यवहार कायमचे दृष्टीआड करण्याचा प्रयत्न त्यांनी केला तरी शिल्लक उरलेले कागदपत्र, रोजनिशा, फोटो पोलिसांनी जप्त केले. अंधुक कल्पना असल्याने इतपत् तरी खबरदारी घेतली गेली. पोलिसांनी कपड्याची व इतर आवश्यक सामानाची जुजबी तयारी करायला १० मिनिट दिली. १० मिनिटांत पोलीस अधिकाऱ्याबरोबर दादा तुरुंगाची वाट चालू लागले, अदृष्टाच्या वाटेने. पुढे कसले ताट वाढून ठेवले याची कल्पना या स्थानबद्धांना कुठली असणार? ही स्थानबद्धता म्हणजे बेमुदत कारावास की आणखी काही? मनात तरंग उठले. राहता राहिले त्या दोन मजली जुन्या घरात एकटे काका. ९ ऑगस्टला सकाळी बडोद्याला आमच्या शेजारी राहणाऱ्या कुलकर्णी यांच्या मुलीने विचारले, "रेडिओवर मा. कृ. देशपांडे यांना पकडल्याची बातमी आली आहे, ते तुमचे कोण?" बडोद्याला त्यांचे शेजारी होऊन जेमतेम तीन महिने झाले होते. कुणी तरी देशपांडे शेजारी राहतात इतकंच, कुलकर्णींना ठाऊक होत, आणि दादांना पकडल्याची वार्ता सकाळी सकाळी त्यांच्या करवी आमच्या कानावर आली. कुठे नेले हे गुपित होते. मोठे-मोठे बिनीचे नेते पकडले, स्थानबद्ध केले. "लढनेकु तुम, खानेकू हम्" असा धर्म नेत्यांचा नसल्याने नेतृत्व करणाऱ्यांनी संकट झेलण्याचा सहजधर्माचा स्वातंत्र्यपूर्व काळ होता. सरकारला वाटलं की बिनीचे वीर पकडले की लढा थांबेल. पण झालं उलटच. नेत्यांना पकडल्याने अनुयायी जास्त चवताळले. स्वातंत्र्यकुंड आणखी धगधगू लागले.

काका वांध्राहून ताबडतोब बडोद्याला आले. दादांना कुठे ठेवलं आहे याची बातमी काढून कळवतो असं सांगून धीर देऊन वांध्राला परत गेले. दादांची पाठवणी सरकारने 'अ' वर्ग देऊन नाशिकला केली आहे असं शांतीलाल शहांकडे आलेल्या गुप्त पत्राद्वारे कितीतरी दिवसानी आम्हाला कळले. आम्ही सर्व लहान मुलं. छोटी बहीण तर जेमतेम वर्षाची. पुढे काय ? अशी अनेक प्रश्नचिन्हं डोळ्यासमोर उभी राहिली तरी कुणी डगमगलं नाही. आजोबा, आईचे वडील व बाई धैर्याने, खंबीरपणे प्रसंगाला समोरे जायला उभी राहिली. आजोबा हिंदूसभावादी तरी त्यांनी विरोधाचा ब्र काढला नाही. मनोमन साथ दिली. स्वातंत्र्यलढ्यात आपल्या घरातून कुणी सहभागी झाल्याचा अभिमान बाळगला.

मोठ्या प्रमाणावर सरकारने केलेल्या धरपकडीची बातमी वाऱ्याच्या वेगाने अवघ्या भारतात पसरली. स्वयंस्फूर्त हरताळ पडले. शाळा, कॉलेज बंद पडली. मुलं स्वयंस्फूर्तीने सभा घेऊ लागली. तिरंगी झेंडा हाती घेऊन मिरवणुकी काढू लागली. शाळेवर तिरंगी झेंडा लावण्याचा प्रयत्न करू लागली. या निरुपद्रवी कार्यक्रमावर सुद्धा सरकारने गोळीबार केला. नंदुरबारच्या कोवळ्या शिरीषकुमारने झेंडा घेऊन अग्रभागी चालणाऱ्या मुलींवर पोलिसानी बंदूक रोखली म्हणून झेंडा स्वतःच्या हातात घेतला तर त्याला गोळी घालून मारले. काशीबाईने भूमिगतांचा ठावठिकाणा सांगितला नाही म्हणून डगंवले फौजदाराने तिला मिरच्यांची धुरी दिली. भूमिगतांना भाकरी पोचवणाऱ्या बायकांना पकडून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. भूमिगतांच्या नातेवाईकांना विनाकारण झोडपून काढले. त्यांत जोशी काकांचे भाऊ, जयरामअण्णा, त्यांच्या सासूबाई, आई भरडले गेले, जोशी काकांचे सासरे वारले तर तीन दिवस प्रेत उचलायला कुणी मिळाले नाही. प्रेत कुजत पडले. न कळत्या, अजाण बाळांसकट कुटुंबच्या कुटुंब तुरुंगात टाकली. साताऱ्यातील शिराळे पेट्यातील शेडगेवाडीचे शेडगे यांचं कुटुंब त्यापैकी एक. बहुतेकांनी छळ सोसला पण भूमिगतांचा ठावठिकाणा सांगितला नाही. त्यांची नावं सांगितली पण त्या आधी त्यांना पकडल्याची खात्री करून घेऊन. साध्या साध्या, सामान्य कुवतीच्या माणसांनी अतुलनीय प्रसंगावधान, धैर्य दाखवून कैक वेळा पोलिसांचा " मामा " केला. भूमिगतांना लपवण्यात, त्यांना खाऊ घालण्यांत, पोलिसांपासून वाचवण्यात गावंच्या गावं सामील असत. अशाच एका आजीबाईने एका भूमिगताला व स्वतःच्या सुनेला जवळ झोपवून पोलिसांना सांगितलं, " बाहेरगावाहून आलेला माझा मुलगा व सून झोपली आहेत, हवं तर खात्री करून घ्या ". त्यांत आजीबाईना किंवा सुनेला विपरीत वाटलं नाही. पोलिसापासून भीती नाही, याची खात्री करून घेऊन तो तरूण पसार झाला. कृतज्ञता व्यक्त झाली ती त्याच्या नजरेत. "आजपासून तू माझी आई, तू माझी बहीण " अशा नाटकी संवादाची आतषबाजी न करता. विश्वास बसणार नाही अशा वीरश्रीयुक्त, आव्हानकारी, चित्तथरारक कथा ४२ च्या भारलेल्या, मंतरलेल्या दिवसांत प्रत्यक्षात घडल्या आहेत. त्या सांगणं, लिहिणं म्हणजे एक वेगळा ग्रंथप्रपंच

होईल. ह्या व अशा प्रकारच्या कथा, बातम्या, बापू, माझा पाठचा भाऊ, बाहेरून फिरून आला की सांगे. साताऱ्यात घडणाऱ्या हकीकती आम्हाला सातारकर म्हणून विशेष रस असे. 'आज काय सभेला गराडा घालणाऱ्या पोलिसांच्या बंदुका भूमिगतांनी हिसकावून घेतल्या, तर उद्या काय पोस्टातून नेण्यात येणाऱ्या पैशाच्या थैल्या लुटल्या, स्वातंत्र सैनिक अमुक अमुक तुरूंगातून बाहेर निसटून भूमिगत झाले, अत्याचार करणाऱ्याच्या पायाला पत्रे ठोकले, काँग्रेसनं समान्तर ट्रान्समीटर चालवलं आहे, ही जोखीम उषा मेहता नावाची भूमिगत मुलगी सांभाळीत आहे. साताऱ्यातील गणपतराव पाटील व इतरांनी पाटीलकीचा राजीनामा दिला आहे, ते सर्व स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले आहेत. आरळ्याच्या चांदभाईने स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या तलाठ्याचे नाक कापले.'

वर्तमानपत्रात यातील कुठलीही बातमी आम्हाला वाचायला मिळत नसे. आम्ही बापूला खोदून खोदून विचारीत असू. तो सांगे. ठिकठिकाणी बुलेटिन्स टाकतात त्यांत ही माहिती असते. त्याला बुलेटिन् दाखवायला घेऊन ये सांगितले तर उत्तर येई 'वाचून फाडून टाकलं.' काका अधूनमधून चौकशी करायला येत. तेव्हा त्यांनी अशा बातम्या वर्तमानपत्रांत न आढळल्याचे सांगितले. पुढे भूमिगत जोशी काका बडोद्याला आमच्याकडे ८ दिवस येऊन राहिले. त्यांनी ह्या बातम्या खऱ्या असल्याचे सांगितले. चळवळ्या जोशी काकांना पकडून देणाऱ्यास ४२ मध्ये ५,००० चे बक्षीस लावले होते. जोशीकाकांबद्दल आमच्याकडे कामाला येणाऱ्या बाईला संशय येऊ लागला. खोलात शिरून त्या चौकशी करू लागल्या म्हणून जोशीकाकांना आमच्याकडील मुक्काम हलवावा लागला. जोशीकाकांवर पोलिसांचा डोळा होताच. शिराळे पेठ्यातील चरणकरांच्या चरणच्या वाड्याला पोलिसांचा वेढा पडला असता जोशी काका, चांदभाई, वसंतदादा पाटील वाड्यात होते. गोळीबार चालू होता. जोशी काकांवर गोळी झाडली असता चांदभाईने स्वतःच्या छातीवर गोळी झेलून जोशीकाकांचा प्राण वाचवला. पुढे चांदभाईची आबाळ झाल्याने क्षयाच्या भक्ष्यस्थानी पडले. मागे राहिली त्यांची अशिक्षित बिबी गुलशन. अशी कैक कुटुंब उजाड, ऊध्वस्त झाली. कैक असाध्य रोगाला बळी पडली. कित्येकांनी यज्ञकुंडात आपल्या प्राणांची आहुती दिली. अशापैकी एक चरणकरांची बहीण सोनूताई. त्यांना शेवटची इच्छा विचारता त्यांनी काय इच्छा प्रदर्शित करावी ? त्यांनी सांगितलं, "माझी इच्छा एकच मला तिरंगी झेंड्यात गुंडाळून जाळावं".

९ ऑगस्टला स्थानबद्ध करून सरकारने ज्यांना तुरूंगात डांबले ते सुरक्षित होते. त्यांना सर्व सुविधा मिळत होत्या. एका ध्येयाने, एका विचाराने प्रेरित होऊन अेकत्र आल्याने ते आप्तसंबंधितांहून जास्त जवळचे झाले होते. कार्यावरील निष्ठा, पत्करलेली जबाबदारी स्वतःच्या वैयक्तिक सामर्थ्यावर किती उभी आहे याची स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या प्रत्येक सैनिकाची ही एक प्रकारची परीक्षा होती. एखादा भूमिगत पकडला जाऊन तुरूंगात आला की बाहेर वाहणाऱ्या वाऱ्याची दिशा राजबंदीना आत कळे. कडक

बंदोबस्तात सुद्रा सांकेतिक भाषेतील पत्रांची देवाण-घेवाण चाले. असेच एक पत्र शिराळे पेट्यातील हालचाल कळावी म्हणून दादांनी जोशीकाकांना सांकेतिक भाषेत पाठवले होते. "कासेगावला लग्न लागलं, चरणला, इस्लामपूरला लग्न लागलं, आरळयाला होणाऱ्या लग्नाचा मुहूर्त केव्हा आहे ?" दादांचा शिराळे पेटा ह्या लढ्यात अग्रभागी होता. जोशीकाका, दादा, कतेकाका, वसंतदादा पाटील, बुवासाहेब गोसावी, भाऊसाहेब सोमण, बापूसाहेब शेंडे यांनी या लढयाचे रणशिंग फुंकले जाण्यापूर्वी चिकाटीने केलेले निरपेक्ष,अविश्रांत परिश्रमामुळे सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या कार्यकर्त्यांची अभेद फळी तयार झाली होती. शिराळे पेट्यांतील एक स्वातंत्र्यसैनिक, कासेगावचे कासेगांवकर वैद्य जुन्या आठवणी हसून सांगत होते. भाऊसाहेब सोमण, दादा, बुवा गोसावी या हयात असलेल्यांच्या आठवणीने त्यांना गहिवरून आले. शिराळे पेट्याची मनोभूमी नांगरून तयार होती. मशागत केलेली जमीन बी पडण्याची वाट बघत होती. एकाएकी शिराळे पेटा चळवळीच्या अग्रभागी राहून तळपला नाही. वरील कार्यकर्त्यांची तपश्चर्या त्यामागे होती. धुमसणाऱ्या ज्वालामुखीवर ठिणगी पडली. एकच आगडोंब उसळला. इतर ठिकाणची चळवळ शमली पण शिराळे पेटा धुमसत राहिला तो गांधीजींनी भूमिगतांना सरकारपुढ हजर होण्याचे आवाहन करीपर्यन्त. गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे भूमिगतांनी शस्त्रही सरकारच्या स्वाधीन केली.

ह्या लढ्यात दादांच्याबरोबर नाशिकला स्थानबद्ध झालेल्यात शांतिलाल शहा, वि. स. पागे, बाळूभाई मेहता, गोकुळभाई भट, ना. ग. गोरे, सॉलिसिटर कोरा, साने गुरुजी इत्यादी होते. लक्ष्मीबाई ठुसे या त्यापैकी एक होत्या. हे स्थानबद्ध रोजच्या चाकोरीबद्ध, रटाळ वातावरणात बदल करण्याची क्लुप्ती काढीत. सॉलिसिटर कोरा एखादा राष्ट्रीय प्रसंग साजरा करण्यासाठी कितीतरी दिवस आधीपासून स्वतःच्या वाट्याचे दूध न पिता विरजण लावीत. साखर न खाता साठवून ठेवीत. साठवलेल्या दह्याचे, साखरेचे श्रीखंड बनवून सगळ्यांना चमचा चमचा चाखायला देवून तोंड गोड करीत. इथली मित्रमंडळी एकमेकांचे वाढदिवस साजरे करीत. याला दिवाळीसारख्या सणाचा अपवाद नव्हता. अशाप्रसंगी स्थानबद्धांचे आप्त भेटवस्तू, फळांची करंडी, फराळाच्या वस्तुनिशी भेटीला येत. जेलरची पाहणी झाल्यावर भेटवस्तू संबंधिताला मिळत. स्थानबद्धांना कारागृहाबाहेरील संबंधितांना भेटी पाठवण्याची परवानगी होती. असेच साने गुरुजींचे स्त्रीगीते हे पुस्तक शान्तिलाल शहांनी नाशिकहून भेट म्हणून मला पाठवले होते. हा कारावास म्हणजे सर्व सुखसोयी असलेला पारतंत्र्याचा सोन्याचा पिंजरा होता. गांधीजींची सुटका झाली तरी दादा नाशिकच्या तुरुंगात होते. याला कारण होते शिराळे पेट्यातील दादांची रुजलेली, खोल गेलेली पाळंमुळं सरकारच्या लक्षात आल्याशिवाय कशी राहतील? शिराळे पेट्यातील उद्रेकाला जबाबदार असणाऱ्यापैकी दादा एक होते, दादांना सोडण्याचा धोका सरकारला पत्करायचा नव्हता.

सत्याग्रह हे नाव बदलून लढा हे नाव चळवळीला दिलेल्या ह्या लढ्याची तशी आम्हाला

झळ लागली नाही. आठवड्यातून एक पत्र लिहिण्याची परवानगी असल्याने एकमेकांची खुशाली कळे. पत्र सेन्सॉर होत असे. आक्षेपार्ह वाटणारा मजकूर वाचता येणार नाही अशा पद्धतीने खोडला जाई. दादांना स्थानबद्ध करण्यापूर्वी आमची रवानगी बडोद्याला झाली होतीच. दर महिन्याला पुरेल अशी रक्कम दादांनी बँकेत ठेवली होती. पण आम्हाला बडोद्याला दोन वर्ष राहावे लागेल ही कल्पना नव्हती. आजोबांनी काटकसरीने घर चालवून सगळं निभावून नेलं. शिवाय काका मधून मधून येऊन चौकशी करीत. नातेवाईकांनी, समाजाने, शाळेतील शिक्षक व मुले यांनी सरकारच्या दडपणाने आम्हाला दूर ठेवले नाही. उलट या कुटुंबातील कर्ता पुरुष देशासाठी स्थानबद्ध आहे, हे कुटुंब साधेपणात व्यवस्थित राहते याचे त्यांना कौतुक वाटे. या लढ्याची एक प्रतिक्रिया म्हणजे शाळा, कॉलेजं ऑगस्टपासून बेमुदत बंद झाली. आमच्या शाळेने दिवाळीपर्यंत शाळा बंद असल्याचे जाहीर करून टाकले. आमच्या घरी लढ्याला पोषक वातावरण असले, तरी मुलांनी शिक्षण, अभ्यास अर्धवट टाकून राजकारणात उडी घ्यावी असे दादांसकट कुणाला वाटत नसे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या विचारसरणीचा, कार्यपद्धतीचा, उद्देशाचा सखोल अभ्यास करून मग विचारपूर्वक निर्णय घ्यावा असे दादांचे मत होते. तशा तऱ्हेची पत्रे आम्हाला तुरुंगातून येत. दादांनी आज स्वतः एका पक्षाला निष्ठा वाहिली ती कायम. शाळा बंद होती तरी मी इंग्रजी, गणित शिकायला जाई. पुढे काय झाले. डिसेंबर महिना आला. एक एक अफवा उठू लागल्या इंग्रजीचे उच्चाटन होणार आहे. पूर्वपरीक्षा चालू असता चळवळीत भाग घेतलेली मुले हॉलमध्ये घुसली. परीक्षेला बसलेल्या मुलांच्या उत्तरपत्रिकांवर शाई ओतली. उत्तरपत्रिका फाडून टाकल्या. विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना पकडून पकडून त्यांना बांगड्या भरल्या. अफवा व खऱ्या हकीगती एकमेकात इतक्या बेमालूमपणे मिसळल्या गेल्या की खरेखोटे कळेना. दादांची अभ्यास करण्याबद्दलची पत्रे येतच होती तरी मी पत्रांना न जुमानता अभ्यास करणे सोडून दिले. टिवल्याबावल्या करीत वेळ काढू लागले. "परीक्षा होणार नाहीत तर अभ्यासाची डोकंफोड कशाला" असे मनाने घेतले. सगळा रागरंग बघून बाईने एक दिवस समजूत घातली. तू अभ्यास कर. समजा बडोद्याला परीक्षा झाली नाही तर जिथे परीक्षा होईल तिथे मी तुला घेऊन जाईन. तुझे वडील तुरुंगात. समज, परीक्षा घेतली आणि तू परीक्षेला बसली नाहीस किंवा अभ्यास न केल्याने नापास झालीस तर त्यांना किती वाईट वाटेल? माझी मान किती खाली जाईल? शेवटी माझ्या मानगुटीवर बसलेले हे अभ्यास न करण्याचे भूत गेले. मी अभ्यासाला लागले. चांगले मार्क मिळवून मॅट्रिक झाले. आमच्या घरातील पहिली मॅट्रिक, तीही वडील जेलमध्ये असताना म्हणून थोडंफार कौतुक झालं. दादांना ही बातमी तुरुंगात कळवली. लढ्यामुळे परीक्षेची अनिश्चिती, उत्तरपत्रिकेवर शाई ओतणे, त्या हिसकावून घेणं हे होणारे तुरळक प्रकार. यामुळे माझी परीक्षा होईपर्यंत काका बडोद्याला राहिले होते. चांगले मार्क मिळाल्याने मला फ्री शिप-शिष्यवृत्ती मिळत होती. मैत्रिणींनी भरीला घातले, "तुझे वडील जेलमध्ये आहेत. तू अर्ज कर." मी अर्ज केल्याचे फुशारकीने घरी सांगितले.

पण काकांनी अर्ज मागे घ्यायला लावला समजावले, " आपण फी भरू शकतो. आपल्यापेक्षा जास्त गरजू विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होऊ दे ".

## पुन्हा मुंबईला आगमन

वडोद्यासारख्या वैभवशाली संस्थानात आम्ही दोन वर्ष होतो. तिथल्या दसऱ्याच्या-गणपतीच्या संपन्न मिरवणुका पाहिल्या. सोन्याचांदीच्या तोफा, सजवलेले हत्ती, घोडेः उंट त्यावरील तितकेच रुबाबदार स्वार, दरबारी बँड, गायकवाडी कंगणीदार पागोटे घातलेल्या वादकांचा होलारी बँण्ड पाहून डोळ्याचे पारण फिटले तरी आम्हाला कधी एकदा वांद्राला जातो असे झाले होते. वांद्राच्या मोठ्या घरात काका एकटे राहात असले तरी आमचे घर जणू भूमिगतांचे केंद्र होते. ४२ साली नुकतेच लग्न झालेले श्री. व सौ. गुपचूप तिथे रहात. लग्न झाले आणि गुपचूप भूमिगत झाले. सौ. गुपचूप तशा या राष्ट्रीय वृत्तीच्या वातावरणाला अपरिचित. त्यांना सक्त ताकीद दिली होती की, श्री. गुपचूप यांच्याशी साधी ओळख आहे असे देखील कुठल्याही रीतीने दर्शवायचे नाही, मग नात्याचा उच्चार तर दूरच राहिला. हा चळवळीत सहभागी झालेला तरुण प्रथम वर्ग मिळवलेला शास्त्र शाखेचा पदवीधर होता. विमलाताई भूमिगत नव्हत्या, तरी चक्रवाक पक्षाच्या जोडीची ताटातूट जशी दोघांमध्ये असलेल्या कमळाच्या पानाने केलेली असते तशी परिस्थिती या भूमिगत परिस्थितीने दोघांची झाली होती. पास है फिर भी दूर. गुपचूप यांना पकडल्यावर सौ. गुपचूप पार्ल्याला काकूभाईच्याकडे रहायला गेल्या. (एके दिवशी काकूभाईच्या परिचयाचा एक पोलिस इन्स्पेक्टर त्यांच्याकडे आला. तो विमलताईच्या ओळखीचा झाला होता. त्याने विमलाताईना मधाचे बोट लावले. श्री. गुपचूप यांना भेटायची इच्छा असली तर माझ्याकडे या. मी, श्री. गुपचूप यांची गुपचूप भेटायला येण्याची व्यवस्था करतो. लहान वय, अननुभवी यामुळे पोच नसलेल्या विमलाताई हुरळून रात्रीच्या वेळी इन्स्पेक्टरबरोबर जायला निघाल्या. काकूभाईमध्ये पडले, सुचवले, "हे बघ, तू आता कांही जाऊ नकोस. उद्या सकाळी वांद्राला माधवराव देशपांडे यांचेकडे जा. ते सांगतील तसे कर." दादा ह्या वेळेपर्यंत स्थानबद्धतेतून सुटले होते. सकाळी सकाळी विमलाबाई निघाल्या पण माधवराव काकांच्याकडे न येता त्या इन्स्पेक्टरकडे जाऊन पोचल्या. पाहतात तो इन्स्पेक्टरशिवाय घरात चिटपाखरू नाही. इन्स्पेक्टर बसा बसा म्हणेपर्यंत त्या ज्या पळत सुटल्या त्या वांद्राला माधवराव काकांच्याकडे येऊन थडकल्या. त्या आधीच काकूभाईचा दादांना फोन आला होता चौकशी करण्यासाठी. तर या बाईचा पत्ता कुठे आहे? सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. निराश होऊन दादा घरी आले तर ह्या बाईसाहेब घरी हजर होत्या. आधी काकूभाईना फोन करून निश्चित केले आणि विमलाबाईंना चार हिताच्या गोष्टी ऐकवल्या. " हे बघ, अनुभवी मोठ्या माणसांनी सांगितलेले ऐकले नाही तर अशी फटफजिती होते. वेळ चांगली म्हणून तू धडपणे इकडे आलीस. "

ह्या काळात उस्मानचाचा उर्फ आझादचाचा भूमिगत होते. ते आमच्या घरांतील

माळचावर राहिले होते. घरात फक्त काका होते. बाईमाणूस कुणी नव्हते. त्यांनी शंकरपाळे, डिंकाचे लाडू, पाणी असे फराळाचे कांहीबाही देऊन भुकेची वेळ जेमतेम भागवली हृया उस्मानचाचा व दादांचा १९३० पासूनचा परिचय. दादांच्या जुन्या जुन्या आठवणीत. ते रंगून जातात.

'वुई आर सेव्हन' या सप्तर्षींमधील दादांचे मित्र भाई धोत्रे हे या काळात भूमिगत नव्हते, पण भूमिगत असल्यासारखे होते. ते गांधी सेवा संघाचे सचिव म्हणून काम पाहात. संस्थेचे पैसे सांभाळणे, कार्यकर्त्यांना पैसे पुरवणे, निरोपाची देवाण-घेवाण करणे वगैरे कामे बाहेर राहून ते करीत. त्यांचे ऑफिस काळबादेवीला बच्छराज पेढीवर होते. पोलिसांना काही सुगावा लागल्याने ते तपास करायला पेढीवर गेले असता चळवळीसाठी जमवलेले दोन लाख (त्यावेळचे) बरोबर घेऊन भाई जे सटकले ते टॅक्सीने थेट वांद्र्याला आले. पैशासकट जवळजवळ दोन महिने त्यानी ऑफिसमध्ये काढले. जोशीकाकांचे व भाईंचे संघटन या वास्तव्यात वाढले. दादांची स्थानबद्धता, शिराळे पेटयातील अक्षय पेटलेल्या ज्वालाकुंडामुळे वांद्र्याच्या आमच्या घरावर पोलिसांची नजर होतीच.

बाबुराव जगताप, जी. डी. पाटील, गुलाबराव गणाचार्य व त्यांच्यामुळे नाना पाटील या सातारवासी यांचा दादांशी संबंध होता. कामानिमित्त उस्मानचाचा साताऱ्याला जात असल्याने तेही या क्रांतिवीरांशी परिचित झाले होते. नाताळचे दिवस होते. नाना पाटील शिवडीच्या नागूसायाजी वाडीत उतरले होते. तत्पूर्वी माधवरावांचे काय बोलणे झाले ते उस्मानचाचांना माहीत नाही. बाबूराव जगताप यांनी नाना पाटलांना माधवराव यांचेकडे नेण्याची जबाबदारी उस्मानचाचांवर टाकली होती. ते सांगतात, "आम्ही लपत छपत माधवरावांच्याकडे आलो. खोलीत आम्ही तिघेच होतो. नाना पाटलांनी पैशाची मागणी केली व माधवरावांनी त्यांना आश्वासन दिले. ही भेट १०–१५ मिनिटांची होती. भेटीनंतर आम्ही घरून निघालो. वेगवेगळ्या डब्यात बसून भायखळ्याला आलो. तेथे त्यांना लव्ह लेनमधील मेवावाला चाळीत तासगावचे भीम यांचेकडे सोडले. दुसऱ्या दिवशी माधवरावांनी पैशाचे पुडके दिले. ५,००० रुपये असावेत. ते उस्मानचाचांनी बाबूराव जगताप यांना नेऊन दिले."

## आश्रमी पद्धतीचे लग्न

आम्ही १९४४ च्या मे महिन्यात बडोद्याहून मुंबईला आलो. दादांना स्थानबद्ध म्हणून किती दिवस जेलमध्ये रहावे लागेल हे अनिश्चित होते. पण बडोदे सोडण्यापूर्वी बडोद्याला स्थायिक असलेल्या बाबाजी मोघे यांच्या मुलाने श्री. विनायकराव यांनी मला लग्नासाठी मागणी घातली. बाबाजी व दादा दोघे त्यावेळी तुरुंगात होते. बाईने दादांशी व दादांनी बाबाजींशी पत्रव्यवहार करून हे लग्न पक्के केले. दोघेही जेलमधून सुटल्यावर हे लग्न व्हावे असे ठरले. लग्न ठरल्यावर जवळजवळ वर्षाने हे लग्न झाले. या कालावधीत आम्ही दोघांनी पत्रव्यवहार करायला हरकत नाही अशा अर्थाचे पत्र दादांनी बाईला जेलमधून

पाठवले होते. दादा जेलमधून सुटले तो दिवस आश्विन शुद्ध पंचमीचा म्हणजे ललिता पंचमीचा होता. घरात नवरात्र बसले होते. अंबाबाईचे, आमच्या कुलदेवीचे. मी अंबाबाईचा जोगवा मागायला शेजारी गेले होते. तिथे मला दादा सुटून घरी आल्याचा निरोप आला तर खरे वाटले नाही.

बाबाजी मोघे व माधवराव देशपांडे यांनी जेलमध्ये एकमेकांशी पत्रव्यवहार करून ठरवलेले लग्न जवळ जवळ वर्षाने सेवाग्रामला झाले. लग्न ठरवताना दादांनी एक सुचवले होते. लग्न झाले तरी लग्नानंतर शांता पुढे शिकेल. तावडतोब लग्न व्हावे असे मुलीचे वय नाही. मोघे मंडळींनी कबूल केले. लग्नानंतर माझे शिक्षण मागील वर्षावरून पुढे सुरू राहिले. लग्न सेवाग्रामला गांधीजींच्या उपस्थितीत व्हावे, गांधीजींचा आशीर्वाद मिळावा अशी दादांची व बाबाजींची इच्छा होती. तर माझ्या सासूबाईंना वाटे लग्न धुमधडाक्याने, संस्थानी पद्धतीने बडोद्याला व्हावे. बॅण्ड लावून नवरा मुलगा हत्तीवरून मिरवावा. सासूबाईंच्या सर्व हौशी बाबाजी लहान वयात साबरमती आश्रमात घर सोडून गेल्याने मारल्या गेल्या होत्या. एका बाजूला दादा व बाबाजी तर दुसऱ्या बाजूला माझ्या सासूबाई. दोन्ही बाजू समसमान असल्याने माघार घ्यायला कुणी तयार होईना. शेवटी दोन्ही व्याहयांनी संगनमत करून असहकाराचे शस्त्र उपसून निर्णय दिला, "तुमच्या मुलाचे लग्न तुम्ही खुशाल बडोद्याला डामडौलात करा. आम्ही दोघेही लग्नाला हजर राहणार नाही. केशव लग्न लावील." दोघांच्या सत्याग्रहापुढे सासूबाई काय करणार? त्यांनी निमूटपणे माघार घेतली. सेवाग्रामला लग्न गांधी पद्धतीने झाले. सेवाग्रामला पोचल्यावर गांधीजींना लग्नाचे आमंत्रण करण्यासाठी सायंप्रार्थनेच्या वेळी दादा व बाबाजी गेले. आम्ही सर्व प्राथनेला हजर राहावे म्हणून गेलो. लग्नाचे आमंत्रण दिले. गांधीजींना सकाळी सवड नसल्याने मुहुर्त बदलून संध्याकाळचा गोरज मुहुर्त धरला. गांधीजींचा कुणीतरी गैरसमज करून दिला होता. माधवराव देशपांडे खूप मोठे वऱ्हाड घेऊन लग्नाचे निमित्त करून मजा करायला सेवाग्रामला आले आहेत. डबे भरभरून खाद्य पदार्थ आणले आहेत. दादांनी त्यांना खरी वस्तुस्थिती सांगितली. गैरसमज दूर झाला. शान्त होऊन ते लग्नाला यायला तयार झाले.

लग्नाचा दिवस उजाडला. लग्नविधीचा प्रारंभ झाला तो संडास सफाईने. माझ्यापोटात गोळा उठला. दिवसभर कोणत्या कोणत्या प्रसंगाला तोंड द्यावं लागणार या भीतीने. नंतर गोठ्याची सफाई, गाईची पूजा, सूतकताई हे कार्यक्रम उरकले. लग्नासाठी शान्ताबाई माडखोलकर नागपूरहून आल्या होत्या. महात्मा गांधी, जानकीदेवी बजाज, डॉ. सुशिला नायर, शांताबाई काळे, कमूताई लेले अशी अनेक प्रतिष्ठित मान्यवर मंडळी आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होती. महात्माजी आले. शेजारी शेजारी ठेवलेल्या पाटावर आम्हाला उभं केलं. मुंडावळ्या, अंतरपाट, अक्षता याला फाटा दिला होता. मंगलाष्टकं सुरू झाली. मंगलाष्टकं संपली. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. तीच सनई, तोच चौघडा. आम्ही एकमेकांना हार घातले. सहजतेने चांगला लाभ झाला असं काहीसं मनात धरून

शान्ता नांव बदलून माझं सुलभा नांव ठेवलं गेलं. झालं लग्न. दादांच्या मोठ्या मुलीचे लग्न गांधीजींच्या उपस्थितीत झाले. बाल मित्र व्याही व्याही झाले. लग्न लागल्यावर आम्ही गांधीजींच्या पाया पडलो. त्यांनी भेट म्हणून स्वाक्षरी केलेली पुस्तकं दिली. दुसऱ्या दिवशी गांधीजींच्या झोपडीत आम्हाला घेऊन यायला बाबाजींना गांधीजींनी सांगितलं. गांधीजींनी लग्नमंडप सोडण्यापूर्वी उपदेशात्मक छोटं भाषण केलं. आमच्याकडे दादा व काका व्यतिरिक्त कुणी खादी वापरत नव्हतं. घरच्या बायकामुलांना सेवाग्रामला जायचं म्हणून खादीने मढवलं होतं. गांधीजी हरिजन फंडासाठी कदाचित अंगावरचे दागिने मागतील म्हणून दूरदर्शीपणाने बायका लंकेच्या पार्वती बनून लग्नाला आल्या होत्या. सासूबाई कुणाला ऐकू जाणार नाही अशा हलक्या आवाजात पुटपुटत होत्या, "हे कसलं बाई लग्न." रात्र झाली. सगळीकडे निजानीज झाल्याची खात्री करून घेऊन माझ्याजवळ आल्या. मला उठवलं. पुरचुंडीत आणलेला चपला हार, बांगड्या मला घालायला सांगितलं. एक ९ वारी जरीची साडी माझ्यापुढे करून मला नेसायला लावली. म्हणाल्या, "आता तुझ्या आई वडिलांच्या, काकाकाकूच्या पाया पड, आणि दागिने, साडी परत माझ्या हवाली कर" सगळा गुपचीपीचा कारभार. पण लक्ष्मीपूजन उरकल्याचं समाधान सासूबाईनी अशा तऱ्हेने मिळवलं असावं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमची सगळ्यांची वरात महात्माजींच्या झोपडीत जाऊन धडकली. झोपडी कमालीची स्वच्छ, साधी होती. महात्माजींच्या समोर एक बैठे लाकडी टेबल होते. येणाऱ्या पाहुण्यांसाठी बसायला चटया अंथरल्या होत्या. आधुनिकतेची तेथे एकच खूण होती ती म्हणजे दूरध्वनी. महात्माजींच्या वास्तव्याने सर्व वातावरण पवित्र, चैतन्यमय वाटत होतं. झोपडीत प्रवेश केल्यावर आम्ही सर्व त्यांच्या पाया पडलो. पाठीवरून, डोक्यावरून ममतेने हात फिरवून त्यांनी आम्हांला जवळ बसवून घेतलं. त्यांचं व्यक्तिमत्व सौम्य, प्रसन्न होतं. इंग्रजांना कापरं भरवणारी व्यक्ती हीच याच्यावर विश्वास बसत नव्हता. चौकशी करता करता त्यांच्या सचिव डॉ. सुशीला नायर यांना गांधीजींनी खूण केली, त्यांनी गांधीजींनी कातलेल्या सुताची गुंडी आणून दिली. गांधीजींनी ती गळ्यात घातली. आम्ही परत पाया पडलो, बाहेर निघतो न निघतो तोच बाबाजी माझ्याजवळ आले. अगदी हळू आवाजात कुजबुजले, "बापूजींनी स्वतः कातलेल्या सुताची गुंडी तुला दिली. तू आता आजन्म खादी वापरली पाहिजेस." बाकीची, सासरे नव्या सूनबाईशी कसले खास हितगुज करतात म्हणून बुचकळ्यात पडली. माझी मात्र हबेलंडी उडाली. मी खादी वापरी पण आजन्म खादी वापरण्याचे वचन द्यायची त्या क्षणाला माझ्या मनाची तयारी नव्हती. बाबाजींनी लगेच सत्याग्रहाचे आमरण उपोषणाचे शस्त्र उपसले. दादा म्हणाले, "आम्ही मुलगी तुम्हाला दिली. आम्ही मध्ये पडणार नाही." मी खादी वापरण्याची शपथ घेतली नाही तर बाबाजी उपोषणाला बसणार हे ऐकून मी घाबरले, खादी वापरायला कबूल झाले. आमची आपसात कांही बोलणी चालली आहेत हे लक्षात आल्यावर पुढे चालत असलेले बाबाजींचे चिरंजीव विनायकराव उर्फ आप्पा थांबले. सगळं ऐकून घेतल्यावर

वडिलांना म्हणाले, " जबरदस्तीने, उपोषणाच्या व दडपणाखाली कुठलीही गोष्ट करायला लावणं अयोग्य आहे. आता मी काय सांगतो ते ऐका, " शांता जर खादी वापरणार असेल तर माझे आमरण उपोषण." शहाला काटशह मिळाला. आमरण उपोषण बारगळले. ह्या लग्नाचे निवडक फोटो काढावेत अशी सूचना केली होती पण फोटोचे फॅड साधेपणाच्या लग्नात बसत नसल्याने ती कल्पना कार्यवाहीत आली नाही. नंतर हुरहुर लागून काय उपयोग ?

### ४२ नंतर

दादा तुरुंगातून सुटले. बाहेरील घडामोडीचे तपशील त्यांच्या कानावर येऊ लागले. ४२ च्या चळवळीत मोटारी लुटणारे, जोशीकाकांच्यावर झाडलेली गोळी स्वतःच्या देहाची ढाल करून झेलणारे तालीमबाज चांदभाई खितपत पडून निवर्तल्याचे दुःखद वार्ता कानी आल्यावर गुलशनला—त्यांच्या पत्नीला जाऊन भेटून आले. मला ' अडाणीला शिकून काय करायचे' असं वारंवार प्रतिपादन करणाऱ्या गुलशनचे मन वळवून तिला वर्ध्याला महिलाश्रमामध्ये शिकायला उद्युक्त केले. आरळ्याहून मुंबईला आणले. बाबाजींना पत्र लिहून वर्ध्याहून बोलावून घेतले. त्यांच्या सोबतीने गुलशनची पाठवणी महिलाश्रमात केली. वैकुंठलाल मेहता, रामभाऊ जोशी, दादा दरमहा खर्चाची २०-२० रुपये गुलशनला पाठवीत. मालूताई थत्ते, सौ. कमूताई लेले या महिलाश्रमाच्या प्राचार्य, कार्यकर्त्यांना गुलशनकडे लक्ष देण्याबद्दल वारंवार पत्र लिहित. अभ्यासक्रम पुरा झाल्यावर मुंबई ग्रामोद्योगामध्ये नोकरीसाठी खटपट करून बिळाशीला गुलशनची नेमणूक करून दिली. " माझ्या चामडयाचे जोडे करून घातले तरी दादांचे उपकार फिटणार नाहीत. " या शब्दांत ती दादांची आठवण काढते. ४५ मध्ये गांधीजींच्या आवाहनाला शिरसावंद्य मानून तुरुंगातून पळालेले, भूमिगत असलेले त्यांचे लढवय्ये अनुयायी सरकार समोर हजर झाले. सेनापतीने शस्त्र सरकार स्वाधीन करायला सांगितलं. भूमिगतांनी शस्त्रं स्वाधीन केली. सरकारने खटले भरले. सशस्त्र उठाव केल्याबद्दल, चिथावणी दिल्याबद्दल. आता हे खटले भूमिगतांतर्फे चालवायचे म्हणजे पैशाचं पाठबळ हवं. खटले चालवण्यापूर्वी पुरावे, साक्षीदार इत्यादिंची पूर्वतयारी करायला हवी. साताऱ्यांत चालणाऱ्या खटल्यासाठी दादांनी पैसे गोळा केले. खटला कोर्टात उभा रहाण्यापूर्वीची तयारी केली. मुंबईला असलेली इतर कामं, मुंबईचं वास्तव्य यामुळे प्रत्येक तारखेला साताऱ्याला जाणं दादांना सोईस्कर नव्हतं, व्यवहार्य तर नव्हतंच. साताऱ्याचे स्थानिक कायदे पंडीत बॅ. करंदीकर हे खटल्याच्या तारखेला भूमिगतांतर्फे वकील म्हणून हजर रहात. आरळ्याच्या चांदभाईने तलाठ्याचे नाक कापल्याचा खटला उभा राहिला तेव्हा दादा चांदभाईसाठी गेले होते. "मी वेडावाकडा पडलो आणि नाकाची अशी दुर्दशा झाली" अशी साक्ष खुद्द तलाठ्याने कोर्टात न्यायाधिशासमोर दिल्यानं खटल्यातील हवा निघून गेली. सरकारला खटला मागे घ्यावा लागला. आरळ्याच्या तालमीतील मशागत केलेल्या मातीतील चांदभाई म्हणजे अनेक पक्व फळांपैकी एक फळ.

४२ च्या देशभक्तीने ओतप्रोत भरलेल्या निर्मळ गंगेच्या प्रवाहात गटारगंगेचा एक छोटा प्रवाह मिसळला होता. गांधीजींनी शस्त्रं सरकारला देण्याचे आवाहन केल्यावर सच्च्या

गांधीवाद्यांनी तो हुकूम मानला. तदनंतर जाळपोळ, लुटालूट चालू राहिल्याने ह्या गटार-गंगेच्या ओंगळ ओहोळाचा उथळ खळखळाट जाणवू लागला. कांही गुंडांनी चळवळीच्या नांवाखाली धुमाकूळ घातला होता तो आटोक्यात येईना. आम्ही गांधीबाबाची माणसं या आवरणाखाली त्यांची दुष्कृत्य चालू राहिली. सामान्य जनता गोंधळून गेली. त्यावेळी खेरांच्या मंत्रिमंडळात मोरारजीभाई गृह मंत्री होते. त्यांना हा गुंडपणा निपटून काढायचा होता. मंत्रीमंडळाला विश्वासू वाटणाऱ्या, साताऱ्याची नाडी ओळखणाऱ्या, जनमानसाचा रागरंग जाणणाऱ्या विश्वासू सहकाऱ्याची मंत्रीमंडळाला आवश्यकता होती. त्यांनी बाळासाहेब खेरांना ही गरज सांगितल्यावर त्यांनी आपला उजवा हात माधवराव यांचे नाव सुचवले. समाजाला उपद्रव करणाऱ्या या दरोडेखोर गुंडांची शस्त्रं हळूहळू काढून घेण्यात सरकारला यश मिळाले. या तथाकथित गांधीबाबांच्या अनुयायांचे पितळ उघडे पडून त्यांची दुष्कृत्यं उजेडात आली. या समाजकंटकांनी जवळ शस्त्रं नसल्याने, संतापलेली, भरडली गेलेली माणसं कधीही आपल्या नरडीचा घोट घेतील अशी भीती व्यक्त केली. स्वसंरक्षणार्थ शस्त्र परत मागितली. त्यांना शस्त्रं परत दिली नाहीत पण जवळ जवळ २५ जणांना काँग्रेस सरकारने एका बंगल्यात नजरकैदेत ठेवलं. म्हटलं तर त्यांचं रक्षण केल्यासारखं झालं जनतेमागचा या गुंडांचा ससेमिरा चुकला. पण या उचापतखोरांना नजरकैदेत कशी चैन पडणार? त्यांनी जबरदस्त दडपण आणून स्वतःची सुटका करून घेतली. या संदर्भात मलकापूर, सातारा येथे जे खटले झाले, खऱ्या व बनावट भूमिगतांसाठी त्यांत दादांनी बरीच धावपळ केली.

या चळवळीत संपूर्ण अहिंसावादी, गांधीजींचे सच्चे अनुयायी बाबाजी यांनी "सत्य अहिंसेचे बंधन वेळी झुगारून द्यावे पण इंग्रजांना पळवावे" या आदेशाचे पालन करतांना रेल्वेरुळाच्या फिशप्लेटस् काढल्या होत्या. जमावाला चिथावणी देऊन पोलीस इन्स्पेक्टरला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला होता. या खटल्याचे वेळी दादा स्वतः खटला चालवायला पूर्ण तयारीनिशी गेले होते, पण काय जादू झाली न कळे, जबानीत पोलिस इन्स्पेक्टरने सांगितले, "जमाव चवताळला होता पण या गृहस्थाने बाबाजींनी जर वेळीच जमावाला शांत केले नसते तर साक्ष द्यायला मी आज इथे जीवंत राहिलो नसतो." चांदभाई-च्या खटल्याची पुनरावृत्ती झाली.

## कोरा ग्रामोद्योग व दादा

गांधीजींनी शस्त्रसंन्यास घेऊन सरकार समोर हजर होण्याचे आवाहन भूमिगतांना केले तसेच दुसरे आवाहन सुटून आलेल्या आपल्या सच्च्या पाईकांना केले. त्यांनी रचनात्मक, विधायक कार्याला वाहून घ्यावे असे गांधीजींनी टाशीवपणे सांगितले. आता विधायक कार्य काय करावे याची स्पष्ट, तपशीलवार योजना आखावी म्हणून मुंबई उपनगराच्या मरोळ बाजारात सॉलिसिटर कोरा, द. ना. वांद्रेकर, दत्तूभाई हटंगडी, दादा, प्राणलालभाई अशी बरीच मंडळी जमत. मरोळला कोळी समाज बहुसंख्येने होता. स्वच्छतेचे

धडे तोंडपाटिलकीने न देता हे लोक स्वतः स्वच्छतेच्या कामाला रस्ता सफाईपासून सुरुवात करीत. ही साधी खादी वापरणारी, खूप शिकलेली माणसं काही अपेक्षेने काम करीत नाहीत याची खात्री पटल्यावर कोळी बांधवानी त्यांना मनापासून सहकार्य दिले. व्यसना-पासून कोळी समाजाला परावृत्त करण्याच्या प्रयत्नाला त्यांनी उत्फूर्त प्रतिसाद दिला. कोळी समाजाला, त्यांच्या व्यवसायाला अुपयुक्त अशा सहकारी सोसायटीची स्थापना कार्यकर्त्यांनी केली. समाजाच्या उन्नतीसाठी, साक्षरता प्रसारासाठी कीर्तनाचे, भजनाचे कार्यक्रम ठेवून त्या माध्यमातून मूलभूत स्वच्छता, सहकार्य, साक्षरता याचे महत्त्व पटवण्याचा प्रयत्न केला. १९४६ ला पटवर्धनबुवा, आफळेबुवा राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून प्रकाशझोतांत होते. त्यांच्या कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले. या पोशाखी नसलेल्या समानधर्मीयांचा सुंदर संच सहजपणे जमून मुंबईच्या एका उपनगरी भागात प्रामाणिकपणे काम करी. मुख्य मंत्री बाळासाहेब खेरांची त्यांना सर्वतोपरी मदत असे. ही सर्व मंडळी आपापल्या विश्वात मग्न असतां दौऱ्यावरून परत येता येता बाळासाहेब खेर एकदा अचानकपणे जीपमधून मरोळला आले. कामाचे नाटक नव्हते म्हणून अचानक भेटीमुळे धावाधाव होण्याचे कारण नव्हते. मुख्य मंत्र्यांवर वजन पाडण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. बाळासाहेबांनी काम पाहून समाधान व्यक्त केले. या जमलेल्या संचाने अधिक कामाची स्फूर्ति घेअून १९४६ च्या रामनवमीला कोरा ग्रामोद्योग केंद्राची स्थापना केली. बोरिवलीच्या जंगलवजा परिसरांत सॉलिसिटर कोरा यांचे हे केंद्र म्हणजे दुसरा प्राण होता. ही त्यांची आत्मीयता उमजून बाळासाहेबांनी त्यांचे नांव केंद्राला द्यावे असे सूचवले. मंडळाने ते मान्य केले. दादा या केंद्राच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. दत्तूभाईंनी तर त्यांचे जीवन केंद्रा-साठी समर्पित केले आहे. खरे गांधीवादी. दादा त्यावेळी अुपनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. या केंद्रात उंटाची तेलघाणी होती. बायकांना जाती ओढून धान्य दळण्याचा त्रास नको म्हणून हे दळणाचे काम उंट करीत. चामडी कमावणे, त्याचप्रमाणे सुधारित पद्धतीने शेती, गृहउद्योग अशी अनेकविध कामे कोरा केन्द्रात चालत. आश्रमवासीयांचे तंत्र सांभाळण्यासाठी लागणारे हातसडीचे धान्य, घाणीचे तेल, पीठ, गाईचे तूप सगळे मिळ-ण्याचे कोरा ग्रामोद्योग केन्द्र खात्रीचे ठिकाण होते. आता प्रामुख्याने तेथे राहिली आहे फक्त "नर्सरी". दत्तूभाईंच्या अथक् परिश्रमाचा मूर्तिमंत, मूक साक्षीदार. शिबिरार्थी येथील आदर्श गृहोद्योग नजरेखालून घालण्यासाठी येत आणि स्फूर्ति घेअून जात. पर्यटक तितक्याच संख्येने येत. या केंद्राच्या योगक्षेमाचा भरवसा कार्यकारी मंडळाने रामरायावर टाकला होता. कार्यावरील नितांत श्रद्धेमुळे हे कार्यकारी मंडळ सुरुवातीला सभेसाठी झोपडीत जमत असे. पावसाळ्यात चारीबाजूनी पावसाची झड आत येई. जमीन ओली होऊन मंडळ गारठे, मंडळाला सचैल स्नान घडे तरी हे कार्यकारी मंडळ नव्या योजना आखणे, त्या कशा कार्यवाहीत आणाव्या याचा सांगोपांग विचार करणे, कार्याचा आढावा घेणे अशा कामासाठी वारंवार नियमितपणे जमे. त्या झोपडीच्या जागी आता पक्की इमारत झाली आहे.

एकदा काय मजा झाली, गुरांचे चामडे सोलून काढणाऱ्या मडवीचे व कोरा ग्रामोद्योगामध्ये काम करणाऱ्यांचे वाजले. मडवींचे समर्थन होते जनावरांचे चामडे सोलण्याच्या त्यांच्या हक्काच्या पुष्टयर्थ. कोरा ग्रामोद्योगवाल्यांनी आम्हा मडवींच्या हक्कावर गदा आणली अशा आशयाची केस, त्यांनी कोर्टात दाखल केली. तारखावर तारखा पडत. कोरा ग्रामोद्योग केन्द्रातर्फे श्री. दत्तूभाई कोर्टात हजर रहात. एका तारखेला दत्तूभाईना कोर्टात हजर रहायला उशीर झाला. न्यायाधीश एक मुस्लीम तरूण होता. उशीराचे कारण ऐकून न घेता हटंगडींना अपशब्द बोलून "यू गेट आऊट" म्हणून हाकलून दिले. खट्टू झालेले गांधीवादी हटंगडी बोरिवलीस आले. आल्या आल्या ही हकीकत त्यांनी लोकल बोर्डाचे लक्ष्मणराव म्हात्रे उर्फ म्हात्रे सरकार यांच्या कानावर घातली. म्हात्रे उपनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचीव तर दादा अध्यक्ष. दोघांचा घनिष्ट संबंध. हे सगळं होईपर्यन्त संध्याकाळ झाली. म्हात्रेंनी सल्ला दिला, "वांद्याला माधवराव देशपांडे यांना फोन करून त्यांच्या विचाराने वागावे". हटंगडीनी फोन करून हकीकत दादांच्या कानी रातोरात घातली. दादांनी एक मसुदा तयार करून कलेक्टरतर्फे त्या न्यायाधीशाला पाठवून दिला. त्यावेळी "माधवरावांचा आवाज म्हणजे अुपनगराचा आवाज" अशी दादांची पत होती. हटंगडी जुन्या आठवणीत हरवून सांगतात. या मसुद्यांत कोरा ग्रामोद्योगाच्या प्रतिनिधीला अपमानास्पद वागणूक दिल्याबद्दल न्यायाधिशाला जाब विचारला होता. न्यायाधीशाची मस्ती अुतरली. परत तारीख पडल्यावर हटंगडी कोर्टात गेल्यावर न्यायाधीशांनी त्यांना सन्मानपूर्वक "या, बसा" केले. न्यायाधिशाच बोलणं आदबशीर झालं. दत्तूभाईना हळूच म्हणाले, "तुम्ही या गोष्टी अितक्या का वाढवल्या ? मला अेका दिवसाच्या आत स्पष्टीकरण द्यायचे आहे, तेही लेखी. कलेक्टरपर्यन्त तुम्ही हे न्यायला नको होते". न्यायाधीशाच्या स्वरातली अजीजी, पडलेला चेहरा पाहून गांधीवादी हटंगडी विरघळले. न्यायाधीशाला शिक्षा व्हावी, त्याच्या नोकरीवर परिणाम व्हावा असं त्याना वाटत नव्हतं. ते कोर्टातून निघाले ते बोरिवलीला म्हात्रे यांकेकडे जाऊन पोचले. झालेली हकीकत कानी घातली. म्हात्रे यानी हटंगडींना समजावलं. माधवराव आता न्यायाधीशाला मिळालेल्या पत्राबाबत काय करू शकणार? या घोळात त्यांना घेऊन आता माघार घेतलेली त्याना पटणार नाही. शेवटी "न्यायाधीशाच्या वागण्यावरून त्याना वर्तणुकीचा पश्चाताप होत आहे अस जाणवतं. खरा पश्चाताप होणं ही मोठी शिक्षा ते भोगीत आहेत. सबब यापुढे अशी अपमानास्पद वागणूक ते कुणाला देणार नाहीत असे गृहीत धरू या" असं लिहून घेअून दादांनी प्रकरण मिटवलं. पुढे अनेक वर्षे दादा केंद्रात जात. शेवटी शेवटी प्रकृती अस्वास्थ्याने काठीच्या आधाराने येणारे, काय दत्तूभाई म्हणून पाठीवर, थाप मारणारे, पावस, आळंदी, पवनारला आग्रहाने नेणारे माधवराव दत्तूभाअींच्या डोळ्यासमोरून हलत नाहीत. आजही ते माधवरावांसाठी प्रार्थना करतात.

## दादा व विधायक कार्य

भायखळ्याला सातारा जिल्हा नागरी संघ होता. साताऱ्याहून अनेक निरक्षर पोटा-

साठी मायपोट असलेल्या मुंबईला येत. शरीरकष्टाची कामं करीत. त्यांच्या हितासाठी या संघाची स्थापना झाली होती. बाबूराव जगताप या संघाचे काम पहात. दादांनी तेथे साक्षरता प्रसाराचे वर्ग सुरू केले. शासनाच्या योजना राबवल्या. सही करण्या-इतपत साक्षरता यशस्वी झाली. सरकारी पैसा सरकारी योजनेसाठी वापरला गेला.

या काळात दुसऱ्या युद्धाचे दूरगामी दुष्परिणाम दिसू लागले. गहू, साखर, तांदूळ यांची टंचाई निर्माण झाल्यामुळे शिधापत्रिकेवर माणशी पावशेर गहू, पावशेर तांदूळ १५ दिवसांसाठी मिळत. पाहुणा तर सतत आमच्या घरी असे. असेच एक दूरच्या नात्याचे परगावचे वृद्ध शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी घरी आले. शस्त्रक्रिया होऊन काही दिवसांनी ते दवाखान्यातून घरी आले. पण उपचारासाठी त्यांना नंतर दवाखान्यात वारंवार जावे लागे. त्यामुळे त्यांच्या गावी जाणं त्याना गैरसोयीचे होते. प्रवास करण्याइतपत अंगात शक्ति नव्हती. एक दिवस जेवता जेवता बाईला म्हणाले, "कमळा-बाओी, एक विचारलं तर राग नाही ना येणार." आता हे गृहस्त बाईच्या वडलांच्या वयाचे त्यांच्यावर बाई काय रागावणार, त्यांनी संभाषणाची गाडी पुढे रेटली. "सध्याच्या रेशनिंगच्या दिवसात तुम्ही दोन्ही वेळा मला भात वाढता, तुम्हाला ते कसं जमतं? काळचा-बाजारांतून तर तांदूळ आणीत नाही ना?" बाओीने त्यांच्या शंकेचे निराकरण केलं. म्हणाली, " आपण शंका मनात डाचत ठेवली नाही हे फार चांगलं केलं. काळचाबाजारातून वस्तू आणणं म्हणजे देशद्रोह. शिधापत्रिकेवर जे धान्य मिळतं तेही तुटपुंज. लाल ज्वारी, मका वगैरे ते आम्ही खातो. घरात भात शिजवला जातो तो आपल्यापुरता. आपण वृद्ध त्यातून आजारी. लाल ज्वारी, मक्याची पोळी, भाकरी मुलं खातात, भात खात नाहीत."

मागील दाराने धान्य आणणं, परदेशी वस्तू वापरणं म्हणजे इंग्रज सरकारला मदत, देशद्रोह असं मानण्याचा तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता. "अतिथी देवो भव" सुभाषित बडबडण्यापेक्षा कृतीने मुलांच्या मनावर बिंबवणं हे दादा-बाई जास्त संयुक्तिक मानीत असत.

४२ ची ही चळवळ. लढा शान्त होतो न होतो तेवढ्यात मुंबईला गोदी विभागात स्फोट झाला. आसपासचा परिसर हादरून गेला. या स्फोटांत उडालेल्या सोन्याच्या चिपापैकी काही सोनं काही महाभागांना मिळालं. तरी ज्यांची बरीच हानी झाली अशापैकी इब्राहम बच्चा हे एक. त्यांनी थेट महात्माजींना पत्र पाठवले. मदत करण्याची विनंती केली. त्याची एक प्रत दादांना पाठवली. इब्राहिम बच्चाला मदत करण्याविषयीचे गांधीजींचे पत्र यथावकाश दादांना आले होते. महात्मा गांधींचा व दादांचा परिचय गांधीजींच्या जुहूच्या मुकामी झाला होता, दादा त्यांना कापसाचे पेळू नेऊन देत असत. ते पत्र आझाद चाचांनी पाहिले आहे. तसेच साने गुरुजींचे गीताई भाषान्तर करत असल्याच्या आशयाचे पत्र त्यांच्या नजरेखालून गेले आहे. ४२ च्या चळवळींत हे सर्व जप्त झाले.

हा गोदी विभागांतील स्फोटामुळे जसा त्या भागात बदल झाला तसाच बदल वांद्र्याला सध्याच्या स्वामी विवेकानंद मार्गावर तळ्यासमोर डौलाने एका शेजारी एक उभ्या असलेल्या नॅशनल लायब्ररी, महात्मा गांधी सेवा मंदिर आणि विठ्ठल रखुमाईच्या मंदिराच्या परिसरात

झाला. कुणाला खरं वाटणार नाही. ४५-५० वर्षापूर्वी स्वामी विवेकानंद रस्ता नव्हता. त्याच्या ऐवजी नूतन नगर, सध्याचे तळे, वरील तिनही वास्तूंची जागा, जरीमरीच्या बाजूचे तळे असे भले मोठे अखंड तळे होते. ही जागा कलेक्टरच्या मालकीची होती. वांद्रयाचं मुंबई नगरपालिकेत विसर्जन झालेलं नव्हतं. कालक, रतनचंद सेमलानी यांच्या मदतीने वर्षाच्या शेवटीच्या दिवशी बहुमताने ठराव पास करवून घेण्यात दादांनी पुढाकार घेतला. या ठरावाच्याद्वारे अत्यल्प किमतीत ही जागा विठ्ठल रखुमाईच्या मंदिरासाठी दादांनी मिळवून दिली. पुढे भरणी टाकून विठ्ठल रखुमाईचे मंदिर पुरे होईपर्यन्त अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. नाभिक समाजाने पुढाकार घेऊन हे देऊळ बांधले. त्यामुळे काही अडचणी आल्या की त्यांच्या जातीचे पुढारी अडचणींच्या निराकरणासाठी दादांच्याकडे येत. दादांनी बिनतोड उपाय सुचवला अशा खुशीने परत जात. मंदिराचा नकाशा काढणं, तो पास करून घेणं, त्याचे सुशोभन करणं, ही सगळी उसाभरी काकांनी हौसेनं केली. राजसी मिस्त्रीसारख्या कलाकाराला स्वतःचा शब्द टाकून शिल्पासाठी बोलावलं. विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींचि निवड, निजामपूरकरबुवांच्या देखरेखीखाली मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा सगळं जातीने लक्ष घालून, सूचना देऊन दोघा भावांनी करवून घेतलं. नाभिक समाजाने ते मानलं. देशपांडे कुटुंबाने-काका-काकूंनी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली, खर्च दिला. आजीने मूर्तीचे अलंकार, कपडे केले. दादांनी या मंदिराची आदर्श घटना केली आणि सरकारकडून ती मंजूर करून घेतली. ही सगळी खटपट भावाभावांनी विनामूल्य निरपेक्षपणे केली. त्याचवेळी त्यांचे जुने टंकलेखक डाकोरनाथ वाघ, जे पुढे मंदिराचे विश्वस्त झाले, त्यांना आठवणीने बोलावून घेतले. घटना टंकलिखित करायला सांगितले. वर स्पष्ट बजावले, "याचे पैसे मी देणार नाही. हे काम तुमच्या ज्ञातीचे आहे, देवाचे आहे". प्रपंच सांभाळून थोडंफार समाजोपयोगी काम करण्याचा धडा दादांनी या प्रसंगाने दिला त्यामुळे हे काम करण्याचे भाग्य मला लाभले, डाकोरनाथ काम तर करतातच शिवाय कृतज्ञता व्यक्त करतात. या समाजाने सेना न्हावी वस्तीगृह मंदिराला लागून बांधून परगावच्या विद्यार्थ्यांचि रहाण्याची सोय केली आहे. सुधारणेचे एक पाऊल पुढे टाकले आहे.

उपनगर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, त्याचप्रमाणे स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणून दादांनी बरीच कामं केलीं.

३० जानेवारी १९४८ ला गांधींना गोळया घालून मारले. गांधी वधानंतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर दंगल पेटली. कारण खून गोडसेने, एका ब्राह्मणाने केला होता. अनेक निरपराध ब्राह्मणांची घरं पेटवली गेली. तर कित्येकांना त्या आगीत भिरकावलं गेलं. आरळयालाही जळीताची झळ पोचल्याशिवाय कशी राहील? गावातील ब्राह्मणांची घरं पेटवून हाती मशाल घेतलेला संतप्त जमाव आरडा-ओरडा करीत आरळयाच घर जाळायला आमच्या घरावर चालून आला. जयरामअण्णा त्यावेळीं त्या घरी केन्द्र संचालक म्हणून रहात होते. केन्द्राच्या अनेक वस्तु, अवजारं घरात होती. आरडा-ओरडा घराला

भिडल्याचे ऐकताच ते बाहेर आले. जमावाचा हेतु लक्षात आल्यावर धीराने जमावाला सामोरे गेले. अण्णांनी ठणकावून सांगितलं, "हे घर काही देशपांडयांची वैयक्तिक खाजगी मालमत्ता नाही. तुम्ही सर्व या घराचा येथील केन्द्राचा लाभ घेता. तुम्हाला त्यातूनही घर जाळायचं असेल तर तो त्रास तुम्ही घेऊ नका. पलिता माझ्या हाती द्या. माझ्या हाताने मी आग लावतो." या परखडपणाचा जमावावर परिणाम झाला. जमाव मुकाटयाने निघून गेला. घराला लागून असलेले पंडितांचे घर आपोआप बचावले. ज्यांची घरं जळाली ती कुटुंबं या वाचलेल्या घरांच्या आश्रयाला आली. ३५ सालापासून पेरेलेल्या सुविचाराचे, गावासाठी खाल्लेल्या खस्तांचे असे दृष्यफळ दिसले. पेरलेले अगदीच खडकावर पेरले गेले नाही, थोडीफार भुसभुशीत जमीन गवसली. जयरामअण्णांना हे सर्व घरांबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेने, केन्द्राच्या ओढीने, अंतःस्फूर्तीने सुचलं. विध्वंसक जमावाला त्या घराबद्दल मनाच्या कोपऱ्यांत कुठेतरी वाटणाऱ्या आपुलकीचा जय झाला. या अनाकलनीय घटनेने दादा व्यथित झाले. ते गांधीजींना युगपुरुष मानीत. त्यांचा मनःक्षोभ शांत व्हावा या हेतूने अुस्मानचाचांनी "अहिंसाके सीनेमे हिंसाने गोली चलाअी" ही स्वरचित कविता ऐकवली.

गांधीजींच्या खुनामुळे अुठलेली वावटळ शमली. सत्याची बाजू घेणाऱ्या बाळासाहेब खेरांसारख्यांना सुध्दा "बामणाला बामण मिळाला" हा अहेर मिळाला. त्यानंतर अंबरनाथला महाराष्ट्र पातळीवरील विधायक कार्यकर्त्यांचे संमेलन भरले. अुद्घाटनासाठी राजेन्द्र बाबू आले होते. परिषदेस साने गुरुजी, अेस्. अेम्. जोशी वगैरे अुपस्थित होते. तेथे महाराष्ट्र सेवा संघाची स्थापना होअून दादा त्याचे सचिव झाले. परिषद भरवण्यांत दादांचा पुढाकार होता. आभार प्रदर्शनात शंकरराव देवांनी याचा प्रामुख्याने गौरवाने अुल्लेख केला. १९६० मध्ये दादा महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष झाले. या संघाची घटना दादांनी तयार केली. कायद्याच्या ज्ञानाचा अुपयोग झाला. ४८ साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र सेवा संघाची पाळंमुळं खोल रुजावी, मुंबईत संघाचे कार्य भरघोसपणे चालावे या अुद्देशाने सांताक्रूझला धोबीघाट स्थलांतरित झाला, त्यावेळी अल्प किमतीत मिळवलेल्या जमिनीपैकी काही भाग महाराष्ट्र सेवा संघासाठी दादांनी दूरदृष्टीने घेऊन ठेवला होता. त्याचा लाभ आता घसघशीतपणे संघाला मिळाला आहे. धोबीघाटाचे एक जुनेजाणते कार्यकर्ते रामावतार दादांच्याबरोबर नेहमी कामानिमित्त भेटीगाठींसाठी संबंधित कचेरीत पदाधिकाऱ्यांना भटायला जात. अशावेळी कितीही आग्रह केला तरी दादा वाहन करीत नसत. क्वचित् प्रसंगी गरजेलाच ते वाहन करीत. सार्वजनिक पैसा वैयक्तिक सुखासाठी, चैनीसाठी वापरू नये हे स्वतःच्या वागण्याने कार्यकर्त्यांवर बिंबवत. त्यांच्या साध्या, पुढे पुढे गबाळपणाकडे झुकणाऱ्या कपडयांकडे बघून तेथील कर्मचारी, कनिष्ठ त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत. पण या कर्मचाऱ्यांचे अधिकारी आले, त्यांचे दादांशी आदराचे वागण पाहिले की हीच मंडळी खजील होत. आपला मुद्दा पटवून देताना दादा कधी संतापत नसत, की, स्वतःचा मुद्दा सोडीत नसत. अशावेळी त्यांच्या स्वरांत आर्जवीपणा असे

चेहऱ्यावर हमदर्दी असे. रामावतार सांगतात, "आम्ही उत्तर हिंदुस्तानी, आमचा त्यांचा काय संबंध ? त्यांनी आमची व्यवस्था लावून देण्यासाठी, कपड्यांसाठी घाट बांधण्यासाठी, नळाचे, विजेचे कनेक्शन मिळावे म्हणून कुठली खटपट करायचे दादांनी बाकी ठेवले नाही. सहकारी सोसायटी स्थापन करून सोसायटीचे फायदे काय मिळतात ते आम्हा अनपढ गरिबांच्या गळी उतरवले". शेवटी मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा आमचा कैवारी हितकर्ता आता कोण या विचाराने मला गलबलून आले. दादांच्या ते लक्षात आले. त्यांनी, माझा हात त्यांच्या मोठ्या मुलाच्या बापूच्या हाती दिला. "आता तुमची गाऱ्हाणी तुम्ही याच्याकडे सांगा. तो तुमचा पाठीराखा होईल" असं सांगून सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

## कार्यकर्त्यांची जडणघडण

विधायक कार्याचा वृक्ष जितका फोफावेल, जितक्या त्याला नव्या फांद्या फुटतील तितका समाज प्रगतीशिल बनतो. जुन्या जीर्णशीर्ण फांद्या गळून पडतात. उदाहरणार्थ हातसडीची केन्द्र, तेलघाणी, कमी जास्त प्रमाणात कताई केंन्द्र. एकविसाव्या शतकात कॉम्प्युटरच्या युगांत तर आणखीही गृहोद्योगाची छोटी छोटी केन्द्र नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. समाजाच्या गरजा बदलतात. जुन्या अडचणींचे निराकारण होते, नव्या समस्या निर्माण होतात. एकविसाव्या शतकात मानसिक ताण वाढल्याने कोवळी पिढी व्यसनांचा तकलादू आसरा घेऊन शारीरिक, मानसिक व्यथा व्यसनात बुडवण्याचा फोल प्रयत्न करते. समाजाच्या या अधोगतीचे डोळसपणे निरीक्षण करणाऱ्या समाजधुरीणांनी नशाबंदी मंडळाची १९५८ मध्ये स्थापना केली. विधायक कार्याच्या वृक्षाला एक नवा धुमारा फुटला. प्रत्यक्ष काम मुंबईत सुरू झाले १९६० साली. मुंबईसाठी प्रमुख संघटकाची जागा निर्माण करून त्या पदाची जबाबदारी दादांच्यावर सोपवली. व्यसनमुक्तीचे अवघड कार्य तेही नखरेल, बहुढंगी, बहुरंगी, बहुविध पक्षाचे माहेरघर असलेल्या मुंबईत करणे म्हणजे कसरत होती. त्यावेळी २५ वर्षांपूर्वी मुंबईची लोकसंख्या होती ५० लाख तर संघटक होते फक्त २०. नुसते तुलनात्मक आकडे नजरेसमोर आले तरी भल्याभल्याचे हातपाय गारठून गेले असते. दादांनी संघटकांच्या मदतीने बुबासाहेब गोसावी, गो. बा. महाशब्दे यांच्या सहकार्याने ही अवघड कामगिरी पार पाडण्याचे अटीतटीचे प्रयत्न केले. धर्माचे, परमेश्वराचे अधिष्ठान प्रत्येक जनहिताच्या कार्यामागे असावे. स्वीकृत कार्यावर श्रध्दा ठेवून पाऊल पुढे टाकले तर यशाने हुरळून जाण्याची त्याचप्रमाणे अपयशाने खचून जाण्याची वेळ येत नाही. हे संघटकांच्या मनावर दादा बिंबवत. व्यसनाधीनांना व्यसनमुक्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ते याच मंत्राचा उपयोग करायला सांगून, व्यसनाच्या विळख्यांत सापडलेल्यांना मानसिक आधार द्यायला सांगत. स्वतः काम करीत असताना ते संघटकांवर अनेक जबाबदारीची कामं सोपवत. कामं कशी झाली आहेत ते स्वतः

बारकाईने पाहत. चुकलं तर समजावून सांगत. कुशलतेनं संयोजन केलं तर उत्तेजन देत, शाबासकी देत. याचं दृष्य फळ म्हणजे संघटक म्हणून सुरवातीपासून काम करणारे का. दा. राऊत यांना त्यांनी निवृत होण्यापूर्वी प्रमुख संघटक पदाची सुत्रं सांभाळण्यायोग्य तरबेज केलं. का. दा. राऊत ही धुरा समर्थपणे सांभाळीत असल्याचे दादांनी "याचि देही याचि डोळा" पाहिले, निश्चिंत झाले. नशाबंदी मंडळाने अनेक योजना राबवल्या. दारू, गांजा, चरस, ब्राऊन शुगर, गर्द यांच्या आहारी गेलेल्यांना करमणुकीसाठी मन कुठे तरी गुंतावे म्हणून भजनी मंडळं स्थापन केली, नशाबंदी सप्ताह आयोजित केले, नशाबंदी मंडळाची दिंडी काढली, पदयात्रा करता करता देशाटन व्हावे, संघटक चतुरस्त्र व्हावेत, बहुश्रुत व्हावेत म्हणून. या दिंडीत त्यांनी स्त्री संघटकांना आग्रहाने सहभागी करून घेतलं. एक पंथ दो काज या न्यायाने संघटकांनी जवळ जवळ सारा भारत पालथा घातला. पायी जाता जाता व्यसनमुक्तीचा प्रचार झाला, स्वच्छतेचे धडे शिकवले गेले. या विषयावरील गांधीजी, विनोबा तसेच इतर संतांच्या लिखाणाचा, विचारप्रणालीचा ग्रंथांचा प्रचार झाला. नवी दिशा दाखवण्याचा प्रयत्न केल्याचे आंतरिक समाधान मिळाले. पण कांही वेळा काय होई, कामाच्या अतिरिक्त ताणाच्या जोडीला संघटकांना कुणी वेडवाकडं बोलत, प्रामाणिकपणाबद्दल आक्षेप घेत, संशय व्यक्त करीत. मग हे संघटक क्वचित रागावत, संतापत. त्यावेळी दादा त्यांच्या संतापाची वाफ दबेपर्यन्त एकही शब्द उच्चारत नसत. मग सुचवत की, 'जे कांही शब्द मनाला लागण्यासारखे वाटत असतील ते माझ्याकडे द्या,' माझे खिसे मोठे आहेत. कुणी कांही लागेल असं बोललं तर संतापून शब्दाला प्रतिशब्द करण्याने आपली शक्ती क्षीण होते, कार्याची हानी होते. ज्ञानेश्वर माऊलीने काय म्हटलं आहे. 'कुणी वन्हि होऊन आपल्याला जाळायला आलं तर आपण पाणी होऊन त्याला शान्त करावं.' कार्यकर्त्याने स्वतःच्या मनावर आधी बिंबवून घ्यावं की, 'तया सुखाची अैसी जाती । जे आपण धरी शान्ति ।। ' पदाधिकाऱ्याला, कार्यकर्त्यांना त्याचप्रमाणे आपल्याला ज्येष्ठ असलेल्यांना न दुखवता मधला मार्ग संघटकांनं काढायचा असतो. कैक वेळा न पटलेलं काम करावे लागते तेव्हा शान्तपणा हवा. हे आपलं वैयक्तिक काम नाही. कार्यकर्त्याने, मग तो कुठल्याही श्रेणीचा असो, स्वतःची जबाबदारी ओळखून वागले पाहिजे, कार्यावर निष्ठा ठेवली पाहिजे, ही साधना, तपश्चर्या स्वतःच्या बळावर उभी केली पाहिजे. इतकं सगळं दादांनी शान्तपणे समजाऊन सांगितल्यावर कितीही वैतागलेला संघटक शान्त होई. दादा पाणी होऊन संतापाचा वन्हि विझवून टाकीत.

सगळ्यांनाच काही भजन, कीर्तनाची आवड नसते. हे ओळखून दादांनी कुस्त्यांच्या फडाचे आयोजन नशाबंदी मंडळातर्फे केले. या कुस्त्या दर नारळी पौर्णिमेला जुहूच्या वाळवंटात महाराष्ट्र पातळीवर होत. पत्रकं, जाहिराती काहीही नसता महाराष्ट्रातून आमंत्रणाची अपेक्षा न बाळगता पहेलवान येत, कुस्त्या होत. विजयी पहेलवानाला खादीचे कपडे, चादरी अशी दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या वस्तू बक्षीस-

रूपाने मिळत. हार तुरे अशा वस्तूमध्ये अनाठाई खर्च करण्यापेक्षा गरजेच्या वस्तू बक्षीस म्हणून देण्याचा दादांचा आग्रह असे. नशाबंदी मंडळाच्या कार्यक्रमात हारतुऱ्यांना फाटा मिळे. तेवढ्याच पैशात टॉवेल्स, हातरुमाल देण्याची प्रथा दादांनी पाडली होती. या कुस्तीच्या होणाऱ्या फडात बाबूराव रेवदंडकरांचा सहभाग होता. तरुण मित्र मंडळ ही जुहूची संस्था. या कुस्त्याचे फड सुसूत्रपणे पार पाडण्यात मदत करी. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनासाठी दादा सचिवालयातून मान्यवर मंत्री, नेते आणीत. भानुशंकर याज्ञिक दारूबंदी मंत्री असताना उद्‌घाटनासाठी दादांच्या शब्दाखातर आले होते. सयाजीराव सिलम उद्‌घाटनासाठी कौतुकाने आले यात काय विशेष? कारण दादांना बोलावून त्यांनी आग्रहाने प्रमुख संघटक पद स्वीकारण्याची गळ घातली होती. प्रमुख संघटक कार्यकारिणीवर नसतो. पण दादांना त्यांनी कार्यकारिणीवर घेऊन त्यांचा विशेष बहुमान केला. याचा लाभ संघटकांना झाला. संघटकांच्यावतीने त्यांची न्याय्य बाजू मांडून, पटवून त्यांच्या हिताचे अनेक ठराव कार्यकारिणीकडून दादांनी करवून घेतले. त्यामुळे नशाबंदी मंडळाच्या कार्यक्रमाप्रमाणे हे कार्यकर्ते सर्वोदय संमेलनासाठी सवलतीचा लाभ घेऊ शकत. आसपासच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत. असेच एकदा सयाजीराव सिल्म पाँण्डेचरीचे गव्हर्नर असताना संघटकांना घेऊन दादा पॉण्डेचरीला गेले. माताजींचे दर्शन झाले. त्यांनी संदेश दिला, "केवळ सत्यच जगात दिव्य प्रेम करण्याचे सामर्थ्य देऊ शकेल". माताजी (पॉण्डेचरी), तो दिवस होता १५-४-१९६४. गव्हर्नर सयाजीराव सिल्म यांची भेट घेतल्यावर त्यांनी सर्व संघटकांना गव्हर्नरच्या पाहुण्यांच्या इतमामाने वागवले. गव्हर्नरतर्फे शाही खाना दिला. संघटकांना दादांची बाहेर किती इज्जत होती ते परत कळून आले. सयाजीराव सिल्म काय किंवा मिनु मसानी काय, सर्व मंडळी स्वातंत्र्यपूर्व काळात खांद्याला खांदा लावून काम करीत. त्यांच्यात हा हिंदू, हा मुसलमान, हा शीख, हा पारसी हा जातीभेद, धमभेद नव्हता. सर्व प्रथम ते भारतीय होते. प्रांतावार भाषा रचना, त्यासाठी भारताचे लचके तोडणे ही विटंबना स्वातंत्र्योतर काळातील. आंतरभारती हे साने गुरुजींचे स्वप्न शेवटी दुर्दैवाने स्वप्नच ठरलं. त्यामुळे १९६५ मध्ये जेव्हा पुण्याला हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला तेव्हा दादा, नंदूभाई, बाबाजी मोघे, बदरीभाई हे पुण्याला गेले. दंगलग्रस्त भागात फिरून त्यांनी शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. या संदर्भात ते एस. एम. जोशींना भेटले. पुढे लवकरच पाकिस्तानचे युद्ध सुरू झाल्याने ही दंगल शमली. अशीच दंगल याच वर्षी मालेगावला उसळली. पुण्याला हल्या नावाच्या मुसलमान हमालाने भर दिवसा गणपतीसमोर लघवी केल्याचे निमित्त झाले. हिंदूच्या भावना दुखावल्या गेल्या. मालेगावला कारण मिळवण्यासाठी निमित्ताला टेकलेल्या जमातीपुढे शांतताप्रिय समाजाचे काही चाललं नाही. मालेगाव दंगलीत पेटलं. बदरीभाई, दादा तेथे गेले. मुस्लीम नेत्यांना भेटले. पुणतांबेकर वकील, जे हिंदूचे नेतृत्व करीत त्यांना भेटून दंगल मिटवण्याचे प्रयत्न केले.

नेहमी आरोपी व फिर्यादी या दोन्ही पक्षांमध्ये तडजोडीने झगडा मिटवण्याचा प्रयत्न वकील या नात्याने करणाऱ्या दादांना एकदा साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभं रहावं लागलं. दावा होता पारल्याला घेतलेल्या जागेसंबंधी. वकील होते पार्ल्याचे एल. व्ही. देशपांडे. दिवाणी दाव्याप्रमाणे हा दावाही वर्षानुवर्षे चालला. १९६० साल उजाडलं. दादांनी देशपांडे वकीलांना सूचवलं की, त्यांनी लिहिल्याप्रमाणे फक्त प्रश्न विचारावेत. बाकीचे सर्व मी साक्षीदार म्हणून उत्तर देताना पाहून घेईन. साक्ष देताना दादांनी जमिनीच्या व्यवहाराच्या आपल्या अनुभवाच्या पुष्टयर्थ वर्षानुवर्षे करीत असलेल्या ट्रस्टच्या कामाचे नावानिशी दाखले दिले. जमिनीची योग्य किंमत लावल्याचे जज्जसाहेबांना पटले. दावा जिंकला गेला. वकील व साक्षीदार यांनी पुरकपणे काम करून प्रतिपक्षाच्या वकीलाला शिरकायला फट ठेवली नाही.

१९४२ पासून वादी, प्रतिवादी, आरोपी, फिर्यादी, त्यांचे वकील या वर्तुळातून दादा वकील या भूमिकेपासून जाणीवपूर्वक दूर राहिले. वरील उदाहरण अपवादात्मक घडले. पण समाजाभिमुख अनेक संस्थांचे ते कायद्याचे सल्लागार म्हणून विनामूल्य काम करीत. वयाची ७५ वर्षे उलटल्यावरही प्रसंगी वकील म्हणून कोर्टात उभे रहात. म्हणून तर आदिवासी त्यांना "आमचे म्हातारे वकीलबाबा" म्हणून प्रेमाने संबोधीत "आ तो आपणच माणस छे". पा.

स्वराज्य मिळाल्यावर १९५२ साली लोकसभेच्या व विधानसभेच्या पहिल्या निवडणुका झाल्या. विधानसभेचे काँग्रेसचे तिकीट दादांना व द. ना. वांद्रेकरांना मिळाले. दादा वांद्र्याला राहणारे तर द. ना. वांद्रेकर हे खारला राहणारे. खार, वांद्र्यांचा मतदार संघ प्रचाराच्या, फिरण्याच्या दृष्टीने दोघांना सोईचा होता. वांद्रेकरांना खार, वांद्र्याचा मतदार संघ मिळाला तर बरं असं वाटत होतं. दादा १९५२ मध्ये जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांचे काम बोरिवली व आसपासच्या परिसरांत चाले. वांद्रेकरांना वाटे दादांनी बोरिवली मतदार संघ निवडणुकीसाठी निवडला तरी ते तेथे काम करीत असल्याने त्यानां निवडणूक लढवणं जड जाणार नाही. शेवटी दादांनी बोरिवली मतदार संघासाठी तिकीट स्वीकारले. हा मतदार संघ, गोरेगाव, मालाडपासून कांदिवली, बोरिवली, उत्तन, गोराईसकटच्या आसपासच्या परिसराचा बनलेला होता. विभाग बराच मोठा, शिवाय राहण्याच्या जागेपासून दूर होता. समाजवादी पक्षातर्फे प्रिन्सिपॉल वेलिंगकर उभे होते. काही गुजराथी मंडळींनी आम्हाला निवडणुकीसाठी गुजराथी उमेदवार हवा म्हणून श्री. राजडा यांना भरीला घातले. ते स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहिले. वैकुंठलाल मेहता, बाळासाहेब खेर यांनी राजडा यांना उमेदवारी मागे घेण्यासाठी समजावण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. पुढे कांही वर्षे गेली. राजडांनी कबूल केलं की मी या संधीसाधूंच्या आग्रहाला बळी पडायला नको होतं. गुजराथी मतदारांची बहुसंख्या हे त्यांना प्रमुख आकर्षण वाटलं असावं. इतरही बारीक सारीक प्रतिस्पर्धी होतेच. दादांच्यासाठी बोरीवलीचे

कोरा ग्रामोद्योग केंद्र, मालाडचे आदर्श दुग्धालय, गोरेगावच्या तरुणांनी स्थापन केलेले युवक मंडळ यांनी मदतीचा मजबूत हात पुढे केला. स्कूल बोर्डाचे चेअरमन असताना या परिसरात स्थापन केलेल्या शाळांमुळे चर्चमधील धर्मगुरूंना दादा चांगले परिचित होते. त्यांनी एक पत्रक काढून दादांना त्यांचा ठोस पाठिंबा जाहीर केला. त्याचप्रमाणे उत्तन, गोराई वगैरे छोटया छोटया गावातून कोळी बायका मदतीसाठी अखंड दादांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. गोरेगाव, दहिसर सारख्या मोठमोठ्या ट्रस्टची काम दादा वकील या नात्याने पाहत. अनेक वर्षांचे घरगुती संबंध स्मरून त्यांनी निवडणुकीसाठी युवक मंडळ स्थापन केले. दादांना पाठिंबा जाहीर केला. हे मंडळ पक्षातीत होतं त्यामुळे काय झालं. एकसंघ, तरुण, उत्साही कार्यकर्त्यांचा गट पडेल ते काम करण्यासाठी तयार झाला. बोरिवलीचे लक्ष्मणराव व शांतीबाई म्हात्रे यांचे घर, मालाडचे आदर्श दुग्धालय म्हणजे निवडणुकीच्या काळात दादांचे दुसरे घर झाले. म्हात्रे सरकार तर जणू आपणच निवडणूक लढवीत आहोत अशा हिरीरीने कामाला लागले. दादांना या मोठ्या मतदार संघात फार फिरावं लागे. अनेक वेळा रात्रीचा मुक्काम बोरिवलीला म्हात्रे यांचेकडे असे. काही गुजराथी मंडळींनी राजडा यांच्या प्रचारासाठी पत्रक काढले. देशपांडेजी महाराष्ट्रीयन आहेत, आपला स्वतंत्र गुजराथी उमेदवार राजडा यांना मत देऊन निवडून आणावे. त्यावेळी अनेक गुजराथी काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रति-पत्रक काढून "देशपांडेजी अपनाच माणस छे" हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. माधवराव देशपांडे यांचा डाकोरला, गुजराथेत झालेला जन्म, गुजराथी भाषेतील शिक्षण, उत्कृष्ट गुजराथी बोलणे, त्यांचें मतदार संघातील कार्य याचा या पत्रकात आवर्जून उल्लेख केला. माधवरावांना निवडून आणण म्हणजे काँग्रेस, निवडून आणण आहे हे मतदारांच्या नजरेला आणून दिल. म्हात्रेंनी समजावून सांगितल, "हा मराठी, हा गुजराथी ह्या भाषिकवादाचे खूळ निष्कारण मतदारांच्या डोक्यात भरवू नका. काँग्रेस हा आपल्या सर्वांचा पक्ष आहे हा विचार मनी धरा." त्यांनी स्वतःच्या कुटुंबाचे उदाहरण दिले. म्हणाले, "मी स्वतः तुरुगात होतो त्यावेळी गुजराथी बंधूनी माझ्या कुटुंबाची देखभाल केली. अडीअडचणीला धावून आले. त्यांत अनपढ भाजीवाल्यांचाही समावेश आहे."

प्रचाराच्या अनेक माध्यमांपैकी एक म्हणजे मशालीची मिरवणूक. गोरेगावला ही मशालीची मिरवणूक काढायचे ठरले. मशालीच्या जोडीला काँग्रेसची निशाणी असलेल्या बैलांनाही सामील करण्याची कल्पना निघाली. ह्या काँग्रेसच्या मशाल मिरवणुकीची भलतीच फजिती झाली. मशाली तारेने काठीला नीट न बांधता दोऱ्याने बांधल्या होत्या. मिरवणूक निघून थोडा वेळ झाला आणि पेटलेल्या मशाली, काठीला बांधलेल्या दोऱ्यासकट भुरू-भुरू जळून गेल्या. हातात राहिल्या फक्त बिनउजेडाच्या काठ्या. आदर्श दुग्धालयांतील बैलजोड्यांनी त्या दिवशी मिरवणुकीची थोडी फार लाज राखली. उलट प्रिन्सिपॉल वेलिंगकरांसाठी काढलेल्या मशालीच्या मिरवणुकीं-तील मशाली व्यवस्थित तयार केल्या होत्या. तारेने नेटक्या बांधल्या होत्या. मधून

मधून त्यावर तेलाचा शिडकावा होत होता. मशाली घेतलेले कार्यकर्ते मशाल विशिष्ट पद्धतीने हातात घेऊन शिस्तीने चालले होते. ही मशाल मिरवणूक आखीव रेखीव होती. या निवडणुकीत घंगर इलेक्ट्रिक कंपनीने त्यांची गाडी विद्युत रोषणाई करून काँग्रेसच्या प्रचारासाठी या विभागातून फिरवली. पुढे निवडणुकीच्या खर्चाचा प्रश्न आला त्यावेळी कंपनीने सांगितले की, आम्ही आमच्या कंपनीची जाहिरात केली. "घंगर इलेक्ट्रिक कंपनी" ही पाटी रोषणाई केलेली गाडीवर लावलेली होती. दादांच्या निवडणुकीच्या खर्चाचा प्रश्न नव्हता. कमीत कमी खर्च करून दादा निवडून आले होते. उमेदवारांनी त्यांना निवडून दिले होते.

बोरिवली मतदार केंद्राचा विभाग खूप मोठा असल्याने मतदान केन्द्रही बरीच होती. फक्त काँग्रेसचे व प्रजासोशॉलिस्ट पार्टीचे उमेदवारांचे प्रतिनिधी निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक केन्द्रावर हजर होते आणि ते निवडणूक संपेपर्यंत केन्द्रावर राहिले. बाकीच्या पक्षांना व स्वतंत्र उमेदवारांना सर्व केन्द्रावर स्वतःचे प्रतिनिधी पुरवणेही जड गेले. दादांचे वैयक्तिक पातळीवरील संबंध, काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधीत्व, त्यांची तपश्चर्या, वकिलीच्या व्यवसायामुळे दूरदूरच्या अशीलाशी आलेला संपर्क, तर प्रिन्सिपॉल वेलिंगकरांचे पक्ष कार्यकर्ते, कॉलेजमधील सहाध्यायी, विद्यार्थी, यामुळे दोघांना माणसांची वाण भासली नाही.

दादांच्या कुटुंबीयांचा मतदार संघ खार, वान्द्रे असल्याने त्यांनी दादांना मत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. त्यांनी आपला मतदानाचा हक्क बांद्रयाला बजावला. निवडणुकीच्या दिवशी म्हात्रे पतिपत्नी लवकर उठली. स्नान करून, शुचिर्भूत होऊन जोडीने मतदान केंद्रावर गेली. पहिला नंबर लावला. मतदान करून मतदानाचा शुभारंभ केला. कोळी समाजातील बायका, चर्चमधील धर्मगुरु, गुजराथी, मराठी सर्व जाती-धर्म विसरून काँग्रेसच्या झेंड्याखाली काम करीत होती. खरी लढत दादा व वेलिंगकर यांच्यात होती. गोरेगाव वेलिंगकरांचा बालेकिल्ला तर मालाड, बोरिवलीत दादांचा जोर होता. मतनोंदणी संपली. मतपत्रिकांच्या पेटया एका ठिकाणी आणून मत मोजणीला सुरुवात झाली. उमेदवाराबरोबर त्याला एका सहकाऱ्याला मतमोजणी चालू असताना आणण्याची मुभा होती. दादांच्याबरोबर यासाठी काका गेले होते. पेटया उघडल्या जात होत्या. मतमोजणी होत होती. जयाचा काटा कधी दादांच्याकडे तर कधी वेलिंगकरांच्याकडे झुकत होता. पुढे जशजशा पेटया उघडल्या जाऊ लागल्या तसा वेलिंगकरांचा विजय निश्चित आहे असं दादांना वाटू लागलं. पराजय अटळ आहे अशी समजूत करून घेऊन दादा मतमोजणी केन्द्र सोडून जाण्याची भाषा बोलू लागले. पण काकांनी निक्षून सांगितले. "तुला जायच तर तू जा. मी शेवटची पेटी उघडली जाऊन मतमोजणी पुरी होईपर्यंत येथून हलणार नाही." कुठल्या कुठल्या केन्द्रातल्या पेटया उघडायच्या आहेत, कुठल्या केन्द्रात दादांचा जोर होता, प्रत्येक पेटीत किती

मतपत्रिका असतात याचा हिशोब करून, जयाची शक्यता असल्याची खात्री गणिती काकांनी दादांना पटवून दिली. अंतिम मत मोजणी झाली, काकांचा अंदाज, त्यांची भविष्य-वाणी खरी ठरली. काकांच्या हाताला यश आहे. त्यांची बत्तिशी खरी ठरते हा दादांचा समज वज्रलेप झाला. दादा १,१०० मतांनी बोरिवली मतदार संघातून निवडून आले. आमदार झाले. काँग्रेसचा विजय झाला. "यत्र योगेश्वर: कृष्ण:" म्हणत डोक्यावर टोपी ठेवून पुढे होणारे काका, छगनभाई, रतनचंद सेमलानी, सदाशिवराव जोशी, युवक मंडळ सर्वांनी पुढाकार घेऊन दादांना मिरवणुकीने घरी आणले. दादांचा विजय म्हात्रे सरकारनी दणकेबाज सत्यनारायण करून साजरा केला.

## मा. का. देशपांडे की मा. कृ. देशपांडे ?

१९५२ सांली दादा विधानसभेचे सभासद असताना पुण्याला अधिवेशन असे. तेव्हा त्यांचा मुक्काम एकतर आळंदोला नाही तर सभापती कुंटे यांचेकडे असे. क्वचित ते टिळक रोडवर राहत. एकदा मजाच झाली. पोस्टमनने एका एम. के. देशपांडेचे पत्र दुसऱ्या एम. के. देशपांडे यांना नेऊन दिले. दोघेही एम. के. देशपांडेच. पण एक माधव काशीनाथ देशपांडे इंग्रजीचे प्रोफेसर तर दुसरे माधव कृष्ण देशपांडे विधानसभेचे आमदार. पत्र मिळाल्यामुळे मा. का. देशपांडे विधानसभेत जाऊन बसले. दादांना ओळखणाऱ्या आमदारांनी हे देशपांडे दुसरेच असल्याचे निदर्शनास आणून दिले. तेव्हा मा. का. नी. पत्र दाखविले. ते पत्र होते रेण्ट कंट्रोल बील कमिटीवरील नियुक्तीचे. अंतर्गत राजकारणी खेळीमुळे दुसऱ्या देशपांड्यांना पत्र मुद्दाम पाठविलेले होते. दादांनी त्या सन्मानासाठी पाठपुरावा केला नाही. पुढे कमिटीच्या एका सभासदाने राजीनामा दिल्याने दादांना ते पद स्वीकारण्याची परत विनंती केली. तेव्हा मला इतर रचनात्मक कार्यात जास्त रस आहे असे सांगून दादांनी सभासदत्व नाकारले. विनोबांचा बडोद्या-पासूनचा हा खास मित्रपरिवार बुद्धिमान, व्यासंगी असला तरी सत्ता, संपत्ती, कीर्ती या ऐहिका पाठीमागे पळत सुटणारा नव्हता. पुढे तर दादांनी आमदार पदाचा राजीनामा दिला.

एक मात्र खरं की, दादा आमदार असल्याने अनेक श्रेष्ठ, ध्येयवादी राष्ट्रीय पुढाऱ्यांना जवळून बघण्याची संधी मला मधून मधून मिळाली. क्वचित बाईच्या ऐवजी दादा मला घेऊन जात. राजेन्द्रबाबू, जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण अशा मान्यवर लोकाग्रणींना अगदी जवळून निरखण्याचे भाग्य मला लाभले. प्रासंगिक फोटो काढणं, आल्बम करून जपून ठेवणं आमच्या घरच्या तत्त्वात बसत नव्हतं. उलट फोटो काढण म्हणजे एक खूळ वाटे. आता मात्र त्याची हळहळ वाटते. जुन्या प्रसंगांना उजळा देऊन पुन:प्रत्ययाचा आनंद देण्याची किमया या जुन्या फोटोमध्ये खात्रीपूर्वक आहे. माझं लग्नं गांधीजींनी लावलं. त्याप्रसंगी अनेक फोटो काढता आले असते. सूचवूनही ती कल्पना हसण्यावारी नेली. आता खंत वाटून काय उपयोग आहे? आरे

कॉलनीच्या उद्‌घाटन प्रसंगी पंतप्रधान नेहरू वितीच्या अंतरावरून गेले. क्रुश्चेव, बुल्गानीन् हे रशियन पुढारी दोन खुर्च्यांच्या रांगामधून हात उंचावून स्वागताचा स्वीकार करीत, अभिवादन करीत जात होते. त्यावेळी नव्हता मेटल डिटेक्टर की नव्हती कडेकोट सुरक्षा व्यवस्था. लाडके नेते व सामान्य जनता यांत दुराव्याची भिंत नव्हती. मोकळं, आनंदी वातावरण, आदरणीय नेत्यांची जवळीक, ते आपले आहेत याची खात्री पटवी. माऊंटबॅटन, जवाहरलालजी यांना दिल्या जाणाऱ्या मेजवानीच्या प्रसंगी बाई अधूनमधून जाई. आमदार असताना दादा बंद गळ्याचा लांब कोट, धोतर, टोपी असा पोशाख करीत. पॅण्ट, टायला आता रजा दिली होती. याच काळात दादा, त्यांचे श्वसूर राघवेन्द्रराव शूरपाल व बाई त्रिस्थळी यात्रा पुरी करण्यासाठी उत्तरेला गेले होते. दक्षिणेतील रामेश्वराचा सेतु म्हणजेच वाळू उत्तरेकडील अलाहाबादच्या त्रिवेणी संगमात टाकून यात्रा पुरी केली. तिघ परतीच्या मार्गाला लागली. विनोबांचा मुक्काम त्यावेळी पाटण्याला आमदार निवासात होता. प्रवासात अचानक दामोदरदासजी मुंदडा दादांना भेटले. एकमेकांचे कुशल विचारल्यावर दामोदरदासजी दादांना म्हणाले, "विनोबाजी इतक्या जवळ मुक्काम करून असतांना तुम्ही त्यांना भेटल्याशिवाय जाणार काय ? "दादांच्या मनातील गोष्टच जणू दामोदरदासजी बोलले. पाटणा आल्या आल्या समानासकट दादा, आजोबा, बाई सगळी खाली उतरले म्हणा, की दादांनी त्यांना उतरायला लावलं. दामोदरदासजी समवेत विनोबाजींना भेटली. भेटीत दादांनी रुपये दोन हजार विनोबांना दिले. दोघांच्यात चर्चा झाली. भूदान चळवळीत सहभागी होण्याचे दादांनी कबूल करून स्वतःची वेंदची म्हणजेच सध्याच्या गांधी सेवा ग्रामची जमीन देण्याचे आश्वासन विनोबांना दिले. परतीचा प्रवास सुरू झाला. या पुढील प्रवासात बाई विनोदाने दादांना म्हणाली सुद्धा, "विश्वामित्र ऋषींना दक्षिणा दिलीत, प्रवासाची सांगता झाली."

## भूदान व दादांचे कार्य

या पाटण्याच्या भेटीनंतर १९५५ साली दादांनी मुंबईला भूदान यज्ञ समितीची स्थापना केली. केदारनाथजी अध्यक्ष तर भूतपूर्व मेयर गणपती शंकर देसाई व दादा संयुक्त कार्यवाह झाले. कोषाध्यक्ष होते काकूभाई. काकूभाईंची कचेरी बोरीबंदरला बचुअल्ली इमारतीत होती. तेथेच भूदान यज्ञ समितीची कचेरी ५२ ते ५५ पर्यंत होती. समितीचे काम तेथून चाले. प्रचार सभा आयोजित करणे, पदयात्रेचा कार्यक्रम ठरवणे व तो सुसूत्रपणे अंमलात आणणे हा त्यापैकी काही भाग होता. मुंबईबाहेरून येणाऱ्या कार्यकर्त्यांची राहण्या-जेवण्याची सोय करणे, हवं नको पाहणे हे भूदान यज्ञ समितीचे कार्यवाह उर्फ यजमान या नात्याने दादा आपुलकीने, वडिलधाऱ्याप्रमाणे चोखपणे पाहत. घरदार सोडून, ध्येयाने प्रेरित होऊन या चळवळीत उडी घेणाऱ्या मुलांबद्दल दादांना विशेष प्रेम वाटे. त्यांना

घरगुती वातावरण मिळावे यासाठी ते दक्ष रहात. कुटुंबातील कर्त्या पुरुषाची भूमिका बजावीत. या भूदान यज्ञ समितीने जिना हॉलमध्ये जयप्रकाशजींची सभा आयोजित केली होती. मोरारजीभाई देसाई अध्यक्ष होते. पुढे १९५३ साली भूदानाबरोबर जीवनदान, संपत्तीदानाची हाक विनोबांनी दिली तेव्हा जयप्रकाशजींना घऊन दादा मुंबईत फिरले. लाखो रुपये त्यांना गोळा करून मिळवून दिले. ज्यांना जमीन दान करणं शक्य नसेल त्यांनी कार्यासाठी वेळ द्यावा, ज्यांना वेळ देता येत नसेल त्यांनी संपत्ती द्यावी असा पर्याय काढला होता. निदान सहावा भाग जमीन, संपत्ती, वेळेचा भाग अपेक्षित होता. दादा भूदान यज्ञ समितीच्या कार्यालयात नियमितपणे दुपारी जायचे. पत्रव्यवहार करून त्यांनी जयप्रकाशजी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, रा. कृ. पाटील, विमलाताई ठकार, नारायणभाई देसाई यांच्या सभा मुंबईत आयोजित करून जनजागरणाच्या हेतुला चालना दिली. भूदान चळवळीसाठी आयोजित केलेल्या पदयात्रांपैकी शिराळा पेट्यातील पदयात्रेसांठी शंकरराव देव आले होते. पदयात्रेची पूर्वतयारी करण्यासाठी कार्यकर्ते पदयात्रेच्या मार्गाची आखणी करीत. त्या मार्गावरील गावी डेरेदाखल होऊन जनजागरणाच्या माध्यमातून गावकऱ्यांची मनं वळवून भूदानांत जमीन देण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीत, मुक्कामाची व्यवस्था करीत. तयारी झाल्यावर पदयात्रेत सामील झालेल्या लोकप्रिय नेत्याच्या हस्ते पदयात्रेचे संयोजक दानपत्राच्या वितरणाचा समारंभ घडवून आणीत. या वातावरणाने भारून जाऊन काही वेळा समारंभ चालू असताना काही भूधारक स्वतःच्या मालकीची जमीन दान केल्याची घोषणा करीत. भूदान चळवळीत जमीन मिळवून ती भूमिहीनांना देणं हा पूर्वभाग झाला. पण त्या जमिनीची मशागत करणं व त्यासाठी सहाय्य करणं हा महत्त्वाचा भाग काही वेळा दुर्लक्षित राहिल्याने जमिनी पडीक रहात. जमिनी दान केल्याने जमिनीचे आधीचे मालक त्यात लक्ष घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. ज्या कुळांना, भूमिहीनांना जमिनी मिळत, त्यांची परिस्थिती जमिनीची मशागत, बी-बियाणं, नांगरट यासाठी लागणाऱ्या खर्चाला अनुकूल नसे. कैकवेळा अशिक्षितपणाच्या जोडीला आळस असल्याने जमीन तशीच पडून राही. अशावेळी दानात मिळालेल्या जमिनीचा जास्तीत जास्त सदुपयोग व्हावा म्हणून दादा या दुसऱ्या भागांचा पाठपुरावा करीत. प्रत्यक्ष शेती करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न करीत.

मुंबईच्या भूदान समितीचे अध्यक्ष श्री. केदारनाथजी यांचे एक "व्यवहार शुद्धि मंडळ" होते. १९५२ पूर्वी हे मंडळ व्यापार, उद्योग करणाऱ्या व्यापारी, उद्योगपती यांना जाऊन भेटे. प्रामाणिकपणे धंदा करावा असे विनवीत. खोटी वजने, मापे वापरणे, खोटे वजन करून माल देणे, भेसळीचा माल विकणे यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत. भारत सरकारला फसवू नये, कर भरावा, संपत्तीची खरी नोंद करावी असं त्यांच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीला आवाहन करीत. या मंडळाचे

कार्यालयही बोरीबंदरला बचूअल्लीच्या इमारतीत असलेल्या काकूभाईच्या कचेरीत होते. या मंडळाचे काम दादा करीत. पुढे भूदान यज्ञ समितीची स्थापना झाली, समितीचे काम सुरू झाले. दोन्ही कामं एकमेकांना पूरक असल्याने "व्यवहार शुद्धि मंडळ" भूदान यज्ञ समितीत विलीन झाले.

या भूदान चळवळीच्या घरीदारी वेढलेल्या वातावरणाने माझा दोन नंबरचा भाऊ श्रीरंग या चळवळीकडे ओढला गेला. त्याला विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमात गोडी वाटेना. १९५४ मध्ये तो बी. कॉमच्या शेवटच्या वर्षाला होता. परीक्षेला ४ महिने राहिले आणि त्याने घरी जाहीर करून टाकले की, तो परीक्षेला बसणार नाही. भूदान चळवळीचा पूर्णवेळ कार्यकर्ता होणार. आमच्या घरी सामाजिक बांधिलकी, सामाजिक कार्याची जाणीव ही लहानपणापासून होती. घरचे वातावरण आपल्या मर्यादित कुटुंबाचा, सुखदुःखाचा, हिताचा विचार करण्यापुरते संकुचित विचाराचे निश्चित नव्हते. त्यांच्या भूदानाच्या कार्याला कुणाचा विरोध नव्हता. विरोध होता तो शिक्षण अर्धवट सोडण्याला. रंगाने चार्टर्ड अकाऊंटन्ट होऊन चळवळीत भाग घ्यावा असे आम्हाला वाटे. तोंडावर आलेल्या परीक्षेला आधी त्याने बसावं असं वाटलं तर त्यात गैर नव्हतं. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न केले. मी आणि बाई श्रीराम चिचलीकरकडे गेलो. फक्त ४ महिन्यांनी त्याने त्याच्या आवडीचे काम करावे हे श्रीरामने पटवण्याचा प्रयत्न करावा, असे सुचवण्यासाठी. घरच्या सांगण्यापेक्षा मित्राच्या उपदेशाचा उपयोग होईल, परिणाम होईल या हेतूने. रंगाच्या संबंधित सर्व हकीकत विनोबांच्या कानावर गेली. त्यांनी सांगितले, "माधवरावांची भूमिका चुकीची नाही, मी जर रंगाचा पिता असतो तर मीही असाच वागलो असतो." त्यांना जरी पुस्तकी शिक्षणाचे महत्त्व वाटत नसले तरी त्यांनी दादांच्या दृष्टिकोनातून न्याय्य विचार केला होता. आमच्या बुद्धीला वाटे, शिक्षण पुरे झाले तर चळवळीला त्याचा उपयोग जास्त होईल. त्याने घरची जबाबदारी उचलावी, घरासाठी दोन पैसे मिळवून आणावे असं कुणी अपेक्षित केलं नव्हतं. पण प्रयत्न फोल ठरले. रंगा मुंबईचा पूर्णवेळ कार्यकर्ता झाला. धोबी तलावला स. का. पाटील यांच्या अध्यक्षते-खाली झालेल्या शिबिरात रंगा दादांच्याबरोबर गेला. पूर्णवेळ कार्यकर्ता झाल्याच्या निवेदनावर शिक्कामोर्तब झाले. या घडामोडीने घरातील तणाव वाढत गेला. वैतागून बाई एक दिवस, "तुला भूदानाच्या कामाला जायचे तर जा, पण हातातील घड्याळ काढून ठेव" असं म्हणाली. रंगाने घड्याळ काढून ठेवलं आणि अनवाणी पायानी घराबाहेर चालू लागला. चपला फाटल्या होत्या, नव्या घ्यायच्या होत्या, बाईच्या ते लक्षात आलं नाही. रंगा पूर्णवेळ कार्यकर्ता झाला पण त्याच्या मूलभूत गरजा भागाव्यात, किरकोळ खर्च भागावा म्हणून त्याला काही मिळत नसे. दादा समितीचे कार्यवाह होते पण त्यांनी रंगाच्या मानधनाबद्दल तोंडातून अवाक्षर काढलं नाही. विनोबांनी "मातृहस्ते भोजन" चा मंत्र दिल्याने तो जेवण तेवढं घरी घेई.

केदारनाथजी, गणपतीशंकर देसाई, मिनू मसानी यांना रंगा हा दादांचा मुलगा हे माहीत होतं. एका बैठकीला रंगासह वरील सर्व मंडळी हजर होती. केदारनाथजींनी रंगाच्या मानधनाचा प्रस्ताव मांडला. दादांनी मौन पाळले. प्रस्ताव केदारनाथजींनी मंजूर करून घेऊन दरमहा ६० रुपये मानधन रंगाला द्यायचे ठरले. या मिळणाऱ्या ६० रुपयांतून घरी बाईला जेवणाचे म्हणून ३० रुपये रंगा देई. उरलेल्या ३० रुपयात स्वतःच्या कपडचालत्यासकटचा खर्च भागवी. विनोबाजी जमिनीचा, संपत्तीचा ६ वा भाग दान करण्याचे आवाहन करीत. आम्ही भावंड ६. त्याचा छठा भाग रंगा असा विनोबांच्या चळवळीत पूर्णपणे सहभागी झाला. नोकरी, लग्न कशाच्या फंदात पडला नाही. एकदा जे ध्येय ठरवलं त्यापासून रतिभर ढळला नाही. कुटुंबात सुद्धा अलिप्ततेने वागला आणि अजूनही तसा वागतो. माझे आजोबा राघवेन्द्र शूरपाल हे पक्के हिंदू सभावादी. त्यांना हे सर्व खुळचटपणाचे वाटे. ते विनोदाच्या आवरणाखाली विषादाने उद्‌गारत, "माझ्या जावयाने मुलांचा छठा भाग रंगा जमिनीच्या दानपत्रावर दक्षिणा म्हणून विनोबांना अर्पण केला." रंगावर त्यांचा जास्त जीव होता.

१९५२ ते १९५७ च्या दादांच्या आमदारपदाच्या काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात होती. त्यावेळी भाऊसाहेब हिरे हे महसूल मंत्री होते. जमिनी-विषयक सखोल अभ्यास करून दादांनी मंत्रीमहाशयांना विधानसभेत अनेक प्रश्न विचारले. भूमिहीन किती, याची माहिती विचारून भाषणाच्या शेवटी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र का हवा, याबद्दलची भूमिका स्पष्ट केली. याला वर्तमानपत्राने प्रसिद्धी दिली होती.

कुठल्याही सुसंधीचा लाभ उठवला नाही तर दादा रागावत. म्हणत, "कल्पवृक्षा-खाली तुम्ही बसलात तरी भिकेच्या झोळीला गाठी मारण्याइतके नतद्रष्ट आहात. गंगा अंगावर येत आहे असं तुम्हाला समजलं तर तुम्ही त्यात स्नान न करता बाजूला सरकाल." १९५४ साली गयेला भरलेल्या सर्वोदय संमेलनाला येण्याबद्दल दादांनी विचारल्यावर आम्ही, मी आणि माझी चुलत बहीण कुमुदने चटकन् होकार दिला. संधीचा लाभ उठवला. या संमेलनाच्या सुखद, स्फूर्तिदायक आठवणी इतक्या वर्षांनी अजून ताज्या आहेत. वेगवेगळ्या प्रांतातून येणाऱ्या प्रतिनिधींसाठी कडब्याच्या गवताने शाकारलेल्या बराकीवजा झोपड्या तयार करण्यात आल्या होत्या. अशीच एक झोपडी मुंबईच्या प्रतिनिधींसाठी होती. जमिनीवर पण पेंढाच पसरला होता. त्यावर आपली वळकटी, बॅग व इतर सटरफटर सामान रांगेने प्रतिनिधी ठेवीत. इतर प्रतिनिधींबरोबर मेयर, मंत्री हे देखील या झोपडीवजा बराकीत संमेलनाचे चार दिवस होते. ही, व्ही.आय.पी. मंडळी साधेपणाने, अहंपणा, शिष्टपणा न करता रहात. सार्वजनिक नळावर त्यांचे कपडे धुणे, जेवणाची भांडी साफ करणे हे कार्यक्रम चालत. आमदार निवासातील पंचतारांकित हॉटेलमधील

राखीव जागा, संमेलनाच्या ठिकाणी नेण्या-आणण्यासाठी परदेशी बनावटीचा मोटारींचा ताफा, बड्यांच्या पथ्यपाण्याची, खास आवडी-निवडीची खाद्यपेयांची यादी हे चालू उपचार या संमेलनासाठी नव्हते. हजारो प्रतिनिधींच्या रेसोडचाची व्यवस्था राधाकृष्ण बजाज तेथे जातीने हजर राहून बघत. कुणीही कुठेही जाऊ शकत होतं. कडक सुरक्षा व्यवस्थेचा तेव्हा उगम झाला नव्हता. आमच्या मागून, पुढून, बाजूने जयप्रकाशजी, त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवी, विनोबाजी, मंत्री, मुख्य मंत्री सहजतेने ये-जा करीत. पहिल्याच दिवशी राधाकृष्ण बजाजांनी रसोड्यात मदत करण्यासाठी स्वयंसेवक म्हणून नांवे देण्याचं आवाहन केलं. मी आणि कुमुदने नाव देऊन भाजी चिरणं, वाढणं अशा प्रकारची कामं मजेनं केली. दोन दिवसांनी पंडित नेहरू, राजेन्द्र बाबू संमेलनासाठी आले. दोघंही सामुदायिक भोजनगृहात, मोठ्या तंबूत "भोजनासाठी" सहभागी व्हायचे आहेत, ही वार्ता संमेलनात पसरली. संमेलनातील भाषणं झाल्यावर ते भोजनगृहाच्या दिशेला यायला निघाले आणि ज्याला त्याला वाटायला लागलं की, स्वयंसेवक म्हणून वाढायच्या निमित्ताने भोजनगृहात जावे. बजाजांनी रागरंग ओळखला आणि सांगितलं की, पहिल्या दिवसापासून न चुकता मदतीला येणाऱ्या स्वयंसेवकांनीच भोजनगृहात थांबावे. इतर प्रतिनिधी दंगाधोपा न करता निमूटपणे बाहेर निघून गेले. आमच्यावर बाहेर जाण्याची अर्थातच् वेळ आली नाही. राष्ट्रपती राजेन्द्रबाबू, पंतप्रधान जवाहरलालजी किती साधेपणाने वागले म्हणून सांगू! इतरांना बसायला ज्या लांबलचक किनतानाच्या पट्ट्या घातल्या होत्या त्यावरच जवाहरलालजी आणि राजेन्द्रबाबू बसले, मध्ये होते विनोबाजी. इतरांच्या साख्याच पत्रावळी त्यांच्यासमोर ठेवल्या होत्या. सुदैवाने आम्ही रोज जी पंगत वाढीत होतो तिथेच ही विनम्र, निगर्वी, भारतातील सर्वोच्च पदं भूषविणारी रत्नं बसली होती. वाढण्याच्या निमित्ताने त्यांना अगदी जवळून पाहण्याचा आम्हाला योग आला. त्या पंगतीसाठी खास दुसरी माणसंही वाढण्यासाठी नेमली नव्हती. जेवणं झाली. सर्वांच्याप्रमाणे पंडितजींनी स्वतःची पत्रावळ उचलून बाहेर ठेवलेल्या पिंपात टाकली. खास व्यवस्था म्हणजे हात धुण्यासाठी साबणाची पेटी घेऊन एक मुलगी उभी, तर हात पुसण्यासाठी टॉवेल घेऊन दुसरी मुलगी उभी होती. जे प्रसंग नुसते आठवले तरी मन भरून येतं तितकंच आजची अव्यवस्था पाहून खंतावतं. नामधारी पोलीस व्यवस्था, तकलादू संरक्षण, जनतेनेच निवडून दिलेलं सरकार व जनता यांतील वाढत जाणारी दरी, मन विकलग्रस्त करतं. ही सुवर्णसंधी दादांच्यामुळेच मिळाली. या संमेलनात जयप्रकाशजींनी भूदानासाठी जीवनदानाची घोषणा केली. संमेलनाचा ठरलेला कार्यक्रम संपला की गणपतीशंकर देसाई, गोपाळराव काळे, भाऊ धर्माधिकारी असा आमचा ग्रुप आसपास फिरण्यासाठी बाहेर पडे. झालेल्या कार्यक्रमावर चर्चा होई. ती फार ऐकण्यासारखी असे. बोधप्रद असे.

आम्ही संमेलनाहून परतलो. दादांच्यावर गांधी-विनोबाजींच्या विचारसरणीचा

प्रभाव आधीपासून होता. सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून रचनात्मक विधायक कार्य करावे असे गांधीजींना, विनोबांना फार वाटे. गांधीजींनी स्वतःच्या वागण्याचे ज्वलंत उदाहरण भारतीयांच्या समोर ठेवले होते. त्यासाठी स्वतःच्या प्राणाची बाजी लावली होती. या विधायक कार्यावर पक्ष मजबूत असतो. स्वराज्य मिळवून जर गरीब, दुःखी, तळागाळातील जनतेच्या परिस्थितीत फरक पडत नसेल तर स्वराज्य मिळवून काय उपयोग ? भूमिहीनांना भूमी मिळून जर ते भूमीपूत्र झाले तर केवढी मोठी रक्तपात-विरहित क्रांती होईल, या विनोबांच्या विचारसरणीचा दादांच्या मनावर इतका परिणाम झाला की आमदार पदाचा राजीनामा देऊन पूर्णवेळ हे काम करण्याचे त्यांनी ठरवले. गयेच्या संमेलनाची ही फलश्रुती होती. त्यावेळचे कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख मोरारजीभाई देसाई यांना दादांनी राजीनामा सादर केला. विनोबाजींच्या आवाहनानुसार विधायक कार्याला वाहून घ्यायचं ठरवलं असल्याचं कारण राजीनाम्यात नमूद केलं. दादांचा बोलविता धनी विनोबा व मोरारजीभाई यांची भेट झाली असता दादांच्या राजीनाम्याचा विषय निघाला. तेव्हा मोरारजीभाईंनी सांगितलं, पटवून दिलं की, "राजीनामा स्वीकारला तर फेरनिवडणूक घ्यावी लागेल आणि तो व्याप नको आहे. मी राजीनामा स्वीकारणार नाही. विधानसभेच्या अधिवेशनाला हजर रहावे म्हणजे झालं." विधायक कामाच्या आड ते येऊ इच्छित नव्हते. काही झालं तरी मोरारजीभाई गांधीवादी होते. त्या आशयाचे पत्र त्यांनी एप्रिल ५५ मध्ये दादांना पाठविले. मोरारजीभाईंचा व दादांचा घनिष्ट परिचय असल्याने दादांची सत्तेपाठीमागे न धावण्याची मनोवृत्ती त्यांना पूर्ण परिचित होती. खरं तर दादा विधानसभेवर निवडून आले तेव्हा ते कायदे मंत्री किंवा शिक्षण मंत्री होणार अशी हवा होती. पण त्यांना अशा पदांचा हव्यास नसल्याने त्यांनी अशा पदांसाठी पाठपुरावा केला नाही. या पदांमागोमाग मिळणाऱ्या सुखोपभोगाकडे त्यांनी जाणीवपूर्वक पाठ फिरविली. मोठा मतदार संघ असल्याने निवडणुकीच्या वेळी आवश्यक म्हणून विकत घेतलेली जुनी गाडी त्यांनी निवडणुकीनंतर लगेच काढून टाकली.

## गांधी सेवाधाम——एक स्वप्निल नवनिर्मिती

या राजीनाम्याच्या प्रसंगाने दादांच्या एकंदर व्यक्तीमत्वाबद्दल परिचितांपेक्षा अपरिचितात जास्त कुतूहल निर्माण झाले. आता तर या चळवळीत स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन दादा चळवळीशी एकरूप झाले. पदयात्रांचे नियोजन करणे, त्या सुव्यवस्थित पार पाडणे, त्यात सामील होणे, यावर न थांबता बेंद या वतनी गावाची स्वतःची २५० एकर जमीन दादांनी दान केली. चार युक्तीच्या गोष्टी सांगून, नुसते वाचापांडित्य दादांनी दाखवले नाही. या जमिनीच्या दानपत्राच्या वितरणाचा समारंभ झाला बेंदीवर. ही पठारी जागा ३,५०० फूट उंचीवर आहे. हवामान महाबळेश्वरसारखे आहे. या समारंभासाठी मुख्य मंत्री मुरारजीभाई बेंदीचा चढ पायी चढून आले होते. ५५-५६ मध्ये कुठलंही वाहन वरपर्यंत जाऊ शकत नसे. ह्या समारंभाचे द. ना. वांद्रेकर, वि. स. पागे, शंकरराव

देव, बापूसाहेब शेंडे प्रमुख साक्षीदार होते. याच वेळी बेंदीचे नाव बदलून "गांधी सेवा धाम" या नावाने त्याचे बारसे झाले. आसपासच्या गुढे, येसलेवाडी, आरळे, धनगरवाडा येथील गावकरी समारंभाला आले होते. गांधी सेवा धाममध्ये त्यावेळी फुलं कुठली ? पण तिथल्या बायका रसिक. बायकांनी कच्च्या करवंदांचा हार करून गांधीजींच्या फोटोला घातला. पिकल्या करवंदांचं रंगतदार नाविन्यपूर्ण सरबत देऊन पाहुण्यांचं स्वागत केलं. विविध करमणुकीचे कार्यक्रम झाले. कुसुमताई जोशींनी तर जेवणाचा, पक्वान्नांचा असा थाट उडवला की बाबाजी मोघे पानातील पदार्थ मोजीत. पानात १७-१७, १८-१८ वेगवेगळे पदार्थ असत. दादा मस्करीने सांगत आपण जसंजसं, गांधी सेवा धाम सोडून खाली जाऊ तसतशी पदार्थांची संख्या रोडावत जाणार आहे. तयारी ठेवा, पुढे पुढे अशी वेळ येईल की, एक-दोनच पदार्थ पानात असतील.

या ओसाड पठारावर दादांच्या शब्दाला मान देऊन पहिलं कुटुंब आलं ते जयरामअण्णा जोशी व कुसुमताई यांचे. त्यांचं एकुलतं एक घर त्या पठारावर होते. घर कसलं, गोठाच होता तो. त्या ठिकाणी ४ महिन्याची तान्ही मुलगी घेऊन कुसुमताई हिंमतीने राहिल्या. गांधी सेवा धामच्या कायापालटात या जोडप्याचा सिंहाचा वाटा आहे. नेमिनाथ कत्ते सुरुवातीला तर झाडावर "झोपडी" बांधून राहिले होते, जंगली जनावरांच्या भीतीने. या गांधी सेवा धामच्या विविध योजना हाती घेण्यापूर्वी कत्ते काकांनी दादांना कबूल केलं होतं की माझी हाडं गांधी सेवाधाममध्ये पडतील. पण कत्ते काका आपला शब्द पाळू शकले नाहीत. त्यापूर्वी कत्ते काकांना समजावून सांगितलं होतं की, संस्था जमिनीवर चालत नाहीत, त्यासाठी तिथे कार्यकर्त्याने पक्कं बांधून घ्यावं लागतं पण एका ठिकाणी स्थिर राहाणं, चिकाटीने काम करणं कत्ते काकांच्या स्वभावात नव्हतं.

मोरारजीभाईंच्या हस्ते झालेल्या दानपत्राच्या वितरण समारंभाचे वृत्त भूदानपत्रिकेत भाऊ धर्माधिकारी यांनी सविस्तर दिले. दादांनी मुंबईहून नेलेल्या फोटोग्राफरने त्या प्रसंगाचे फोटो काढले. आता डोळ्यासमोर उभे होते काम, काम आणि काम. या गांधी सेवा धामचे स्वावलंबी, आदर्श खेडं सत्यसृष्टीत साकार व्हावं असं दादांना वाटे डोळ्यासमोर महात्माजींचा आदर्शवाद होता. तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील. टुमदार, नेटकं, संस्कारी खेडं डोळ्यासमोर तरळे. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांची तमा नव्हती. ते श्रम जाणवणारे नव्हते. यासाठी हवे होते निस्पृह कार्यकर्ते, वेगवेगळ्या स्तरातील, वेगवेगळ्या क्षेत्रातील. या कार्यकर्त्यांना एका ठिकाणी आणून त्यांचा असा एक सुंदर हार गुंफायचा होता की, जो गांधीधामचे वैभव वाढवणार होता. त्यासाठी हवा होता एक मजबूत दोरा, जो स्वतःचं अस्तित्व दिसू न देता सगळ्या फुलांना एका ठिकाणी धरून ठेवणारा. तो धागा म्हणजे स्वतः दादा होते. असे अनेक कार्यकर्ते दादांनी शोधून काढले की ज्यांनी पगारी नोकर ही भूमिका न घेता गांधी सेवाधामच्या निर्मितीत मनःपूर्वक सहकार्य केले.

या गांधी सेवा धामच्या योजनांसाठी ५६ साली सर्वोदयचे अनुदान मिळाले. ते पुरे

पडत नसल्याने दादांनी स्वतःचा पैसा तर घातलाच, पण भावालाही मदत करायला प्रेरीत केलं. दादांनी सर्व प्रकारची मदत वेगवेगळ्या माध्यमातून गोळा केली. आर्थिक मदत करू न शकणाऱ्यांनी श्रमदान केलं, बुद्धीवंतांच्या बुद्धीचा उपयोग योजना आखण्यात व त्या राबवण्यात झाला. आसपासच्या गरीब, मागासलेल्या मुलांसाठी शाळेची स्थापना केली. शाळा ९ वी पर्यंत होती. शाळेची इमारत बांधली त्यावेळीच मुलांना राहण्यासाठी वसतिगृह बांधले. पाठोपाठ शिक्षक वर्ग आला, त्यांच्या राहण्याची व्यवस्था आलीच. हळूहळू इमारतींची संख्या वाढू लागली. गोठेवजा घरात राहणारे संचालक जयरामअण्णा आता चांगल्या घरात रहायला आले. चव्हाण, भोसले, नाटवडेकर, य. गो. पाटील, म. गो. पाटील, भीमराव इंगवले, बी. जी. पाटील या शिक्षकांची कुटुंबं गांधीधाममध्ये राहायला आली. संचालकांच्या मदतीला सुर्यवंशी, गोरे, लोखंडे, गुळवणी वगैरे कार्यकर्त्यांची ये-जा सुरू झाली. गांधी धामला आता १०—१२ कुटुंबांची वस्ती झाली. शाळेची मुलांची संख्या जवळ जवळ १५०—२०० पर्यंत पोचली. 'कमवा व शिका' या तत्वावर ही शाळा व वसतिगृह चालवले होते. विद्यार्थ्यांना एका नया पैशाचा खर्च शिक्षणासाठी करावा लागत नसे. शिक्षक व विद्यार्थी एका ठिकाणी रहात असल्याने गांधी सेवा धामचे गुरुकुलांसारखे वातावरण होते. मुलांना सर्वांगीण शिक्षण मिळावे त्यांनी चतुरस्त्र व्हावे म्हणून जे काही आदर्श शाळेला जरुरीचे होते, नावीन्यपूर्ण होते ते ते दादा गांधी सेवा धामच्या शाळेत आणून टाकीत. भूगोल, शरीरशास्त्र मुलांना शिकवणं सुलभ व्हावं म्हणून पृथ्वीचा गोल, तो सुरक्षित राहावा, त्यावर धुळीची पुटं चढू नयेत म्हणून केलेले काचेचे कपाट, स्केलेटन (हाडाचा सापळा) ह्या वस्तू खरेदी केल्या, गांधी सेवा धामला नेण्यासाठी. मुलांनी अभ्यासाव्यतिरिक्त वाचन करून ज्ञानात भर घालावी म्हणून निवडक पुस्तके विकत घेतली होती. ती ठेवण्यासाठी काचेचं कपाट होतं. मुलांच्या व्यायामासाठी झोपाळे, घसरगुंडी, मल्लखांब होता. लेझीम, डंबेल्स होते. कवायतीसाठी बिगुल होते, तेही पितळेचे. त्याच्या पाठोपाठ विकत घेतलेल्या पडघमवर टिपरी पडून सकाळची मुलांची कवाईत होई. शारीरिक व अभ्यासातील या सुविधाबरोबरच मुलांना प्रार्थना, राष्ट्रीय गाणी तालासुरांत म्हणता यावीत म्हणून तबला, पेटी, तंबोरा, गांधी सेवा धामच्या शाळेसाठी आणला होता. गायन मास्तर म्हणून इनामदार यांची नेमणूक केली होती. विनोबांचे बंधु बाळकोबा भावे यांचेकडे उरुळीकांचनला सतार व गायनाच्या प्रशिक्षणासाठी त्यांना पाठवून तयार करून आणले होते. मराठी टंकलेखन मुलांना यावे या उद्देशाने मराठी टंकलेखन मशीनची खरेदी झाली होती. आजही शहरातून सुद्धा किती शाळांत स्वतंत्र गायन मास्तर तबला पेटीच्या सरंजामासकट असेल ? आपली शाळा परिपूर्ण असावी यासाठी दादांचा हा अट्टाहास होता.

या शैक्षणिक प्रगतीच्या हातात हात घालून हे नवनिर्मित गाव स्वावलंबी असावं म्हणून शेती, तीही सुधारित करावी असं ठरलं. त्यासाठी जयरामअण्णा कोसबाडला राहिले. नवे तंत्र, नवे प्रयोग यांचे निरीक्षण करून ते तंत्र, प्रयोग आत्मसात् करून आले. एका

वर्षी त्यांनी ११० पोती भात शेतातून काढले, भूईमूग, गहू, तांदूळ, भाजीपाला, दूध मुबलक असल्याने मुलांची खाण्यापिण्याची चंगळ होती. इतर मुलांना सणावाराला गहू दिसायची वानवा, तिथे सकाळच्या न्याहरीला वसतिगृहातील मुलांना गव्हाची लापशी मिळे. सकाळच्या न्याहरीसाठी शिस्तीने बसलेल्या मुलांची रांग मोठी विलोभनीय दिसे. मुलांना भाकरी करून घालायला बाई लावली होती. आंब्याची झाडं शेकडयांनी लावली होती, तीही कलमी. खुंटी कलममधील दापोलीचे तज्ञ बाबा फाटक यांना बोलावले होते. त्यांच्या देखरेखी-खाली हे काम करवून घेतलं होते.

गांधी सेवा धाममधील वसतिगृह, शेती, तिथं राहणारी कुटुंबं, शेतीसाठी रोजावर येणारे मजूर या सर्वांसाठी पाण्याची व्यवस्था करणं क्रमप्राप्त होतं. त्यासाठी चार बिहिरी खणल्या, बांधून काढल्या, त्याला रहाट बसवले, इंजिन बसवले. एका विहिरीचा खर्च काकांनी केला. कुसुमताईंनी विहीर खणण्याच्या मुहुर्ताची कुदळ जमिनीत घालून मुहुर्ताचा नारळ फोडला. पाण्याचा पंप व बांधून काढलेल्या टाकीमुळे गंगा अंगणातच नाही तर घरात आली. ५०० फुटाची पाईप लाईन टाकून घरात नळाचे पाणी येऊ लागले. त्या पाठोपाठ शेतीसाठी अवजारं आली. लोखंडी व लाकडी दोन्ही त-हेचे नांगर गांधी सेवा धामकडे होते. शेतासाठी व दूधदुभत्यासाठी गुरं गांधी सेवा धामची वाट चालू लागली. जोशीकाकांच्याकडे एक जर्सी गाय होती. दादांनी जोशीकाकांना ती गांधी सेवा धामला देणगी म्हणून द्यावी असं सहज सुचवलं आणि जोशीकाकांनी ट्रकमधून त्या गायीचं दावं धरून रात्रभर प्रवास केला. गाय गांधी सेवा धामच्या गोठयात बांधून टाकली. गाय रोज ८ लिटर दूध देई. गाई, बैल यांनी गोठा शोभू लागला. आरळे, गुढं, येसलेवाडीला कामासाठी जाणं, सामानाची, धान्याच्या पोत्याची ने-आण करणं सुलभतेने व्हावं म्हणून बैलगाडी विकत घेतली. डोंगर चढण्या-उतरण्याची जिकीर कमी झाली. गाईमुळे रोज वसतिगृहातील मुलांसाठी ताकाचा हंडा जाऊ लागला. गुराढोरांना चाऱ्याला कमतरता नव्हती. गोबर गॅस सुलभतेने वापरता येऊन स्वयंपाक करणं होईल, वीज निर्मिती होईल ह्या कल्पनेने गोबर गॅस प्लॅण्ट बसवला. गोबर गॅस व चुली आल्या, लाकडाने होणारी अस्वच्छता, काजळी, धूर डोळयांचे विकार याचे उच्चाटन होऊ लागले, घरांत विजेचे दिवे आले. पवन चक्कीमुळे पिठाची गिरणी सूरू झाली. संचालक म्हणून येथे प्रथम आलेल्या, गोठेवजा घरांत राहणा-या, जोशी कुटुंबाच्या घरी आता वीज, नळाचे पाणी खेळू लागलं. दारासमोरील तुळसी वृंदावन, फुलांची झाडं, डोळयांचं पारणं फेडू लागली. हे सर्व किती अल्पावधीत !

वसतिगृहातील मुलांचे कोडकौतूक इतक्यावरच संपलं नव्हतं. त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, राष्ट्रप्रेमाचे बाळकडू त्यांना मिळावे, गावकऱ्यांना धार्मिक माध्यमातून देश-हिताची जाणीव व्हावी, स्वच्छतेचे महत्व पटावे या उद्देशाने दादांनी त्यांचे कारवारचे मित्र रमण महर्षीमुळे झालेले गुरूबन्धु आत्मारामजी देव उर्फ गुरूदेवानंद यांना बोलावून घेतले. भजनीमंडळ सुरू केले. दर पौर्णिमेला सत्यनारायण होई. आसपासच्या वेगवेगळया गावी भजनाचा, प्रवचनाचा कार्यक्रम होई. त्या निमित्त गावकरी, कार्यकर्ते एकत्र येत.

विचारांची देवाण-घेवाण होई. कार्य करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याचा प्रयत्न होई. मार्ग सुचवले जात. करमणुकीच्याद्वारा हे एकप्रकारचे ज्ञानसत्र सुरू होते. स्त्रिया त्यात भाग घेत. बाबाजी मोघे, वि. स. पागे, बापूसाहेब शेण्डे, भारदे, शंकरराव देव यांची व्याख्यानं आयोजित होत. अशाच प्रकारे गोकुळअष्टमीचा उत्सव साजरा होई. हा सर्व कार्यक्रम शाहीरबुवा देशपांडे यांच्या देखरेखीखाली होई. ते मुलांच्याकडून पूजा करवून घेत. जातिभेदनिर्मूलनाचा धडा अप्रत्यक्षरीत्या गिरवला जाई. रात्री-अपरात्री पठारावर यायला, फिरायला भीती नव्हती. राखणीस ठेवलेली इमानी कुत्री आपली कामगिरी चोख बजावीत. गांधी धामच्या वाढत्या पसाऱ्याचं चोराचिलटापासून रक्षण करीत. वसतिगृहातील मुलांना गांधी सेवा धाम आपले वाटे. एकदा असाच एक चोर चोरी करून जात असता पाठलाग करून चोरलेला माल वसतिगृहातील मुलानी सोडवून आणला होता.

याच्या पाठोपाठ गांधी सेवा धामसाठी वस्त्र स्वावलंबनाची योजना आली त्यासाठी कताई केंद्र सुरू केलं. कापूस पिंजणे मशीन, अंबर चरखे केंद्रात आले. मैनाताई झांबरे या केंद्रांची व्यवस्था पहात. त्यांचे वडील मंगळवेढ्याला वकील होते. मैनाताईंनी वेळेला गुडघा गुडघा चिखलातून पेळूची पोती बिळाशीहून गांधी धाम पर्यंतचा अवघड चढ पार करून डोक्यावरून वाहून आणली आहेत. गांधी सेवा धामच्या बायका आवर्जून कताईसाठी जमत. त्यातील काहींनी स्वतःच्या सुताची विणलेली एखादी साडी अजून ४० वर्षानंतर आठवण म्हणून जपून ठेवली आहे. पठारावर तेलघाणा चाले. त्यासाठी नामू तेली यांचे कुटुंब वस्तीला तिथे राहत होते. कुलकर्णी यांना साबणाचा कारखाना काढायचा होता. त्यासाठी कर्जाची व्यवस्था केली. दादा त्यासाठी जामीन राहिले. पुढे हा कारखाना गांधी धामहून खाली आरळ्याला आला. या कारखान्याची पण चित्तरकथा झाली. गांधी धामची नवनिर्मिती शून्यातून उभी झाली होती. हे नवजीवन मिळवणारे गांधी सेवा ग्राम बघून आनंदित होण्याऐवजी कुणी वैयक्तिक हेवेदावे साधून घेण्याचा प्रयत्न केला. कारखाना आरळ्याला स्थलांतरीत झाल्यावर कर्जाचे हप्ते वेळेवर दिले नाहीत व दादा त्यासाठी जामीन राहिले म्हणून आमच्या आरळ्याच्या घरावर लिलाव करण्याची वेळ हितशत्रूंनी आणली. वास्तविक पाहता हे घर आता अनेक विधायक, रचनात्मक घडामोडीचे केन्द्र म्हणून ओळखले जाई. त्या घरावर लिलावाची वेळ आली म्हणून आरळेवासीयांनी सभा बोलावून लिलावासाठी घर विकत घेण्यासाठी कुणीही उभं रहायचं नाही असं ठरवलं. पण त्यात भाऊबंदापैकी एकाने लिलावांत घर घेण्याचा निश्चय केला. दोनवार लिलाव पुकारला दादांनी तिसरा लिलाव पुकारण्यापूर्वीच्या अवधीत जुने कागदपत्र चाळून पैसे भरल्याच्या पावत्या शोधून काढल्या व हजर केल्या. तिसऱ्या वेळेला लिलाव पुकारण्याची पाळी आली नाही. घर वाचलं. अपकीर्ती व्हावी म्हणून कागदपत्र न पाहता जे नाटक रचलं गेलं ते भूईसपाट झालं. अरिष्ट टळलं. विघ्नसंतोषीपणा उघडा पडला.

अधूनमधून पण सातत्याने शहरी पाहुणे गांधी सेवा धामला भेट देत. ५६ मध्ये दादांचे

खास मित्र, उपमंत्री वान्द्रेकरांनी या भागाला भेट दिली. वान्द्रेकरांची ७ बैलजोड्या लावून मिरवणूक काढली. गाडीवर माचा टाकून ऊस, केळीचे खांब लावून गाडी सजवली. बॅण्ड लावला. लेझीम पथकाबरोवर वाजत-गाजत मिरवणूक निघाली. या अनपेक्षित स्वागताने वान्द्रेकर भारावून गेले, म्हणाले, " माझ्या लग्नातही माझं इतकं कोडकौतुक झालं नाही ". गांधी सेवा धामची धीमेधीमे पण निश्चित प्रगतीपथाकडे वाटचाल चालली होती.

## विनोबा ग्राम

गांधी सेवा धामच्या पुढे आणखी उंचावर एक पाडा आहे. त्याला धनगरपाडा म्हणत. गुरं राखणं हे या ३५-४० उंबरे असलेल्या रहिवाशांच्या पोटाचं मुख्य साधन. चंद्रमौळी झोपड्यांची ही वस्ती होती. या रहिवाशांसाठी सहकारी सोसायटी सुरू केली ५९ मध्ये सोसायटीतर्फे कर्जे मिळवून दिल्यामुळे धनगरपाडा कौलारू घरांनी शोभू लागला. जनावरं विकत घेण्यासाठी कर्ज मिळाल्याने गुरं राखणं या उपजीविकेच्या साधनाची व्याप्ती वाढली. मुलांच्यासाठी बालवाडी काढली. सत्यभामाबाई कुलकर्णी ही बालवाडी चालवीत. त्यांनी हरिजन सेवा केली. त्यांच्या जोडीला येथील मुलांना आंघोळी घालणं, मुलींच्या वेण्या घालणं, मुलांना स्वच्छ ठेवण्याचे धडे आई-वडिलांना देणं इथपासून सुरुवात करून साक्षरतेचे धडे दिले. त्यासाठी त्या तेल, फणी, साबण या आयुधानिशी धनगरपाड्याला जात. तिथे कताई केंद्र सुरू केलं. पिंजण मशीन, अंबर चरखे यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी थोड्याफार स्थिरावलेल्या गांधी सेवा धामच्या बायका धनगरपाड्यात जाऊन तेथील स्त्रियांना धड देऊ लागल्या. आपल्या उत्कर्षाबरोबर शेजाऱ्यांचा उत्कर्ष व्हावा ह्या भूमिकेतून ही सर्व धडपड चाले. या धनगरपाड्याच्या आसमंतातील डोंगराच्या एका भागातून एका नैसर्गिक झऱ्यांचे पाणी खाली येई. त्या जागी बाबाजींच्या हस्ते कल्पक दादांनी गोमुख बसवले. पाणी गोमूखातून पाड्याला एकत्रित होऊन मिळू लागले. त्याच दिवशी धनगरपाड्याचे नामकरण विनोबा ग्राम म्हणून झाले. तेथील सहकारी सोसायटी विनोबाग्राम सहकारी सोसायटी म्हणून काम करू लागली. ५९ साली बसवलेले गोमूख आजही चांगल्या अवस्थेत आहे. आणखी एक बालवाडी आरळं व गांधी सेवा धाम यामधील एका छोट्या गावात काढली. कुसुम देशपांडे या चुणचुणीत बाई ही बालवाडी चालवीत.

५५-५६ मध्ये गांधी सेवा धामला जायचं म्हणजे वाहतुकीचे साधन बैलगाडी किंवा आपले दोन मजबूत पाय. त्यामुळे जगातील तर नाहीच पण आसपासच्या प्रांतातील घडामोडीपासून गांधी सेवा धाम पूर्णपणे वंचित होतं. बाह्य जगाशी संपर्क असावा, चालू घडामोडींचे ज्ञान असावे म्हणून दादांनी कण्यासह रेडिओ घेऊन वर पाठवला. प्रथम रेडिओ लावला तर " कोण वरडतंय " म्हणून बांबरवाडी, गुढं इथले गावकरी गोळा झाले. अद्भूत जादूने गोंधळले, चकीत झाले, आनंदले. " लई ब्येस् झालं " म्हणून जाता जाता प्रमाणपत्र दिलं.

गांधी सेवा धामची शेती, गुरांची देखभाल, शाळा, वसतिगृह, गृहोद्योग पाहण्यासाठी,

त्यापासून स्फूर्ति घेऊन काही करता आलं तर करावं या उद्देशाने कितीतरी पाहुणे भेटी देऊन जात. अशीच वारणानगरची मंडळी दूध प्रकल्प हाती घेण्यापूर्वी चाऱ्याची व्यवस्था करणे कितपत शक्य होईल ह्याचा अंदाज घेण्यासाठी बस करून आली होती. दोन्हीकडील भौगोलिक परिस्थितीचे साध्यर्म्य लक्षात घेऊन शिबिरं तर किती भरत याचे मोजमाप नाही. ना. रा. जोशी यांचे ५० शिक्षकांचे एक शिबिर वानगीदाखल सांगता येईल. हे सगळे गोकुळ डोळे भरून पाहिल्यावर कुणी वसतिगृहातील मुलांना मेजवानी देई. अशीच जिलेबीची मेजवानी एका पाहुण्याने दिली होती. खास पाहुण्यांना चहा मिळे. तो सुद्धा किटली, उत्तम कपबशाच्या सरंजामाने युक्त. दादा तर या गांधी सेवा धामसाठी नुसते झपाटल्यासारखे झाले होते. कुठून कुठून वस्तु गोळा केल्या, विकत घेतल्या, प्रसंगी डोक्या-वरून गांधी सेवा धामला नेल्या. घरातल्या काही वस्तूंचे स्थलांतर झाले. ध्यास एकच गांधी सेवा धाम दृष्ट लागण्यासारखे आदर्श व्हावे. हेलपाटे तर किती घातले, याला मर्यादा नाही. दरवेळी शिराळयाचे त्यांचे बंधुतुल्य मित्र पिलोबाअण्णा बरोबर असत. त्यांनी सबबी, अडचणी पुढे केल्या नाहीत. कंटाळा केला नाही. जयरामअण्णा जोशी, अनुसया फाळके, पिलोबाअण्णा हसबनीस, कत्ते हे विश्वस्त गांधी सेवा धामचे होते. दादा प्रमुख होते. १०–१२ वर्षे हे सर्व सुरळीत चाललं.

## जाऊ तिथे खाऊ

पुढे इतर ठिकाणी संस्थात जे होतं तेच गांधी सेवा धाममध्ये झालं. " जाऊ तिथे खाऊ " या वृत्तीची माणसं साळसूदपणाचा आव आणून संस्थेभोवती घोटाळू लागली. त्यांनी चालत्या गाडयाला खीळ घालण्याचा जणू चंग बांधला. चोऱ्या करून, वस्तू विकून पैसा गाठी मारायला सुरुवात झाली. त्याला बोटचेपी माणसं साथ देऊ लागली. कपाटं, पुस्तकं, हार्मोनियम अशा अनेक वस्तू ज्या विकता आल्या नाहीत त्या नातेवाईकांकडे पोहचवल्या गेल्या. नातेवाईकांनी त्या ठेवून घेतल्या. वसतिगृहासाठी दिलेली देशपांडे कुटुंबाची २०-२० घागरींची मोठी मोठी तांब्या-पितळेची भांडी विकण्यापर्यंत या कारस्थान्यांची मजल गेली. विहिरीचे रहाट, बसवलेले इंजिनही यातून सुटले नाही. सुपाने ओतून ओंजळीने घेण्याची वेळ या नांदत्या वास्तूवर आली. एका विश्वस्ताच्या वयामुळे येणाऱ्या मानसिक कमकुवतपणाचा, अस्थिरपणाचा गैरफायदा संधीसाधूंनी घेतला. त्यांना हातातील बाहुलं बनवलं. त्या ट्रस्टीतर्फे डावपेच खेळायला सुरुवात झाली. हा खेळखंडोबा करणाऱ्याला दया दाखवून पांघरूण घातलं गेलं. एकाचे सूप घेऊन दुसऱ्याच धान्य पाखडून त्या सुपाची विल्हेवाट लावली. या वागण्याने या संधीसाधूंचा एक गट झाला. कसंही वागलं तरी चालतं अशी समजूत करून घेऊन त्यांनी पुढची कुटील कारवाई सुरू केली. आमरण उपोषणाच्या नाटकाने दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. दया दाखवावी पण ती अस्थानी, अयोग्य माणसाला नाही. अपराध्याला शासन हे झालंच पाहिजे. नाही तर किती तऱ्हेनी किंमत मोजावी लागते, कसा सर्वनाश होतो, याच गांधी सेवा धाम मूर्तिमंत उदाहरण

आहे. या कटकटींना कंटाळून कार्यकर्ते गांधी सेवा धाम सोडून जाऊ लागले. उरलेल्यांना चरायला मोकळं कुरण मिळालं. तेवढ्याने समाधान झालं नाही म्हणून उपवासाचे सोंग झाले. भरपूर गाजावाजा झाला. एखाद्या कार्यासारखी उपोषणाची तयारी केली. येणाऱ्या-जाणाऱ्या बघ्यांची जेवणा-खाण्याची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, महाराज हुतात्मा झाल्यावर जाळण्यासाठी लाकडं वगैरेची सोय, सारं सारं काही जय्यत होतं. पण हा, हाय रे दैवा ! हा खाऊन पिऊनचा उपास संपला. सर्व तयारी फुकट गेली. कारण काय, तर हा ट्रस्ट त्यांना स्वतःच्या वैयक्तिक मालकीचा करून हवा होता. दावे, कोर्टकचेऱ्या झाल्या आणि सत्य अग्निदिव्यातून तावूनसुलाखून निघाले, मनःस्तापाची किंमत देऊन. निकाल जरी देशपांडे यांच्या बाजूने लागला तरी अविश्रांत कष्ट, पैसा, योजना, अनेकांचे अबोल सहकार्य याचा परिपाक म्हणजे वास्तवातील हे गोड देखणं स्वप्न. हे नांदतं गोकुळ भुई-सपाट झालं. बेचिराख झालं. पण फिनिक्स पक्षी राखेतून पुनर्जन्म घेतो तशी शुभ लक्षणं गांधी सेवा धामच्या सुदैवात लिहिली आहेत असे वाटते. त्या दिशेने हळूहळू, पण ठाम निश्चित पावले पडत आहेत.

गांधी सेवा धामची अशी वाताहात झाल्यावर काही दिवसांनी दादा त्या बाजूला त्यांच्या पुतण्याबरोबर गेले होते. सगळी दुर्दशा पाहून त्यांना अश्रू आवरेनात. वाळवंटात पाणी ओतलं. सगळं व्यर्थ गेलं असं वाटून दादांना होरपळल्यासारखं झालं. तसेच बाळ, त्यांचा पुतण्या आणि दादा साताऱ्याच्या स्टँडवर आले. "दादा सुन्न होऊन बसले असता एक इसम दादाच्या जवळ आला, त्याने पायावर डोकं ठेवून गजबजलेल्या स्टँडवर विनासंकोच दादांना साष्टांग घातला. विचारलं, दादा, मला ओळखलं का ? मी अमुक अमुक. आपल्या गांधी सेवा धामच्या शाळेचा माजी विद्यार्थी. आता कलेक्टर कचेरीत मोठ्या हुद्यावर काम करीत आहे. तुमच्यामुळे मी हे दिवस पाहिले, नाही तर गुरं हाकत खेड्यात राहिलो असतो." घरी चलण्याचा खूप आग्रह केला असताही वेळेअभावी दादांना त्या 'विद्यार्थ्याला' नकार द्यावा लागला. आता तर दादांना आसवं मुळीच आवरेनात. वाळवंटातील ओयासिसचा शोध लागल्याने आताचे अश्रू कृतकृत्यतेचे होते, आनंदाचे होते. गांधी सेवा धामचा अध्याय संपला. म्हणता म्हणता त्याला नवजीवन मिळेल अशी आशा वाटू लागली.

## नशाबंदी मंडळाची वारकरी दिंडी

दादांच्या रचनात्मक कार्याची व्याप्ती गांधी सेवा धामपुरती मर्यादित नव्हती. त्याच-वेळी मुंबईलाही नशाबंदी मंडळ काम करू लागले. नशाबंदी मंडळ स्थापन झाले १९५८ साली. पण प्रत्यक्ष कामाची सुरुवात मुंबईला होईपर्यन्त १९६० साल उजाडले. विधान-सभेचे सभापती सयाजीराव सिलम यांनी दादांना नशाबंदी मंडळाचे प्रमुख संघटक म्हणून काम करावं असं सूचवलं. दादांनी व्यसनमुक्तीचा एक भाग म्हणून ती जबाबदारी स्वीकारली. त्याच्या जोडीला मुंबई व आसपास अनेक विधायक कामे चालू होती. विनोबाजींच्या

निधीमुक्ती, तंत्रमुक्तीनंतर १९५७ साली मुंबईची भूदान यज्ञ समिती बरखास्त होऊन मुंबई सर्वोदय मंडळाची स्थापना झाली. त्यात दादांचा पुढाकार होता. हे सर्वोदय मंडळ अजून त्यांच्या धोरणानुसार काम करीत आहे. या सर्वोदय मंडळाचे ऑफिस १९७२ पर्यन्त जवळ जवळ १५ वर्षे मणिभवनच्या नूतनीकरण केलेल्या इमारतीत होते. विनोबाजींना दादांची विठ्ठल भक्ती, आळंदी, पंढरपूरची वारीची ओढ परिचित होती. दादांची पायी आषाढी-कार्तिकीची वारी म्हणजे पदयात्राच की! पण आध्यात्मिक बैठक असलेली. वारीमध्ये वारकऱ्यांत सर्वोदयाचे काम करणे, व्यसनमुक्तीचे काम करणे ही एक पर्वणी विनोबाजींना वाटली व त्यांनी दादांना वारकऱ्यांत हे काम करायला सांगितले. या कामासाठी आळंदी, पंढरपूरला केन्द्र असावे, केन्द्रासाठी जागा असावी असे सुचवले. पंढरपूरला जागा मिळवण्याचे प्रयत्न केले व जागा मिळवली. ही जागा पंढरपूरला मोक्क्याच्या जागी मिळाली आहे. जागा मध्यवर्ती असल्याने सगळ्या दृष्टीने सोईस्कर आहे. व्यसनमुक्तीच्या प्रयोगाची व्याप्ती वाढावी ही मूळ कल्पना व आग्रह दादांचा. त्या कल्पनेप्रमाणे शेगावला काम चालू आहे. व्यसनमुक्तीचे सघन क्षेत्र म्हणजे विनोबा ग्राम समूह. तेथे ह्या प्रयोगाबद्दल दादांनी आग्रह धरून पाठपुरावा केला. नशाबंदी मंडळाला सहभागी करून घेतले. त्याचे प्रयोग ठाणे जिल्ह्यात आजही चालू आहेत. ज्ञानेश्वर माऊलीच्या आषाढी-कार्तिकी पंढरपूर-आळंदीच्या ८०० वर्षांची परंपरा असलेल्या वारीच्या जोडीला आधुनिक ज्ञानेश्वर विनोबाजींच्या अनुयायांची, वारकऱ्यांची ज्येष्ठी-वारी सुरू झाली. त्याचं काय झालं. साधारण १९६५ मध्ये विनोबाजी पदयात्रेच्या निमित्ताने पंढरपूरला गेले होते. विनोबांची विठ्ठलभक्ती तर सर्वश्रुत आहे. त्यांना विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनाची आस होती. त्यांच्याबरोबर सर्व जाती-धर्माचे, त्याच-प्रमाणे फ्रान्स, जर्मनी देशातील कार्यकर्ते होते. पंढरपूरच्या देवळात दर्शनासाठी फक्त हिंदूंना प्रवेश होता. तर विनोबांची मनोभूमिका पदयात्रेतील सर्वांना दर्शन घेण्याची परवानगी मिळावी तरच देवळात जाऊन दर्शन घ्यायचे, नाही तर लांबून नमस्कार करायचा अशी होती. शेवटी पुंडलीक, विठ्ठल, रखुमाई मंदिराच्या विश्वस्त मंडळाने सभा बोलावून विनोबाजींच्या बरोबर आलेल्यांना जातिधर्मभेद न मानता सर्वांना प्रवेश देण्याचा ठराव मंजूर करून विनोबाजींना आमंत्रण दिलं. आमंत्रणाचा स्वीकार करून विनोबांनी मंदिर प्रवेश केला सर्व अनुयांच्या समवेत. जवळ जवळ अर्धा तास ते गाभाऱ्यात अश्रूधारा वहात असलेल्या अवस्थेत होते. कंठ सद्‌गदीत झाला होता. सर्वांना मंदिर प्रवेश खुला झाला होता. पंढरीचा निळासावळा विठूराया तमाम भक्तांना दर्शन देण्यासाठी बडव्यांच्या तावडीतून सुटला होता. तेव्हापासून विनोबाजींच्या श्रद्धाळू अनुयायांना ही ज्येष्ठीवारी, जेष्ठ शुद्ध एकादशीची चालू ठेवावी असे वाटले. कारण मंदिर प्रवेशाची तिथी होती ज्येष्ठ शुद्ध एकादशी. ज्ञानदेव कदम, डॉ. कुलकर्णी व इतर १०–१२ कार्यकर्ते ह्या वारीचे सातत्य टिकवण्यासाठी वारीसाठी निघाले. विनोबांनी या वारकऱ्यांना अट घातली, पायी तर वारी करायची पण एकही पैसा बरोबर बाळगायचा नाही. कुठल्याही संस्थेतर्फे जेवणखाण,

राहण्याची व्यवस्था करून घ्यायची नाही. विठ्ठलावर तुमची श्रद्धा आहे. जो सर्वत्र वास करतो तो तुमची व्यवस्था करील. भौतिक सुखाची तुम्ही अपेक्षा धरू नये. एकदा नाशिकचे सर्वोदय संमेलन संपले. हे ज्येष्ठीचे वारकरी निघाले. जाण्यापूर्वी दादांची भेट घेतली. त्यानी दशमीला पंढरपूरला येतो, तुमची भेट घेतो असं आश्वासन दिलं. कार्यकर्ते मजल दरमजल करीत पंढरपूरला पोचले. पंढरपूरचे सर्वोदय संमेलन व्यवस्था करणार होते. तेथील बाबूराव जोशींनी एकवेळची व्यवस्था केली. संध्याकाळच्या फराळाची व्यवस्था लागली नाही. ही वारकरी मंडळी उतरलेल्या ठिकाणाचा तपास काढीत काढीत दादा भेटायला आले. सगळ्या व्यवस्थेची चौकशी केली तर समजलं की मंडळी उपाशी आहेत. कुणीतरी एकभुक्त राहण्याचा सल्ला अनाहूतपणे दिला होता आणि खोलात शिरून विचारलं तर डॉ. कुलकर्णी म्हणाले, "जेवणाचा अर्ज विठ्ठलाला केला आहे, बघू या, मंजूर होतो का. अर्ज मंजूर झाला तर द्वादशी सोडल्याचे भाग्य, नाही तर एकादशीचे पुण्य मिळेल." विनोदाच्या झालरीखाली लपलेल्या या वाक्यांनी ही मंडळी उपाशी असल्याची जाणीव झाली. दादांच्या डोळ्यात हे सुकलेले चेहरे पाहून पाणी तरळलं. तुम्ही काळजी करू नका. मी काहीतरी व्यवस्था करतो, असा दिलासा दिला. परत बाहेर गेले. येताना फराळाच्या जिनसा घेऊन आले. सगळ्याना समोर बसवून खाऊ घातले. दुसऱ्या दिवशी शिधा विकत आणून, जेवण बनवण्याची व्यवस्था करून सगळ्यांचा अंतरात्मा तृप्त केला. दादांच्या रूपाने विठूरायानें भुकेल्या पोटी अन्न घातले असें या कार्यकर्त्यांना वाटले. दादांनी शब्द दिला की, यापुढे ज्येष्ठ शुद्ध दशमी ते द्वादशी तीन दिवसांचा पंढरपूरचा खर्च माझा. ही घटना घडली ७१ मध्ये. विनोबांना ७५ वर्षे पुरी झाली त्या वर्षी. शेवटी शेवटी दादा पंढरपूरला वयामुळे जाऊ शकत नव्हते तरी खर्चाचे पैसे न चुकता पाठवत. ज्येष्ठीवारीच्या निमित्ताने ग्रामदान, भूदानाची भूमिका पदयात्रेच्या माध्यमातून, मार्गावरील वेगवेगळ्या मुक्कामी, गावकऱ्यांना समजावून सांगण्याची संधी या दादांपासून प्रेरणा मिळालेल्या आधुनिक वारकऱ्यांना मिळाली. या सर्वोदयी वारकऱ्यांचा पंढरपूरचा तीन दिवसांचा मुक्काम पोटापाण्याच्या विवंचनेतून मुक्त झाला. निश्चितपणे नियोजित प्रचार कार्याचा व्यसनमुक्तीचा निश्चितपणे कार्यक्रम पार पडू लागला.

भुकेलेल्याला खाऊ घालून त्याचा अंतरात्मा तृप्त करणं हा दादांचा सहज स्वभावधर्म होता. संमेलनं, अभ्यास वर्ग, शिबिरं असली आणि त्याचे दादा पदाधिकारी असले की, जमलेल्या मेळाव्याचे यजमानपद ते उत्स्फूर्तपणे, हौसेने सांभाळीत. मग स्थळ, काळ, वेळेच्या अडचणी त्यांना भेडसावीत नसत. संयोजन व मेळावे सुव्यवस्थितपणे कार्यकर्त्यांच्या मदतीने ते पार पाडीतच. पण बाराच्या भुकेची ते कसोशीने व्यवस्था करीत. सभेत चर्चा, ठराव, इतर अनुषंगिक कार्यक्रम चालला असला तरी दादांना काळजी वाटे. सभा संपल्यावर पाहुण्याना आवश्यक असणाऱ्या भोजनाची स्वयंपाकी असो-नसो, वेळी स्वतः धोतर खोचून पाकनिष्पतीला सुरुवात करीत. त्यांचे मानसपुत्र बाळ परूळेकर यांना हळूच खुणवीत, चल चल बाळ, 'सभा संपल्यावर त्यांना काय खाऊ घालायचं! आचारी मिळाला नाही.'

कधी बोलावलेला आचारी दांडी मारी. आमंत्रितांना हे कारण सांगणे दादांना संयुक्तिक वाटत नसे. भुकेच्या वेळी भावना ओतून बनवलेली गरम गरम खिचडी, भाजी जेवणाऱ्यांना पक्वान्नाहून गोड लागे. अशावेळी कपडे चुरगाळतील, हळदतिखटाचे डाग कपड्यांना पडतील याची खंत ते बाळगीत नसत. कुणीतरी निदर्शनास आणल्यास त्याला पिशवीतून कपडे आणायला सांगून कपडे बदलीत असत. अशावेळी रांधून वाढण्याच्या गडबडीत असलेले, धोतर वर खोचलेले दादा. कोणाला गबाळे वाटत असले तरी बहुसंख्यांना त्यांच्या मातृहृदयात वसत असलेला कळवळा जाणवे. अशावेळी कराव्या लागणाऱ्या पदरमोडीची ते फिकीर करीत नसत. त्यांच्याबरोबर संमेलन, आसपासची प्रेक्षणीय स्थळं, तीर्थयात्रा करणाऱ्यांना याचा अनुभव पदोपदी येई. बायकांना तर त्यांच्याबरोबर प्रवास करताना माहेरची आठवण येई. शक्यतो स्वतः उठारेटा करून बायकांना आराम देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांच्या सहवासात आलेली अशी व्यक्ती नाही की, दादांच्या बरोबर तिने प्रवासाची मजा चाखली नाही. सर्वोदयी, नशाबंदी मंडळ कार्यकर्त्यांना ते तीर्थक्षेत्र, आधुनिक तीर्थक्षेत्र, भाक्रानांगल-सारखी दाखवून आणीत, तर सर्वोदयी कार्यकर्त्यांना पवनार, सेवाग्राम, सर्वोदय संमेलनाला हजर राहायला प्रवृत्त करीत. प्रवासात ब्रह्मचारी, संसारी, तरूण, वृद्ध, स्त्री-पुरुष, कामात देव पाहणारे, देवाला सगळं अर्पण करून निर्लेप सेवा करणारे, सगळ्या जमातीचे प्रवासी दादांच्या बरोबर असत. दादा प्रत्येक स्थळी अनेक वेळा गेल्यामुळे त्यांना तेथील खडान्‌खडा माहिती असे. त्यामुळे हे पर्यटन स्वस्त व मस्त होई. कुठल्याही प्रकारचा गाजावाजा न होता सगळं नियोजन दादा काटेकोरपणे करीत. कुणीतरी मस्करीने म्हणे, "दादा, तुम्ही यात्रा कंपनी काढायला हवी होती". दादा ते हसण्यावारी नेत. एकदा त्यांचे मित्र व त्यांच्या पत्नी सांसारिक आघातांनी फार निराश झाली होती. तेव्हा त्यांना घराबाहेर काढून त्यांच्यासाठी खास तीर्थक्षेत्रीच्या भेटीची योजना आखली. त्यात पवनारचा अंतर्भाव केला स्वतः त्यांच्याबरोबर फिरले. विनोबांचे मौन ज्या दिवशी सुटले त्यादिवशी हे त्रिकुट पवनारला होते. विनोबांशी ओळख करून दिली. घरी परततांना त्या जोडप्याचा निराशेचा अंधःकार हळूहळू विरू लागला होता.

## दादांचे यजमानपद

असंच एक शिबीर ५६ साली मिरजेला आयोजित केलं होतं. महाराष्ट्रातील जवळ जवळ ६० ग्रामदानी कार्यकर्ते जमले होते. शिबिराचा समारोप आटपाडीला होता. कारण महाराष्ट्र सेवा संघाचे सूतकताई केन्द्र तेथे होते. या संघाची स्थापना ४४-४५ मध्ये महात्मा गांधींच्या प्रेरणेने झाली होती. या संघाच्या स्थापनेत दादांचा सिंहाचा वाटा होता. कार्यवाह, मंत्री, विश्वस्त, अध्यक्ष अशी विविध पदं दादांनी भूषविली. आटपाडीला होणाऱ्या समारोपाच्या वेळी दादा संघाचे विश्वस्त होते. आटपाडी हा तसा दुष्काळी गाव. जेवण मिळण्याची पण पंचाईत असे. कार्यकर्ते कैकवेळा पोट मारून

काम करीत. शिबिरार्थी कार्यकर्त्यांच्या व सन्माननीय पाहूणे, पदाधिकारी यांच्या जेवणाचा प्रश्न स्थानिक आटपाडी गावकऱ्यांना भेडसावू लागला. कुणीतरी कल्पना काढली की, वर्गणी गोळा करून हा प्रश्न सोडवावा. दादांना अडचण सोडवण्याची ही पद्धत आवडली नाही. त्यांनी सांगितले, "या शिबिराचे यजमानपद सातारा जिल्ह्याकडे, आटपाडीकडे आहे. सबंध महाराष्ट्रातून पाहुणे आपल्या जिल्ह्यात आले असता वर्गणी काढून जेवू घालणे इष्ट नाही. आपल्या जिल्ह्याला हा कमीपणा आहे. कार्यकर्ते घरा-घरातून वाटून देऊन त्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे मला पटत नाही." अन्नशुद्धी-साठी साजूक तूप आणवून, सुग्रास जेवण सामान्य कार्यकर्त्यापासून कुठलाही भेदभाव न करता दादांनी दिले. आग्रह करून जेवू घातले. आपण सर्व एकाच कुटुंबातील आहोत, संकोच करू नये, असे विनवले.

नवीन कार्यकर्ते उमेदीने, ध्येय्याने प्रेरित होऊन या समाजाभिमुख कार्यात उडी घेत. प्रसंगी घराचे, आप्तस्वकीयांचे पाश तोडत. त्यांना परिवारिकता लाभावी म्हणून दादा समयोचितपणे त्यांचे कौतुक करीत. शाबासकीची थाप पाठीवर मारून उत्तेजन देत. अडीअडचणी निवारण्याचा प्रयत्न करीत. तुलसीराम कांबळी, जे ग्रामदानी कार्यात विशेष रस घेत असत, त्यांचा दादांशी प्रथम परिचय जरी ५९ मध्ये झाला तरी पुढे ते वांद्रयाला गांधी सेवा मंदिरमध्ये रहायला येऊन एकनाथ भगत, मधू रावकर, राम देशपांडे यांचेबरोबर लालबाग क्षेत्रात काम करू लागल्यावर दृढ झाला. त्यापूर्वी आमदार, खादी ग्रामोद्योग प्रमुख, भूदान यज्ञ समितीचे संस्थापक, विनोबांचे बालमित्र या बिरूदांमुळे अपरिचितांना दादांचा दबदबा वाटे. पुढे कुसुमताईशी तुळसीरामजी विवाहबद्ध झाले. दोन्हीं पक्षांच्या कुटुंबियांचा विवाहाला विरोध होता. कुसुमताई आजारी पडल्यावर त्यांना घरची आठवण येणं साहजिक होतं. दादा प्रकृतीची विचारपूस करीत, त्यात नवल नव्हते. त्या सुमारास महाराष्ट्र पातळीवर गांधी सेवा मंदिरमध्ये वांद्रयाला सभा होती. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, गोविंदराव देशपांडे, आचार्य भिसे मंडळी सभेनिमित्त आली होती. यजमानपद दादांकडे असणे निर्विवाद होते. पाहुण्यांच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था कुणावर न सोपवता स्वतः जातीने पाहण्याची दादांना सवय होती. या प्रसंगी त्यांनी सत्यनारायणाची पूजा आयोजित करून कांबळी दांपत्यांना पूजेला बसवले. नवदांपत्याकडून पूजा करवून घेण्याचा प्रघात पाळला. त्यांचे कौतुक अनेक मान्यवरांकडून झाल्याने घरदार सोडण्याची रुखरुख थोडी-फार बोथट करण्याची त्यांची सदिच्छा या प्रसंगाने नवविवाहितांना जाणवली.

वांद्रयाचे महात्मा गांधी सेवा मंदिर जसे रचनात्मक कार्याचे केंद्र होते, परगावातील कार्यकर्त्यांचे उतरण्याचे ठिकाण होते, तसेच ग्रॅण्टरोडचे मणिभवन. ह्या मणिभवन मधून भदान यज्ञ समिती, मुंबई, गांधी स्मारक निधी, सर्वोदय, अखिल भारतीय गांधी स्मारक निधी अशा संस्थांचे कामकाज चाले. विचारविनिमय होई. निर्णय घेतले जात. ही इमारत ५३ साली पार मोडकळीला आली होती. अखिल भारतीय गांधी स्मारक निधीचे मंत्री म्हणून भाई धोत्रे काम पाहत. भाई धोत्रे हे दादांचे बालमित्र.

वडोद्याला दोघांची विनोबाजीमुळे जुळलेली मैत्री अभंग होती. इमारतीची नाजूक अवस्था पाहून भाईनी व मावळंकरांनी मणिभवनच्या दुरुस्तीचे, पुनरुज्जीवनाचे काम विश्वासाने दादांवर सोपवले. दादा त्यावेळी मुंबई गांधी स्मारक निधीचे एक मंत्री होते. संचालक होते गणपती शंकरभाई. दादांनी ती अगदी मोडकळीला आलेली इमारत आपल्या इंजिनिअर भावाच्या, केशवराव यांच्या मदतीने दुरुस्त करवून घेतली. काकांनी स्वत: काम विनामूल्य केलं. शिवाय कमीतकमी खर्चात दुरुस्तीचे काम करून दिले. इमारत निर्धोक झाल्याने कामं निर्धास्तपणे होऊ लागली. सौ. पुष्पा ओहोळ या सध्याचा . . . ची मुलाखत मंत्री या नात्याने दादांनी येथेच घेतली. त्या पहिल्या स्त्री कार्यकर्त्या म्हणून काम करू लागल्या. येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजनामागे दादांचा हात असे. मणिभवनच्या सुधारीत इमारतीचे उद्घाटन करायला पंतप्रधान जवाहरलाल नेहरु आले होते. मंत्री म्हणून निधीच्या कामात जास्त रस घेणं दादांच्या बाबतीत नैसर्गिक होतं. त्यावेळी ते आमदार होते, ५७ पर्यंत. १९५३ ते ६० च्या निवडलेल्या विश्वस्त मंडळातील स.का. पाटील, मोरारजीभाई देसाई, गणपती शंकर देसाई यांचेबरोबर विश्वस्त म्हणून दादा काम करीत. वांद्रयाच्या गांधी सेवा मंदिराला १९७१ पर्यंत मणिभवनकडून अनुदान मिळे. गांधी सेवा मंदिराहून भव्य अशा गांधी भवनाची विस्तारित योजना मूर्तस्वरुपात यावी अशी दादांची ओढ होती. पण मतभेदामुळे त्या कल्पनेला मूर्तस्वरूप न येऊन गांधी भवन पाहण्याचे भाग्य दादांना लाभले नाही.

वकिलीचा व्यवसाय ऐन भरात असताना पोषाखाबद्दल काटेकोर, नेटके असणारे दादा आमदारपदाचा राजीनामा देण्याचे ठरल्यावर कपड्यांबद्दल उदासीन राहू लागले. वकिलीच्या सुरुवातीला गांधी टोपीऐवजी झिरमिळाची पगडी घालणारे दादा, व त्यांचे मित्र बाळूभाई मेहता नाशिक तुरुंगात एकत्र स्थानबद्ध होते. त्यांनी दादांना लिहिलेल्या पत्रात या पोशाखाचा गंमतीने उल्लेख केला आहे. नाशिकला तुरुंगात असताना दोघांनी मिळून ज्ञानेश्वरीचे गुजराथी भाषांतर करायला प्रारंभ केला होता. काही अध्याय भाषांतरित झाले पण काम पुरं होऊ शकलं नाही. दादांच्या पाठीमागे हे सत्प्रवृत्तीला पोषक काम पुरं व्हावं असे प्रयत्न चालू आहेत. पवनारला राहणाऱ्या प्रविणाबेननी हे काम पुरं करीत आणलं आहे. १९४५ मध्ये दादा तुरुंगातून सुटले. इतर व्यापात गुंतले. ५५ नंतर तर त्यांनी विनोबाजींच्या चळवळीत स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. धोतर नेसताना निरीला निरी लावून चापूनचोपून धोतर नेसणारे, टोपी ठराविक कोनमध्ये घातली पाहिजे यासाठी दक्ष असणारे दादा काळाच्या पडद्यामागे विस्मृतीत गेले. नवगत कार्यकर्त्यांच्या डोळ्यासमोर दिसले ते कपड्याबद्दल बेफिकीर असणारे, किंचित गबाळे वाटणारे दादा. त्यांचे डोळे, मनात सतत काहीतरी विचारमंथन चालू असल्याने लुकलुकत. बोलायला लागले की, समोरच्या माणसावर दादांचा प्रभाव पडे. आपले विचार ते सहजतेने पटवून देत.

वरवर गबाळे दिसणाऱ्या दादांचं मन मात्र जातिवंत रसिकाचं होतं. हा रसिकतेचा

स्पर्श ते काम करणाऱ्या संस्थांना होई. म्हणून तर ३५०० फूट उंचावरील 'गांधी सेवा, धाम' या त्यांच्या अपत्यवत् नव्हे तर अपत्याहून जास्त प्रिय असलेल्या संस्थेला, गावाला, एक वेगळी आकर्षक ऐट होती. आध्यात्मिक पाया असलेल्या त्यांच्या सश्रद्ध भाविक मनाची साक्ष ठायी-ठायी दिसे. गांधी सेवा मंदिरची इमारत बांधून पुरी झाल्यावर त्यांना आठवण झाली ती अनंतचैतन्य या हाडाच्या कलावंताची. पोर्टेटमध्ये त्यांचे विशेष प्राविण्य. ते मूळ राहणारे कारवारचे. त्यांचा कारवारचा पत्ता दादांना माहीत नव्हता. मॉरिस फ्रीडमन् उर्फ भारतानंद या रमणमहर्षींच्या शिष्याची त्यांना आठवण झाली. दोघही गुरुबंधूना भारतानंदाशी संपर्क साधून दादांनी अनंतचैतन्य यांना पत्र पाठवून मुंबईला बोलावून घेतले. त्यांच्या राहण्याजेवणाची व्यवस्था करून त्यांच्याकडून ज्ञानेश्वर महाराज रमणमहर्षि, महात्मा गांधी, विनोबाजी, यांच्या पूर्णाकृती तसबिरी काढून घेतल्या. आजही श्रद्धा व सौंदर्य यांचा सुरेख समन्वय साधणाऱ्या या तसबिरी गांधी सेवा मंदिरची शोभा वाढवीत आहेत. अनंतचैतन्याची अंगीभूत कला पाहून त्यांना पद्धतशीर शिक्षण द्यावे असा नुकताच आग्रह करून दादा थांबले नाहीत तर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये अनंतचैतन्यांना प्रवेश मिळवून दिला. अनंतचैतन्य कलावंत खरे पण ठराविक चौकटीत बसणारे, कायदे-कानून सांभाळून अर्ज करणे, सल्ला मिळवणे या उपचारावाबत अनभिज्ञ होते. हे सर्व आवश्यक उपचार दादांनी पार पाडून माझ्यासाठी जे. जे. स्कूलचे दार उघडे करून दिले. आजही ते दादांचा कृतज्ञतेने उल्लेख करतात. सांगतात की, "माधवरावांच्यामुळे मी मुंबई पाहिली. अनेक संस्थांची पोट्रेटची कामं मला मिळाली. नाही तर बसलो असतो कारवारच्या भिंती रंगवत". १९४५ साली झालेल्या परिचयाचा बारीकसा धागा पकडून त्या आधाराने खटपट करून योग्य, होतकरू माणसाकडून काम, तेही निर्दोष, करुन घेतले. याच दृष्टीकोनातून २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या निमित्ताने दशग्रंथी उपाध्याय पाध्ये यांचा शांतीपाठ, घनपाठ गांधी मंदिरमध्ये होई. या त्यांच्या हातोटीमुळेच समाजसेवेचा हा जगन्नाथाचा रथ त्यांना हाकता आला.

विद्यार्थीदशेपासून त्यांच्यावर असलेला विनोबांचा ठसा ज्याप्रमाणे पुसट झाला नव्हताच त्याप्रमाणे त्यांची नैसर्गिक, भाविक, अध्यात्मिक प्रवृत्ती कमी झाली नव्हती. भाविक म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसावर उमटे. त्यांची आळंदी, पंढरपूरवारी, त्यांत परिचितांना सहभागी करून घेणं चुकलं नाही. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला ते रमणमहर्षी, अरविंदाश्रम या त्यांच्या पवित्र तीर्थस्थानी न चुकता हजर रहात. गुळवणी महाराज, गोंडवोले महाराज, गाडगे बुवा यांचे पाय वास्तूला लागले की वास्तू पवित्र झाली अशी त्यांची निरंतर भावना होती. मग वेगळी वास्तुशान्त आमच्याकडे होत नसे. आमच्याकडील लग्न, मुंजी ज्ञानेश्वर माउलींच्या साक्षीने आळंदीला झाल्या. टीका होई की मुंजी ज्ञानेश्वर महाराजाच्या समोर होतात, ठीक आहे. पण लग्न त्या ब्रह्मचाऱ्यासमोर लावण्यात कसलं औचित्य आहे? पण औचित्यापेक्षा माउलींचा आशीर्वादाचं त्यांना अप्रुप वाटे. दादांनी आपल्या नातवाची, म्हणजे माझ्या मुलाची अनीलची मुंज आळंदीला करण्याचा प्रस्ताव

मांडला. सगळ्यांनी तो उत्स्फूर्तपणे उचलून धरला. आश्चर्याची बाब म्हणजे माझे सासरे बाबाजी मोघे यांची समजूत पटवून दिली. कार्याला कुठे न जाणारे बाबाजी मुंजीला हजर राहण्यासाठी आले. मुंजीच्या दिवशी सनई, चौघडा वाजू लागल्यावर बाबाजींचें बिनसले. आनंदी उत्साही वातावरण बदलून गेले आणि ते वळकटी बांधून आळंदीहून पवनारला जायला निघाले. सगळ्यांची पाचावर धारण बसली. गडबडीत असलेल्या दादांच्यापर्यंत हा प्रकार गेला. बाबाजींना वाटलं सनई, चौघडा लावणं म्हणजे पैशाची उधळपट्टी आहे. दादा हातातलं काम टाकून बाबाजींच्या जवळ गेले–म्हणाले 'तुम्ही १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, कुणा पाहुण्यांचं स्वागत करायचं असलं तर सनई चौघडा लावता मंगल, प्रसन्न वातावरण निर्माण व्हावं म्हणून. मग इथे हरकत घ्यायचं काय कारण आहे? असा कितीसा खर्च होणार आहे? जादूची कांडी फिरली. बाबाजींनी बांधलेला बिस्तरा सोडला. जाणं रद्द केलं. मुंजीसाठी जमलेल्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

## घरगुती दादा :

हा श्लोकांचा उत्तरार्ध दादांना फार लागू पडत होता. आर्थिकदृष्ट्या ही उक्ती यथार्थ नसली तरी एका योजनेतून दुसरी योजना, दुसरीतून तिसरी, याला दादांच्या आयुष्यात शेवटपर्यंत खंड नव्हता. यासाठी पायाला चक्र लावल्याप्रमाणे ते प्रवास करीत. मग तो कितीही कष्टकारक असो. परमेश्वर कृपेने, ध्यान धारणेने त्यांना आरोग्याचे वरदान लाभले होते. उत्साहाची कारंजी नेहमी थुईथुई नाचत. दमणे, शरीराचे चोज पुरवणे त्यांच्या स्वभावात नव्हते. जागा राखणे, प्रथम वर्गाचा प्रवास, रिक्षा, टॅक्सी उठसूठ करण या चैनी त्यांनी केल्या नाहीत. ते शक्य तितके पायी जात. सामान उचलण्यासाठी हमालावर अवलंबून रहात नसत. प्रवासासाठी त्यांनी एक घोंगडीचा बिस्तरा शिवून घेतला होता. विकत मिळणाऱ्या बिस्त-यासारखेच कप्पे असलेला, पण वजनाला हलका. एका कप्पात अंग पुसायचा टॉवेल अगर पंचामध्ये घालायचे कपडे ठेवून टॉवेल त्याभोवती गुंडाळून केलेली उशी, दुसऱ्या कप्प्यात पांघरायची शाल. बिस्त-याला बंद लावल्यामुळे घडी करून बांधलेला हा बिस्तरा सुटसुटीत होई. इतक्या तुटपुंज्या साधनावर दादा कुठेही जात. कितीही लांब प्रवास करीत. प्रवासाहून घरी आले, मुक्काम घरी असला की कुठलंही काम करायला तयार असत. भाजी चिरण, निवडण, स्वयंपाक करणं न चिडता आनंदाने करीत. पण त्यांच्या हाताशी काम करणं आम्हाला संकट वाटे. त्यांच्या हुकुमाची तामिली करता करता कमरेचा काटा ढिला व्हायची वेळ येई. माझे आजोबा कर्मठ वैष्णव ब्राम्हण. सोवळ-ओवळं फार. त्यात श्राध्दपक्ष असलं तर मग विचारूच नका. आम्हाला स्वयंपाकघरात मज्जाव असे. अशावेळी दादा ओलेत्याने स्वयंपाक करीत. दार लावलेलं असे. उगाच लहान मूल चूकून आत गेलं तर? स्वयंपाक झाल्यावर दादा ब्राम्हण म्हणून जेवायला बसत. नैवेद्य, दोघांचं जेवण आटोपलं की दार उघडे. इतक मनापासून सोवळ्याच तंत्र सांभाळणारा दुसरा आचारी व ब्राम्हण आजोबांना तरी कसा मिळणार? माझ्या

पाठचा भाऊ बापू काही वेळा वैतागून, तर कांही वेळा चिडून विनोदाने आजोबांना म्हणे "मजा आहे तुमची. आमदार स्वयंपाकी ओलेत्याने स्वयंपाक करायला तुम्हाला मिळाला". हे सगळ कर्मकांड संपवून कुणाच्या शेऱ्याकडे लक्ष न देता दादा कपडे बदलून कामासाठी निघून गेलेले असत. माझ्या आजोबांचे मन सांभाळण्यामागे त्यांनी माझ्या आजीला तिच्या मृत्युसमयी दिलेलं वचन होतं. आजीच्या पाठी आजोबांना अंतर न देण्याच. आजोबांचे सोवळ्याच तंत्र सांभाळतांना त्यांची एकुलती एक मुलगी एखादे वेळी वैतागे पण दादा शांत असत. ६३ मध्ये आजोबा वारले. त्यावेळी दादा सहजपणे उदगारले- आज मी वचनमुक्त झालो". दादा नेहमी बाहेर असल्याने बाहेरची आघाडी आजोबा काटकसरीने, हिशोबीपणाने सांभाळीत . बावगा खर्च, बेशिस्त वागण त्यांना खपत नसे. दादा घरी असले की वेळी अवेळी पाहुण्यांची बरीच वर्दळ असे. घरगुती संबंध असलेल्या काही बायका जिना चढून सरळ वर येत. बाई स्वयंपाकघरात असली तर दादा हाक मारीत. अहो बाई, अहो बाई, लवकर बाहेर या. धीर न निघून आपणच आत जात. सांगत, "एकादशीबाई आल्या आहेत". बाई बुचकळ्यात पडून या कोण एकादशीबाई म्हणून प्रश्नार्थक मुद्रेने बाहेर जाई, तर बाहेर प्रबोधिनीबाई, योगिनीबाई आलेली असे. कुणी दोघी जणी आल्या की, ऋद्धिसिद्धी आल्या म्हणून गौरवाने संबोधून स्वागत करीत. त्यांच्या अबोल स्वभावाला असलेली विनोदाची, मिस्कीलपणाची डूब निकट परिचय झाल्याशिवाय लक्षात येत नसे. मधूनच त्यांना कधीतरी दुसऱ्याची फिरकी घेण्याची लहर येई. एकदा नुकतेच लग्न झालेली बापूची बायको दादा बाई बरोबर प्रवास करीत होती. ५६—५७ ची गंमत. दादा सारखे प्रवासात सुनेला काय हव, नकोची चौकशी करीत होते. तू खिडकीजवळ बस, असा आग्रह करून करून खिडकी जवळची जागा बसायला दिली. समोरच्या बाकावरील प्रवासी निरीक्षण करीत होते. शेवटी त्यांना राहवल नाही. "मुलीचे नुकतच लग्न झाले आहे का? तिला सासरी पोचवायला जाता का? " दादांनी हसून घालवले, गप्प बसले. पुढचा प्रश्न आला "तुमचे जावई काय करतात"? तेव्हा बाईने सांगितले की, ही आमची सून आहे. आमच्या घरी सुनांना नेहमी झुकत माप दिले जाई. परक्या मुलींना दडपण वाटू नये म्हणून परोपरीने कोशीस होई. कौतुक होई. परीक्षा पास झाल्यावर सत्यनारायणाची पूजा स्त्री-पुरुष हा भेदभाव न करता पास होणारीच्या हस्ते होई. दुसऱ्याची सतत काळजी घेणा-या वडीलपणाच्या भूमिकेची दादांना इतकी सवय झाली होती की, त्यांचा पाठचा भाऊ त्यांच्या बरोबर रस्त्याने जात असला आणि तो रस्ता ओलांडायला लागला तरी त्यांना धीर निघत नसे. पटकन मोठ्यांदा ओरडत, तो, तो मूर्ख पहा कसा रस्ता ओलांडतो'. मग परकं कुणी एकतय याचं त्यांना भान नसे, पर्वा वाटत नसे. बरं, हा पाठचा भाऊही ४०–४५ वर्ष ओलांडलेला, तंदुरुस्त, इंजिनिअर. तो दादांच ओरडण मनावर घेत नसे. उलट त्यामागील आपुलकीची, प्रेमाची भावना काकांना सुखवीत असे. अशी वेळ ते नुसतं हसुन साजरी करीत.

## दादांचे परिभ्रमण

हिमालयाच दादांच आकर्षण सर्वश्रुत आहे. वर्षातून एकदा तरी त्या भव्य दिव्य गिरिराजंच दर्शन घेतल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. मग तेथील दऱ्याखोऱ्याचा, गुहा यांचा शोध घ्यायला सुरुवात होई. कुणी बरोबर असलं तर वाहवा, नाही तर "एकला चलो रे" म्हणत पडशी खांद्यावर टाकून हे गिर्यारोहक निघत. एखाद्या गुहेत, जी बाहेरून दिसत नसे अशा ठिकाणी, दादा जात. कुणी फलाहारी महाराज, देखण्या कृष्णमूर्तीच्या सोबतीने एकटे राहिल्याचा शोध लागे. हे फलाहारी महाराज थंडी व पावसाळ्यातही आपली गुहा सोडीत नसत. त्या विजनवासात त्यांची सगुण उपासना चाले. त्यांच्या गुहेपर्यंत मार्ग काढत येणाऱ्या शोधकाला, साधकाला कृष्णाचा प्रसाद म्हणून ते जेवू घालीत. दादांनी तेथे प्रसाद भक्षण केला व मनोमन दरवर्षी आवश्यक वस्तुंचे पार्सल फलाहारी महाराजांना पाठवायाचे ठरवले. ते होते तोपर्यंत हे पार्सल न चुकता ठराविक पत्त्यावर जाई, त्यांना पोच येई. अशा हिमालय भेटीतून मानसरोवराच्या यात्रेची कल्पना दृढ झाली. ज्यावेळी यात्रेला जायचे ठरले त्यावेळी चीन-पाकिस्तानचे युद्ध सुरू झाले. साध्या धार्मिक यात्रेच्या हेतूने जाणाऱ्या यात्रेकरूंना सुद्धा भारत सरकार परवानगी देईना. त्यावेळचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची खास परवानगी मिळवून दादांनी सहप्रवाशांबरोबर यात्रेच प्रस्थान ठेवले. जाण्यापूर्वी भारत सरकारला लिहून द्यावे लागले, "आमच काही बर वाईट झाले तर आमचे आम्ही जबाबदार ?" जाण्यापूर्वी दादांनी मृत्युपत्र केल. काकांच्या हवाली केल. सूचना दिली, "जगून वाचून परत आलोतर प्रश्न नाही, जर बर वाईट झाले तर लिफाफ्यात लिहिल्याप्रमाणे व्यवस्था करावी. दोघांव्यतिरिक्त हे बाईला, काकुलाही माहीत नव्हते. दादांची यात्रेची तयारी चालू होती, त्यावेळी माझी प्रकृती चिंताजनक होती. यात्रेहून परत येईपर्यंत मी असेन याचा भरवसा नव्हता. पण दादांचे एकदा ठरले ते ठरले. "होणारे न चुके होय जरीही ब्रह्मा तया आडवा" अशी मनाची समजूत करुन घेतली. निघण्यापूर्वी भेटून गेले. दादांचा-स्वभाव अंगवळणी पडल्याने वाईट वाटून घेण्याचा प्रश्न नव्हता. तरी मनाचा कोपरा कुठे तरी हलला. मानससरोवर, तिबेट, चीन हे भारतीय चिनी प्रदेश सीमारेषेवर एकमेकांना भिडणारे. काही विपरीत न घडता यात्रेकरू मानसरोवराला जाऊन पोचले. सीमारेषेवर या भारतीय यात्रेकरूंना चिनी सैनिक गस्त घालताना दिसत होते, आणि चिन्यांना हे यात्रेकरु दिसले. चिनी अधिकाऱ्याला यात्रेकरूच्या मिषाने हिंदी हेर आल्याच्या संशयाने पछाडले. यात्रेकरुंना जागच्या जागी थांबायला सांगून तो अधिकारी स्वतः पुढे आला. दादांच्या वकिली चाणाक्षपणाने, प्रसंगावधानाने त्या अधिकाऱ्याला पुरेपूर पटवून दिले की, तीर्थयात्रेव्यतिरिक्त दुसरा कुठलाही हेतू मनात धरुन हा गट आलेला नाही. दुसऱ्या दिवसाच्या चहाचे आमंत्रण देऊन अधिकारी परतला. दुसऱ्या दिवशी स्वतः तो अधिकारी या पाहुण्यांना न्यायला व पोचवायला आला. त्यांची व्यवस्थेची जातीने देखभाल केली, कोऱ्या चहामध्ये लोण्याचे तुकडे घालून विशिष्ट प्रकारचा चहा


पाहुण्यांना दिला. वेडवाकड तोंड करून हा नामांकित चहा सर्वांनी संपवला. चवीची बात सोडा, शीर सलामत राखून परतायला मिळाल, हेही नसे थोडके, या मानसरोवराची यात्रा सफल करुन परतलेल्या यात्रेकरूंचा त्यावेळचे राष्ट्रपती राजेंद्रबाबू यांनी श्रीफळ देऊन सन्मान केला.

प्रवास म्हटला की दादांची पंचेंद्रिये पूर्ण जागृत होऊन सर्व शक्तीनिशी काम करीत की काय न कळे. ऐनवेळी आलेल्या अडचणीवर ते समयोचितपणाने मात करीत. मला आठवतय, दादा त्यावेळी ७० रीच्या आसपास होते. आम्ही मद्रास मेलने रामेश्वर, कन्या-कुमारी या दक्षिणेच्या प्रवासाला निघालो होतो. काही परदेशीय विद्यार्थी आमचे सह-प्रवासी होते. ओसीअेम्एफजीच्या वैद्यकीय परीक्षेसाठी ते रेल्वेचा प्रवास संपवून पुढ सिलोनला स्टीमरने जाणार होते. स्टीमरचे आरक्षण त्यांनी करून ठेवले होते. पंबम् व इग्मोर दोन स्टेशन झाली की आमचा प्रवास संपायचा होता. पण मनात योज-लेले निविघ्नपणे पार पडल तर, हा तरच मोठा लांबलचक आहे. पंबम्साठी गाडी सुटली आणि काही सेकंदात गाडीच्या दोन्ही बाजूच्या मोकळ्या मैदानातून एका हातात पातळ डांबराचे डबे व दुसऱ्या हातात कपडचाचे बोळे घेतलेली शाळकरी मुले झुंडीने येऊन रुळा वर येऊन उभी राहिली. ड्रायव्हरला गाडी थांबवणे भाग होत. गाडी थांबण्यापूर्वी "हिंदी डाऊन, हिंदी डाऊन 'च्या घोषणा आमच्या कानावर आदळल्या. गाडी थांबली न थांबली तोच मुलांनी देवनागरी लिपीत लिहिलेल्या "तीन शयनागार" या अक्षरावर डांबर फिरवून ती अक्षर पुसुन टाकली. यातून एकही डबा, एकही अक्षर वाचले नाही. मुले एवढयावर थांबली नाहीत. त्यांनी दगडफेकीला सुरुवात केली. गंमत वाटून काही प्रवाशांनी उघडचा दाराखिडक्याशी गर्दी केली होती. त्यांनी भराभरा दारखिडक्या बंद करायला सुरुवात केली. पण दुदवाने या दगडफेकीचा प्रसाद आमच्याबरोबर प्रवास करणाऱ्या काही परदेशी विद्यार्थ्यांना मिळाला. कपाळावर दगड लागून भळाभळा रक्त वाहू लागले. रेल्वेमार्ग अडल्याने गाडी पुढे जाऊ शकत नव्हती. पोलिसांचा पत्ता नव्हता. दादांनी काय केले, प्रवासात सोईस्कर म्हणून घातलेल्या लेंग्यावर घाईघाईने पांढरे धोतर लुंगीसारखे गुंडाळले. रंग तर मद्राशाला मिळताजुळता होताच. दगड-फेकीला न जुमानता निर्धाराने, निर्धास्तपणे दारात उभे राहिले, घोषणा देऊ लागले. "हिंदी डाऊन, हिंदी डाऊन". मुलांना वाटले असेल आपलाच कुणी पाठीराखा आहे. डांबराचे डबे उचलून मुले मुकाटचाने चालू लागली. गाडी इग्मोरसाठी मार्गी लागली.

कुणाचे मन कसे राखावे हे मनकवडेपणामुळे दादांना बरोबर कळे. रामेश्वरला दशपुत्रे नावाचे पुण्याचे उपाध्याय स्थायिक झाले होते. त्यांच्या सौभाग्यवतीला महाराष्ट्रातील चांगल्या गव्हाच्या पोळीची सारखी आठवण येई. ही त्यांची आवड लक्षात ठेवून दादांनी आम्हाला रामेश्वरच्या प्रवासात कणीक बरोबर घ्यायला लावली. नसते ओझे अस कुरकुरत आम्ही कणीक बरोबर घेतली. त्या बाईना भेटल्यावर त्यांना कणीक दिली. ती सोनेरी, पिवळट, सकस कणीक पाहून ती

बाई किती खूष झाली म्हणून सांगू, ही खुषी पैशात मोजता येणारी नव्हती. नशाबंदी मंडळाच्या संघटक व स्वातंत्र्यसैनिका विमल आम्ब्रे यांनी कोकण सोडल तरी त्यांची दहीभाताची आवड कायम आहे हे लक्षात ठेवून प्रवासातही दादा आठवणीने हो त्यांची आवड पुरवीत. बोलता बोलता चार गोष्टी सांगत. आता इतकी वर्षे प्रपंच केला, आता प्रपंचातून मन काढून घ्यावे. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्याने भडकून न जाता डोक शांत ठेवून विचार करावा म्हणजे जास्त निर्दोष कार्य होते. नेहमी सांगत, 'तू मीराबाई हो, वारकरी हो'. तीर्थक्षेत्री त्यांच्याबरोबर गेल, एखाद्या समाधीचे, मूर्तीचे ज्याचे त्याने दर्शन केल्याने त्यांचे समाधान होत नसे. त्या दर्शन घेणाऱ्याच डोक स्वतःच्या हाताने समाधीवर, मूर्तीवर टेकवत. काही वेळा डोक आपटल जाई हे त्यांच्या लक्षात येत नसे. कसे छान दर्शन करवले या आनंदात ते असत. कार्यकर्त्यांच्या सुखसोयीकडे त्याचप्रमाणे अडचणींकडे ते लक्ष देत, तितकच त्यांच्या भिडस्तपणाचा कुणी गैरफायदा उठवीत नाहीत ना, हे पहात. दादांच्या सामाजिक संस्थांच्या टंकलेखनासाठी श्री. शशो काळे यांचेकडे त्यांना वारंवार जावे लागे. काळे सांगतात, 'इट वॉज प्लेझर टु वर्क वुईथ हिम' मजकूर सांगताना कधी अडखळणे नाही. दुसऱ्या पानावर मजकूर पुढे चालू होणार असला तरी शेवटचा शब्द विचारण नाही. पान बदलल की मजकुराचा ओघ न अडखळता सुरू. एकदा दादांच्या बरोबर असेच कुणीतरी होते. दादांच काम संपल तसे त्या फुकटच्या गृहस्थांनी स्वतःच्या पोतडीतून कागद काढले आणि टंकलेखन करायला काळे यांना फर्मावले. त्यांचे अरेरावी वागण-बोलण दादांना रुचले नाही. तिथल्या तिथे फटकारल, 'तुम्हाला काय वाटल, एबीसीडी एबीसीडी करणारा, हा झाडाखाली बसणारा टंकलेखक आहे? त्या गृहस्थाने मुकाटयाने कागद पिशवीत घातले. ज्ञानेश्वर माऊलीच्या ओवीचा संदर्भ देऊन ते सल्ला देत, साच लटिके ओळखावे। हित अहित जाणावे। हिताचि लागी।।

* * *



डावीकडून : (१) वै. गोपाळ काळे (२) वै. माधवराव देशपांडे
(३) वै. विनोबा भावे (४) वै. बाबाजी मोघे

## ३. जो कर्म करी सकळे, परी कर्मबंधा नाकळे

**सिद्ध बेट—तपोवन**

साच लटिके ओळखावे । हित अहित जाणावे । हिताचि लागी ।। ही ज्ञानेश्वर माऊलीची शिकवण दादा त्यांच्या सहवासात येणाऱ्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करीत. व्यवहारी जगात वागण्याचा तो एक प्रकारचा वस्तुपाठ होता. स्वतःच्या हितासाठी खऱ्याखोटयाचा पडताळा घ्यावा. हित, अहित जाणून तसे वागण्याचा परिपाठ देणारे दादा स्वतः मात्र तो धडा गिरवू शकले नाहीत. श्रद्धाळूपणा व भाविकपणा दादांच्या बुद्धिवादावर नेहमी मात करी. ज्ञानोबा, विठोबा यांना परमदैवत मानणारे दादा पंढरपूरच्या विठूरायाच्या राऊळातील गरुड खांबाला मिठी मारीत, भान हरपून नाचत, डोळयातून अश्रूधारा वाहत. दादांची हीच अवस्था अरविंदबाबू, रमणमहर्षींकडे गेल्यावर होई. १९३० पासून दादा वर्षातून एकदा रमणमहर्षींकडे जात. रमणमहर्षी दादांचे मार्गदर्शक गुरू. बालपणाचा निश्चित निरागसपणा वाटयाला न येता खडतर शैशव संपले, विद्यार्थीदशेत कष्टसाध्य विद्याभ्यास पूर्ण केला, नोकरी केली. त्याला जोड हवी म्हणून शिकवण्या केल्या, कुटुंबाच्या चरितार्थासाठी वकिली केली, उत्तम वकील म्हणून नावलौकिक मिळवला, लक्ष्मीची कृपादृष्टी वळता वळता वकिलीचा व्यवसाय सोडला. स्वातंत्र्याच्या पेटत्या होमात कुवतीप्रमाणे अर्घ्य अर्पण केले. स्वातंत्र्योत्तर काळांत सत्तेच्या राजकारणापासून जाणीवपूर्वक दूर राहिले. चालून आलेली अनेक अधिकारपद दूर सारली. स्वतः सामाजिक बांधिलकी मानली आणि या बांधिलकीची जाणीव नवोदित कार्यकर्त्यांना करून देऊन अनेक निष्ठावंत कार्यकर्ते तयार केले. आतापर्यंतच्या ६५—७० वर्षाच्या आयुष्यात अनेक वादळे आली. सुखदुःखाचे कडू-गोड घोट पचवले. हे सर्व त्यांच्या अविचल अध्यात्म निष्ठेच्या बळावर. या गुरुमाऊलीशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणे, सगळा भार तिच्यावर टाकून सतत कार्यप्रवृत्त असणे हे साच आहे, मनःशान्ती देणारे आहे, हे दादांनी मानल. तात्पुरत्या संकटाकडे ते अलिप्तपणे पाहू शकले. त्यातून मार्ग काढून बाहेर पडू शकले. काही अडचणीच्या निराकरणासाठी ते जसे पवनारला विनोबाजींकडे जात तसेच रमणमहर्षींकडे जात. रमणाश्रमाच्या शांत, प्रसन्न वातावरणाचे त्यांना वाटणारे आकर्षण दिवसेंदिवस वाढत होते. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात ज्ञानेश्वर माऊलीने ध्यानधारणा, मनन, चिंतन करण्यासाठी साधकाने कशी जागा निवडावी याचे रसाळ काव्यमय शब्दचित्र समर्थपणे उभे केले आहे. येणाऱ्या-जाणाऱ्याच्या पायरवाने जी मिळेचिना अशी एकान्त जागा साधकाने शोधून काढावी. त्या जागी वड, औदुंबर, पिंपळ, कडुलिंबासारखे दाट

छाया देणारे वृक्ष असावेत पण पक्ष्यांचा कर्कश गोंगाट नसावा, वाजने झुळझुळ वाहणारी नदी, झरा असावा पण त्याचे पाणी पावसाळ्यांतही गढूळ होणारे नसावे. जलाशय संथ असावा. पाणिलगे, हंस, सारस पक्षी, एखादा दुसरा मोर, बस इतकेच या परिसरात पुरे. पण एक मात्र इथे हवेच हवे, ते म्हणजे एखादे शिवालय किंवा एखादा निगूढ मठ. साधनेला पोषक अशा रमणाश्रमातील सदृश्य वातावरणाचा दादांनी अनेकवेळा लाभ घेतला होता. साधकासाठी आश्रमांत छोटया छोटया कुटया होत्या. प्रार्थनागृह होते. या पवित्र वातावरणाने भारून गेलेल्या दादांच्या मनात एक कल्पना घोळत होती. रमणाश्रमाची प्रतिकृती महाराष्ट्रात का असू नये? महाराष्ट्रात, ती सुद्धा आळंदीला का नसावी? आळंदीच्या गावाबाहेर केळेगावच्या आसपास मोकळी जागा आहे. जिथे माऊलीच्या आईवडिलांचे वाळीत टाकल्यानंतरचे वास्तव्य होते, जी जागा या चारी भावंडांच्या पदस्पर्शाने पुनीत झाली होती. सिद्ध बेट म्हणून ओळखली जाणारी ही जागा जर आपल्याला मिळाली तर ? नवे विचारचक्र सुरू झाले.

बडोद्याचे दादांचे मित्र पिंपळस्कर यांचेकडे दादा नेहमी जात. त्यांचेकडे गेले असता बोलण्याच्या ओघात ही सिद्धबेट तपोवनाची कल्पना दादांनी विस्ताराने आपल्या मित्राच्या कानावर घातली. उत्स्फूर्तपणे १,००० रुपयांचा चेक फाडला, मित्राच्या पुढे ठेवला. आता दुसरे १,००० रुपये तुमचे असे बोलून त्यांच्याकडून दुसरा चेक घेतला. पिंपळस्करांच्याकडे तपोवन सिद्धबेटाची मुहुर्तमेढ रोवली. असेच आणखी इतर परिचितांच्याकडून हजार-हजार रुपये घेऊन संस्था रजिस्टर करण्याला आवश्यक असणारी सदस्यसंख्या पुरी केली. 'श्री ज्ञानदेव सिद्धबेट तपोवन-ज्ञानयोग अध्यात्म विद्यापीठ प्रतिष्ठान' ह्या नावाने एफ-६७०, पुणे या नंबराखाली यावर्षी संस्था रजिस्टर झाली. आळंदीच्या नृसिंह सरस्वती स्वामींच्या मठाचे उत्तराधिकारी व त्यांचे शिष्य वै. गोडबोले महाराज यांनी सिद्धबेटी तपोवन झाल्याचे त्यांच्या अंतः-चक्षूंनी पाहिले. ७०-७१ मध्ये मठात दादांची व संतकृपा या मासिकाचे संपादक मामासाहेब देशपांडे यांची योगायोगाने गाठ पडली. दोन देशपांडे व एक गोडबोले. तिघांचा ज्ञानेश्वरीचा दांडगा व्यासंग. तिघांना माऊलीबद्दल ओढ. अशा गाठी-भेटीतून, चर्चासत्रातून तपोवनाचा ढोबळ आराखडा तयार झाला. गोडबोले महाराजांनी सिद्धबेटी असलेली नृसिंह सरस्वती संस्थानची जमीन या भव्य योजनेच्या शुभारंभासाठी दिली. या प्रकल्पाला गुळवणी महाराज, पुणे, गुरुदेव रानडे, जमखिडी, स्वामी स्वरुपानंद, पावस, डोंगरेशास्त्री, बडोदे, पांडुरंगशास्त्री आठवले अशा अनेक या क्षेत्रातील अधिकारी पुरुषांनी आशीर्वाद दिला. आराखडा कागदोपत्री तयार झाला पण त्यासाठी जमीन कब्जात यायला हवी होती. त्यासाठी १०० एकर जमीन मिळावी म्हणून सरकार दरबारी संयोजकांनी अर्ज केला. सरकारी दप्तरदिरंगाईचा हिसका संयोजकांना पावलोपावली जाणवू लागला. जवळ जवळ १५ वर्ष होतील. प्रगती

कासवाच्या गतीने चालली आहे. चांगल्या कामासाठी सुद्धा वेळकाढू धोरण कसे राबवले जाते याचे तपोवन हे एक जीवंत उदाहरण आहे. या योजनेखाली सुरुवातीला देणग्या दिलेले काही भक्त १५ वर्षांच्या कालावधीत माऊलीमध्ये विलीन झाले. त्यापैकीच दादा हे एक. त्यांना ह्या योजनेने घेतलेले मूर्तस्वरुप पहायला मिळाले नाही. तपोवनी ध्यान धारणा, मनन, चिंतन करण्याचे त्यांचे स्वप्न, स्वप्नच राहिले.

सरकारकडून तपोवनासाठी म्हणून मिळवायची ही जागा म्हणजे ज्ञानेश्वर माऊलीच्या आईवडिलांच्या उग्र तपाचरणाने पुनीत झालेली कर्मभूमी. येथे विठ्ठल मंदिर आहे. विठ्ठलपंत, रुक्मिणीबाई यांच्या समाध्या आहेत. काळाच्या तडाख्याने त्या नामशेष होण्याची धास्ती आहे. ज्ञानेश्वर माऊलीची मंदिरे जागोजागी आहेत. पण हा कोवळा अंकूर ज्यांनी जन्माला घातला त्या मातापितरांचं स्मारक तपोवनात व्हावे अशी संयोजकांची, ज्ञानेश्वर भक्तांची कल्पना आहे. ज्या ठिकाणी या चारही साक्षात्कारी संतांचे बालपण गेले, ती ही पावनभूमी १०० वर्षांपूर्वी गायरान म्हणून ओळखली जाई. येथील समाधीच्या देखरेखीसाठी, पूजेसाठी नेमलेल्या पुजाऱ्यांची गुरे या पडीत जमिनीत चरत. ही शेकडो एकर जमीन आता आतापर्यंत दुर्लक्षित होती. पण ज्यावेळी तपोवनासाठी ही जमीन मिळवण्याचा प्रयत्न चालू आहे असे कळले त्यावेळी कुणी कुणी कुळ म्हणून जमिनीवर हक्क दाखवायला सुरुवात केली. कुणी सातबाराच्या उताऱ्यात मालक म्हणून आपलं नाव घुसवले. काही भोंदू साधूबैराग्यांनी छोटया छोटया कुटया उभारल्या. आपला 'शिष्यसंप्रदाय' वाढवायला सुरुवात केली. उलटपक्षी प्रतिपादन करायला सुरुवात केली. तुम्ही जे तपोवन तयार करणार आहात, ज्ञानार्जन, तपःसाधना ते आम्ही करूनच राहिलो आहोत. पाटील, त्यांचे असलेले नसलेले वारस, जमिनीच्या वेगवेगळ्या भागावर आपला हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू लागले. जमिनीचा सोपा वाटणारा प्रश्न भलताच किचकट, वेळखाऊ होऊन बसला. दंडेली, धटिंगपणा वाढल्याने तेथे जाणं मुष्कील झाले. जमीन तर हवी होती, तीही सलग. नाममात्र शुल्क घेऊन सरकारने ही जमीन द्यावी असा अर्ज केलाच होता. तपोवनाची मूळ कल्पना दादांची असल्याने त्यांना या योजनेत फार आस्था होती. कायद्याचे ज्ञान होते. पण काय झालं या १०-१२ वर्षांत महाराष्ट्राचे मुख्य मंत्री वारंवार बदलले. योजनेला चालना मिळून ती जरा पुढे सरकते तो मुख्य मंत्री बदललेला असे. परत पहिले पाढे पंचावन, परत ती योजना, तिचा ऊहापोह, चर्चा या चक्रातून शिष्टमंडळाला जावे लागे. सगळ्याच मुख्य मंत्र्यांना योजनेबद्दल सारखी आस्था कशी असणार, नवी विटी, नवं राज्य आलं की संदर्भ बदलत, अर्थ बदलत. दादांच्या बरोबर काम करणारी, सत्ता राबवणारी माणसे आता निवृत्त झाली होती, थकली होती. सामाजिक मूल्य बदलल्याने अडकून पडलेली कामे कशी सोडवून घ्यावीत याच्या चाव्या वेगळ्या झाल्या होत्या. अर्ज-विनंत्या कायद्याच्या चौकटीत बसवून, हेलपाटे घालण्यात १०-१२ वर्षे गेली. जमीन मिळाली तर पैशाकडून अडायला नको म्हणून जमा केलेले पैसे बँकेत ठेवून दिले. पण हे घोंगडं १०-१२ वर्षे भिजत

पडले आणि जमिनीच्या किमती वारेमाप वाढल्या. १०० एकर ऐवजी १२ एकर जमीन मिळवून काम सुरू करावे असे ठरले. दादांचे १०-१२ वर्षाचे प्रयत्न अपुरे पडले. दादांच्या बरोबरीने मामा देशपांडे धडपड करीत. त्यांनी नेट लावून प्रश्न धसास लावला. १२ एकर जमीन सरकारी निर्णयाने तपोवनाला मिळाली. दादा आपलेपणाने मामा देशपांडे यांना एकेरी नांवाने संबोधीत. नेहमी म्हणत, 'हे काम करील तर मामाच पुरं करील' जमीन मिळाली. नुकताच जानेवारी १९८७ मध्ये ताबाही मिळाला. कंपाऊंडच्या कामाला सुरवात झाली आहे. संतकृपेच्या काकतकरांनी बेचैन करणारी कहाणी सांगितली. मामा देशपांडे यांचे तपोवनाच्या अनुषंगाचे कागदपत्र, आर्थिक व्यवहार अगदी चोख आहेत. अशा स्वच्छ व्यवहार असणाऱ्या कल्याणकारी संस्थेला किती शक्ती खर्ची घालावी लागली याचा विषाद वाटला. मनांत आणले तर कुठलीही संकल्पना कायद्यात बसवून चुटकीसारखे काम करणाऱ्या सरकारला तितकेच एखाद्या सतचरित् संस्थेला रखडवता येत हे परत पटले.

## जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

ह्या तपोवनासाठी दादांनी जीव पाखडला. पण त्याचे मूर्तस्वरूप पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. वयाने पंचाहत्तरी गाठली होती. डॉ. इराणी यांचेकडे दादांचो मोतीबिन्दूची शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रिया यशस्वी झाली पण नंतर जी बंधन पाळायला हवीत ती त्यांच्या धडपड्या स्वभावामुळे पाळली गेली नाहीत. बिछान्यावर ठराविक पद्धतीने पडून राहणे त्यांच्या स्वभावात बसणारे नव्हते. इतर रुग्णांची चौकशी करीत ते दवाखान्यात फिरत. डॉ. इराणींच्या लक्षात दादांनी घेतलेले स्वातंत्र आले. त्यांनी बजावले, 'अशा वागण्याने शस्त्रक्रिया यशस्वी होऊनही उपयोग होणार नाही.' तरीही दादा जमेल तेव्हा बिछाना सोडण्याची संधी सोडीत नसत. परिणाम एकच झाला, आधीच अधू असलेली दृष्टी जास्त मंद झाली. नाशिकच्या तुरुंगात असताना दादांनी व बाळूभाई मेहतांनी ज्ञानेश्वरीचे गुजराथी भाषान्तर करायला सुरुवात केली होती. ४५ साली तुरुंगातून सुटल्यावर तितका निवांतपणा मिळाला नाही. भाषान्तराचे काम अपुरे राहिले. आता बाह्यचक्षु कमजोर झाल्याने बाहेरच्या व्यापाला मर्यादा पडल्या. डोळ्यांच्या जोडीला कानांनी हळूहळू रजा घ्यायला सुरुवात केली. ७२ साली ते नशाबंदी मंडळातून निवृत्त झाले. आळंदीच्या तपोवन सिद्धिबेटाचा प्रकल्प नजरेसमोर ठेवून अवघे पाऊणशे वयमान होते. सतत 'ऑन द व्हील्स' असणाऱ्या त्यांच्यासारख्या हाडाच्या कार्यकर्त्याला घरी चैन पडणे शक्य नव्हते. तर त्यांचे बाहेर जाणे, तेही अेकट्याने घरच्यांना चिंतेत टाकणार होते. जरा बरे असले की ते आळंदीला तसेच पुढे त्यांच्या गावी जाऊन आले की, त्यांना जिवाशिवाची भेट झाल्यासारख वाटे. नृसिह-सरस्वती स्वामी महाराजांच्या मठात नरकचतुर्दशीला ते अनेक वर्षे आवर्जून हजर असत. महाराजांच्या समाधीला स्नान घालणे, षोडशोपचार पूजा करणे या कार्यक्रमात हौसेने, श्रद्धेने भाग घेत. तेथून पुढे आरळ्याला जात. आरळ्याला त्यांची एक माहेरवाशीण कुसुमताई जोशी हिच्याकडे. तिला आई नाही म्हणून दादांची दिवाळी तिथे साजरी होई

असेच १९७८ साली आळंदीहून जाऊन पुढे आरळचाला जावे या हेतूने मुंबईहून निघाले. आरळचाला वाटण्यासाठी म्हणून कपडे, कापड, इतर सामान बरोबर घेतले होते. मुंबई ते शिवाजीनगरचा प्रवास निर्विघ्न पार पडला. नेहमीप्रमाणे हमाल न करता सामान पडशीवजा दोन पिशव्या खांद्यावरून वाहून नेऊन शिवाजीनगरच्या बस स्टॅण्डवर आळंदीला जाण्यासाठी बसची वाट पहात उभे राहिले. तेथे काय झाले त्यांचे त्यांना माहीत. पैसे, सामान चोरीला गेले. दादा स्टॅण्डवर बेशुद्ध पडले. बसच्या तिकिटासाठी पण पैसे राहिले नाहीत. बसेस येत होत्या, जात होत्या. दादांच्या कपड्यांची चिखलाच्या राडीने दुर्दशा झाली होती. चष्मा एकीकडे पडला होता. येणारे-जाणारे या अनोळखी वृद्ध इसमाकडे बघत होते, पुढे जात होते. शेवटची आळंदीची बस लागली. कंडक्टरला काय वाटले कुणाला ठाऊक. दादांना आळंदीला जायच आहे हे त्याला कसे कळले हे कोडे अजून उलगडलेले नाही. त्याने उचलून दादांना आळंदीच्या बसमध्ये बसवले. आळंदी आल्यावर खाली उतरवले. रात्रीची वेळ होती. अर्धवट बेशुद्धावस्थेत, चष्मा गहाळ झालेले दादा अंधारातून रस्ता तुडवीत कसे नृसिंह-सरस्वती स्वामीच्या मठात गेले असतील हे एक गूढ आहे. तेथे गेल्यावर त्यांच्या नेहमीच्या खोलीत जाऊन पडले. सकाळी दादांची ही अवस्था समर्पित भावाने त्यांची सेवा करणाऱ्या बाळू दादांच्या लक्षात आली. नेहमी येणाऱ्या दादांना ते १९५६ पासून परिचित होते. त्यांनी ताबडतोब डॉक्टरांना बोलावून घेऊन तात्पुरते उपचार केले. बांद्रचाला घरी फोन लावून एकूण परिस्थितीची कल्पना दिली. वहिनी व माझा भाऊ-रवीन्द्र ताबडतोब आळंदीला गेले. त्याच टॅक्सीने दादांना घेऊन परत आले. पुढे काही दिवस त्यांना घटकेत आळंदीला आहोत तर घटकेत आरळचाला आहोत असे वाटे, त्यातून ते पूर्णपणे सावरले. हा त्यांचा अेकटयाने केलेला शेवटचा प्रवास.

त्यानंतर त्यांचे बाहेरचे जाणं बंद झाले. गांवातल्या गावात ते काठीच्या आधाराने जात. त्यांच्याबरोबर कुणी गेले तर त्यांना आवडत नसे. रस्ता ओलांडताना कुणी हात धरून नेऊ लागले तर हात बाजूला झटकून टाकीत. कुणाच्या आधाराने जाणे त्यांना कमीपणाचे वाटे. नंदूभाई, शाहीर देशपांडे त्यांना सवडीनुसार न्यायला येत. बाहेर जाणे कमी झाल्याने सुरुवातीला दादांना जड गेले. पण त्यांनी आपली घडी सुटीने बसवन घेतली. दिवसाचा बराच वेळ ते बैठ्या माळयावर घालवीत. आपण व आपले शरीर वेगळ आहे, अशा अनुभतीने ते वागत. बदलत्या ऋतूचा त्यांनी कधी बाऊ केला नाही. स्वतःच्या शरीर अस्वास्थ्याचे रडगाणे गायले नाही. रमणमहर्षी बसत ते आसन त्यांनी महर्षींचा प्रसाद म्हणून त्यांच्या निर्वाणानंतर आणले होते. त्यावर बसून त्यांचे वाचन चाले. नजर कमी झाल्याने पुढे पुढे भिंगाच्या साह्याने वाचण्याचा प्रयत्न करीत. जास्त करून ज्ञानेश्वरी. नजरेसमोर त्यांच्या जीवीच्या जिव्हाळ्याच्या, ज्ञानियांच्या राजाचा वलयांकित फोटो होता. त्यांच्याच बाजूला रमणमहर्षींचा, आजूबाजूला पुस्तकांचा हा मोठा पसारा पडलेला असे. तो पसारा आवरलेला त्यांच्या मनास येत नसे. पुढे पुढे दादांनी वाचन सोडून दिले होते. कुणी ना कुणी तरी सतत त्यांना भेटायला येत असत. ह्या भेटी माळयावर होत. भेटीला

येणाऱ्याला माळचाच्या बैठचा दारातून वाकून जावे लागे. मूळचा हळवा स्वभाव आता आणखीच हळवा झाला होता. त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली की त्यांना कांहीं होत नसल्याचे पटकन ठासून सांगत. 'कोणाचा न करी द्वेष । दया मैत्री असे मनीं ।' या दादांच्या स्वभावाने दीर्घद्वेषीपणाने कुणाशी त्यांचे वैर नव्हते. मतभेद झाले, कडूपणा आला तरी विसरून दादा नवीन पान उलटीत. भेटीला येणाऱ्याजवळ सगळचा कार्यकर्त्यांची, त्यांच्या कुटुंबियांची बारीकसारीक चौकशी करीत, नड भागवीत. विन्मुख पाठवीत नसत. भेटीला येणारे जायला निघाले की, त्यांच्या डोळचातून घळाघळा अश्रू वाहू लागत. हात जोडून लीनपणे नमस्कार करीत. आप्तेष्ट, मित्र, आप्तपरिवाराहून अधिक जवळचे वाटणारे, कार्यानुसार जवळ आलेले कार्यकर्ते भेटून गेले. त्यांची अमेरिकेत राहणारी नात, आपल्या मुलांसह दादांच्यासाठी खास येऊन गेली. मी ज्ञानेश्वरी वाचते, पारायण करते याचे त्यांना फार अपरूप वाटे. नेहमी म्हणत, 'तू लाखो रुपये मिळवले असतेस तर त्याने मला समाधान वाटले नसते इतके समाधान मला तुझ्या ज्ञानेश्वरी वाचनाने होते.' त्यांचेकडे ५० वर्षांपूर्वीची ज्ञानेश्वरीची प्रत होती. पाने पिवळी पडली होती. त्या प्रतीवरून त्यांनी अभ्यास केला होता. ते पुस्तक कुणाला द्यावे हा गहन प्रश्न त्यांना पडला. शेवटी त्यांनी ती प्रत माझ्या हवाली केली.

बापूचे मित्र डॉ. शरद वैद्य दादांच्यासाठी घरी येत तेव्हा स्वतःच्या नादुरुस्त प्रकृतीची गाऱ्हाणी त्यांनी डॉक्टरकडे सांगितली नाहीत. उलट त्यांची ते स्वतःच्या मुलाप्रमाणे विचारपूस करीत. 'कंटाळलो रे देवा, सोडव मला या जंजाळातून' असे त्राग्याचे उद्‌गार न काढणारा हा रुग्ण शरद वैद्यांच्या मर्जीतला होता. सगळचात आहे आणि कशात नाही, अशा अलिप्त वृत्तीने ते शेवटी शेवटी वागत. कशाबद्दल त्यांची तक्रार म्हणून नसे.

तरी त्यांच मन अजून हिमालयाकडे ओढ घेई. हे जाणून बापूने त्यांना घेऊन जाण्याची तयारी दाखवली आणि दादा खूष होऊन गेले. पण हिमालय भेटीची दादांची ही आस पुरी व्हायची नव्हती. त्यांचे धाकटे जावई रेल्वे अपघातात सापडल्याचे कळले आणि हा हिमालय भेटीचा प्रवास रद्द झाला. सुदैवाने जावई बचावले ते पुढे ४ वर्षांनी रिक्षेने दिलेल्या ठोकरीत दगावण्यासाठी. पण हा कडू घोट दादांना पचवावा लागला नाही. दादा गेल्यावर अपघात वर्षभराने झाला. तशीच तीव्र ओढ त्यांना विनोबाजींच्या अंतिम भेटीची लागली होती. त्यांच्या प्रायोपवेशनाच्या, प्रकृतीच्या चढउताराच्या बातम्या दादांना समजत. त्यांच्या जिवाची उलघाल होई. पण एकटे जाण्याची हिंमत आता न उरल्याने त्यांनी मौन स्वीकारले होते त्यांचे मन जाणून. बापूने खास गाडी करून त्यांना पवनारला न्यायचे ठरवले. बरोबर रामभाऊ देशपांडे यांना येण्याची विनंती केली. दोन्ही मित्रांची आंतरिक संदेशाने भेट झाली. विनोबाजींच्या भोवती प्रदक्षिणा घालताना त्यांना दुःखावेग आवरेना. विनोबाजींचे धाकटे बंधू शिवाजी महाराज हे 'वांद्र्याचे माधवराव देशपांडे' आलेत म्हटल्यावर झोपले होते ते उठले. खोलीमध्ये दादांची व्यवस्था केली. दादांनी अंत्यदर्शन घेतले आणि परतीच्या प्रवासासाठी मुकाटचाने स्टेशन वॅगनमध्ये जाऊन बसले, दर्शन मिळाल्याच्या समाधानाने !

तेथून आल्यावर दादांनी मला, बापूला, वहिनीला बोलावून घेतलं. आपले अंत्यविधी करताना कुठल्याही प्रकारचा डामडौल करू नये, धार्मिक सोपस्करांना फाटा द्यावा, विद्युत-वाहिनीत दहन करावे, वर्षश्राद्ध, मासिक श्राद्ध या मागे लागू नये असे स्पष्टपणे तितकेच ठामपणे सांगितले. त्याचवेळी ज्ञानेश्वर माऊलीच्या देवळातील अखंड वीणेकऱ्याच्या देणगीबद्दल बोलून ठेवले. त्या आधी काही दिवस बापूने दादा-बाईचे पोर्ट्रेट करवून घेतले होते. चेहऱ्यावरील भावदर्शनामुळे पोर्ट्रेट हुबेहूब वाटे, जीवंतपणाचा स्पर्श झाल्यासारखे. दादांना ते पोर्ट्रेट दाखवले. बापूला वाटले, दादा कौतुक करतील. पण दादा मोजकेच बोलले. 'पोर्ट्रेट मेल्यावर करतात, पोट्रेट करण्यात घाई झाली ?' बापूने एवढस तोंड केले.

माझा तीन नंबरचा भाऊ रवीन्द्र व वहिनी त्यांचेबरोबर दादा आळंदीला जाऊन आले. नृसिह-सरस्वती स्वामींच्या मठात आधी गेले. आठवणीने नावनिशी सगळयांना बोलावून घेतले. प्रत्येकाला आठवणीने काही ना काही दिले. त्यापैकी बऱ्याचजणांनी दादांच्या संगतीने भारतभ्रमण केले होते. त्यावेळच्या प्रसंगांची उजळणी झाली. त्याचा मातापिता, बंधु, सखासोयरा ज्ञानेश्वर त्याचे दर्शन घेतले, कृतार्थ झाले. ज्ञानेश्वर माऊली व आधुनिक ज्ञानेश्वर विनोबाजी या त्यांच्या आराध्यदैवतांची भेट मुलांनी घडवून आणल्याने दादा अंतर्बाह्य तृप्त झाले.

***

## ४. की झाकलिये घटीचा दिवा

आळंदीला जाऊन आले आणि पुढे १५ दिवस काही गेले नाहीत. परतल्यावर मुलांनी दादांची माळ्यावरची बैठक बाहेरच्या हॉलमध्ये हलवली. माळ्याचा उंबरा उंच, दार ठेंगणे, वाकून बाहेर येताना तोल सावरणे जड जाई. वेगवेगळ्या थरांतील भेटायला येणारी लहान थोर मंडळी, त्यांच्यासमोर पुस्तकांच्या अस्ताव्यस्त पसाऱ्यात अडकलेले दादा, अंथरलेल्या गादीवर आग्रहाने पसरलेले घोंगडे. येणाऱ्यांना हा गबाळेपणा पाहून काय वाटेल ही शंका मुलांना येई. पण या व्यवस्थेत बदल केलेला दादांना खपत नसे. बाहेर दिवाणावर झोपायचा आग्रह केला तर मी पडेन अशी लहान मुलासारखी कुरकूर करीत. पुढे जमिनीपासून उठणे जड जाऊ लागल्याने हॉलमध्ये यायचे कबूल केले. 'रामकृष्ण हरी' म्हणत म्हणत बाहेरच्या दिवाणावर येऊन बसले.

दादांना मृत्यूने जवळ केले ते एखाद्या मित्राप्रमाणे. संपूर्ण जीवन असे व्यतीत करावे की म्हणता यावे, शेवटचा दीस गोड होण्यासाठी जन्मभर हा अट्टाहास. एखादं पूर्ण पक्व झालेलं आम्रफळ देठापासून अलगद गळून पडावं तसं त्यांचं शरीर गळून पडलं. कुणालाही हेवा वाटावा असा मृत्यु त्यांना आला. शेवटच्या दिवसाची त्यांची दिनचर्या नेहमीप्रमाणे पार पडली. जिना उतरून नेहमीप्रमाणे ऑफिसमध्ये चक्कर मारून झाली. शेजारी वहिनीच्या घरी फेरी मारून झाली. आदल्या दिवशी त्यांना सांगितलं होतं, ज्येष्ठ महिना संपत आला, आता आंब्यांचा मोसम संपला. चांगले आंबे मिळत नाहीत. त्यावर त्यांनी 'हरीच्छा' म्हणून गाडगे बाबाप्रमाणे डोक्यावर हात नेऊन हात जोडले. पण, दुसऱ्या दिवशी, त्यांच्या निर्वाणाच्या दिवशी आंबेवाल्याने चांगले आंबे म्हणून थोडे आंबे आणून दिले. संध्याकाळच्या जेवणात आंबरस पाहून जेवणात आंबरस कसा आला म्हणून खुणने चौकशी केली. नेहमीप्रमाणे जेवण केले. खरकट्या हातावर पाणी घातल्यावर तपेली भरून आणावी म्हणून यशोदा घरचीच झालेली कामवाली चार पावलं गेली. तपेली भरून घेऊन परत आली. पाहते तो दादा खुर्चीवरून खाली पडले होते. ज्या क्षणी ते पडले ते परत उठलेच नाहीत. घड्याळाची चावी संपली की घड्याळाची टिक् टिक् बंद पडते तसा त्यांचा श्वास बंद पडला. ज्ञानेश्वरमाऊलीने म्हटल्याप्रमाणे :–

'की झाकलिये घटीचा दिवा । नेणिजे काय जाहला केव्हा ।
या रीती गा पांडवा । देह ठेवी ।।

वाऱ्यापासून दूर टोपलीखाली झाकून ठेवलेला दिवा कधी विझतो हे जसे कळत नाही तसे दादांचे प्राणपाखरू केव्हा उडून गेले ते कुणाला समजले नाही. तो दिवस होता २० जून १९८४.

त्याच्या आदल्या दिवशी जूनमध्ये कधी आळंदीला न जाणारी मी, माऊलीचा प्रस्थानसोहळा पहावा, आळंदी, पुणे माऊलीच्या पालखीबरोबर जावे या हेतूने आळंदीला गेले होते.

निघताना त्यांच्या पाया पडले तर म्हणाले, 'छान ! माझा वारसा तू पुढ चालवणार आहेस'. दादा कैक वर्षे प्रस्थानासाठी आळंदीला जात. आळंदीत मला प्रस्थानाच्या वेळी जूनमध्ये पाहताच यावेळी मी आळंदीला कशी म्हणून परिचितानी कुतुहलाने पृच्छा केली. पुढे पुस्ती जोडली, 'बरं झाल, दादा नाहीत तर तू तरी आलीस.' प्रस्थान सोहळा डोळे भरून बघितला. दुसऱ्या दिवशी माऊलीच्या देवळात वारकरी कीर्तन ऐकत असता दादांची प्रकृती बिघडल्याचा मठातून निरोप आला. टॅक्सीन मुंबईला येईपर्यंत संध्याकाळचे ५ वाजून गले होते. दादांच्या घराशी आले तर सगळा शुकशुकाट होता. वाटलं, दादांना दवाखान्यात दाखल केले असावे पण भ्रम दूर झाला. दादांनीच प्रस्थान ठेवले होते कायमचे. एवढे मात्र खरे की दादांची शेवटची भेट झाली नाही अशी रुखरुख माझ्या मनाला लागली नाही. माझ्या माध्यमातून दादा आळंदीला गेले, माऊलींच्या भेटीची त्यांची आस पुरी झाली. माझ्या मनाची मी समजूत घातली.

कुणाची वाट न बघता दादांचा अन्त्यविधी झटपट आटपला गेला. अनेक चाहत्यांना निकटवर्तीय मित्रांना ही बातमी प्रादेशिक बातम्यात रेडिओवर समजली. ८-१० दिवस वर्तमानपत्रात श्रद्धांजली वाहिली जात होती. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिकांत बातमी वाचून परिचित, अपरिचितांची रीघ लागली. संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची पत्र आल्यावर दादा किती संस्थांशी निगडित होते ते कुटुंबियांना समजले. जातिधर्माचे बंधन न पाळता मिळणाऱ्या दादांची प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहिली. रेडिओने "प्रभाते मनी" कार्यक्रमात रविन्द्र पिंगे लिखित श्रद्धांजली अर्पण केली. त्यावरुन दादांच्या रेडिओवरील "स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र" या भाषणाची आठवण ताजी झाली.

दादांचे बहुरंगी व्यक्तिमत्व दादांच्या मागे उमगून मनात अनेक तरंग उठले. त्यांची तीव्र बुद्धीमत्ता आणि त्याच्या जोडीला अफाट श्रम करण्याची मानसिक तयारी अचंबा करण्यासारखी होती. लहानपणापासून हालांत, कष्टात दिवस काढूनही त्यांना निकोप शरीरसंपदेची ईश्वरदत्त देणगी होती आणि आश्चर्य म्हणजे ही देणगी अनेक चटके बसून, मानसिक बळावर वयाच्या जवळ जवळ ८० वर्षापर्यंत टिकली. शरीराचे चोचले तर त्यांनी कधी केले नाहीत. मला आठवते, आम्ही कधी त्यांचेबरोबर प्रवास केला तर सामान उचलायची वेळ आली की, जास्त जड डाग ते उचलीत. मग आम्हाला झेपो अगर न झेपो, दुसरे सामान उचलावेच लागे. आम्हाला त्यांनी शिकवले. शिक्षणामुळे आम्ही भावंडे, सुना स्वावलंबी झालो. पण आपल्या ऐन उत्कर्षाच्या, सामाजिक प्रतिष्ठेच्या काळातही त्यांनी स्वतःच्या दबदब्याचा मुलांच्यासाठी उपयोग केला नाही. कुणाला भीड घालून, स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून प्रत्येक मुलाला स्वतंत्र संस्थान, एखादी "गादी" बहाल केली नाही. कितीतरी वर्षांनी आमच्या कानावर आले की, दादा आमदार असतांना मुंबई विश्वविद्यालयाच्या सिनेटचे सदस्य होते. पडत झडत मुले आपापल्या कुवतीनुसार समाजात उभी राहिली.

शिकवले, आपली जबाबदारी संपली अशी दादांची वृत्ती त्यामागे होती. आम्हा मुलांच्या, सुनांच्या ओळखी करून देण्याच्या प्रसंगी मात्र आमच्या पदवीचा आवर्जून कौतुकाने उल्लेख करीत. संस्कृत भाषेच्या आमच्या अभ्यासाचा त्यांना फार अभिमान वाटे. हा अभिमान त्यांना असणाऱ्या संस्कृत भाषेच्या प्रेमामुळे असावा. ही बाबाजी मोघे यांची सून असे सांगत. ही माझी मुलगी अशी माझी ओळख करून दिलेली मला आठवत नाही. माझी बहीण सुधा बाळंतपणासाठी आली होती. तिच्यामागे झक्कू लावून तिला (B. A.) च्या परीक्षेला बसायला लावले. मुलगी पदवीधर झाली. पण त्यासाठी दादांनी तिच्या अभ्यासक्रमाची पुस्तके स्वत: वाचून, टिपणं काढून तिचे अभ्यासाचे श्रम किती हलके करावेत! कुठलाही विषय असो. त्यांना त्यात गती असे. त्यांचा एक पुतण्या सुहास सोलापूरकर ( Printing technology ) च्या अभ्यासक्रमासाठी आमच्याकडे होता. दादांचे वय ८० च्या आसपास होते. त्याची पुस्तक वाचून त्याला मदत करण्याची त्या वयातही त्यांना जिद्द होती, हौस होती.

माणसांची पारख त्यांना चांगली होती. कुणाला कुठले काम सोपवले तर हा समाज-सेवेचा अजस्त्र गाडा पुढे जाईल याचे अचूक ज्ञान दादांना होते. तरी क्वचित एखादा विश्वासू, जिवाभावाचा सहकारी मस्तपैकी दादांच्या डोकीवरून हात फिरवी. एकदा आपले मानले की, "पुत्राचे सहस्त्र अपराध, माता काय मानी तयाचा खेद" अशा मातृ भावनेने अपराध पोटात घालीत. त्यामुळे दादांना मन:स्ताप सहन करावा लागे. वैयक्तिक स्वार्थ नसून वाईटपणा येई. अनेक वेळा काय होई, छोटया छोटया संस्थांचे थकलेले पैसे पालक, संस्थांना वेळेवर मिळत नसत. बरे, घेतलेल्या मालाची तुंबलेली बिले जर वसूल झाली नाहीत तर मोठया संस्था कशाच्या जोरावर चालणार? दादा वकील असल्याने वसुलीचे हे अप्रिय काम त्यांच्यावर सोपवले जाई. सामोपचाराने, जडजोडीने बिलाचे पैसे मिळाले नाही तर वेळी कडूपणा पत्करून काम पुरे करावे लागे. यात दादांचा वैयक्तिक फायदा, स्वार्थ कसला होता? जेव्हा एखादे जबाबदारीचे पद स्वीकारावे लागते त्यावेळी ज्यांच्याकडून काम करवून घेऊन ते पुढे रेटावे लागते त्यावेळी नुसते गोड बोलून "वा, वा, फार छान" म्हणून भागत नाही. प्रसंगी समज द्यावी लागते, चार अप्रिय पण सत्य गोष्टी सुनवाव्या लागतात. गैरव्यवहार उजेडात आणावे लागतात. ज्याला समज आहे तो याबद्दल आकस धरीत नाही. मोठया मोठया नावारूपाला आलेल्या संस्था, त्यातील अधिकार पदे, त्याच्या अनुषंगाने येणारी सत्ता भल्याभल्यांना मोहात पाडते. त्यासाठी स्पर्धा, चुरस, हेवेदावे काही वेळा हीन पातळीला पोचतात. प्रसंगी सत्-प्रवृत्तांचा अशा हीनतेत सहभागी न झाल्याने बळी दिला जातो आणि मनांत येतं समाजाचे प्रबोधन, उन्नतीकरण हे शाब्दिक बुडबुडे आहेत. द्वेष, मत्सराच्या आहारी वैयक्तिक स्वार्थाच्या मागे लागल्याने राजकारण काय, समाजकारण काय, वारांगने-प्रमाणे चंचल आहे. हे कटु सत्य आहे. समाज कधी डोक्यावर घेऊन नाचवील आणि कधी खाली आपटून चिंधडया करील याचा भरवंसा नाही. हे सगळ पटत असले तरी

ज्यांना सतत जनसंपर्कात राहण्याचे व्यसन असते त्यांना एकटे राहणे अवघड पडते.

हे एकटेपण पचवणे जमते. पण केव्हा ? स्वतःची अध्यात्मिक, वैचारिक बैठक स्थिर असेल तर. कृतार्थ जीवन जगल्यावर दादांची ही मानसिक बैठक त्यांना शेवटच्या दिवसात साथ करीत होती. दादांचे जीवंत स्मारक असणाऱ्या गांधी सेवा मंदिर, धोबी घाट, गांधी सेवा धाम, विनोबा ग्राम या सारख्या संस्था, छोटया वसाहती या-विषयी ते अलिप्तपणे बोलून योग्य सल्ला देऊ शकत. त्यांच्या श्रद्धाळू भाविक वृत्तीने त्यांना मानसिक शांतता दिली. ध्यान धारणा, मनन, चिंतन त्यांना तारक ठरले.

हे सर्व खरे असले तरी, एखादा हिशोब, अहवाल सुबकपणे, टापटीपीने पेश करणे त्यांना जमत नसे. थोडाफार देशस्थी गैरशिस्तपणा त्यांच्या स्वभावात होता. सरकारी अनुदाने योजनेला पुरी पडली नाहीत तर नैतिक कर्जाच्या कल्पनेसारख्या कल्पना ते लढवीत. पैसे गोळा करीत. अशा वेळी "दिलेला शब्द" हेच तारण असे. बिनव्याजी असे कर्ज मिळे. ते फिटे. पण स्वराज्यपूर्व काळात सार्वजनिक कार्य असे होते की, पैसा पुरा पडत नसे. पदरचा पैसा घालावा लागे. हिशोब सादर करण्यात काटेकोरपणा नसल्याने स्वतःच्या पदराला खार लागूनही गैरसमज होण्याची शक्यता राही. संबंध न तोडण्याच्या भूमिकेतून, अपराध्याला शासन केले जात नसे. त्याच गैरफायदा घेतला जाई. पण संधिसाधूंचे फावून जाई. वयोमानाप्रमाणे त्यांचा तापटपणा कमी झाला होता. पण मूळ स्वभाव फटकळ बोलण्याचा होता. एखादा शब्द कुणाला जिव्हाग्री लागेल याचे त्यांना बोलतांना भान रहात नसे. कुणाला दुखवावे असं मनात नसून समोरची व्यक्ती दुखावली जाई. आपण काही कठोर, तुसडे बोललो हे दादा विसरून परत बोलत. त्यांच्या निकट सहवासात असणाऱ्यांना ह्या स्वभावाच्या खाचखोचा ठाऊक झाल्याने ते दादांचे बोलणे मनाला लावून घेत नसत. उलट सांगत, "त्यांचे मन आईचे आहे. एखाद्या वडीलधाऱ्याप्रमाणे आमची चौकशी करतात, अडचणी जाणतात, दुखले-खुपले पाहतात. मांजरींच्या पिलांना तिची नखं लागतात का ?" आम्ही चूपचाप होत असू.

काही उचापती कारभाऱ्यांना दादांच्या कुटुंबाच्या चरितार्थाची काळजी पडे. ते आडून आडून चौकशी करीत. दादांनी वकिली सोडली. मग मुलांचे शिक्षण, घर-खर्चाची काय व्यवस्था केली ? एक तर आमच्या घरची राहणी साधी होती. चरितार्था-साठी मोठमोठ्या ट्रस्टची कामे दादा अधूनमधून करीत. चरितार्थ भागून जाई. पाहुणे आले की बाई, आम्ही मुले असेल तर त्यात साजरे करून पाहुणचार करीत असू. काही वेळा हीच पाहुणे मंडळी बाहेर पडल्यावर यांना हे कसं काय जमते याची रसभरित चर्चा करीत. ह्या चर्चा चुकूनमाकून दादांच्या कानावर जात. अब्रू राखून घर सांभाळणाऱ्या बायको मुलांवर हे ताशेरे झोडलेले ऐकून दादांना अपराधी वाटे. देशकार्याच्या नादात घराकडे, प्रपंचाकडे हवे तितके लक्ष न दिल्याची खंत वाटे. मग सवडीने पिशव्या भरभरून, त्या स्वतः उचलून आणून भरपूर सामान आणून टाकीत.

घर हा प्रांत बाई व आमचे आजोबा, बाईचे वडील यांनी अनेक वर्ष जमेल तसा सांभाळला. घरीदारी खस्ता खाऊन दादांची त्रिशंकूची अवस्था झाली असं काहींना वाटते. तर काहींच अस मत आहे की, दादांच्या वाटचाला शापित यक्षगंधर्वाचे आयुष्य आले. कुणी काहीही म्हणो, दादांच्या आयुष्याची, समर्पित भावाची ही कथा झाली.

दादांच्या ह्या ८४ वर्षांच्या जीवनकथेचा आढावा घेतला तर कुणाला ते शापित गंधर्व वाटले तर कुणाला तृप्त साधक ! तृप्त साधक तर ते होतेच पण मला वाटतं त्यांचे विशाल वटवृक्षाशी साधर्म्य आहे. वटवृक्ष त्याच्या नाजूकपणाने रंगीबेरंगी पाना-फुलांमुळे आपल्याला आकर्षून घेत नाही. वडाच्या झाडाची आकर्षण शक्ति त्याच्या सभोवतालच्या छोटया मोठया पारंब्यांत आहे. त्यापैकी काही पारंब्या थेट भुईला मिळालेल्या असतात, आत गेलेल्या असतात. ज्यापासून आपल्याला नव्या, कोवळ्या रोपांची अपेक्षा असते. जुने वडाचे झाड जीर्ण शीर्ण झाले, वाळू लागले तरी त्याच्या आधाराने, जीवनरसाने नवे अनेक वटवृक्ष हळूहळू पण जोमाने वाढत असतात. मूळ आधारवड कौतुकाने नव्यांची वाटचाल पाहत असतो. प्रगति पहात असतो. स्वत: पडद्यामागील भूमिका बजावीत, नव्यांना आधार देण्यात आनंद मानतो. स्वत:च्या सर्जनशीलतेचा मूक साक्षीदार होऊन.

***




दादांच्या कर्मभूमींपैकी एक कर्मभूमि

# असे होते आमचे माधवराव उर्फ दादा

## १. माझ्या जीवनाचे शिल्पकार

**--स्वातंत्र्य सैनिका--गुलशनबी शेख**

४२ च्या स्वातंत्र्यांच्या लढ्यात आमच्या मालकांनी चांदमियांनी भाग घेतला होता. रामभाऊ जोशीवर पोलिसांनी नेम धरून चरणाला मारलेली गोळी स्वतःच्या छातीवर झेलून त्यांनी जोशीकांकाना वाचवंले. जोशीकाकांना निसटून जाता आलं.

काही वाईट नजरेचे पाटील, तलाठी, बायका प्रातःविधीसाठी बाहेर गेल्या की संधी साधून त्यांना पळवून नेत. आता सारखी संडासची सोय त्यावेळी खेडोपाडी नव्हती. अशाच एका बदनाम तलाठ्याला धडा तर शिकवावा जीवं, तर मारू नये, अशा विचाराने आमच्या मालकाने शिक्षा म्हणून त्याचं नाक कापलं. या सगळ्या यातायातीत आमच्या मालकांना टीबी लागला. तलाठ्यांच नाक कापल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरला तेव्हा तुरुंगातून सुटून आलेले दादा ४५ मध्ये त्यांना सोडवण्यासाठी मुद्दाम वान्द्र्याहून साताऱ्याला आले. दादांचं आणि आमचं गाव एकच. त्या प्रेमापायी दादांनी ही दगदग केली. पण तलाठी धास्तावला. त्याने जबाब दिला की, " मी वेडावाकडा पडल्याने माझ्या नाकाची ही दशा झाली. माझं नाक कुणी कापलं नाही. टीबीच्या चिवट दुखण्यात मालक गेले. मी निधाराधार झाले. मला ना मूल, ना बाळ. जगाच्या पाठीवर मी एक तरूण, अशिक्षित विधवा राहिले. त्यावेळी दादा धावून आले. 'मी शिकून काय करणार? आहे ते जिणं बर', दादांना परत परत मी तेच सांगे. पण दादांनी माझी समजूत घातली. मला वर्ध्याच्या महिलाश्रमांत कोर्सला पाठवलं. मी एकटी कशी जाणार म्हणून बाबाजी मोघ्यांना बांद्र्याला बोलावून घेतलं. त्यांच्याबरोबर माझी पाठवणी केली. स्वतःच्या लेकीसारखी वान्द्र्याला त्यांच्याकडे आल्यावर मला सगळी मुंबई दाखवली. साड्या कंगवा, आरसा, सगळं पेटी सकट सामान घेवून दिलं. आणखी, काही हवं का म्हणून विचारंल, थेटपर्यंत सोबतीने पाठवले.

मी वर्ध्याच्या महिलाश्रमांत असेपर्यंत दादांनी दरमहा २० रूपये न चुकता पाठवले. महिलाश्रमांत काम करणाऱ्या कमूताई लेले, मालूताई थत्ते यांना दादा नेहमी पत्र पाठवीत माझी काळजी घ्यायला सांगत. रजेत मी आरळ्याला जायला निघाले की, एक मुक्काम दादांच्या घरी बांद्र्याला असे. 'बाई, मला काही काम करायला द्या', मी सांगितल्यावर बाईंनी मला भाजी चिरायला सांगितली. मी जाडीजाडी, कशीतरी भाजी चिरायला लागले. दादांनी ते पाहिले. "अग गधडे, भाजी अशी चिरतात का? तुला पुन्हा पहिल्यापासून कोर्सला पाठवायला हवं, " असं म्हणत पुढ्यातली विळी काढून घेतली भाजी कशी चिरायची ते स्वतः दाखवून दिले. दादा नुसती तोंडपाटीलकी करीत नसत

स्वतः करून दाखवीत. मी बांद्रयाला असतांना मला आवडतात म्हणून बाईने तिखटामिठाच्या पुऱ्या केल्या होत्या. आवडल्या म्हणून मी खाल्या. कारण मला वाटलं बाईने एवढ्या आपल्यासाठी पुऱ्या केल्या आहेत. त्यांच मन मोडू नये. रात्री माझ्या पोटात दुखायला लागलं. मी सारखी उठत होते, बसत होते. बाकी सर्व दमून गाढ झोपली होती. दादांच्या लक्षात माझी बैचैनी आली. चौकशी केल्यावर मी कारण सांगितलं. लगेच उठले. कपाटातलं दह्यांच भांड काढून ताक घुसळता घुसळता सुनावले, 'कुणी ढीग आग्रह केला तरी तू तुझी जीभ आवरायला नको होती का ? त्रास कुणाला झाला' ? ताकांत मीठ, हिंग घालून ग्लास मला हातात आणून दिला. मग झोपले. अशा किती आठवणी सांगाव्यात. माझ्या चामड्याचे जोडे करून घातले तरी त्यांचे उपकार फिटणार नाहीत. आज जो मी आहे तो त्यांच्यामुळे उभी आहे. त्यांनी मला स्वतःच्या पायावर उभं केलं. कोर्स पुरा करवून घेतला. नोकरीला लावलं. नाही तर माझं काय झालं असत ? कुणाच्या तरी दाराशी मिंधेपणाने तुकडे मोडीत पडले असते.

***

## २. अनेकांचे पाठीराखे माधवराव

—शरयू धोत्रे

लोकमान्य टिळकांच्या तेजस्वी नेतृत्वाने प्रभावित झालेली जनता लोकमान्यांच्या निधनाने हवालदील झाली होती. अशा वेळी लोकमान्यांची सूत्रे महात्मा गांधींनी हाती घेतली. पू. गांधीजींनी सुरू केलेल्या सर्वंकश स्वातंत्र्य लढ्यात अखिल भारतातील सर्व थरातील अनेक कुटुंब विधायक कामात, राजकारणात, सर्वस्वी ओढली गेली होती. त्यात डॉक्टर्स, वकील, मील मालक, कारखानदार, प्रोफेसर्स, आदी मंडळींचा समावेश होता. अशा या महात्माजींच्या स्वातंत्र्य लढ्यातील सैनिकात निगर्वी, निःस्वार्थी वकील माधवराव देशपांडे हे एक सैनिक. साधी राहणी व उच्च विचारसरणीचे जणू प्रतिकच.

पू. महात्माजींच्या कार्यपद्धतीमुळे देशात एका विचाराने काम करणाऱ्यांचे जे विशाल पारिवारिक संबंध निर्माण झाले ते खरोखर देव दुर्लभच.

श्री. माधवरावांना मी प्रथम १९३० साली बघितले. त्यांचे स्नेहार्द बोलणं व नम्रता याने मी प्रभावित झाले. तोवर मी भाईकडून (भाई धोत्रे माझे यजमान), श्री. गोपाळराव काळे व बाबाजी मोघे यांजकडून त्यांच्या विषयी ऐकत होती की, ते वकील आहेत, सधन असून निगर्वी, साधे तळमळीने काम करणारे, अनेकांना मदत करणारे असे एकूण असून कार्यकर्त्यांना तर त्यांचे घर म्हणजे मोठाच निवारा. अर्थात घराचा कार्यकर्त्यांना निवारा म्हणून वाटण्यांत, त्यांच्या पत्नी श्रीमती बाई ह्यांचा फार मोठा वाटा आहे. उत्तरोत्तर परिचय वाढत जाऊन मलाही जणू माहेरच मिळालं.

गांधी सेवा संघाचे ऑफिस काही काळ काळबादेवीला बच्छराज पेढीवर होतं. भाई यांचे सेक्रेटरी असल्याने आम्हालाही मुंबईतच रहावं लागलं. मी व दोन मुली, शबरी २½ वर्षाची व कुसुम १½ वर्षाची. भाईनी पार्ल्याला हनुमान रोडवर देसाईंनी बंगलोमध्ये घेतलेल्या जागेत आम्ही राहू लागलो. वर्ध्याच्या आश्रमातून एकदमच मुंबईतच आल्याने व कोणीही परिचित नाही अशा जागी, मी अगदी घाबरुन गेले. भाई सकाळी जेवून ९ ला लोकलनी कामाला जायचे ते संध्याकाळी किंवा रात्री उशिरा परतायचे. वर्ध्याचे आमचं स्वावलंबी जीवन इथेही चालू होतं. परिसरातल्या लोकांना तो एक कुतुहलाचाच विषय होता. त्या सर्व गुजराथी मंडळींकडे रामा गडी कामाला होते. भाईचे मित्र श्री. हरिभाऊ भागवत, माधवराव, रेवतीभाई आदी मंडळींनी धीर देऊन तिथलं राहणं सुसह्य कलं. दैनंदिन संसाराचे व्यवहार लहान दोन मुलींना घेऊन मला एकटीला स्टेशनवर जाऊन करावे लागत. हळूहळू हे सारं अंगवळणी पडतं गेलं. शिवाय परमेश्वर पाठीशी आहे, याचा अनुभव घेत होते. किराणावाल्यांनी निक्षून सांगितले 'की तुम्हाला काय

लागेल ते माझा मनुष्य घरी पोचवत जाईल. अगदी कणीक सुद्धा दळून आणून देईल.' मनांत म्हटलं, "देवच पावला."

पू. बापूजी त्याच सुमाराला राऊंड टेबल कॉन्फरन्सहून परतले व त्यांना व जवाहरलालजींना सरकारनी लगेचच पकडून नेल्यान स्वातंत्र्य लढचाला सुरुवात झाली. अचानकच सर्व झाल्याने भाईचे काम वाढत गेलं. कधी तर दोन-तीन दिवस ही घरी परतत नसत. त्यामुळे मला फारच काळजी वाटत असे. एक दिवस रात्री माधवराव व त्यांचे बंधु केशवराव घरी आले. "तुम्ही घाबरूं नका, भाई सुखरूप आहेत, हे सांगायला आम्ही आलो आहोत. तुम्ही काळजी करणे स्वाभाविकच आहे", अशी प्रस्तावना करून, भाईंना काय काय कामे करावी लागतात ते सांगू लागले. संस्थेचे पैसे सांभाळणे, कार्यकर्त्यांना पैसे पुरविणे. शिवाय लढचाचे निरोप देणे अशी कामे असल्याने ते भूमिगतच आहेत असं समजा. दोन लाख रूपये घेऊन दोन रात्र त्यांना आमच्या घरी रहावं लागलं तेव्हा त्यांना तुम्ही फोन करण्याचा प्रयत्न करू नका. तसंच "कुणी भाई काय काम करतात विचारलं तर ऑफिसचा पत्ता सांगू नका" वगैरे सूचना त्यांनी दिल्या. आम्ही येत जाऊच, भाईही मधूनच येतील. 'नाही तर आमच्याच घरी दोन मुलींसह तुम्ही चलतां कां?' ते म्हणाले, मी "नाही" म्हणाले. मी हिमतीने राहीन, काळजी करू नका असे सांगितले. म्हणतात ना, 'हिंमत मर्दा तो मदते खुदा' त्याप्रमाणे श्री. बगाराम लेले व त्यांचा धाकटा भाऊ यशवंत लेले हे ट्रिटमेंटसाठी म्हणून आमच्या घरी आले व एकटीचा प्रश्न आपोआपच सुटला. पुढे लढचाचे स्वरूप बघून मी मुलांना घेऊन वर्ध्याला मुंबई सोडून आले. तिथे गेल्यावर जंगल सत्याग्रहात भाग घेतल्याने मी पकडली गेले. मुंबईचे घर खाली केल्यावर सामान बरीच वर्षे माधवरावांकडेच होते.

प्रसिद्ध दांडी यात्रेला साबरमतीहून निघतांना महात्माजींनी, स्वराज्य मिळेपर्यंत साबरमतीला परत न जाण्याचे घोषीत केले. त्यामुळे मिठाच्या सत्याग्रहानंतर ते सरळ वर्ध्याला कायमचे आले. अर्थात गांधी सेवा संघाचे ऑफिसही मग वर्ध्याला आले. त्यामुळे भाईची व माझी दहा महिन्यांनी भेट झाली.

एकदा मला बरं नव्हतं तेव्हा ट्रिटमेंटसाठी माझी मैत्रिण सरोजबेन नाणावटी (काकासाहेब कालेलकरांच्या सेक्रेटरी) यांच्याकडे मुंबईला मलबार हिलवर मी होते. तेव्हा माधवरावांनी माझी खूप काळजी घेवून, गाईचे तूप, फळं आदि आणून पोचवलं, मैत्रिणीची आई, भाऊ, डॉ. नाणावटी म्हणत, "अहो आम्ही सर्व करतोय, तुम्ही कशाला ऐवढी दगदग करता?" माधवराव म्हणत, 'अहो ती मला खात्री आहे, तथापि, माझ्या मित्राची पत्नी म्हणून मला काही सेवा करू द्यात.' वर्ध्याला जायला डॉक्टरांनी परवानगी दिली तेव्हा श्री. बाबाजी मोघबरोबर मी जावं असं ठरलं. फर्स्टक्लासच्या दोन तिकिटांची जबाबदारी माधवरावांनी तेव्हा उचलली. शिवाय मुलांसाठी फळांनी भरलेली डालीही बरोबर दिली. असे आम्हा कार्यकर्त्यांचे रक्ताच्या नात्यापेक्षाही जवळचे कौटुंबिक संबंध होते. ते आठवले की हृदय भरून येते. व आजच्या पिढीला आणि जनतेला स्वार्थाने घेरलेलं पाहून खंत वाटते.

मुंबईत असताना भाईंना इन्फ्ल्युएन्झा झाला. हरकिसनदास हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केल्याचे बापूंना, श्री. जमनालालजी बजाज सांगत असतांना, बापूंच्या सुनेने ऐकले व मला त्यांनी सांगितले. हे ऐकून मी फारच बेचैन झाले. मी सरळ बापूजींना व जमनालालजींना भेटून " मला का नाही हे सांगितल, मला मुंबईला पाठवा " असे म्हणू लागले. जमनालालजी व बापूंनी मला समजावले की, " तू तिथे जाऊन अधिक काय सेवा करणार आहेस, स्वामी आनंद व देशपांडेजी सर्व काळजी घेताहेत. आप्तानीच हे करावं असं नाही. हेही आप्तच आहेत." वगैरे मी मूग गिळून बसले. संसारात मला जितक्या अडचणी आल्या त्या त्या वेळेस वरील तत्वाप्रमाणे स्नेहीच मदत करीत आले. कामामुळे भाईची उपस्थिती लाभू शकत नसे. पुढे हे तत्त्व पचनीच पडले. आजच्या पिढीला हे असले, तत्वज्ञान, विशाल कौटुंबिक भावना, निस्वार्थ वृत्ति, इत्यादींचे थोड दर्शन घडविण्यासाठी हे लिहितेय.

अशीच एक आठवण——भाईचे हर्नियाचे ऑपरेशन हरकिसनदास हॉस्पिटलमध्ये झाले होते. त्यावेळी काही दिवस आम्ही मणीभुवनमध्ये थांबलो होतो. दिवाळी होती. पाडव्याच्या रात्री दहा-साडेदाहा वाजता माधवराव व केशवकाका आले. भाई नुकतेच झोपले होते. मी म्हटले, "माधवराव भाई आताच झोपले आहेत, उठवू का ?" तेव्हा ते म्हणाले," छे, छे, त्यांना नका उठवू. बरे आहेत ना ? हे डबे ठेवून घ्या व तुम्हीही झोपां," असं म्हणून, 'केशव दे तें रे डबे' म्हणत आठ-दहा कार्डबोर्डच्या डब्यांची चळत ठेवून गेले. 'आज दिवाळी आहे, तुम्ही काहीच केलं नसणार.' तेव्हा भेटायला येणाऱ्यांना काहीं तरी देता यावं म्हणून ही थोडी फराळाची भेट आणली आहे, भाईंना सांगा आम्ही येऊन गेलो" असे म्हणून ते निघून गेले. मी त्यांच्या या मायाळू स्वभावाने अगदी गद्‌गद् झाले.

हृदय हेलावून सोडणारी त्यातलीच एक आठवण, त्याला काय उपमा द्यावी, हेच कळत नाही. माझा मुलगा मोहन याचे लग्न ठरले. भाईंना मुंबईला बरेच काम होतं. म्हणून मी पुण्याहून मुलीला तिच्या भावाकडे मुंबईस बोलावून साखरपुडा केला. सोनं न वापरण्यांच आमचं व्रत तेव्हा पेढे व साडी-चोळी दिली. आंगठी देणं शक्यच नव्हतं. सोन्याच्या बांगड्या करायच्या की काय याबाबत माधवरावांचा सल्ला घतला. " ते म्हणाले, तुम्हाला सुनेला सोन्याच्या बांगड्या घालाव्याशा वाटत असतील तर जरूर घाला. मी तुम्हाला चार बांगड्या करून आणून देईन. भाईंना समजावण्यांच काम माझं. पैशांची चिंता करू नका." त्यांच्या या आत्मीयतेने माझे डोळे गळू लागले. त्यांनीच सात्वन केले. ही गोष्ट अजूनही कुणाला माहीत नाही. या हाताचं त्या हातालाही कळू न देता त्यांची देण्याची कृती बघून मन थक्क होई. पुढे मुलीला आमची तात्विक भूमिका समजावण्यात यश येऊन फक्त मंगळसूत्र घालण्याचे ठरले, ही गोष्ट वेगळी.

माझे धाकटे मेव्हणे श्री. केशव देवधर, मुंबईच्या खादी ग्रामोद्योग कमीशनमध्ये अंबर शिक्षा विभागाचे ते डायरेक्टर होते. मुंबईला वांद्र्यांला गांधीनगरमध्ये रहात. ते हार्टफेलनी जे जे हॉस्पिटलमध्ये वारले. दोन्ही मुले लहान होती. सक्सेशन सर्टिफिकेटचा

प्रश्न आला. श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी माझी बहीण बिंदु हिला माधवरावांकडे नेले व ' हिचे सक्सेशन सर्टिफिकेटचे काम आहे ते तुम्ही कराव ' एवढे बोलून ते निश्चिंत मनाने वर्ध्याला निघून गेले. बहिणीच्या कोर्टात जाण्याचे वेळी मीही कधी बरोबर असे. फोर्ट मधल्या कोर्टात जायचा-यायचा खर्च तरी माधवरावांनी घ्यावा असे मी सूचवताच त्यांना फार वाईट ' वाटले, आक्का, परमेश्वर कृपेने मला भरपूर आहे. छे. छे., असला विचार मनांतून काढून टाका बघू ' असं ते म्हणाले. मी त्यांची माफी मागितली. अशा महान माणसांचा आता दुष्काळ झाल्याने समाजाची, देशाची, मोठी बिकट परिस्थिती होत चालली आहे.

अलीकडे तीन-चार वर्षापासून ते मला म्हणत की, तुम्ही वाद्रयांच्या महात्मा गांधीसेवा मंदिरात झेंडा वंदनास पाहुणी म्हणून यावे. मला संकोच वाटून मी टाळत असे. तथापि, दोन वर्षापूर्वी त्यांचा मुलगा, श्रीनिवासचं पत्र आलं की, दादांची फार इच्छा आहे की, तुम्ही झेंडावंदन करायला यावे, त्यांची प्रकृती बरी नसते, मी तुमच्या येण्या-जाण्याची व्यवस्था करीन. कधी येता, ते कळवावे. यावेळी मात्र मी टाळू शकले नाही. ठरल्याप्रमाणे गेले. माधवरावांची प्रकृती बघता, मी हो म्हटंल, हे बरंच झालं असे वाटले. पुढे ते देवाघरी गेल्याचे कळल्यावर त्यांची इच्छा मी पुरी करू शकल्यांच समाधान वाटलं.

चि. श्री.निवासनी मोठ्या आस्थेनी मला नेणं पोचवणं केलं. शिवाय मायेची शाल ही दादां करवी पांघरविली. मी म्हटलं, 'दादा याची काय जरुरी होती?' ते म्हणाले, 'असून देत असून देत. फार कांही नाही. फूल ना फुलाची पाकळी देतोय.' यावर कांही बोलणंच खुंटलं, अशा कित्येक हृद्य आठवणी आहेत. मनात त्या जपून ठेवून त्याप्रमाणे अल्पसा का होईना आपल्याकडून असंच वर्तन ठेवण्याच्या प्रयत्नात असते. त्यांच्या प्रेमळ स्मृतीला मुलांसह सविनय श्रद्धांजली वाहते.

***

## ३. एक झाड चंदनाचे

—सौ. शोभना रानडे

कै. माधवराव देशपांडे ह्यांचे व्यक्तित्व कधीही न विसरण्यासारखं होतं. त्यांचा प्रसन्न चेहरा, प्रश्नार्थक मुद्रा व चमकणारे शुभ्र दात माणसाला आकर्षून घेत असत. मी त्यांना प्रथम जगन्नाथपुरीच्या सर्वोदय संमेलनात पाहिलं. संध्याकाळी आम्ही दोघे जगन्नाथाच्या दर्शनाला उभे होतो. मी हात जोडून प्रार्थना करीत होते. शेजारी ते उभे होते. मी बोटांच्या मध्ये एक रुपयाची नोट धरली होती. माझ्या नकळत देवाच्या पुजाऱ्याने ती हळूच काढून घेतली. ते लक्षात आल्यावर मला विलक्षण राग आला. पण माधवराव अगदी शांत होते. 'जाऊ दे' म्हणाले. प्रार्थनेच्या वेळीच ती दक्षणा दिली गेली असे मानावे, म्हणजे झालं. त्यांच्या शांतवृत्तीचा तो माझा पहिला अनुभव होता. त्यानंतर मी त्यांच्या या वृत्तीचा अनेकदा अनुभव घेतला व त्यांच्या शांत प्रतिमेचा ठसा आजतागायत माझ्या मनावर उमटलेला आहे.

महाराष्ट्र सेवा संघाच्या बैठकीला ते नेहमी येत असत. कै. शंकरराव देवांवर त्यांची भक्ति होती. ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे दिवस होते. शंकररावांनी परखड व अतिरेकी भूमिका घेतलेली होती. त्यांच्यासोबत कामे करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांना आश्वासन हवे होते व निश्चय इतका पक्का हवा होता की 'करेंगे या मरेंगे'. आम्हा काही तरूण कार्यकर्त्यांची भूमिका लवचिक होती. आम्हाला असे वाटायचे की, हा प्रश्न इतका सोपा नाही. त्यात राजकारण जास्ती आहे व त्यासंबंधी विनोबांचे जे विचार होते ते आम्हाला जास्ती समाधानकारक वाटायचे. ह्या देशाची भाषावार फाळणी करू नये. असे विनोबांना वाटत असे व म्हणून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राला जाहीर पाठिंबा दिला नव्हता. आमची ही भूमिका कै. दादांना मान्य झाली व ते आमच्या पाठीशी उभे राहिले आणि त्यामुळे खादी ग्रामोद्योगाच्या नित्य कामात अडथळा न येता ते सुरू राहिले.

सर्व सर्वोदय संमेलनासाठी दादा आवर्जून जात असत. २-३ संमेलनात त्यांच्या सोबत असलेल्या डब्यांतले लाडू आमच्यापर्यन्त पोचलेले मला नक्की आठवतात.

भूदान, ग्रामदान, सर्वोदय या सर्वच विचारांशी दादांची तार जुळलेली होती. गांधी, विनोबा ही त्यांची आद्य दैवते आणि त्यांनी सांगितलेल्या कार्यक्रमानुसार चालणे ही त्यांची निष्ठा होती. त्यामुळे आम्हा सर्व कार्यकर्त्यांना त्यांचा आधार वाटायचा. दारूबंदी हा तर त्यांचा अतिशय प्रिय विषय. मी करीत असलेल्या परिश्रमाला त्यांची सक्रिय सहानुभूती असायची व तसं ते अनेक वेळा बोलून पण दाखवीत असत.

सर्व संस्थांनी स्वतःच्या पायावर उभे रहावे व त्यासाठी तशा प्रकारची आर्थिक तरतूद

करावी असं पण त्यांना वाटायचं. कार्यकर्ता हा सर्व कामाचा मानबिंदू आणि त्याची चौकशी व व्यवस्था आपलेपणाने करणे हा त्यांचा सहजधर्म होता. एकदा आजारी दादांना भेटायला मी घरी गेले होते. स्वत:चे दुखणं बाजूला ठेवून माझेच आतिथ्य करायला त्यांनी सुरवात केली. पंढरीची वारी म्हणजे माधवरावांच्या उत्साहाला उधाण यायचे. त्यासाठी मंडळ जमवतील, अर्थ व्यवस्था करतील, गाडी ठरवतील, पुस्तक घेतील आणि आपल्या दुखऱ्या पायाने सर्वोदय दिंडीचं नेतृत्व करतील. अशा या अखंड सेवाव्रत घेतलेल्या दादांना माझी ही विनम्र श्रध्दांजली. मला खलिल गिब्रानचं वाक्य आठवतं, 'चंदनाचा वृक्ष उन्मळून पडतो पण त्याचा सुगंध दरवळत रहातो आणि जगाच्या काना-कोपऱ्यांत जाऊन दडून राहतो'. त्यांच्या व्यक्तित्वाचा सुगंध अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा देत राहील.

***

## ४. आम्ही माहेरवाशिणी---आमचे दादासाहेब देशपांडे यांच्या

सौ. सिंधूताई मुळे, संघटक, नशाबंदी मंडळ

आमचे नशाबंदी मंडळाचे शिबिर संपले की दरवर्षी दादा आम्हाला जवळपासची प्रसिद्ध स्थळे बघायला नेत असत.

एक वर्षी आमचे पन्हाळा येथील शिबिर संपले आणि आम्हाला नरसोबाची वाडी, सांगलीचा गणपती बघायला नेले. दादांनी तसेच औदुंबर करून आम्हाला त्यांच्या आरळे येथील आश्रमात जावयाचे कां म्हणून विचारले. आरळे म्हणजे ३,००० ते ३,५०० फूट उंचीवरचे थंड हवेचे ठिकाण. ७ मैल चालत उंच चढत जावयाचे होते. आम्ही ७-८ महिला आणि ७-८ पुरूष असे होतो. आमचा चढण्याचा वेग दादांना माहीत असल्याने त्यांनी आमच्यासाठी दोन बैलगाड्या ठरविल्या. आम्हाला आरळ्याला आश्रमात पोहोचवण्यास सांगितले आणि दादा स्वत: काही संघटकांना बरोबर घेऊन शॉर्टकट रस्त्याने चालत वर चढले. एवढे चढून आल्यावरही दादा स्वस्थ बसले नाहीत तर आश्रमात प्रथम चहा-पोहे नाश्त्याला बनवायला तेथील कामकरी महिलांना सांगितले.

आम्हाला तोपर्यंत विश्रांती घ्यायला सांगून ते स्वयंपाकाच्या सूचना द्यायला गेले. पुरण-पोळीचा बेत ठरविला. आम्ही चहा नाश्ता झाल्यावर विहिरीवर आंघोळीला गेलो. आम्हाला मुंबईच्या महिलांना विहिरीचे पाणी काढण्याची सवय नसल्याने त्यांनी ४ महिलांना (आश्रमात काम करणाऱ्या) विहिरीचे पाणी काढायाला पाठविले आणि त्यांना आम्हाला न्हाऊ घाला, पाठीला साबण लावून द्या वगैरे सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे त्या महिलांनी आम्हाला न्हाऊ घातले. माहेरपण संपल्यानंतर ह्या वयात असे न्हाणे म्हणजे आम्हाला अगदी माहेरी आल्यासारखे वाटले. स्नानानंतर १ वाजता पुरण-पोळीचे जेवण, पुन: विश्रांती, नंतर आश्रम बघायला गेलो. फिरता फिरता घोड्यावर रपेटही करायला मिळाली. खूप मजेत भटकलो, ५ वाजता पुन: आंबा डाळ, पन्हे घेऊन गप्पा झाल्या. रात्री आमटी भात. दुसऱ्या दिवशी वांग्याची भाजी, भाकरी बेत झाल्यावर परतलो, पण एकसारखे दादांचे माहेरपण डोळ्यापुढून जात नव्हते. सर्वजणी ह्या माहेरपणामुळे भारावून गेल्या आणि मुंबईला आल्यावर दादांना सांगितले 'फक्त ब्लाऊज पीस राहिला दादा'. दादांनी काम तर करू दिले नाहीच पण पोरींना विश्रांती हवी ह्या जाणिवेने त्यांनी 'तुम्ही अगदी आराम करा' असं सांगितले. आम्हाला कोण म्हणणार असे? आजही हे माहेरपण आठवते आणि दादांची वात्सल्यमूर्ती डोळ्यासमोर येते. असे आमचे दादा. कधीही रागवत नव्हते, मोठ्यांने बोलणे त्यांना माहीत नव्हते; त्यांना कुणी काहीही म्हणो, ते म्हणायचे 'माझे खिसे खूप मोठे आहेत, सगळ्यांचे चिडणे, रूसणे, रागावणे मी खिशांत ठेवतो'. तसेच मला म्हणायचे 'पोरी, मळकट कपड्यावर जर डाग पडले तर दिसत नाहीत, पण

पांढऱ्या कपड्यावरचे डाग चटकन् दिसतात, तुला मी बोललो ते याचसाठी, वाईट वाटल कां?'

हृया शब्दातच दादांचे, त्यांना काय म्हणायचे होते त्याचे सार लक्षात यायचे आणि दादाबद्दलचा अभिमान वाढायचा. अशा आमच्या दादांनी ६२ ते ७० हृया आठ वर्षात आमची चारीधाम यात्रा घडवून आणली, १२ ज्योतिर्लिंगे करवली. हृया वयात प्रवास झेपत नव्हता तरी दादांची हौस आणि आवड तरूणांना लाजवील अशी होती.

बद्रीकेदारच्या यात्रेच्या वेळी तर दादांच्यावरचे गडांतर टळले.

सोनप्रयागला छोटया छोटया बराकीत आम्ही आणि आमच्याप्रमाणे अनेक प्रवासी उतरले होते. खालच्या बाजूला अलकनंदा नदी, मोठे मोठे दगड, शिळा, गर्द झाडी होती.

थंडी बद्रीकेदारच्या वाटेवर अतिशय असते. त्यामुळे दारे बंद करून, अंगावरील ब्लँकेट तोडांवरून घेऊन सर्वजण झोपलो होतो. मध्यरात्री १।। ते २ च्या सुमारास मला "मुळेबाई, आमरेबाई" अशी हांक कुणीतरी खूप लांबून मारत आहे, असे ऐकू आले. ३-४ वेळा हाका ऐकल्यावर मी आमच्याबरोबर असलेल्या दहिवळे, जोशी यांना उठवले आणि दादांचा आवाज बाहेरून येतो, जाऊन बघा, म्हणून सांगितले. बॅटरी घेऊन ते ३-४ जण बाहेर गेले, तर दादा अगदी खालच्या बाजूला हातात काठी घेऊन जात असलेले दिसले. 'मुळेबाई' म्हणून हाक मारत होते, अंदाजाने सर्वजण धावत गेले आणि दादांना धरून आणले. दादा म्हणाले, " मी बऱ्याच दारावर काठीने आपटून हाक मारली, पण ते लोक दुसरेच असायचे. शेवटी आपली बराक पुढे असेल असे वाटून खाली खाली जाऊन पोहोचलो असेन. कदाचित अंधारात बराक विसरलो असेन. थोडक्यात वाचलो, नाही तर एवढ्या खोल ठिकाणी काय झाले असते ?" रात्री पण काळोख खूप असल्यामुळे दिसत नव्हते. आल्यावर आम्ही विचारले "दादा तुम्ही एवढ्या अंधारात एकटेच का गेलात? कुणाला तरी. हृया मुलांना उठवायचे होते". तर दादा म्हणाले "पोरांची झोपमोड झाली असती, मला वाटले जवळच लघवींला बसेन आणि आत येईन, पण मी कसा चुकलो अंधारात कळत नाही."

'तुम्हाला जाग कशी आली' मी म्हटले. "दादा, मला माझे नाव घेऊन कुणीतरी बोलावते असे वाटले, नीट ऐकल्यावर तुमचा आवाज ओळखला आणि मग सर्वांना उठवून तुम्हाला शोधायला पाठविले".

तेव्हा दादा म्हणाले 'देवीच्या रुपाने पोरी तू मला वाचविलेस' मी म्हटले 'ही तुमचीच पुण्याई दादा, नाहीतर एवढी बारा ज्योतिर्लिंग, चारी धाम यात्रा आम्हाला कुणी घडविल्या असत्या?' ही यात्रा बद्रीकेदाराची आम्ही दादासमवेत शेवटचीच केली. त्यानंतर आता गेली १५ वर्षे झाली आम्ही कुठेंच एवढ्या मोठ्या यात्रेला गेलो नाही. तशा छोट्या भजनी मंडळाबरोबरच्या सहली होतात पण अशा व्यापक प्रमाणात यात्रा होत नाही.

असे दादा की ज्यांनी आम्हाला ही प्रवासाची आवड निर्माण करून दिली. कुणाचा राग करू नये, तोडून लागेल असे बोलू नये, राग आला तरी विसरून जावे वगैरे. त्यानी स्वत: तसे वागून आम्हाला दाखवून दिले, जगात रहावे कसे? सदा हसत खेळत जगावे.

***

## ५. पदयात्रा सह्याद्रीच्या कुशीतील

**ग्रामसेविका—सत्यभामा कुलकर्णी**

पंढरपूरला विनोबा येणार होते. त्यांचा संदेश प्रत्येक खेड्यातून पोचवायचाच ही पू. कै. दादांची जिद्द होती आणि त्यासाठी आम्ही कार्यकर्ते कसलीच तमा न बाळगता फिरत होतो. शिराळे पेट्यातील पेटलोण गावाच्याही पुढे सह्याद्रीच्या निबिड अरण्यातून आमची पदयात्रा चालली होती. बैलगाडी रस्ता तर नव्हताच ; असायची एखादी पाऊलवाट, पण तीही नव्हती. गर्द रानात कसल्याच पावलांच्या खुणा उमटलेल्या नव्हत्या. जरा पुढे गेल्यावर त्या खुणा क्वचित दिसू लागल्या. त्या होत्या शिकाऱ्यांच्या, जळण आणणाऱ्यांच्या, अनेक ठिकाणी विखुरलेल्या. कुठल्या खुणा पकडायच्या, सुचत नव्हतं. संध्याकाळ झाली होती. पुढील गावी आपण पोहोचणार या विचाराने चढण चढत होतो. खडक, काटे टोचत होते. वेळूच्या बेटातून वाहणारा वारा विचित्र आवाज करीत होता. आम्ही वाट चुकून घनदाट झाडीत शिरलो. दोघंजण पुढे गेले होते. हातावरील माणूस दिसेना. मी त्यांच्यात ऐकायला कमी येणारी कसली चाहूल लागेना. वाटेत खूप पाणी असलेली नदी लागली. नदीला पूल नव्हताच. नदीत उड्या टाकता येतील एवढ्या अंतरावर मोठमोठे खडक होते. तेही नदीच्या दुसऱ्या तीरापर्यंत. स्त्री मी एकटीच. सर्वत्र भयवर्जनम् हे व्रत आम्हा सर्व कार्यकर्त्यांना साधले होते. पदयात्रेत आमच्याबरोबर असलेले दादा म्हणाले, "अंगावरचे उपरणे हाताला गच्च बांधून घ्या. उपरण्याचे दुसरे टोक कत्ते गुरूजी धरतील. माराल ना उडी ?" मी म्हटले, "उपरणे नको. मी तशीच येते." "पांडुरंग हरी, पांडुरंग हरी" हा गजर करीत करीत जोराने, मोठ्याने गात गात आम्ही पाण्यात भराभर उड्या घेतल्या. परतीरी आलो. पण पुढेही गाव लागेना. भजन चाललेच होते. वाट नवखी होती. पण आमच्या आवाजाने कुठल्या तरी धनगर वस्तीतून दोन इसम आले आणि "अशा भयाण जागी अपरात्री आलातच कसे ?" म्हणून आम्हाला दोष दिला. "गाव जवळ नाही, उरली रात्र आमच्या झोपडीत काढा, सकाळी जा" म्हणून सुचविले. त्यांनी आम्हाला त्यांच्या झोपडीत नेले. त्यांनी करून दिलेल्या कढत पाण्याने हात, तोंड धुतले. ओसरीवर विस्तू होता, थोडे शेकले. अन् मग नागलीची भाकरी, चहाचा पाहुणचार घेऊन आगटी जवळ झोपलो. भागूजी, कत्ते, पिलोबा अण्णा, मला गाढ झोप लागली. पहाटे काही न घेता निघालो. थकवा आला होता. पण वनश्री फार बहारीची होती. नुकताच होणारा सूर्योदय, विविध रंगांची फुले, मोठाले वृक्ष, मधूनच वाहणारे चंदेरी झरे, मधूनच तुटलेले उंच उंच कडे. दादा म्हणायचे, "हा

कत्ते पॉईंट, ही सत्यभामा गार्डन, हा पिलोबा पॉईंट." दादांच्या विनोदाने हसत, रमत गाव कधी गाठला हे आम्हाला कळले नाही. वेशीत गिरीजन उभे होते. त्यांनी टोपलीने फुलं उधळली. कढत कढत दूध, द्रोण भरभरून मध, करवंद, आवळे, बिब्याची फुलं, फणसाचे गरे देऊन आमचं स्वागत केलं. आमचा श्रमपरिहार झाला.

दुसऱ्या वेळी आणखी काही स्त्रिया, मुलं बरोबर होती. सर्व लवाजमा बरोबर होता. वाट निरुंद, घोड्यावर ओझी, अशा परिस्थितीत एक घोडे उधळून पळू लागले. त्याच्या पाठीवरची पोती खडकाला अडकली. घोडं रिकामं पळत होतं. आम्ही बायकांच घोड्याच्या पाठीमागून चालत होतो. आम्ही खूप जोरात गलका केला. पुढे जाणाऱ्यांना वाटलं "आम्ही जोरात घोषणा देत आहोत, भजन रंगलेलं दिसतंय." कुणीच पाठी फिरून येईना. शेवटी आमच्यामागे असलेली टोळी आली. एक-दोघं घोड्याच्या शोधात गेले. नंतर पोत्यातील ओझ्याचे वाटप झाले. आम्हा बायकांनाही आमच्या वाटणीचं ओझं उचलण्यात भाग घ्यावा लागला. डोक्यावर गाठोडी, काखेत मुलं असा आमचा तांडा येतोय हे कुणीतरी पुढे कळवले. मग दोन गडी घेऊन दादाच माघारी आले. आमचं सर्व ओझं तर त्यांनी घेतलंच व मुलेही. हा सर्व प्रकार कळल्यावर सर्वजण पोट धरधरून हसली. दादांनी आम्हा सर्वांचे खूप कौतुक केले. मुक्कामाला पोचल्यावर मेजवानीही दिली. आश्चर्य असं की, कुणीही थकलेला भागलेला दिसत नव्हता. रात्री नेहमीप्रमाणे सभा झाली. भजन, नकलांचा कार्यक्रम झाला. खूप मजा आली.

## एक पदयात्रा मुंबापुरीतील

अशाच एका पदयात्रेचा कार्यक्रम मुंबईला झाला. विमल ठकारांची पदयात्रा होती. सभेत खूप दंगल झाली. दगडफेक झाली. स्त्रियांना जखमा झाल्या. मी त्यावर ओव्या केल्या होत्या —

खादीच्या पातळाला रक्ताची लाल खूण।
मुंबापुरीचे बंधु माझे, त्यांनी केली ही बोळवण।। १ ।।
चौपाटीवर सभा, आले दगड लल्लाटी।
धरीतीला डाग नको, माझी पसरते ओटी।। २ ।।

दादा अत्यंत आवडीने माझ्याकडून ह्या ओव्या म्हणवून घेत.

नित्याप्रमाणे पदयात्रा निघाली. कटु अनुभव खूप आले. खूप लांबचा पल्ला मारायचा होता. बरोबर खाण्याच्या वस्तू होत्या. भुकेल्या यात्रिकांनी वाटेत नास्त्याच्या पिशव्यावर हल्ला करून खाण्याच्या जिनसा फस्त केल्या. नास्त्याच्या जिनसा सर्वांना पुरल्या नाहीतच. मुक्कामाला व्यवस्थापक मला रागावले. कारण नास्त्याचे वाटप माझ्याकडे होते. मला वाईट वाटले. दादा आल्यावर त्यांना हे समजले. त्यांनी पिशव्या नव्हे, परातीच्या पराती आणून राहिलेल्यांना पोटभर खाऊ घातले. या

पदयात्रेत प्रचाराची एक तुकडी असे नारायण गाडोदियांनी मला त्या तुकडीत घातले. दादा मला जाताना बजावून गेले होते, "विमलच्या तुकडीत थांबा. बौद्धिक ऐका." पण राम चिचलीकरांच्या आग्रहाने मला प्रचार तुकडीत जावे लागले. दुसऱ्या दिवशी दादा आले तर मी विमलच्या तुकडीत नव्हते. ते म्हणाले, "बाईला बुद्धि आहे. हे काम ती उत्तम तऱ्हेने करतेही. तिला आणखी माहिती असावी अशा हेतूने मी तिला येथे आणले आहे. तिला बोलावून घ्या." दुसरे दिवशी टॅक्सीतून मी परत ठकारांचे तुकडीत सामील झाले. त्यांचे बौद्धिक व सभा यातून खूपच फायदा पुढे काम करताना मला झाला. क्वचित दादा स्वामीजींना (मोघे) विनोबा ग्रामला आमच्यासाठी घेऊन येत.

***

# ६. ते तर कर्मयोगी होते !

—श्री. सदानंद देशपांडे

सुरवात कोठून करावी मला प्रश्न पडला आहे. असं म्हणतात, अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत बी. ए. ची. व एलएल. बी. ची डीग्री पदरात पाडली व पुढे वकिली सुरू केली, मुंबई हायकोर्टात—अतिशय बुद्धिमान्, कर्तृत्ववान असलेले दादा, त्यांनी ह्या क्षेत्रात लवकरच नाव कमावले व अत्यंत निष्णात् वकील म्हणून त्यांची ख्याती वाढायला, मुंबईला होऊ लागली. त्यामुळें लक्ष्मीही त्यांच्या घरी पाणी भरू लागली. रंगाने काळे, तसे ठेंगणेच पण सरळ नासिका, गोल चेहरा, हसतमुख, तसेच वेळी अतिशय गंभीर होणारे दादा—त्यांना एक वेगळीच पर्सनॅलिटी, व्यक्तिमत्व निश्चितपणे होते. त्यांचे चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज नेहमीच विलसत असे. पुढे प. पू. महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांचा त्यांच्यावर विलक्षण पगडा बसला व त्याकाळी नामांकित वकील म्हणून प्रसिद्ध पावलेले दादा लक्ष्मीकडे, पैशाकडे, संसाराकडे पाठ फिरवून १९४२ च्या संग्रामात उतरले. पैशाचा मोह इतका सहज सुटतो का माणसाला? पण त्या तरूण, मध्यम वयात सर्व मोहपाश सोडून के. दादा स्वातंत्र्य संग्रामात उतरले. इथूनच त्यांचा कर्मयोग सुरू झाला. तुरूंगातून सुटून आल्यावर पुन्हा प्रॅक्टीस सुरू करून हवा तेवढा पैसा, नाव त्यांना मिळवता आले असते. पण नाही, अधूनमधून जुजबी कामं करून संसाराला थोडा फार लागेल तेवढाच पैसा ते मिळवू लागले.

१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर दादांनी राजकारणात इतकी वर्ष सक्रिय भाग घेऊन नाव मिळवलेलं होतं, त्यामुळे पहिल्या निवडणुकीत मुंबईच्या गोरेगाव, मालाड-बोरिवली भागातलं कॉंग्रेस पक्षातर्फे विधानसभेचं तिकीट त्यांना मिळालं व ते निवडून आले, एम्. एल्. ए. झाले. वास्तविक पाहता त्यांची योग्यता सर्वच बाबतीत एवढी वरची होती की त्यांना पहिल्या मंत्रिमंडळातच मंत्रीपद मिळावयास हवे होते. त्यांना मंत्रीपद मिळाले (जवळजवळ) असे ऐकिवात असतानाच ते दुसऱ्याला दिले गेले. त्याबद्दल निश्चितच त्यांना त्यावेळी वाईट वाटले असणार. मला स्वतःलाही व्यक्तीशः त्यावेळी खूप वाईट वाटले. तसे त्यावेळी आम्ही सर्वजणच काही खूप मोठे नव्हतो पण दादांच्या त्या-पुढील म्हणजे आम्हा सर्वांना मॅच्युरीटी आल्यावर म्हणा, त्यांच्या सहवासावरून त्यांच्या आयुष्यातले निरनिराळे पैलू पाहून असे वाटले की, हा गृहस्थ पुढे सतत लटपटी खटपटी करत राहिला असता तर निश्चितपणे महाराष्ट्राचा "मुख्यमंत्री" झाला असता, खासदार झाला असता व देशाला, महाराष्ट्राला त्याचा उपयोगही झाला असता. पण दैव तसे घडावयाचे नव्हते. दोन वर्षांनंतरच दादांनी एम्. एल्. ए. पदाचा राजिनामा देऊन

प. पू. विनोबांचे आवाहनाला साद दिली, सत्ता हातात असणं, त्याची अभिलाषा वाढत जाणं हा मनुष्य स्वभाव. त्या स्पर्धेत दादा कधीच उतरले नाहीत. कर्मयोगीच नाहीत का ते ? हो, त्या निवडणुकीवरून आठवले की, दादांनी राजकारणात, सार्वजनिक क्षेत्रात सक्रीय भाग घेतला, तरी ते मूळ पारमार्थिक होते. परमेश्वरावर त्यांची गाढ श्रद्धा. कारण १९६०-६५ सालाच्या सुमारास, मला आठवतय, कितीवेळा तरी माणसं त्यांना भेटावयास (सकाळच्या वेळी) आली की मलाच त्यांना बऱ्याच वेळा सांगाव लागे "दादा ध्यानाला बसलेत, अर्धा पाऊण तास तरी तुम्हाला थांबाव लागेल." पण ज्यावेळी मी १९७२-७३ साली मालाडला "आदर्श दुग्धालय" हृया संस्थेचं काम केलं. आतल्या बाजूला संस्थेच्या लोकांचे राहण्याचे छोटे छोटे साधे बंगले, त्यांच्या समोर बाग, बागेत आंब्याची झाडे, झाडांना केलेला मजबूत गोल पार अतिशय सुंदर, मनोहर आल्हाददायक स्थळ! तिथले मुख्य केशवजी पटेल यांच्याकडे मी संस्थेच्या कामामुळे जात असे. पुढे कोणाकडून त्यांना कळले की, हा देशपांडे इंजिनिअर श्री. माधवरावजी देशपांडे यांचा पुतण्या आहे. या सर्व लोकांनी दादांना निवडणुकीच्या वेळी बरेच सहाय्य दिले होते. पुढे मी त्यांना भेटावयास गेलो असताना त्यांनी दादांची एवढी स्तुती केली व शेवटी काय म्हणाले, माहिती आहे? "अरे, तुझा काका त्या आंब्याच्या झाडाखाली ध्यान करत बसायचा." म्हणजे दादांची 'ध्यान धारणा' खूप वर्षापासूनची होती. कर्मयोग तेव्हापासून साधावयास निघाले होते ते.

मी सांगलीला शिकत असताना वर्षांतून ५-६ वेळा तरी दादा त्या भागात निरनिराळ्या संस्थेच्या कामासाठी आले की हॉस्टेलवर येत असत. तेथेही ते माझ्या बरोबरच्या, आजूबाजूच्या मित्रांची सर्व तऱ्हेची चौकशी करीत असत. राहणारे कोठले? वडील काय करतात? पैसे किती पाठवतात? मध्यमवर्गीय असून पालक हे सर्व कसे निभवतात? प्रत्येक गोष्टीत रस घेण्याची दादांची प्रवृती होती. मला सौ. कुमुदला, माझ्या बहिणीला थोडी तशीच सवय, त्यामुळे दादा म्हणत " वकिलाची पुतण्या-पुतणी शोभता खरं!"

असे हे दादा पूर्वायुष्यात प्रवासात जागेसाठी हमरी तुमरीवर येऊन खूप भांडत, तंटत, रागाने वाटेल ते बोलत. त्यांच्याबरोबर मी प्रवासात होतो आणि ते दृष्य मी पाहिलं म्हणून लिहितो. तेच दादा गाडी सुरू होऊन थोडा वेळ गेला त्या भांडलेल्या शेजाऱ्यांशी मोठ्या प्रेमाने बोलू लागले. कुठल्या गावाला जायचय इथपासून सुरवात करून त्यांच्या घरादाराच्या माहितीपर्यंत मला आठवतंय् तो भांडणाराही चाट पडला. एक-दोन जणांनी मला नंतर विचारलंही 'हा बाबा तर लई चांगला दिसतोय, अन मग मगाशीच त्याला काय झाल व्हतं?'

माझी धाकटी वहीण सौ. नलू, मी व दादा पुढे एकदा पुण्याला चाललो होतो. आम्ही बोरीबंदरला बसलो होतो. आम्ही रिझर्वेशन केले होते. दादर आलं. सहज बाहेर पाहिलं तर फलाटावर बरीच गर्दी, त्या गर्दीत उभे असलेले दादा सहज ओळखता आले. पांढरे स्वच्छ खादीचे कपडे, खांद्यावर पुढेमागे होणारी जोडपिशवी व हातांत कांबळे व बरोबर एक खादीची चादर असलेले, दोरीने बांधलेले बेडींग. गाडीने दादर सोडल्यावर, गाडीत थोडी

स्थिरस्थावरता निर्माण झाल्यावर, मी नलूला म्हणालो, 'मी दादा कोठे बसलेत बघून येतो व त्यांना इथे घेऊन येतो.' डबे शोधत चाललो. ५-६ डबे गेल्यावर पाहिले तर दादा आपल्या पडशीतले पुस्तक काढून बेडींगवर, गाडीच्या दारात बसलेले व पुस्तक वाचण्यात मग्न झालेले. त्यांना मी आमच्या तिकडे बसावयास नेल्याचा त्यांना खूप आनंद झाला. पण तो आनंद होता त्यांना आम्ही दिलेल्या प्रेमाचा-जागेचा नव्हे. नाही तर कोणालातरी 'सरका हो जरा सांगून' कोठेतरी ते बसले असते. खऱ्या अर्थाने असल्या गोष्टीच्या पलिकडे गेलेला, कमीतकमी गरजा अंगिकारलेला, वाचनात दंग असलेला हा एक कर्मयोगी !

दादांना मी कर्मयोगी म्हणतो ते उगीच नाही. काकांना, माझ्या वडिलांना, अचानक ध्यानीमनी नसता बॉम्बे हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यापूर्वी देवाज्ञा झाली. त्यावेळी तिथे मी, दादा व काकू, माझी आई आम्ही तिघजणच होतो. काकांच्या मृत देहाजवळ काकूला एकटीलाच ठेऊन आम्ही खाली आलो. कारण पुढे काय कसे करावयाचे ते तिच्या देखत ठरवता येत नव्हते. खाली आल्यावर चार वेळा भरून येणारे डोळे दादांनी पुसले. मला म्हणाले "घरी फोन करू आणि कोणाला तरी बोलावून घेऊ या, इथं काकूच्या जवळ बसायला. तोपर्यंत आणखी फोन करून कोणाकोणाला बोलावतां येणे शक्य आहे ते पाहू." पुढे सर्व गोष्टी होईतोपर्यंत दादा गंभीरपणे सर्व करत होते. धीर देत होते. पुढेही रोज धीर द्यायचे. त्याच दादांना ४ दिवसानंतर एक मिटींग होती. तिथेही ते हजेरी लावून आले. काही लोक मला नंतर म्हणाले 'कसलं हो त्यांना भावाचं प्रेम'—'राम लक्ष्मण' म्हणतात. 'केशव-माधव' राम-लक्ष्मणच जणू जन्माला आलेत पण हे नुसतेच बरं का? पण परिस्थिती फार वेगळी होती. ती पुढं कितीतरी वर्ष, कितीतरी वर्ष काय, दादा कैलासवासी होईतोपर्यंत दादा आम्हा भावडांना पाहिले की, भावाच्या आठवणीने ढसाढसा रडायचे. आम्हाला पाहिल्यावर त्यांचे डोळे भरून आले नाहीत असे कधी व्हावयाचे नाही. पुन्हा आपले आपणच सावरायचे-हातवारे करत म्हणायचे 'केशवच्या आशीर्वादाने तुमचं ठीक होईल, चांगलं होईल. घरी सांताक्रुझला आले की, काकांच्या फोटोकडे पाहुन त्यांना एवढे भरून यायचे की, एकदाही रडल्या शिवाय ते परत गेले की नाही हे आठवावं लागेल. काका १९६४ साली गेले. दादा १९८४ साली गले. मला प्रश्न पडतो भावाच्या मागे त्याच्या आठवणीने सतत २० वर्षे रडणारा असा हा भावाच्या बाबतीत अतिशय हळवा, मृदु असलेला भाऊ प्रत्यक्ष भाऊ गेला तेव्हा किती ढेपाळला असेल ? आतून किती खचून गेला असणार ! पण तेव्हा त्यांनी आम्हा सर्वांना सावरण्यासाठी, सर्व दु:ख पोटात ठेऊन, चेहऱ्यावर फक्त गंभीर भाव ठेऊन सर्व गोष्टी केल्या—हा कर्मयोगी नाही ?

दादांचे संसारात, घरांत एवढं लक्ष नव्हते असं म्हटलं जातं. ते थोडफार खरही आहे. हे पण त्यांचं कुटुंबावरचं प्रेम खोटं दिखाऊ नव्हतं. संसारातल्याच काय पण कुटुंबातल्या सर्व माणसांवर त्यांची माया होती, प्रेम होते, भक्ती होती. पण त्यात ते गुरफटून जात नव्हते. त्यांचं घरादारांवर प्रेम नसतं तर त्या मंडळीसाठीच त्यांनी बाहेरगांवाहून भाजीपाल्यासकट केवढाली ओझी उचलून आणली नसती. घरी आल्यावर पहाटे उठून काही काही वेळा

स्वतःच्या हाताने ते प्रेमाने कितीतरी वेळा स्वयंपाक करत असत व सर्वांना खाऊ-पिऊ घालत असत. परमेश्वराने त्यांना उत्तम आरोग्याची देणगी बहाल केलेली होती. ती त्यांनी शेवटपर्यंत डॉक्टरांची औषधं न घेता टिकवली होती. त्यांचा कामाचा उरक दांडगा होता. ते सतत उद्योगात राहत असत. वाचन करीत असत, मनन करीत असत. तशी त्यांना चवीनं खाण्याची आवड होती. कुठलाही पदार्थ स्वादिस्ट झाला की ते त्या पदार्थाची स्तुती करत असत. पण तेवढच त्यांनी त्यांच्या जीवनात साधी राहणी, साधा आहार अंगिकारला होता. ते साध्या उकड भाज्या खाऊनही राहू शकत होते. दादांना तुम्ही केव्हांही पाहिले असते तरी ते ताजेतवानेच दिसले असते. आनंदी दिसले असते. त्याचं उदाहरण सांगतो---८-१० वर्षांपूर्वीची गोष्ट. एकदा दादरला मार्केटमधून दादा भाज्यांनी गच्च भरलेल्या पिशव्या घेऊन फुलमार्केटमध्ये भेटले. त्यावेळी त्यांचे वय ७५-७७ तरी असेल. मी त्यांच्या हातातल्या पिशव्या बळबळे काढून घेतल्या. पिशव्या एवढ्या जड होत्या की पुढे थोडा वेळ फिरल्यावर माझ्या सारख्यालाही जरा दमायला झाले. मनात आले दादांनी एवढा वेळ त्या पिशव्या घेऊन कशी काय भ्रमंती केली असेल ?

माझ्या मुलाची चि. श्रीकांतची मुंज झाल्यावर दादांना मी आमच्या बरोबर आरळ्याला येऊ शकाल का? म्हणून विचारले. दादा तावडतोब तयार झाले. आम्ही कऱ्हाडला गाडीत बसलो आणि त्यांना लहानपणची आठवण आली. 'अरे बाळ, त्या श्रीकांत एवढाच म्हणजे १०-११ वर्षांचा असतांना मी आमच्या आईला घेऊन आरळ्याला प्रथम गेलो. कुठून माहिती आहे का? गुजराथमधील बडोद्याहून. कशासाठी? तर उत्पन्नाची काही वाटणी मिळावी म्हणून? म्हणजे मग पुढे शिक्षण घेणे सोईचे पडेल. अगदी अलीकडच्या काळांत म्हणजे १९६०-६२ साली सुद्धा आरळ्याला जायचे म्हणजे दिव्य वाटायचे. रस्ते सगळे खाचखळग्यांचे, गाड्या अगदी दिवसाला २-३ च. अलिकडची ही परिस्थिती. दोन क्षण विचार करत राहिलो, मग एवढासा मुलगा त्याकाळी, ५० वर्षांपूर्वी, कुठून, कसे जावयाचे ते माहीत नसतांना प्रवास म्हणजे पुढे बैलगाडी-घोडी-पाऊलवाट अशा त्या प्रकारांत आपल्या आईला घेऊन एवढ्या लांबवर कसा गेला असेल? खचितच अतिशय बुद्धिमान-धीट असल्याशिवाय हे काम कोणी करू शकणार नाही.

आता डोळ्यासमोर दिसतात ते शेवटच्या दिवसातले दादा. त्यांचे बाहेर जाणे बंद झाल्यावर मला वाटते ते बहुतेक माळ्यावरच असत. ते दृष्यही फार सुंदर, निर्मळ वाटायचे. साध्या राहणीतले, अंगावर फक्त अर्धी चड्डी, खाली एक कांबळं, त्यावर एखादी खादीची चादर, मागे मनोहारी दिव्य असा तेजोमय श्री. ज्ञानेश्वरांचा फोटो व दादांचे बसून, झोपून सारखे ज्ञानेश्वरीचे पारायण चालू, असे ते बघून वाटायचे मनात आणले तर त्या क्षणीही हा गृहस्थ ऐषआरामात, पलंगावर, गाद्यागिर्द्यांवर स्वतःच्या एवढ्या मोठ्या घरात कोठेही पहुडला असता. पण साधासुधा, श्री. ज्ञानेश्वरमाऊलीत तल्लीन झालेला माणूस, एवढ्याशा बुटक्या माळ्यावर, साध्या कांबळ्यावर पडून अहोरात्र ज्ञानेश्वरांचे चिंतन-मनन करत "बसलेला हा त्यागी मनुष्य कर्मयोगीच" की हो !

***

## ७. जे जे मंगल, चांगले, तेथे तेथे दादा

--गोविंद का. शिंदे

श्री. माधवराव देशपांडे यांचा व माझा पहिला परिचय १९५५ च्या सुमारास झाला. विनोबाजींचे ते भक्त. सर्वोदय आंदोलनाला त्यांनी वाहून घेतलेले. त्यासाठी आमदारकीचा राजीनामा दिलेला. स्वतः आपली सर्व जमीन भूदानात त्यांनी दिली. या सर्वांमुळे त्यांच्याविषयीचे एक विशेष आकर्षण त्यावेळेला आम्हा तरुणांमध्ये होते. भूदान, ग्रामदान आंदोलनामध्ये त्यांनी अपार काम केले. मला आठवते, अनेक पदयात्रांमध्ये मी त्यांच्यासोबत होतो. महाराष्ट्र राज्याची प्रथम भूदान समिती होती त्यामध्ये ते होते. तेथे मीही होतो. त्यामुळे भूदानाच्या कामाच्या निमित्ताने ठाणे, कुलाबा (रायगड), सांगली या जिल्ह्यांमध्ये ते विशेष हिंडले. अनेक कार्यक्रमांची व पदयात्रांची मुंबईहून त्यांनी योजना बनवून आखणी करून त्याची अंमलबजावणी केली. भूदान मिळाले परंतु मिळालेल्या जमिनीचे वाटप झाले पाहिजे, भूमिहीनांना ती मिळाली पाहिजे यासाठी ते नेहमी दक्ष असत. मिळालेली जमीन वाटून टाकावी यासाठी त्यांनी अनेक खेड्यांमध्ये जाऊन जमिनीचे वाटप केले. भूदानानंतर ग्रामदानाची चळवळ सुरू झाली. त्यावेळी ग्रामदानाची भूमिका समजाऊन सांगण्याचे काम ते सतत पायी हिंडून करीत असत अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, शंकरराव देव, प्रेमाताई कंटक, आचार्य दादा धर्माधिकारी आदींचे दौरे त्यांनी महाराष्ट्रात आखले व ते यशस्वीपणे पार पाडले. या सगळ्या कार्यक्रमासाठी पैसा जमवावा लागतो. तेही जमविण्याचे काम मुंबईत राहून ते करीत. असत. ग्रामदानी चळवळ सुरू झाली. अनेक ग्रामदाने महाराष्ट्रामध्ये मिळाली. आता ग्रामदाने मिळाली आहेत तर निर्माणाचे कामही त्या त्या गावात झाले पाहिजे, अशा दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले. सांगली जिल्ह्यात त्यांच्या गांधी सेवाधामच्या परिसरात १८ ग्रामदाने मिळाली होती. त्याच्या निर्माणासाठी त्यांनी योजना आखली. प्रत्येक गावाची सोसायटी बनवली व त्यांना शासनाकडून बैल, नांगर, बी-बियाने इत्यादी साधने मिळवून दिली. सामान्य गरीब माणूस सुखी-समाधानी असावा यासाठी त्यांची सतत धडपड चालू असे. ठाणे जिल्ह्यात आचार्य भिसेंच्या मार्गदर्शनाखाली भूदान, ग्रामदानाचे काम चालले होते. त्यांना सर्वतोपरी मदत दादांनी केली. जी ग्रामदानी गावे झाली त्या गावच्या लोकांना, आदिवासींना कसे सहाय्य मिळेल, साधने कशी मिळतील, त्यांची एकी कशी मजबूत राहील, यासाठी ते अखेरपर्यन्त प्रयत्न करीत राहिले. ठाणे जिल्ह्यात अनेक ग्रामदाने झाली. जिल्हादान म्हणून जाहीर झाला. दादांना मोठा उत्साह आला. त्यांनी ग्रामदानी गावच्या विविध योजनांचा पाठपुरावा केला

अगदी डोंगराळ भागात बरवडपाडा नावाचे एक ग्रामदानी गाव मोरवाडा तालुक्यात आहे. तेथे ते सतत जायचे. त्या गावच्या लोकांचा पाण्याचा प्रश्न, शाळेचा प्रश्न, बालवाडीचा प्रश्न, धान्य दुकानाचा प्रश्न असे अनेक प्रश्न हाती घेऊन त्यांनी सोडवण्याचा प्रयत्न केला.

विनोबांचे ते शाळा सोबती. विनोबांच्यावर त्यांचे अपार प्रेम. कधी विनोबांची भेट घेईन असे त्यांना व्हायचे. काही प्रश्न निर्माण झाला, अडचण निर्माण झाली की विनोबांच्याकडे जाऊन त्यासंबंधी ते चर्चा करायचे. सर्व माहिती विनोबाजींना द्यायचे व वैचारिक शिदोरी घेऊन परत आपल्या कामाला लागायचे. विनोबाजींनी अनेक कामे त्यांच्यावर सोपविली व दादांनी ती यशस्वी करून दाखविली. अलिकडे दाद आजारी होते व विनोबाजींचा अखेरचा क्षण जवळ आला होता. अंगात शक्ती नसताना दादा स्वतंत्र गाडी काढून विनोबाजींच्या अंत्यदर्शनासाठी गेले.

दादांनी निरनिराळ्या क्षेत्रामध्ये विविध कामे केली. त्यामध्ये खादी संस्थेचे काम करताना माझा त्यांचा विशेष संबंध आला. महाराष्ट्र सेवा संघ ही महाराष्ट्रातील जुनी खादीची संस्था आहे. महात्मा गांधींनी ती निर्माण केली. या संस्थेच्या ट्रस्टमध्ये माधवरावजी होते. महाराष्ट्रामध्ये कार्यकर्ते काम करीत त्यावेळी कायद्याच्या अडचणी येत त्यावेळी ते माधवरावजींच्या कडे धाव घेत. कै. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी अनेक संस्था उभ्या केल्या. अनेक कामे व्यापक प्रमाणात चालविली. त्यांना दादांनी पूर्ण साथ दिली. अनेक कायदेविषयक प्रश्न येत असत. ते दादा चिकाटीने सोडवत असत. महाराष्ट्र सेवा संघामध्ये खादीचे उत्पादन होते, विक्री होते. आज खादी काम असे आहे की ते शेवटच्या माणसापर्यंत पोहचले आहे. आज दुसरा कोणताच उद्योग नाही की ज्यामुळे सर्वांना उद्योग मिळू शकतो व ते पोट भरू शकतात. म्हणून हा उद्योग जास्त प्रमाणात वाढावा असा त्यांचा प्रयत्न होता. सांगली जिल्ह्यात आटपाडी भागात त्यांनी एक केंद्र उभे केले व ते यशस्वी करण्याची सतत त्यांनी खटपट केली. आटपाडी हा दुष्काळी भाग. या दुष्काळी भागामध्ये लोकांना दुसरा कोणताच उद्योग नाही. त्या भागात जवळ जवळ शंभर लोकांना गेली तीस वर्षे काम मिळत आहे. ही खेड्यापाड्यातील केंद्रे स्थीर व्हावीत, स्वावलंबी व्हावीत ही त्यांची दृष्टी होती. आटपाडीला त्यांनी जमीन मिळवली व ते केंद्र स्थीर केले. महाराष्ट्र सेवा संघाचे अखेरपर्यंत ते ट्रस्टी होते. त्यांनी जे काम केले त्यामुळे महाराष्ट्र सेवा संघाला आज कितीतरी सुलभता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र सेवा संघाचे काम मुंबईतही चालावे म्हणून सांताक्रुझला त्यांनी जागा मिळवली व तेथे केंद्र उभे करण्याचा त्यांचा विचार होता. परंतु ते काम पुरे करण्यापूर्वीच ते देवाघरी निघून गेले.

दादा सर्वोदयाचे कार्यकर्ते, विनोबाजींचे भक्त व देवभक्तही होते. कधी पुण्याकडे गेले आणि आळंदीला जाऊन आले नाहीत असे कधी झालेच नाही. प्रथम आळंदीला जाणार, ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेणार व मग आपल्या कामाला लागणार. पंढरपूरची

वारी कधी त्यांची चुकणार नाही. या त्यांच्या देवभक्तीचा आम्हा मंडळींना खूप अचंबा वाटायचा. सर्वोदयाचे काम करतात व देवाकडेही जातात हे पाहून काही लोक टीकाही करायचे. परंतु ज्या भक्तीभावाने ते हे काम करत होते त्यामध्ये परस्परच उत्तरेही मिळत होती. त्यांचा खूपच साधेपणा असायचा. दोन पिशव्या असायच्या, त्या खांद्यामध्ये टाकून त्यांची पडशी करून ते सतत हिंडायचे. त्या साधेपणाचा ग्रामीण जनतेवर व आम्हा कार्यकर्त्यांच्यावर खूप परिणाम व्हायचा व त्यापासूनही खूप शिकायला मिळायचे.

समाज निर्व्यसनी असला पाहिजे यासाठी त्यांची धडपड चालू होती. महाराष्ट्र राज्याच्या नशाबंदी मंडळात ते पहिल्यापासून होते. मीही नशाबंदी मंडळात असल्यामुळे खूप वेळा आम्ही मिळून कामे केली. महाराष्ट्र राज्यात आज शंभरेक कार्यकर्ते काम करीत आहेत. त्या सर्वांशी दादांचा जवळून परिचय आहे. मुंबईमध्ये गो. बा. महाशब्दे व त्यांनी मिळून या नशाबंदी मंडळाचे काम स्थिर केले व वाढविले. महाराष्ट्र राज्याने पूर्ण दारूबंदी कायदा केला त्यावेळी दादांना खूप आनंद झाला व त्या कायद्याची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी त्यांनी खेड्यापाड्यात काम केले. जनमानस तयार करण्याचे काम केले. सभा, संमेलने व परिसंवाद घेतले. जे जे चांगले आहे, मंगल आहे ते ते त्यांनी करण्याचा प्रयत्न केला.

***

## ८. निर्भय, निःपक्ष, निर्वैर वृत्तीचे दादा

—श्री. जयवंत गं. मठकर

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये ज्यांनी भाग घेऊन स्वातंत्र्यानंतर कुठल्याही पदाची अपेक्षा न ठेवता सेवाभावी तसेच निर्भय, निःपक्ष, निर्वैर वृत्तीने ज्यांनी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सार्वजनिक पुनर्रचनेचे काम केले त्यामध्ये कै. श्री. दादा (माधवराव देशपांडे) यांची गणना करावी लागेल. ते स्वतः गांधीजींचे निस्सीम भक्त, विनोबाजींचे शिष्य व जयप्रकाशजींचे चाहते होते. १९५१ साली भूदानाची सुरुवात झाली त्यावेळी त्यांनी स्वतःच्या परिवारापासून भूदानाची सुरुवात करून या चळवळीमध्ये भाग घेतला. "आधी केले मग सांगितले" या वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्ती आज आपल्या देशामध्ये सहसा नाहीत. परंतु श्री. दादा तसे होते. महाराष्ट्रभर त्यांनी भूदानासाठी, ग्रामदानासाठी प्रचार यात्रा केल्या. ठाणे जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र सर्वोदय मंडळाने जिल्हादानासाठी शक्ती लावलेली होती व ग्रामदान झालेला जिल्हा जयप्रकाशजींना अर्पण करायचा होता. श्री. दादांनी त्यासाठी खूप पायपीट केली. जिल्हादान झाले. केवळ जिल्हादानावर त्यांना समाधान नव्हते. त्यांनी पुनर्निर्माणासाठी निरनिराळ्या संस्थांच्याद्वारा सातत्याने प्रयत्न चालविले. त्यांच्या या प्रयत्नामुळे आज ठाणे जिल्ह्यामध्ये दहा-पंधरा सर्वोदय कार्यकर्ते ग्रामस्वराज्याचे काम करीत आहेत.

नशाबंदीचे काम हे दादांचे अत्यंत आवडीचे काम होते. महाराष्ट्राच्या नशाबंदी मंडळावर ते अनेक वर्षे पदाधिकारी व कार्यकारिणीचे सदस्य या नात्याने सहभागी झालेले होते. मुंबईमध्ये नशाबंदी मंडळाचे काम करणारे जे संघटक होते त्यांचा व दादांचा या कामासाठी एक परिवारच बनलेला होता. वडिलकीच्या नात्याने या दारुबंदी प्रचारकांना ते समजून घेत, त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवीत. त्यामुळे त्यांना बळ मिळत असे. आजकाल मोठी माणसे सामान्य कार्यकर्त्यांचे असे बळ वाढवतात असा अनुभव कमीच.

श्री. दादांचे आणखी एक महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी महाराष्ट्रामध्ये चरखा संघाच्या कामाला अनुसरून महाराष्ट्र सेवा संघाची खादी ग्रामोद्योग व सर्वोदयाच्या कामासाठी स्थापना केली. कै. शंकरराव देव, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, भाई धोत्रे यांच्या बरोबरीने त्यांनी या संस्थेचे काम उभे केले. आज महाराष्ट्रामध्ये खादी ग्रामोद्योगाच्या ज्या काही संस्था आहेत त्यामध्ये महाराष्ट्र सेवा संघाचे काम वैशिष्टयपूर्ण आहे. याचे श्रेय श्री. दादानाच द्यावे लागेल.

कुणावर अन्याय होत असेल, त्याचे चारित्र्यहनन होत असेल तर दादा तेथे तत्परतेने धावून जायचे. पंधरा-सोळा वर्षापूर्वी कै. आचार्य भिसे व व्यक्तीशः माझ्यावर ठाणे

जिल्ह्यातील एका जंगल कॉन्ट्रक्टरने त्याला आम्ही भूदान जमिनीवरील झाडोरा दिला नाही म्हणून नुकसान भरपाईचा दावा केला होता. दादा हे वकील होते, परंतु त्यांनी गेल्या कित्येक वर्षांपासून व्यावसायिक वकिली सोडून दिली होती. आम्हा दोघांच्यासाठी त्यांनी वकील निश्चित केला होता परंतु ते साथ देतील की नाही याची दादांना शंका होती. म्हणून कोर्टाच्या पहिल्या तारखेच्या वेळी आपल्या वकिलीचा अडगळीत पडलेला काळा कोट घेऊन कोर्टात ऊभे रहाण्याच्या तयारीने ते उपस्थित होते. सुदैवाने त्यांना कोर्टात आमचे वकील म्हणून उपस्थित रहावे लागले नाही. परंतु त्यांच्या तत्परतेने मी व कै. आचार्य भिसे भारावून गेलो होतो.

असेच एकदा आम्ही काही सर्वोदयाचे कार्यकर्ते दादांच्यासह रत्नागिरी जिल्ह्यात गेलो होतो. दादा हे आध्यात्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांना गणपतीपुळ्याला जाण्याची इच्छा झाली. आम्ही मंडळीही त्यांच्या सोबत गेलो. त्यावेळी मला आठवते की गणपतीपुळ्याच्या मंदिरामध्ये माझ्या हाताला धरून त्यांनी मला गणपतीसमोर उभे केले. अथर्वशीर्ष म्हटले व पूजा केली. ही त्यांची सहृदयता खूप काही सांगून जाते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांनी मनात आणले असते तर केवळ राजकीय सत्तेमध्येच नव्हे तर विधायक संस्थांच्यामध्ये देखील ते मोठ्या पदावर जाऊ शकले असते. परंतु गांधीजींनी काँग्रेसचे विसर्जन करण्यासंबंधी जो उपदेश केला होता व काँग्रेस कार्यकर्त्यांनी सेवाभावी वृत्तीने समाजाचे काम करावे असे सांगितले होते त्याला अनुसरून दादा शेवटपर्यन्त काम करीत राहिले. गेल्या पाच-सात वर्षांपासून विनोबांच्या भाषेत सांगायचे तर ते सूक्ष्मात गेलेले होते. सर्वोदय कार्यकर्त्यांच्यावर त्यांनी खूप प्रेम केले. त्यांना जे सहाय्य्, सहकार्य करणे शक्य होते तेहीत्यांनी केले. मी महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचा अध्यक्ष झालो हे जेव्हा त्यांना कळले त्यावेळी त्यांनी खूप आनंद व्यक्त केला. त्यांची ती समाधान देणारी आनंदी वृत्ती पाहून मलाही बळ आल्यासारखे वाटले. त्यांच्यापासून शिकण्यासारखे तर खूपच आहे. त्यांच्या आठवणी विधायक कार्यकर्त्यांना नेहमीच प्रेरक अशा रहातील. त्यांच्या जीवनाचा साधेपणा, आचार, विचार, उच्चार या गोष्टी लक्षात घेऊन आम्ही मंडळींनी काम करणे हीच त्यांना खरीखुरी आदरांजली ठरेल.

***

## ९. देशभक्त, देवभक्त, साधु-संत-सज्जन, सद्गुरुभक्त श्रीयुत माधव कृष्ण देशपांडे, बांद्रा, मुंबई, यांच्या काही पवित्र आठवणी

— 'गुरुदेवानंद' गीताश्रम परमधाम, कारवार
गुरुवार, ता. २९-५-८६.

**श्रीरमण महर्षींच्या पदकमली प्रथम भेट व मैत्रीयोग.**—श्रीभगवान् रमण महर्षींच्या दर्शनासाठी माधवराव अरुणाचलास इसवी सन १९३८ साली डिसेंबरमध्ये आले होते. तेव्हा ते मला श्रीरमणाश्रमाच्या मागील भागात असलेल्या पलाक्कोतु नावाच्या बागेतील माझ्या कुटी समोरुन जातांना दिसले. सहज मी त्यांना विचारले, "आपण मुंबईहून आला काय ?" ते म्हणाले, "होय, मी मुंबईहून आलो आहे. श्री भगवान् रमण महर्षींच्या दर्शनासाठी या द्रवीडभाषी देशात आपल्या तोंडी मराठी भाषा ऐकून आनंद वाटत आहे. आपण येथे केव्हापासून राहत आहा ?" मी म्हटले, "मला इकडे दोन वर्षे झाली. मी श्रीभगवान सद्गुरु रमण महर्षींच्या सत्संगतीत राहून ज्ञानाचा व ध्यानाचा अभ्यास करीत आहे. श्रीमद्भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे "अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम" म्हणजे ज्यांना आत्मा विदीत झाला, अनुभवास आला त्यांच्या संगतीत राहिले असता, ब्रह्मनिर्वाण म्हणजे काय ते प्रत्यक्ष अनुभवास येते, कारण ते ब्रह्मनिर्वाणरूप झालेले असतात. म्हणून त्यांच्या भोवतालचे वातावरणही ब्रह्मनिर्माणरूप असते. "श्रीभगवान् सद्गुरु रमण महर्षींच्या दर्शनास आपण इकडे आला, हे आपले परमभाग्य आहे, असे मी समजतो व आपले अभिनंदन करतो. आपणास परमार्थ आवडतो का? आजपर्यंत आपण काय सत्संग केला व काय काय परमार्थसाधना केली आहे, ते सांगाल काय ?" यावर माधवराव म्हणाले, "मी दरवर्षी पंढरपूरास चारही वारीस चारदा जातो व श्रीविठ्ठलाचे दर्शन करतो. तसेच दर महिन्यास आळंदीस जाऊन श्रीज्ञानेश्वरांचे दर्शन घेतो. श्रीज्ञानेश्वरांची मी अभ्यासपूर्वक पारायणे केली आहेत. श्रीतुकारामगाथा, श्रीएकनाथी भागवत यांचाही अभ्यास केला आहे. श्रीसंत विनोबांनाही वारंवार भेटावयास जातो, त्यांचा सत्संग करतो व त्यांच्या मार्गदर्शनाने जनताजनार्दनाची सेवा म्हणून देशभक्तीही करतो. प्रपंचासाठी वकिली करतो. बांद्रा, मुंबई इथे राहतो. माझे नाव माधव कृष्ण देशपांडे, आपण इकडे राहता म्हणून म्हणतो श्रीभगवान् रमण महर्षीकडे मला नेऊन व माझी माहिती देऊन मजसाठी कृपाशिर्वादाची प्रार्थना कराल काय ?" मी उत्तर दिले "माधवराव, आज रात्री श्रीमहर्षी एकटेच असतात, आपण त्यांच्याकडे जाऊ व प्रार्थना करू. आपण मजकडे यावे." ठरल्याप्रमाणे आम्ही दोघे श्रीमहर्षींकडे एकांत पाहून त्या रात्री जाऊन त्यांची प्रार्थना केली. माधवरावांची परमार्थसाधनाची

हकीकत त्यास सांगून कृपाशिर्वादासाठी आपल्या पदकमलांच्या आश्रय घेत आहे म्हणून विनंती केली. तेव्हा माधवराव हात जोडून उभे होते. श्रीमहर्षी हास्यवदनाने, कृपादृष्टीने त्यांच्याकडे पहात होते. अष्टसात्विक भावांनी माधवराव भारुन गेले व त्यांना धन्य वाटले! श्री सद्गुरुंच्या पदकमलांना आम्ही दोघांनी भक्तीभावाने स्पर्श केला व त्यांचा निरोप घेतला. या आमच्या प्रथम भेटीपासून आम्ही गुरुबंधू झालो व कायमचे परम स्नेही झालो. श्रीभगवानाम् रमण महर्षींच्या परम कृपामृताने!

(२)

## वैराग्यशील श्रीगोविंदस्वामींची सेवा

पंचविशीच्या घरातील श्रीगोविंदस्वामी हे अत्यंत वैराग्य धारण करून मौनी व एकांतवासी होऊन अरुणाचलास पलाक्कोतु बागेच्या एका कुटीत राहत होते. एक दिवस माधवरावास त्यांच्या भेटीस नेले. श्रीगोविंदस्वामींचे तीव्र वैराग्य, अखंड एकांतवास, अयाचित वृत्ती वगैरे साधना पाहून माधवराव त्यांचे भक्त बनले. पुढे गोविंदस्वामी अरुणाचल सोडून कर्नाटकात आपल्या गावी गेले. तेथेही त्यांच्या सेवेसाठी व सत्संगासाठी माधवराव जावयाचे. श्रीगोविंदस्वामी समाधिस्थ होईपर्यंत बरीच वर्षे त्यांच्याशी माधवरावांचा संबंध होता. सेवाभावाने माधवराव त्यांची काळजी वाहत. त्यांच्या सत्संगाने व सेवेने माधवराव स्वतःला कृतकृत्य समजत!

(३)

## माधवरावांना श्रीरमण महर्षींच्या प्रेमाचा व कृपेचा दिव्य अनुभव

१४ एप्रिल १९५०, रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अरुणाचली स्वाश्रमी श्रीभगवान् रमण महर्षींचे परमनिर्वाण त्यांच्या वयाच्या बहात्तराव्या वर्षी झाले. सर्वप्रथम ही बातमी बी. बी. सी. ने रेडियोवर जाहीर केली, पहाटे पाच वाजता रेडिओ लावून मुंबईला माधवराव बसले असता ही बातमी माधवरावांनी ऐकली. मात्र तोच माधवरावांची स्थिती चमत्कारिक झाली. ते एकदम स्तब्ध झाले. ते अंतर्मुख होऊन श्रीसद्गुरुस्मरण करीत जवळच्या समुद्रकिनारी गेले. तेथे त्यांनी ओक्साबोक्शी रडून श्रीरमण महर्षींना मनोमनी विचारले "श्रीभगवान सद्गुरुदेवा, आता आम्ही तुमचे कसे दर्शन घ्यावे? तुमच्या दर्शनाचे परमभाग्य तुम्ही आम्हाला पुन्हा नाही का देणार?" असा त्यांच्या मनाने आक्रोश चालवला असतां एकदम प्रकाश झाला व त्या प्रकाशात श्रीभगवान सद्गुरु रमण महर्षींची दिव्य मूर्ती त्यांना दिसली! माधवरावांनी हात जोडले नतमस्तक होऊन परम प्रेमाने ते भरून गेले. अशा मनस्थितीत त्यांनी श्रीसद्गुरु रमण महर्षींचा दिव्य संदेश ऐकला **"संदोदित सर्वत्र हा विद्यमान् आहे! हा तुझ्या अंतर्यामी आहे व बाहेर सर्वत्र**

भरून उरलेला आहे! असा याला जाणावा व पहावा! शांत हो! शांत!"
या दिव्य साक्षात्काराने माधवराव कृतकृत्य होऊन परमानंदतृप्तीने घरी परतले. माधवरावांनी हा आपला दिव्य अनुभव जेव्हा मला ऐकवला, तेव्हा मी माधवरावांना म्हटले, "माधवराव, तुम्ही धन्य आहात, धन्य आहात, त्रिवार धन्य आहात, कारण तुम्हाला श्रीसद्गुरुदेवांचे दिव्य दर्शन झाले आहे व तुम्ही आता सद्गुरुकृपांकित आहात!"

(४)

## माधवरावांनी आमच्या परम मैत्रीयोगाला परम आप्तेष्टतेची जोड दिली

सन १९६९ साली डिसेंबरमध्ये माधवरावांनी मला पत्राद्वारे कळविले की आमचे सुपुत्र डॉ. एकनाथ देव यांना आपली नात जयश्री, मुलीची मुलगी, वधू म्हणून द्यावयाची अशी सर्वांची इच्छा आहे, तर या विवाहाला मी संमती द्यावी व विवाह साजरा करण्यासाठी मुंबईला यावे. ही आमच्या परम मित्राची इच्छा आम्ही सर्वांनी मान्य केली. वांद्रा, मुंबईला हा विवाह सुयोग्य सोहळ्याने संपन्न झाला व आमच्या इतक्या वर्षांच्या चालत आलेल्या पारमार्थिक, परम मैत्री योगाला परम आप्तेष्टतेची जोड मिळाली.

***

# १०. माझे श्रद्धास्थान

—डाकोरनाथ वाव,
विश्वस्त,
विठ्ठल मंदिर, बान्द्रे

माझ्या जीवनात काही आदर्श व्यक्ति तसेच थोर सज्जन पुरुष, ध्येयवादी महात्मे बरेच येऊन गेले. त्यापैकी माधवराव कृष्ण देशपांडे यांचा माझ्या जीवनाशी फार जवळचा घनिष्ठ संबंध आला. त्यांचा आदर्श, ध्येयवादी व सदाचारी वागणुकीचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला आहे. त्यांच्याबद्दल काही आठवणी लिहून पाठविण्याची सूचना आली म्हणून यथामति लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

माननीय श्री. माधवराव देशपांडे उर्फ दादासाहेब यांचा माझा परिचय माझ्या विद्यार्थी-दशतच झालेला आहे. माझे एक बालवर्ग मित्र कै. विनायक भालचंद्र श्रोत्री यांचे घरी माझे नेहमी जाणे-येणे असे. त्यांच्या शेजारी श्री. माधवराव नवीनच वकिली पास करुन बांद्रे येथे राहण्यास आले. त्यावेळी त्यांच्या पूज्य मातोश्री व एक धाकटे बंधू कै. केशवराव कृ. देशपांडे हे सिव्हील इंजिनिअर होऊन आले होते. दोघा बंधूंची स्वतंत्र जीवनाची वाटचाल बांद्रे येथेच सुरू झाली. हा काळ म्हणजे इसवी सन १९२८–३० असावा.

श्री. माधवरावांचा कोर्ट-कचेरीचा धंदा चांगला चालत होता. तरी पण त्यांना समाज-सेवा आणि धार्मिक आचरणाचे उपजतच बाळकडू होते. घरात नित्य नैमित्तीक कुलधर्म, कुलाचार चालू असायचे. मध्यम वयात भाग्याने पूर्ण बहरलेला संसार, धंदा, व्यवसाय सोडून त्यांनी सत्याग्रहात भाग घेऊन ब्रिटिश सरकारचा कारावास पत्करला होता हे आश्चर्य.

आता थोडे विषयांतर म्हणजे त्या काळात मला त्यांनी फार मोठा आश्रय दिला होता. मी १९३६ साली मॅट्रीक झालो. नोकरी मिळना, घरची अत्यंत गरीबी. थोडे टायपींग व लघुलेखन शिकलो. तेवढ्या गुणांवर श्री. माधवरावांनी मला त्यांच्या ऑफिसचे टायपींग काम करण्यास ठेवले. मी फार हुषार नव्हतो तरी त्यांनी मार्गदर्शन करून घरच्या-सारखा मला सांभाळले होते. म्हणून त्यांचे अशिलाचे भाषण तसेच मित्रांचे, सत्संगाचे भाषण मी लक्षपूर्वक ऐकत असे. कारण मीही वारकऱ्याचा मुलगा आहे म्हणून स्वाभाविक आवड होती. एकदंर त्यांच्या सहवासामधील माझा काळ म्हणजे पुढील आयुष्याचा पायाच म्हणावा लागेल. ते जरी सत्याग्रहात पडले तरी मला आपुलकीने सांगत की, "तू या भानगडीत पडू नको. तुझी घरची परिस्थिती फार बिकट आहे". त्यांच्या सह-वासात मला बराच ऑफीस कामाचा अनुभव मिळाला व मला पुढ रेल्वेत नोकरी लागली तरी ते मला कामासाठी बोलावीत होते. मलाही त्यांचा शब्द मानावा लागत होता.

उत्तर आयुष्यात श्री. माधवराव त्यागी जीवन जगत होते. शरीर दुर्बल झाले तरी उपास-तापास किंवा केवळ फलाहार व दूध यावर राहत असत. असे असले तरी आळंदीस हळू हळू येत असत. आळंदीतील श्री. नृसिंह सरस्वती स्वामींचा मठ त्यांचे हक्काचे घरच झाले होते. त्यासाठी ते आजन्म सभासद झाले होते. त्यांच्या घरची सर्व मंगल कार्ये तिथेच होतात. हा क्रम अद्याप चालू आहे. अशा प्रकारे आयुष्याचा शेवट श्री. माधवरावांनी त्यागी-तपस्वी अवस्थेत राहत्या घरीच पूर्ण केला. धन्य ते महात्मे अशा थोर-उदार महात्मे यांचे उतराई व्हावे व निवांत त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांच्या आत्म्याला चिरशांती मिळो ही प्रार्थना करावी. त्यांचे मुलगेही कर्तबगार आहेत. त्यांनी त्यांची परंपरा यथाशक्ति चालविली आहे. त्यांना धन्यवाद, शतशः प्रणाम.

***

## ११. आमदारपदाचा मोह नसलेले माधवरावजी

—प्रा. ठाकुरदास बंग,
गोपुरी, वर्धा.

स्वर्गवासी माधवराव देशपांडे यांचा व माझा निकट परिचय होण्याचे भाग्य माझ्या नशिबी बरेच दिवस नव्हते. १९५३ साली जेव्हा त्यांनी मुंबई विधानसभेचे आमदारपद विनोबाच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून सोडले. तेव्हा माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले की, हे माधवराव कोण? त्यानंतर महाराष्ट्र राज्य झाले व ४–५ वर्षांत दृढ परिचय होण्याचा सुयोग लाभला. माधवरावांची विनोबाभक्ति दृष्ट लागण्याजोगी होती. महात्माजी व विनोबांच्या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते.

रचनात्मक विधायक कार्यासाठी त्यांनी वकिली सोडली. आमदारकीचा राजीनामा दिला. आणखी काय काय सोडले ते एक देवाला माहीत! आत्मस्तुती त्यांना प्रिय नव्हती. मुंबईत असले की त्यांच्या जीवंत स्मारकाला "महात्मा गांधी सेवा मंदिराला" त्यांनी भेट दिली नाही असा एकही दिवस गेला नाही. ह्या इमारतीतच महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या कार्यालयासाठी त्यांनी जागा दिल्यामुळे मंडळाच्या सभा, बैठकीसाठी माझे मुंबईला जाणे नित्य घडत असे; त्यामुळे माधवराव देशपांडेशी भेटण्याचे प्रसंग नेहमी येत. त्याच्या साध्या सरळ, निगर्वी, स्वभावाचे ऋजु आणि मृदु व्यक्तिमत्त्वाचे नेहमीच दर्शन घडे.

असे हे सेवापरायण व्यक्तिमत्त्व देशाची आमरण परिपूर्ण सेवा करून अनंतात विलीन झाले.

***

## १२. आम्ही सगोत्रीय

—वि. स. पागे

"वास्तविक पाहता स्वातंत्र्यसैनिक वै. माधवराव व मी शिराळे पेटयातील वाळवे तालुक्यातले. मी तासगावचा तर माधवराव आरळचाचे. पण वैयक्तिक सत्याग्रहात १९४१ साली आम्ही दोघांनी वैयक्तिक सत्याग्रह केला. मी तासगावला तर माधवरावांनी वांद्रयाला. योगायोगाने आम्हा दोघांना येरवडयाच्या तुरूंगात शिक्षा झाल्यावर ठेवले आणि परस्पर परिचयाचा योग आला. त्याला कारण म्हणजे आम्हा दोघांची वारकरी संप्रदायाची व ज्ञानेश्वरीची आंतरिक ओढ. मी रोज ज्ञानेश्वरीवर संध्याकाळी ठीक ५ वाजता निरूपण करीत असे. माधवराव देशपांडे, नरवणे, लाला काका, नटवरलाल दवे हे प्रमुख श्रोते अभ्यासक होते. सर्वांनी ज्ञानेश्वरीच्या नव्या प्रती खुणा करण्यासाठी मागवल्या होत्या. ज्ञानेश्वरीच्या अध्ययनाची एकत्रित पुनरावृत्ती १९४२ साली. पुन्हा नाशिकच्या तुरुंगात झाली. माधवरावांना ९ ऑगस्टला स्थानबद्ध करून नाशिकला आणले होते. मी भूमिगत होतो. मला पकडल्यावर माझी पाठवणी नाशिकला झाल्याने परत गाठ पडली. परिचय दृढ झाला. अध्ययनाला तुरुंगासारखी निवांत निगूढ जागा नाही याचा प्रत्यय आला.

आम्ही दोघेही स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचे काँग्रेसचे निष्ठावंत पाईक. स्वातंत्र्यासाठी कारावास भोगणारे. १९५२–५७ मी एम. एल. सी. तर दादा एम. एल. ए. विधायक कार्यासाठी अनेक प्रसंगी आम्ही एकत्रित आलो. बुद्धिमान तर ते होतेच. पण त्यांच्या भाविकतेचे, श्रद्धेचे पारडे जास्त जड होते. विनोबाजींवरील अढळ श्रद्धेने त्यांनी विनोबांच्या भूदान आवाहनाला साथ देऊन त्यांची बेदीतील २५० एकर जमीन दान केली. बेदीचे नामकरण 'गांधी सेवा धाम' करून माजी प्रधानमंत्री श्री. मुरारजी देसाई यांच्या हस्ते दानपत्रांच्या वितरणाचा सोहळा पार पाडला. ही जागा गांधी सेवा धामची, पाचगणीच्या ऊंचीची, जवळ जवळ ३,५०० फूट आहे. प्रवास साधन नसल्याने आम्ही सर्व, मी, मुरारजीभाई, उपमंत्री द. ना. वान्द्रेकर, बाबाजी मोघे (विनोबाजींचे बालमित्र), भाऊ धर्माधिकारी (संपादक, भूदान पत्रिका) वगैरे नामवंत ह्या सोहळयासाठी तेवढा चढाव पार करून बेदीच्या पठारावर आलो. निम्मा चढ चढल्यावर एक कौतुकाची गोष्ट अनपेक्षितपणे नजरेस आली. तिथे गोपाळ ह्या जमातीची ५–५० घरे होती. ही जमात गाई पाळून गुजराण करणारी. ह्या जमातीने आपली घरे तर शेणाने सारवून निर्मळ ठेवली होतीच, पण गाईचे गोठे देखील शेणाने

सारवून तुकतुकीत करून दृष्ट लागण्याजोगे स्वच्छ ठेवले होते. प्रत्येक घरापुढे तुळसीवृंदावन होते. देवळात काय वाटेल इतक प्रसन्न, निर्मळ त्या घराकडे पाहून वाटले. हे संस्कार त्यांनी कुठून मिळवले? त्यांना "रानटी जमात" कसं ठरवलं तेच कळेना. त्यांचे गोठे पाहून मला कॅनडातील ओटावा येथील राष्ट्रीय गोशाळेची आठवण झाली. वृंदावन बघून तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीता या पुस्तकातील वृंदावनाची संकल्पना डोळ्यासमोर उभी राहिली. स्वावलंबी खेडे असावे तेही टुमदार हे स्वप्न माधवरावांनी डोळ्यासमोर ठेवले होते. तेथे वसतीगृह बांधले होते. "काम करा व शिका" या तत्त्वावर आधारित.

पुढे विनोबांच्या आदेशाने माधवरावांनी राजकारण सोडले. विधायक कार्याला वाहून घेतले. आणि पुन्हा आम्ही नशाबंदी मंडळात एकत्र आलो. नशाबंदी मंडळाच्या पंढरपूरच्या वारीची मूळ कल्पना माधवरावांचीच. अध्यात्म व समाज-कारण याचा सुंदर मेळ या वारीच्या कल्पनेने माधवरावांनी घातला. या वारीच्या माध्यमाने जनता संपर्क साधला जाईल, त्यांना व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवता येईल, यात्रेकरूंना स्वच्छतेचे धडे देता येतील, सामूहिक जीवन जगण्यामागील उद्देश सांगता येईल अशी माधवरावांची भावना होती. त्यांच्या जोडीला पुस्तक विक्रीला चालना मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती.

अनेक विविध क्षेत्रात आम्ही बरोबर काम केले. त्यांच्या वांद्रयाच्या घरी मी अनेकवार गेलो आहे. पण आमचे गोत्र जुळले ते आध्यात्माच्या दोघांच्या समान दुव्याने म्हणजे आम्ही सगोत्रीय नाही का?"

***

## १३. स्वर्गस्थ माधवराव देशपांडे (एक राष्ट्रसेवक और भगवत्‌जन)

—कै. गोकुळभाई भट्ट

बम्बई उपनगर जिलेके विल्लेपार्ले उपनगर में हमारे घर पर एक छोटे कद के कुछ श्याम रंग के, पर तेजस्वी चेहरेवाले वकील को देखता रहा। हमारी जायदाद के कई सवाल के विषय में मेरे पिताजी उनसे चर्चा करते थे। और यह वकील जोकि बान्द्रा में रहते थे वे सम्बन्धी घूमते रहते थे।

लेकिन यह वकील कुछ और खूबिया अपने में रखते थे। कानूनी सलाहकार के रुप में, और राष्ट्र सेवक के रुप में उनके साथ मेरा परिचय बढता गया। क्योंकि आजादी के जंग में वे भी एक त्यागी, निष्ठावान वीर थे। कॉंग्रेस के काम के निमित्त हमें अनेक बार सभाओमे और कार्यक्रमो में साथ जुडते रहे। उनमें लगन के साथहीसाथ बुद्धिपूर्वक वे त्याग की भावना से एक आकर्षण थे।

आजादी के बाद वे सर्वोदयके काम में लग गये। विनोबाजीके एक निष्ठावान साथी के समान वे बने थे । पंढरपूर के भक्त थे । जीवन के अंतिम समय में वे एक भक्तजन के रुपमें हमारे सामने आये।

उनका स्वभाव अत्यन्त मिलनसार, हृदय में स्नेह और प्रेम भरा था। उनके चेहरे पर नाराजगी कभी छायी नहीं। प्रसन्न वदन वे रहते थे। दलील और चर्चा करने में वे कुशल थे। पर अपनी बात को स्वीकार करने के लिये वे हंसकर अपने मतका प्रतिपादन करते रहते थे।

अपने घर को संभालते हुए उन्होने समाज की निस्वार्थ भाव से सेवा की है। माधवराव विठोबा के परमभक्त, गांधीजीके अनन्य सेवक, विनोबा विचार केआराधक व प्रसारक, जयप्रकाश की संपूर्ण क्रांति में विश्वास रखनेवाले सर्वोदय प्रेमीने अपने वान्द्रा उपनगर में एक केंद्र खडा किया। उस केन्द्रने सर्वोदय ग्रामी काम किया और माधवरावजीके जाने के बाद भी वह केन्द्र आज अपने उद्देश्य की पूर्ति कर रहा हैं। ऐसे मेरे मित्र का, साथी का स्मरण आज भी उत्साहप्रेरक और चेतनदायी है।

***

## १४. दादांनी मला असं घडवलं

—श्री. का. दा. राऊत,
प्रमुख संघटक, नशाबंदी मंडळ,
चिटणीस, मुंबई नशाबंदी सप्ताह, नागरिक
समिती, मुंबई.

१९६० ते १९७० दहा वर्षांचा कालावधी दादांबरोबर कार्य करण्यास मला मिळाला, हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गोष्टी मला शिकता आल्या. आणि त्या मी आत्मसात केल्याने आज त्यांनी सोपवून दिलेले काय पार पाडण्यास मला बहुमोल सहाय्यक ठरल्या आहेत.

दादांचे पहिले तत्त्व होते धर्मावर अधिष्टान. भारतीय संस्कृती व ज्ञानेश्वरीचे वाचन. दादांनी तर ज्ञानेश्वरी मुखोद्‌गतच केली होती. एकेका ओवीचा अर्थ सांगतांना ते त्यात रमून जात. गूढ शब्दांचा अर्थ सोपा करून देण्याची त्यांची हातोटी वेगळीच होती. हा हा म्हणता वेळ कसा जायचा हेही कळायचे नाही. तश्याच काही प्रसंगात ते इतके तल्लीन होत की, त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु बाहेर पडत. अनेक व्यक्तींची प्रवचने मी ऐकली आहेत. ज्ञानेश्वरी समजाऊन देतांना जड शब्दास दुसरा जड शब्द प्रतिपादन करून स्वतःची महती वाढविण्याकडे इतरांचे लक्ष असते. या बाबतीत दादा सर्वश्रेष्ठ मानले पाहिजेत. किती सोप्या शब्दांत ते विवरण करीत. शब्दांची उकल सहज भाषेत करून ऐकणाऱ्यालाही तल्लीन करीत. त्यांचे श्रद्धास्थान पू. विनोबाजी, दादांशी बोलताना असा एकही सलग्न तास जात नसे की ज्यात विनोबाजींचे नाव आले नाही. बरं ती अंधश्रद्धाही नव्हती. विनोबाजींच्या गोष्टी सांगतांनाही काही घडलेले प्रसंग विहित करताना त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळत असत.

संघटकांना आईचे प्रेम व वडिलांचे मार्गदर्शन देणारे दादा एकमेव थोरच म्हटले पाहिजेत. मंडळांत मी प्रमुख संघटक आहे, ह्याची जाणीव दादांनी कधी उरी बाळगली नाही, की त्या दृष्टीकोनातून ते वागलेही नाहीत. ही त्यांची खरी थोरवी.

मुंबईतील कामात त्यांनी विविधता आणली आणि ती आणतांना वरीचशी जबाबदारी ते माझ्यावर सोपवत. नशाबंदी सप्ताहातील कार्यक्रमाची आखणी करणे, मुंबईचे मासिक व वार्षिक अहवाल लिहीणे, आदी कामे ते माझ्याकडून करवून घेत. ह्या कामाबरोबरच मला इतर क्षेत्रांतील माहिती व्हावी या उद्देशाने त्यांनी ते कार्य करीत असलेल्या धोबी घाटाचे काम व हिशोबाचे काम

माझ्याकडून करवून घेत. त्याकरिता व मंडळाच्या अहवाल लेखनाकरिता ते मला घरी बोलवत. काम संपल्यावर अनेक विषयांवर माझ्याशी बोलत असत. वेळेची तमा नसे. अशा वेळी बहुमोल मार्गदर्शन मी पदरी पाडून घेत असे. ह्या पदरी पाडलेल्या मार्गदर्शनाच्या तत्त्वाचे पालन करूनच नशाबंदी मंडळातून दादा निवृत्त झाल्यावर त्यांचे अपुरे राहिलेले कार्य आज पंधरा वर्षे मी करीत आहे.

त्यांच्याबद्दल काही गोष्टी की ज्या माझ्या आयुष्यात मला कधीच विसरता येणार नाहीत अशांची नोंद न करणे हे कृतघ्नपणाचे ठरेल. माझ्या हल्लीच्या दैनंदिन जीवनात ज्यावेळी तशा प्रकारच्या प्रसंगाची आठवण येते, तेव्हा त्याचा उल्लेख मी सतत करीत असतो, इतका माझ्या जीवनातील प्रसंगात त्या सुवर्णाक्षरांनी लिहल्या गेल्या आहेत.

माझी पत्नी तर नेहमीच त्यांचा आदराने उल्लेख करीत असते. हो, कारणही तसेच घडले आहे. मी समाज कार्यकर्ता नशाबंदीचे मानधन घेऊन जीवन जगणारा, घरी चार मुले. आर्थिक अडचणी सतत आऽऽवासून उभ्या असावयाच्याच. त्यामुळे इतरांबरोबर तीर्थयात्रेस जाणे कधी जमत नसे. मीच जिकडे जात नसे तेथे पत्नीला कोठे कसे पाठविणार ? पण १९७० साली पंढरपुरला मंडळाचे वार्षिक शिबीर घेण्याचे ठरले. मला पंढरपुरला जाण्यास मिळणार म्हणून मनातून मी सुखावलो होतो. पण त्याचबरोबर पत्नीला तो योग नाही म्हणून कष्टी झालो होतो. दादा केव्हा केव्हा माझ्या घरी येत असत. तसेच हे शिबीर घेण्याचे ठरल्यावर अचानक आले. आम्ही बोलत असताना, त्यांना पत्नीने सांगितले. "दादा, माझी खूप इच्छा होती पंढरपुरला येण्याची", पण दादांनी ती उत्कट इच्छा ओळखली व ते म्हणाले: "मुली मी तुला नेणारच" त्यावर मी त्यांना म्हटले, "दादा ते कसे शक्य आहे. महाशब्दे फार कडक. संघटकांनी कोणालाही बरोबर आणू नये, हा कडक दंडक. हा दंडक मोडणे कसे शक्य आहे?" त्यावर त्यांनी म्हटले, "ते काही असो! या मुलीला मी पंढरीचे दर्शण घडविणारच!" आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे दादांनी महाशब्देशी बोलून माझ्या पत्नीलाच नव्हे तर महाशब्देच्या पत्नीलाही पंढरीचे दर्शन घडविले. किती थोर मनाचे व दिलेला शब्द खरा करून दाखविणारे आमचे हे दादा! आणि येवढे केल्यावर पत्नीच्या तोंडात सतत दादांच्या नावांचा उल्लेख कां होऊ नये?

दुसरी गोष्ट; मी घरी सत्यनारायण करावयाचे ठरविले. दादांना पण आमंत्रण आग्रहाचे दिले होते. पण त्यांच्या पुढे एक मोठाच प्रश्न उभा राहीला होता. दुसऱ्या दिवशी मंडळाच्या कार्यकारणीची बैठक होती; म्हणून आदल्या दिवशी-म्हणजे पूजेच्या दिवशी बुवा साहेब गोसावी संध्याकाळी पुण्याहून मुंबईस येणार होते. त्यांना दादर स्टेशनवरून सांताक्रूज येथे घेऊन जाणे व खाजगी चर्चा करणे, अत्यंत आवश्यक होते. ह्या कारणामुळे दादांनी "मी येवू शकणार नाही" याची स्पष्ट कल्पना मला दिली होती. ठरलेल्या वेळेस आम्ही

दोघे पूजेस बसलो. पूजा संपली व पोथी सुरू झाली आणि दादा बुवासाहेब गोसावींना घेऊनच माझ्या घरी आले. आम्हा दोघांची परिस्थिती मोठी विचित्र झाली. दोघांच्याही मनांत दादांच्या पाया पडण्याची तीव्र इच्छा असतांना व ती पुरी करण्यासाठी आम्ही उठणार इतक्यांत दादांनी उठू नका म्हणून खूण केली. व ते बूवासाहेबांना म्हणाले "बुवासाहेब, विष्णू लक्ष्मीची जोडी पूजा करतांना पहाणे भाग्याचे असते नाही ?" आणि त्याच वेळी त्यांच्या डोळ्यातील आनंदाश्रु गालावर ओघळलेले मला दिसले. आम्ही दोघांनीही बसल्या जागेवरुन त्यांना नमस्कार केला. आणि माझ्या डोळ्यांतूनही आनंदाश्रु आले. बुवासाहेब झालेल्या वयाबरोबरच, प्रकृती स्वास्थ्यामूळें कोठेच कोणाकडे जात नसत. पण अशक्य गोष्ट दादांनी शक्य केली व मला आयुष्यभर आठवणींची शिदोरी ठेऊन दिली.

दादा निवृत्त झाले व त्यांच्या जागेवर माझी नियुक्ती झाली. मलाच काय पण सर्व संघटकांना व इतरांनाही असे वाटले की, ही नियुक्ती फोल ठरणार. पण त्यांना काय कल्पना· माझ्या त्या जागेसाठी संपूर्ण तयारी दादांनी करून घेतली आहे, ती. दादा मला नेहमी म्हणत "राऊत, माझ्यानंतर ही जागा तुम्ही सांभाळावयाची व म्हणून तुम्हाला मी तयार करीत आहे" त्यासाठीं त्यांनी कांही वेळला मला जास्त काम देऊन मार्गदर्शन केले. अशाच एका प्रसंगाची नोंद मी माझ्या जीवनांत कायमची करून ठेवीली आहे. आणि सतत ती आचरणात आणीत आहे. माझ्या यशाचे ते गमक आहे. आणि म्हणूनच येथे त्याची नोंद करणे अत्यावश्यक वाटते.

ते नशाबंदी सप्ताहाचे आधीचे दिवस होते. सप्ताहांतील कार्यक्रमांची आखणी होऊन कार्यक्रम पत्रिका आमच्या शेजारच्या एकवीरा प्रेसमध्ये प्रिटींगसाठी देण्यात आली होती. त्याच्या मधील दुरुस्तीसाठी दादा सतत यावयाचे व आमच्याच घरात बसून आम्ही काम करीत असू दोन दिवसांत छपाई पूर्ण होणे निकडीचे असल्याने रात्री १०-११ पर्यंत दादा व मी एकत्र असू. शेवटच्या दिवशी प्रुफ तपासून काम पूर्ण करावयाचे होते. रात्री १० वाजून गेले होते व प्रेसमधील सेवकांनी सांगितले "तुम्ही एक तासाने या". वेळ कसा घालवायचा हा मोठा प्रश्न होता. दादा म्हणाले ! "येथून दादर चौपाटी जवळ आहे ना ! चल आपण जाऊन तेथे बसू". मला ही अनेक गोष्टीबाबत त्यांच्याशी बोलावयाचे होते. म्हणून चटकन हो म्हटले, आम्ही दोघे चौपाटीच्या रस्त्याला लागलो. मुंबईतील कामाविषयी मी बोलत होतो. मला जे दादांनी करूं नये असे वाटे त्यावर मी चांगलेच दादांवर ताशेरे ओढले. दादा नुसते हं हं करित होते माझ्या प्रश्नाचे उत्तर देत नव्हते. त्यांच्या अशा वागण्यामुळें मी जास्त ज्यास्त चिडत गेलो. राग अनावर होऊन मी मोठ्याने बोलू लागलो. चौपाटीवर पोहचलो. जागा पाहून बसलो. तरी मी रागाने त्यावेळी किती बोललो तेच मला आठवेनासे झाले. बोलून बोलून किती बोलणार ? माझा आवाज हळू हळू कमी झाला व मी शांतपणें समुद्राकडे टक लावून बसून राहिलो तरी ही दादा गप्पच ! आणि शेवटी दादांनी एकदाचे तोंड उघडले, मला म्हणाले "दमलास, हे बघ, तुझे बोलणे संपले. तुझ्या बोलण्याचा शारांश मी ऐकून घेतला. आता उत्तर देतो. वेडचा, —कांही गोष्टी मलाही

पटत नाहीत. पण मंडळाचे काम हे वैयक्तीक नव्हे. मंडळाच्या हिताकरिता मी ज्या जागेवर बसलो आहे ना, ते पूर्ण करण्याकरितां कांही वेळा पटत नसलेले काम करणे भाग पडते. पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांनाही न दुखवता आपण मधला मार्ग काढावयाचा, कळले ना? येथे मी पण बाळगावयाचे नाही. आणि हे बघ! आपल्या समोरचा मनुष्य रागाने बोलत असला की आपण गप्प बसावयाचे, उदा. मीं आतां बसलो तसे समोरचा माणूस किती वेळ बोलणार? शेवटी गप्प बसणारच. तो शांत झाला की आपण असें कां वागलो ते शांतपणे त्याला पटवून द्यावयाचे व ते नंतर त्याला ते पटतेही. उगाच वाद-विवाद करावयाचा नाही. आपली शक्ती नष्ट होते. एकमेकाबद्दल मत वाईट होते. आणि मग सबंध बिघडतात. सार्वजनिक कार्यात असें वागू नये, कळले? वेडया, तूं माझ्यानंतर माझ्या खुर्चीवर बसणार आहेस. तुला मीच बसवणार आणि तुला मी पूर्णपणे त्या दृष्टीने तयार केले आहे. हा तुला शेवटचा मंत्र, त्याचे तू पालन कर. सर्व ठिकाणी तू यशस्वी होशील". आणि त्या नंतर त्याच वर्षी दादा निवृत्त झाले. मी मात्र आजही त्यांनी मला दिलेल्या शेवटच्या मंत्राचे काटेकोरपणे पालन करीत आहे. आणि हेच माझ्या यशाचे गमक आहे.

दादांकडे पाहिल्यावर कोणालाही त्यांच्या ज्ञानाची, प्रेमाची, मोठेपणाची आणि विशाल हृदयाची कल्पना येणार नाही. खडबडीत काटेरी फणसांच्या आंत गरे गोड असतात हेच खरे! आजही दादांची खुर्ची सहज डोळयासमोर उभी राहते आणि नतमस्तक होऊन मूक श्रद्धांजली वाहिली जाते. खूप खूप लिहावेसे वाटते पण........कितीही लिहले तरी अपुरे ठरणारे आहेत. शब्द कमी पडतील इतकी थोरवी त्यांच्यात होती. अखेर इतकेच म्हणता येईल "असे होते आमचे दादा"......

***

## १५. "आमचे म्हातारे वकीलबाबा कसे आहेत?"

—मोहनलाल रामावत

माझी व पू. दादांची ओळखभेट पू. आचार्य भिसे यांनी १९६७ मध्ये ठाणे जिल्ह्यात तलासरी येथे करून दिली. त्यापूर्वी पवनारला भेट घालून दिली होती. पण जुजबी-सर्वोदय संमेलनात भेटल्यावर पू. दादा माझ्या कामाची आस्थेने चौकशी करीत. ६७ मध्ये माझेकडे ठाण जिल्ह्यातील, तालुक्यातील जी गावे ग्रामदानाच्या कामासाठी दिली होती त्या प्रत्येक गावात मी प्रचार सभा घेई. गावप्रमुखाला भेटे. अगदी सरळ व सोप्या भाषेत ग्रामदानाचे महत्त्व पटवून देई. मग समाधानांत प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाल्यावर मी सह्या घेण्याचा कार्यक्रम करीत असे. संपूर्ण गावांच्या सह्या घेऊनच आम्ही दुसऱ्या गावी जात असू.

१५ दिवसांनी होणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सभेत अहवाल सादर करताना मी गावाच्या अडचणी सभेपुढे मांडताना कार्यकर्त्यांना सोसाव्या लागणाऱ्या हालांचा निर्देश करी. त्यांचे खाण्या-पिण्याचे होणारे हाल, झोपण्याच्या जागेची पंचाईत. राजकारणी व सरकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी अडवणूक वगैरे वगैरे हे सर्व ऐकून पू. दादांना फार वाईट वाटे.

ठाणे, जिल्ह्यातील एकूण १,६०० गावांपैकी १,४०० गावे आम्ही नोंदवली होती. नोंद-वलेल्या गांवांचे रजिस्ट्रेशन व्हावे यासाठी एकदा तालुका रजिस्ट्रेशन घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे गावे नोंदवली. या कामासाठी मे. प्रांतसाहेब, तहसीलदार, बी. डी. ओ. व प्रमुख राजकीय पुढाऱ्यांना समजावणेचे कामाकरितां फक्त पू. दादा माझ्याबरोबर यायचे, नेहमी सोबत रहायचे. म्हातारपणी दादांची जिद्द व निष्ठा पाहून मलाही फार जोर चढायचा. या प्रसंगी अनेक वेळा गाड्या, एस. टी. मिळत नसत त्यावेळी सुद्धा माघार न घेता दादा माझ्याबरोबर ट्रकने प्रवास करून मार्गदर्शन करायचे. ज्या ठिकाणी ही सोय नव्हती अशावेळी अगदी उन्हात पायी माझ्याबरोबर चालत येऊन मला सोबत करायचे. गावामध्ये दूध नाही, चहा नाही. जेवण-डाळभात कसा तरी मिळे दादा मात्र आनंदाने सर्व कष्ट सहन करून माझ्यासोबत त्यांच्या उतारवयांत रहात, स्वराज्याच्या आंदोलनाच्या गोष्टी सांगत.

ठाणे जिल्ह्यात कॉम्रेड गोदाराणी परुळेकर यांना आदिवासी फार मानतात. दादा खांद्यावर पडशी टाकून या भागात येत. आदिवासींनी गोदावरी बाईंना विचारलं, "या भागात एक म्हातारे वकीलबाबा, खादीचे कपडे घातलेले, खांद्यावर पडशी टाकून येतात आम्हाला बोलावतात आम्ही काय करावे"?

गोदावरीबाईंनी चौकशी केल्यावर त्यांना समजलं की, हे म्हातारे बाबा गोष्टी सांगतात. भजन शिकवतात. स्वच्छतचे महत्त्व पटवून देतात. निवडणुकीबद्दल, मतदानाबद्दल चुकून अवाक्षर तोंडातून काढीत नाहीत तेव्हा त्यांनीच आदिवासींना सांगितले की, "त्यांनी जरूर म्हातारेबाबा येतील तेव्हा जावे. ते सांगतील ते ऐकावे. त्यांच्या खादीच्या कपड्यांनी बिचकून जायचे नाही. दादा काही कुठल्यांही पक्षप्रचारासाठी येत नाहीत वकीलबाबा सांगतात ते ऐकावं" आदिवासीच्या शंकेचे निरसन झाले. ती मंडळी म्हातारे वकीलबाबा येण्याची वाट बघू लागली. दादा निवर्तल्याचे माहीत नसल्याने त्यांच्या निधनानंतर किती तरी दिवस त्यांची चौकशी हे आदिवासी करीत. हालहवाल विचारीत.

१९७१ साली तलासरी तालुक्यातील काजळी गांव आम्ही ग्रामदानी म्हणून सर्वप्रथम घोषित केले पण अच्छाड व कोदाड ही दोन्ही गाव, १९६९ पासून प्रयत्न करूनही ग्रामदानी म्हणून घोषित होऊ शकली नाहीत याचं दादांना वाईट वाटे. आचार्य भिसे यांच्या प्रकृति अस्वास्थामुळे ती गांव त्यांच्या हयातीत त्यांनी ग्रामदानी आल्याचे एकावे असं वाटे. पण दादानी व मी जीव तोडून काम करूनही यश आलं नाही. याचं दादांना फार वाईट वाटलं. तीच परिस्थिती वाडा, खडकोना, मनोर जवळील गावांची झाली यामुळे सभेत भाषण करताना दादांच्या कंठातून शब्द फुटत नव्हता. डोळ्यातून पाणी वहात होते.

तलासरी तालुक्यातील काजळी व पालघर मधील मेंढवण या ग्रामदानी गावांत कामाला सुरूवात केली. दर आठ दिवशी दादा येथे सभेला येत. वळकटी, अंथरुन पांघरुण असलेली पिशवी, तांब्याभांडे व मुख्य करून ज्ञानेश्वरी सोबत असायची. गावात पिण्याचे पाणी नाही, घरं नाहीत, कामधंदा नाही, शाळा नाहीत, वीज व रस्ता नाही. सगळी नकारघंटा. तेथे आम्ही बालवाडी सुरू केली. रोजगारीची कामे उपलब्ध करून देऊन रस्ता तयार केला. सावकारांच्या मुठीतून लोकांना मुक्त केलं. ग्रामकोश तयार केला. खावटी कोठारे सुरू केल्याने लोकांना कर्ज व धान्य बारा महिने पुरु लागले. बालवाडी शिक्षिकेच्या पगाराची व्यवस्था दादांनी नशाबंदी मंडळामार्फत करवून तिला १०० रु. चालू केले. गावांत दुसरे पीक घ्यायचे ठरवून गहू, भाजीपाला करायचे ठरवले. मशीन आणून दादांच्या हाताने नारळ फोडून कामाला सुरुवात केली. श्रमदानाने रस्ता, बंधारा बांधताना दादा ८ दिवस राहून सहभागी झाले. ते लोकांना ज्ञानेश्वरीमधील व इतर कथा सांगत. चटीव व अंदाड गावी पू. महाजन गुरुजी, पू. दादा व मी जाऊन नशाबंदी व ग्रामदानी शिबिरं घेत असू. बखाडपाडा या मोखाडे तालुक्यातील गावी कामाला सुरुवात करतांना, दादांनी त्यांचा झाडोरा १,००० रुपयांना विकून दिला. व आम्ही कामाला सुरुवात केली. ७७ साली हे गाव आम्ही ग्रामदान गॅझेट घोषित केले. दादा या गावात फार आनंदाने लोकांच्या आनंदाच्या सोहळ्यात "ज्ञानबा तुकाराम, विनोबा तुकाराम" म्हणून नाचत होते. मी एक वकील आहे म्हणून सांगताच लोकांना फार आनंद झाला. आपल्या तक्रारी ते दादांच्याकडे नोंदवू लागले.

१९७१ मध्ये ठाणे जिल्हा ग्राम स्वराज्य समिति स्थापन झाली. वाकी, नाम, झरी, जामसर, माण ही चार गावं रजिस्टर झाली. पुढची जबाबदारी दादांच्यावर सोपवायचे ठरले. दादांचे वय होत ७३ वर्षे.

## डोलारी बुद्रुक

जव्हार तालुक्यातील डोलारी बुद्रुक या गावाकरता "श्री बालाजी देवस्थान ट्रस्ट, नाशिक" यांनी आचार्य भिसे यांना एक लाख रुपये देणगी दिली. गावाच्या विकासासाठी ही रक्कम चार जणांच्या नावे ट्रस्टी म्हणून बँकेत ठेवली. मात्र कामाला सुरवात झाली नाही. गावातील लोक खुनी, दरवडेखोर, गुंड–गावात विकासकार्यासाठी कुणी जाईना. हे लोक म्हणू लागले "आम्हाला गावाचा विकास नको, बँकेतील पैसे द्या. नाहीतर खून करू."

अशीच चार-पाच वर्षे गेली. भिसे गुरुजी वारले. ट्रस्टने रक्कम दुसरीकडे खर्च करून डोलारीचा हक्क उडवून लावला.

पू. दादांनी मला वांद्रयाला त्यांच्या घरी बोलावले. व या कामाची जबाबदारी सोपवली. त्याप्रमाणे मी गावात जाऊन माहिती गोळा करून हकीकत दादांच्या कानी घातली. त्यानंतर दादांनी व मी तेथे जाऊन एक शिबीर घेतले. दारू पिऊन कुणी येऊ नये म्हणून जाहीर केले.

सभेला सुरवात झाली. "लोक पैसे मागतात. पैसे कोठे आहेत? कोण देणार? कोणाचे पैसे? कोण घेणार?" येथून प्रश्नोत्तरांना सुरवात झाली. तंग वातावरण हळूहळू निवळले. वादविवाद सर्व शंका संपल्या. एक पंच कमेटी केली. पू. दादा, मी, मोहनलाल रामावत् कमेटीवर होतोच. गावाचा ठराव झाला आणि आमचे 'म्हातारे वकीलबाबा' चॅरिटी कमिशनरकडे आमचा दावा करण्याकरता नाशिकला निघाले. आम्ही पंचकमिटीचे प्रमुख बरोबर गेलो. पण आमच्याकडे प्रवासाला, जेवणाला पैसा नव्हता. दादांनी आमचा प्रवासखर्च व जेवणखर्च केला. केस कोर्टात चालली. आमच्या डोंगरी गावाच्यावतीने पू. दादा आमचे वकील म्हणून काम पहात. दुसरा वकील हजार रुपये फी मागतो. कुठून देणार? काय करणार? सर्व पैसे ट्रस्टने खर्च करून टाकले होते. एक लाख रुपयांवरील व्याजाचे ऐंशी हजार गावाला मिळावेत अशी बाजू दादानी कोर्टात मांडली. यातच आमची कसोटी होती. दादांच्या नंतर माझा नंबर आला. मी पटवून देण्याचा प्रयत्न केला.

"१०० टक्के आदिवासी रहात असणाऱ्या आदिवासींचे हे गाव आहे. या गावात हे आदिवासी वंशपरंपरा राहतात. या गावातील जमिनीवर व मालमत्तेवर गावात राहणाऱ्या आदिवासींचा हक्क व अधिकार आहे."

"या गावाची जमीन आपणास जव्हारच्या राजेसाहेबांनी दान दिली आहे. या जमिनीवरील झाडांच्या विकून आलेल्या एक लाख रुपयांचा ट्रस्टने याच गावाच्या विकासासाठी

खर्च केला पाहीजे. ती रक्कम इतरांसाठी खर्च होऊ नये अशी आमची मागणी आहे." या मुद्यावर सर्वांचे एकमत झाले.

पू. दादांनी कोर्टापुढे डोंगरी गावाची बाजू मांडण्यात, बोलण्यात जोर चढविला. शेवटी केस भांडता भांडता कोर्टाला दादांच्या बाजूने निर्णय द्यावा लागला. "ऐंशी हजार फिक्सड् डिपॉझिटमध्ये बँकेत ठेवून दर वर्षाला येणाऱ्या सहा हजार रुपयांचा गावाच्या विकासासाठी विनियोग करावा" असे ठरले.

डोंगरी गावात बालवाडी सुरू झाली. पू. दादांच्या हस्ते उद्घाटन व शिबीर झाले. खुनी, गुंड २० लोक माळकरी झाले. ३० जणांनी दारू सोडली. दर शनिवारी व एकादशीला दादांचे स्मरण करून आम्ही भजन करतो. मी त्यांना टाळ, पखवाज, वीणा आणून दिली आहे. दर आठवड्याला रामविजय, भागवत, हरीकथा विजय वाचतो. कथा, गोष्टी सांगतो. त्याचवेळी गावाच्या विकासाचा विचार करतो. आता गावात वीज आली, रस्ते झाले, पाण्याची सोय झाली.

नशाबंदी मंडळातर्फे वारकरी संप्रदाय मेळावा व्यसनाधीनाच्या मुक्ततेसाठी घ्यावा ही दादांची कल्पना. गेल्या वर्षी आम्ही असा मेळावा घेतला. नशाबंदी सप्ताह आवर्जून साजरा होतो. हरिपाठ, भूपाळी, कीर्तन प्रवचनाचा कार्यक्रम होतो. गोपाळकाला होऊन कार्यक्रम समाप्त होतो. दरवर्षी सौ. शोभनाताई रानडे व मुख्यमंत्र्यांचे बंधु नारायणराव चव्हाण कार्यक्रमास येतात. दरवर्षी आम्हाला दादा शंभर तुळशीच्या माळा व इतर पुस्तके भेट म्हणून देत असत.

दादांच्या अगदी शेवटच्या दिवसात त्यांच्या सहवासांत राहण्याचा मला योग आला. खप शिकावयाला मिळाले. अजून तहसीलदार, बी. डी. ओ. इतर कर्मचारी दादांची आठवण काढतात, विचारतात, "आपले म्हातारे वकीलबाबा कसे आहेत"?

***

## १६. श्री. दादासाहेब तथा माधवराव देशपांडे यांचे एक स्वभाव वैशिष्टय

—श्री. दामोदर वि. जोगळेकर

दादा साहेबांचा व माझा साधा परिचय ते विधान सभेत निवडून आल्यापासून होता. परंतु जवळून परिचय असा मी त्यांच्याबरोबर नशाबंदी मंडळात एक पदाधिकारी म्हणून काम करू लागल्यापासून. म्हणजे सुमारे वीस वर्षांचा. त्यांच्याशी जवळीक उत्पन्न होण्याचे कारण म्हणजे दुसऱ्या एका बाबतीत त्यांचे व माझे कार्यक्षेत्र एक होते. ते म्हणजे आचार्य विनोबांचे भूदान-ग्रामदान मूलक आंदोलन. आम्ही दोघेही त्या आंदोलनात दैनंदिन कार्यकर्ते नव्हतो. परंतु दर एक हंगामी आणि विशेष आंदोलनात तसेच दर-वर्षीच्या सर्वोदय सम्मेलनात सहभागी होत असू. या कार्यक्रमांत गाठी-भेटी व अनेकवेळा एकत्र प्रवास व सहवासही होत असे. सहवासामुळे दादा जास्त कळून आले. आचार्य विनोबा व दादा बडोद्याचे बालस्नेही होते. तेव्हा आचार्यांची आंदोलने म्हणजे दादांच्या घरचाच मामला. तेव्हा आपल्यापेक्षा इतरांच्या सुख-सोयीकडे त्यांचे जास्त लक्ष असे. त्यांच्या स्वतःच्या गरजा फारच माफक. वारकऱ्या सारख्या. म्हणजे वारकरीच होते. ते अनेकवेळा वारकरी दिंडीत सामीलही होत असत.

दादांना दुसऱ्याला म्हणजे आपल्या स्नेह्या-सोबत्यांना व ओळखीच्या कर्मचाऱ्यांना आपल्या घरी अथवा गांधी सेवा मंदिरात बोलावून खाऊपिऊ घालण्याचा मोठा शौकच होता. त्यापायी त्यांचा भरपूर खर्चही होत असावा. वर्षातून एकदा तरी असा समारंभ व्हायचा. आमच्या नशाबंदी मंडळाचे एक सम्मेलन वर्षाकाठी एकदा महाराष्ट्रातून दूरवर कुठे तरी भरत असे. सम्मेलन आटोपले की काही संघटक आणखी पुढे दूरवर जाऊन यात्रा व पाहाण्यासारख्या ठिकाणी सहल नेत असत. पोक्त उमरीच्या स्त्री संघटक या सहलीत दादांना आग्रह करून नेत असत. दादा बरोबर असले की, सर्वांची राहाण्याची व जेवणाची सोय आपोआप होत असे. कोणाचेही हाल व्हायचे नाहीत. दादा बरोबर आले की सर्व संघटक निष्काळजी होत असत. आपला प्रांत असो किंवा पर प्रांत असो दादा काय काय हिकमती लढवून एक एक सोय मार्गी लावीत, क्वचित पदरमोडही करावी लागत असावी. परंतु संघटकांनी व इतर सोबत्यांनी त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाला दादांनी कधी तडा जाऊ दिला नाही. या लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची त्यांना हौस होती. इतकी की आम्हास त्याबद्दल अचंबा वाटत असे.

एकदा एक सर्वोदयी पुढारी ज्यांना आम्ही सर्वजण मानीत असू असे मुंबईला आले असता ठाणे जिल्ह्यातील काही ग्रामदानी गावातील कामकाज कसे काय चालले आहेत दाखविण्या-साठी त्यांना न्यायचे होते. नशाबंदी मंडळाची एक स्टेशन वॅगन गाडी होती ती घेऊन

जायचे ठरले. आम्ही नऊ जण होतो. आज जाऊन परवा परत यायचे होते. तिसऱ्या दिवशी कामे उरकता उरकता दुपार टळून गेली. तीन वाजले. सभोवताली मोठेसे गावही नव्हते. जेवणाची सोय उत्तम तर नव्हेच पण सामान्य सुद्धा त्या गावी होण्या-सारखी नव्हती. डोंगराळ मुलुख, ठाण्या-मुंबईला जायचे तर तीन-चार तासांचा तरी प्रवास होता. पद यात्रेतील (छोटया) जेवणा-खाण्याचे हाल तसे आमच्या परिचयाचे होते. परंतु बरोबर आदरणीय पाहुणे होते. दादांनी एक युक्ती करायचे ठरविले. जवळच्याच एका आडगावी एक आश्रमशाळा होती. तिचे चालक दादांच्या परिचयाचे होते. तिथे दादांनी आम्हाला नेले, आश्रमांत शुकशुकाट होता. मुले शाळेत होती. दुपारचे सगळे आटोपले होते व संध्याकाळचे कामकाज सुरू व्हायला अवकाश होता. त्या आश्रमशाळेचे चालक दादांचे स्नेही मुंबईला गेले होते. आतां आली का पंचायत? आम्ही असतो तर सरळ उपाशीच मुंबईस परतलो असतो पण दादांनी हिकमत लढविली. वर्गावर शिकवीत असलेल्या एका शिक्षक कार्यकर्त्याला बाजूला बोलावून दादा सांगत होते.

"आता काय करावं! आमचा हरीभाऊ (त्या आश्रमशाळेचे चालक) असेल म्हणून त्याच्या भरंवशावर या पुढारी मंडळींना तुमच्याकडे घेऊन आलो. बहुतेकांनी सोमवारचा उपास संध्याकाळी सोडायचा ठरविलं आणि दुपारी चहापाण्यावरच भागविलं. आमचीच मंडळी असती तर फारसा प्रश्न नव्हता. पण पुण्याचे हे * * * साहेब वर्धेचे * * साहेब. या सारखी मंडळी बरोबर आहेत. त्यांची साधी जेवण-खाण्याची सोय आम्हास करता येऊ नये? मोठा लज्जास्पद प्रसंग आहे आमच्यावर! बघा तुम्हाला कांही करणं शक्य असल्यास." दादा स्वत:कडे कमीपणा घेऊन इतक्या आर्जवाने बोलत होते की, दादांचे बोलणे पुरे व्हायच्या आधीच त्या शिक्षक कार्यकर्त्याने खुणेने दोघा विद्यार्थ्यांना जवळ बोला-वून दोन-चार माणसांना बोलवायला सांगितले. आणि दादांना निश्चित केले. वर अशा मोठ्या मंडळींना घेऊन तिथल्या आश्रमशाळेत आणल्याबद्दल दादांचे आभार मानले. टाकीवरुन आम्ही आंघोळी उरकून येतो, तो भात-भाजी-भाकरीचे साधेच पण रुचकर जेवण तयार होते. आकंठ जेऊन सगळे ब्राम्हण (सर्वजण) तृप्त झाले. अन्नदात्याला शुभ आशिर्वाद मिळाले. शाळा पाहाण्याचा, दोन शब्द बोलण्याचा, शेरे बुकात शेरे लिहण्याचा, औपचारिक कार्यक्रम पार पाडला. निघतांना दादांनी कांही देणगीदाखल नोटा दिल्या व पावती घेतल्याचेही आमच्या लक्षात आले. पण त्याचा उच्चार दादांनी कधी केला नाही.

* * *

## १७. देशभक्त माधवराव देशपांडे

—पां. वा. गाडगीळ,
पत्रकार महर्षी.

देशभक्त माधवराव देशपांडे यांचा जन्म १८९७ साली डाकोर येथे झाला. त्यांचं लहानपण डाकोर येथेच गेलं. माधवरावांचे वडील लहानपणीच मृत्यू पावल्यामुळे माधवराव व त्यांचे बंधू केशवराव यांना घेऊन त्यांच्या आई बडोद्याला आल्या. बहिणीच्या मदतीने मुलांचं थोडफार शिक्षण आईने बडोद्याला केलं. माधवरावांचा विनोबांशी स्नेह जमला तो लहानपणी बडोद्यालाच. १९१६ साली विनोबांनी विद्यार्थी मंडळ स्थापन केलं. त्यात माधवराव विनोबांबरोबर होते. माधवरावांची आई पतिनिधनानंतर सासरचं मूळ गाव आरळे येथे गेल्या होत्या. पण तिथे आधार मिळण्याचे लक्षण दिसेना म्हणून बडोद्याला परत आल्या. लहानपणापासून माधवरावांनी विद्याभ्यास झटून केला. विनोबांच्या सहवासामुळे, संगतीमुळे, विद्यार्थी मंडळातर्फे माधवरावांनासुद्धा इतर सर्व सदस्यांना समाजसेवेचं बाळकडू लहान वयांतच मिळाल होतं. माधवरावांचे काका धोंडोपंत यांनी त्यांना मुंबईला आणून त्यांचं पुढील शिक्षण केलं पण माधवराव वकील झालेले पहायला ते हयात राहिले नाहीत. माधवराव यांनी नोकऱ्या व शिकवण्या करून शिक्षणाचा बराचसा खर्च स्वतः सोसला. शिवाय भावाचंही शिक्षण पुरं केलं.

समाजसेवा सतत करीत राहिल्यामुळे वांद्रा म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत १९३७ साली माधवराव निवडून आले. त्यावेळी उपनगर जिल्हा काँग्रेस कमिटी वेगळी होती. त्या कमिटीचे अध्यक्ष झाल्यावर उपनगरात त्यांनी बऱ्याच शाळा काढल्या. शाळांतून अभ्यासापूर्वी विनोबांची गीताई म्हणवून घेण्याचा प्रघात त्यांनी पाडला. वडिलांच्या सातारा जिल्ह्यासही ते विसरले नाहीत. शिराळे पेट्यातही त्यांनी अनेक शाळा काढल्या.

धर्मक्षेत्रांना भेटी देणं हाही त्यांचा एक छंद होता. तिरुवन्नमलई, पांडेचरी, आळंदी, पंढरपूर इत्यादी क्षेत्रांना ते नेहमी भेटी देत असत. महात्मा गांधी व विनोबा याखेरीज रमणमहर्षी, अरविंद घोष या सत्पुरुषांबद्दलही त्यांना आदर होता. माधवरावांची मोठी कन्या शांता हिचे लग्न १९४५ साली गांधीजींच्या उपस्थितीत सेवाग्राम येथे आश्रमपद्धतीने झाले.

माधवरावांनी स्वातंत्र्य लढ्यात सतत भाग घेतला. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहासाठी महात्माजींच्या दांडीच्या यात्रेत माधवरावही होते. १९४१ साली विनोबांच्या मागून ज्या व्यक्तींनी सत्याग्रह केला त्यात महात्माजींनी माधवरावांना निवडले होते. त्यावेळी साधी शिक्षा माधवरावांनी येरवडा कारागृहात भोगली. आईच्या निधनानंतर १५ व्या दिवशीच माधवराव सत्याग्रह करून कारागृहात गेले. १९४२ साली ९ ऑगस्टला

अपरात्री पोलिसांनी माधवरावांच्या घरात जाऊन त्यांना स्थानबद्ध केले. १९४५ च्या मध्यापर्यंत त्यांनी ही स्थानबद्धता भोगली. ही स्थानबद्धता जवळजवळ २१½ वर्षा-इतकी दीर्घ होती. कारण सातान्यात जे बंड झाले होते त्या बंडाशी माधवरावांचा संबंध असावा असा सरकारला संशय असावा. माधवराव तुरुंगात असताना बांद्रयाच्या त्यांच्या घरी भूमिगतांचा अड्डा निर्माण झाला होता. सरकारच्या संशयाला हे महत्त्वाचे कारण होते. पोलिसांनी त्यांच्या घरावर धाड घालून त्या काळांत, जुन्या डायऱ्या, फोटो, कागद-पत्र जप्त केली होती.

१९५२ साली बोरिवली मतदार संघातून माधवराव काँग्रेसच्या तिकिटावर मुंबई विधानसभेवर निवडून आले. त्यावेळी घडलेली एक घटना माधवरावांच्या अत्यंत निर्लोभी वृत्तीचे द्योतक म्हणून नोंदवण्यासारखी आहे. घरभाडे कायदा दुरुस्त करण्यासाठी एक कमिटी नेमण्यात आली. मुरारजी त्यावेळी मुख्य मंत्री होते. माधवराव हे त्यांचे विशेष माहितीतले असल्यामुळे मुरारजींनी कमिटीमध्ये सभासद म्हणून माधवरावांचा समावेश केला. त्यावेळी सेक्रेटरीएटमध्ये काही डावपेची राजकारण होऊन एम. के. देशपांडे या नावाखाली माधवरावांचा समावेश न करता पुण्याचे एक इंग्रजी शिक्षक मा. का. देशपांडे यांचा समावेश करण्यात आला. एवढेच नव्हे तर मा. का. देशपांडे यांना सेक्रे-टरीएटमध्ये बोलावून घेऊन त्यांना नेमणुकपत्रही देण्यात आले. पुढे मुरारजींच्या कानावरही गेले, तेंव्हा ते थोडे भडकलेही पण कागदोपत्री पक्का झालेला निर्णय बदलण्या-पलीकडे गेला होता. नंतर एका सभासदाने खाजगी कारणासाठी त्या कमिटीवरील आपल्या जागेचा राजीनामा दिला तेव्हा माधवराव यांना पुन्हा पुन्हा विचारण्यात आले पण "आपल्यामागे पुरेशी सार्वजनीक कामे आहेत. सदर कमिटीवर जाणेची आपली इच्छा नाही" असे त्यांनी कळवून टाकले.

"आमदारकी सोडून ग्रामसेवेसाठी या" अशी विनोबांची हाळी आल्यावरून माधव-रावांनी आमदारकीचा राजीनामा दिला होता पण निवडणुकीची कटकट उत्पन्न होईल म्हणून मुरारजींनी राजीनामा स्वीकारला नाही. पण त्यावेळेपासून भूदान व इतर विधायक कार्याला माधवराव यांनी सर्वकाळ स्वतःला वाहून घेतले. सातारा जिल्ह्या-तील बेंद येथील देशपांडे वतनाची २५० एकर जमीन भूदानात दान करून मागासलेल्या मुलांसाठी वसतीगृह काढले. आरळ्याचे घरही शाळेला दिले. अनेक गृहोद्योग सुरू केले. या जमिनी माधवराव यांच्या घराण्याचे मूळ गाव बेंद येथे असून ऊंच पठारावर आहे. जमिनीचे दानपत्र या पठारावरील जागेवर करण्यात आले. या समारंभासाठी पठाराची खूप ऊंच चढती जमीन पायानी चालून मुरारजी दादांच्यासाठी आले होते.

माधवराव यांनी वकिली केली. त्या काळात ती यशस्वीतेने केली. अनेक गरिबांची, संस्थांची फुकट वकिलीही त्यांनी केली. त्यावेळचा त्यांचा पोशाख शर्ट, पँट, कोट, टाय असा होता. अर्थात् खादीचा त्या सार्वजनीक काळातही ते करीत असत. पुढे गांधी आणि विनोबा यांचा नाद अधिक लागल्यावर त्यांच्या पोशाखात हळूहळू बदल होत गेला.

व शेवटी खादीचे अगदी जाड धोतर, जाड खादीचा शर्ट, जाड खादीचा कोट आणि पुष्कळदा जाड खादीचा रुमाल असे वापरीत.

नशाबंदीमंडळाचे प्रमुख पदही त्यांना मिळाले होते. सर्वोदय मंडळातर्फे साक्षरता वर्गही त्यांनी चालवले. भजनी गाण्याचाही त्यांना नाद होता. संपूर्ण भारताचा हिमालयांतील मानस सरोवरासकटचा प्रवास त्यांनी अनेकदा केला होता. संस्कृत भाषेवर त्यांचे बरेच प्रेम असून शेवटपर्यंत संस्कृत वाङ्मय ते वाचीत असत.

माधवराव २० जून १९८४ रोजी वारले. संस्कृत प्रेम व अध्यात्मिक गोडी या गोष्टी त्यांनी कडेपर्यंत टिकवल्या. शेवटचे काही दिवस ते थकल्यासारखे झाले होते. मृत्यु अचानक व कोणताही त्रास न होता, वेदना न होता त्यांना मिळाला.

माधवरावांच्या स्मरणार्थ देशपांडे परिवाराने महिला भजनीमंडळ स्पर्धा ठेवल्या असून त्यासाठी फिरती ढाल ठेवली आहे.

* * *

## १८. प्रसिध्दिविन्मुख माधवराव

—श्री. रं. धामणकर

कै. माधवरावांचा माझा परिचय १९३० सालचा. १९३० सालात पनवेल यथे भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेत झाला. १९३२ साली घाटकोपर येथे भरविलेल्या महाराष्ट्र परिषदेत त्यांच्या बरोबर मी पकडला गेलो. शिक्षा झाली व ठाणे जेलमध्ये आम्ही बरोबर होतो. विधायक प्रवृत्तीचे, अबोल, प्रसिध्दिविन्मुख असे ते थोर कार्यकर्ते होते. स्वराज्य मिळाल्यावर कै. बाळासाहेब खेर यांचेबरोबर आदिवासी सेवा मंडळाचे कामात आम्ही सहभागी होतो. सच्चे गांधीवादी, विधायक कामात आस्था असणारे असे कै. माधवराव सेवेचे कामांत मग्न असत. त्यांचे चरित्र तरूण पिढीपुढे येणे आवश्यक आहे.

***

## १९. आमचे प्रेमळ दादा

—सौ. विमल प्रभाकर आंबरे,
स्वातंत्र्य सैनिका व संघटक, नशाबंदी मंडळ

माननीय श्री.माधवराव देशपांडे यांचा व माझा परिचय नशाबंदी मंडळाच्या कार्यकारणाने झाला. आम्ही त्यांना दादा म्हणत होतो. नशाबंदी मंडळात ते आमचे प्रमुख मार्गदर्शक होते.

प्रतिवर्षी नशाबंदी मंडळाची शिबीरे महाराष्ट्राबाहेर घेण्याची सुरूवात त्यांनी केली. शिबिराचा कार्यक्रम योजनापूर्वक ते ठरवीत असत व त्याप्रमाणे शिबीरे यशस्वी होत असे.

शिबीराचा कार्यक्रम आयोजित करीत असताना कमीतकमी प्रवास खर्च, राहण्याची व भोजनाची सुविधा यांचा त्यांत प्रामुख्याने समावेश असे. मंडळात पुरुषाप्रमाणे स्त्रियांचाही समावेश असे आणि संसारात रमून देशसेवेचे कार्य करणाऱ्या महिलांना बाहेर शिबिरात असताना स्वयंपाक वगैरे कोणताही उपद्रव होऊ नये याची ते खबरदारी घेत असत. वेळ पडली तर ते स्वत : स्वयपाक करून आम्हाला मायेने व प्रेमान जेऊ घालीत.

शिबीराचा कार्यक्रम पार पडला की दादांची आमच्या समवेत यात्रा सुरू होई ते अगदी खुषीत असत व आमचे मार्गदर्शक बनत. तीर्थाचे ठिकाणी तीर्थस्थानाची माहिती देत व पूजा-अभिषेक आमचे हस्ते करवून देवाच्या पायांवर आमचे डोके ठेवीत. समाजकार्य करीत असताना नेहमी नम्र असावे हेच ते जणू सुचवित व आमच्यावर ईश्वरनिष्ठेचा संस्कार घडवीत. उत्तम जेवणाचा नैवेद्य असे. प्रवासात भक्तिमार्गाच्या गोष्टी व जपतप चाले.

महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेर दादांनी अनेक थंड हवेची ठिकाण व धार्मिक स्थळांची यात्रा आम्हाला पित्याच्या अंतःकरणाने घडवून आणली. त्यापैकी " सोमनाथ " काही आम्हाला जमले नाही. त्यांना हुरहुर लागली. त्यावेळी ते आमच्या मंडळातून निवृत्त झाले होते. वयाची ७५-७६ वर्षे उलटून गेली होती, दष्टि अधू झाली होती. तरी पण त्यांनी सोमनाथला जाण्याची सर्व तयारी केली. मोजकी मंडळी बरोबरघेऊन जाण्याचा बेत केला. मला चिठठी पाठवली की, "तू तुझे कपडे घेऊन उद्या बॉम्बे सेंट्रलला निघून ये. तुझे एकच ज्योतीर्लिंग राहिले आहे, ते पुरे होईल." पण मला त्यांचेबरोबर जाणे घरगुती अडचणींमुळे शक्य झाले नाही.

माननीय दादा मला नेहमी म्हणत, " अग आंब्रे, तू मीराबाई हो, भजन म्हणत रहा. तुझ्या लग्नाला २५ वर्षे होऊन गेली ना ? आता तू वारकरी होऊन भक्ति कर". दर एकादशीला त्यांची आळदीला वारी असे. दादांच्या शिकवणीने व संस्काराने नशाबंदी मंडळाचे पहिले भजन मंडळ मी काळाचौकी येथे स्थापन केले. या सरस्वती भजनी मंडळास

१२ वर्ष पूर्ण झाली. गेल्या ११ वर्षांच्या कालावधीत माझ्या ह्या भजन मंडळामार्फत नशाबंदी मंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्रात एक व महाराष्ट्राबाहेर याप्रमाणे एक-दोन कार्यक्रम ठिकठिकाणी घडवून आणले. मा. दादांचा आदर्श मी डोळ्यांसमोर ठेविला आहे.

पंढरपुरच्या विठोबाची तर त्यांनी आमच्याकडून पूजा-अभिषेक करवून, साग्रसंगीत जेवण करून, नैवेद्य दाखवून, आम्हा सुवासिनींना प्रथम जेवू घातले. पुणे येथून मंडईची भजन मंडळी आली होती. त्यांच्या भजन संगीताची मेजवानी रात्रभर घडवून आणली. भजन पंढरीच्या विठोबासमोर झाले. बद्रीकेदारला जाताना त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. पण त्यांनी आम्हांस जाणीव होऊ दिली नाही. आपले काम आपण स्वतःच करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. कोणाकडूनही ते आपलें काम करवून घेत नसत. असे आमचे प्रेमळ दादा त्यांनीच आम्हाला तीर्थयात्रा घडविल्या व त्यांच्याच प्रेरणेने मी अनेक वर्षे आमच्या सरस्वती मंडळाच्या भगिनींना त्यांच्या कुटुंबासमवेत यात्रेला घेऊन जाते. आता दादा गेले तरी त्यांची प्रेरक शक्ती आम्हाला यापुढेही लाभावी, हीच प्रार्थना !

***

## २०. तू धैर्य सोडू नकोस

—श्रीमती मालती चिंचलीकर

१९५६-५७ सालापासून म्हणजे मी भूदान आंदोलनात आल्यापासून त्यांचा व माझा परिचय झाला. त्यांच्या अनेक स्मृति मनात तरळत आहेत.

त्यांची पहिली भेट झाली ती मुंबई गांधीस्मारक निधीच्या मणिभवनमध्ये. त्यावेळी मी नुकतीच भूदान आंदोलनात आलेली होते. समयदानी म्हणून. गांधी-विनोबा साहित्य विक्री, सुटीत शिबिराला जाणे, पदयात्रेत सामील होणे, संध्याकाळी एखाद्या चांगल्या वक्त्याच्या व्याख्यानाला जाणे, अशी उमेदवारी करीत होते. त्यावेळचे भूदान मंडळ मणिभवनमध्ये होते. कै. गणपतीशंकर देसाई प्रमुख होते. देशातील अनेक व्यक्ति मणिभवनमध्ये आम्हाला पहायला मिळत. त्यांचा परिचयही होई.

एक दिवस कॉलेजमधून आल्यावर मणिभवनमध्ये गेले होते. इतक्यात "ए मुली! थांब, तुझे नांव काय?" मी चटकन आवाजाच्या दिशेने पाहिले. एक ठेंगणी व्यक्ती, रंग गडद-सावळा, डोक्यावर कशीतरी सफेद टोपी, अंगावर खादीचे कपडे, वेश तसा गबाळच, डोळ्याला जाड भिगांचा चष्मा, त्या चष्म्याच्या आडची जितकी तीक्ष्ण तितकीच प्रेमळ नजर असलेली व्यक्ति माझ्याजवळ येऊन उभी राहिली. ते होते माधवरावजी देशपांडे—दादा.

दादांनी माझे शिक्षण, माझ्या घरातील माणसे, माझी सांपत्तिक स्थिती, मी या आंदोलनात कशी आले, इ. सारीसारी चौकशी केली. मी सकाळी कॉलेजला जाते, दिवसभर नोकरी करून राष्ट्र सेवादलात जाणे, घरी आईला मदत करणे, हे ऐकून त्यांना खूप आनंद वाटला.

"वा! तू स्वतःच्या पायावर उभी राहून स्वतःच शिक्षण घेत आहेस हं. मला तुझे कौतुक वाटते. मुलगी अशी असावी. मला फार आवडले तुझे हे सारे."

असे म्हणून त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला व म्हणाले, "माझा आशीर्वाद आहे तुला." माझ्या पाठीवरून फिरलेला तो हात वात्सल्याचा होता; मायेचा होता. हे मी कधीही विसरू शकत नाही.

देशात ज्या प्रांतात विनोबांचा मुक्काम असे त्या ठिकाणी सर्वोदय सम्मेलन होई. आम्ही सर्वजण जात असू. दादाही आमच्याबरोबर असत. प्रवासात सर्वांच्या खाण्यापिण्याची चौकशी होई. स्वतःच खरेदी करून सामान आणून देत. सम्मेलन संपल्यानंतर जवळपासच्या प्रेक्षणीय स्थळांना जाणे हा त्यांचा कार्यक्रम असे. प्रत्येकाला

विचारून आग्रह करीत व आपल्याबरोबर घेऊन जात. जर का नकार दिला की, त्यांचे उत्तर "अग, अशी कशी तू? म्हातारी झालीस का? अद्याप खूप आयुष्य आहे तुझ्यापुढे! आता उत्साह आहे, शक्ती आहे, का फिरून घेत नाहीस? मी बघ कसा? तुमच्यापेक्षा मोठा असूनसुद्धा फिरतो की नाही!" यावर आमचा उत्साह न वाढला तरच नवल. मग सारे बेत सुरू व्हायचे त्याबरोबरच आमचे प्रयाण!

एखादी बैठक असो, भूदानाचे वा नशाबंदीचे शिबीर असो अथवा सर्वोदय सम्मेलन असो, दादांची भूमिका घरच्या वडीलधाऱ्याची असे. दादा वकील होते पण वकिली बाणा कधीच दाखविला नाही.

१९८२ च्या जानेवारीत श्रीरामचे (माझ्या पतीचे) निधन झाले पण त्यावेळी दादा थकले होते. त्यांना चालवत नव्हते. अनेकांकडून त्यांनी मला निरोप पाठविले-की, "मीच तुझ्याकडे यायला हवे होते पण आता मी थकलो आहे, चालवत नाही, पण तुला पहायचे आहे, तेव्हा एकदा घरी ये." मी गेले. मला जवळ बसविले व मालती माझ्यापेक्षा श्रीराम लहान होता पण चटकन निघून गेला. पण तू धैर्याने कामाला लागलीस, हे मला समजले. फार अभिमानाची गोष्ट आहे. "धैर्य कधी सोडू नकोस." ही दादांची शेवटची भेट पण आजही ते शब्द माझ्या कानात घुमत आहेत.

***

## २१. दादांचे संस्मरण

—श्री. राम देशपांडे

१९५७ साल भूदान यज्ञाचे महत्त्वाचे वर्ष. भूदान प्राप्तीचा मोठा संकल्प यावर्षी पुरा करावयाचा होता. भारतात त्यासाठी निरनिराळ्या भागात अनेक भूदान पदयात्रा चालल्या होत्या. ठिकठिकाणचे भूदान प्राप्तीचे वृत्तही वृत्तपत्रांतून वाचावयास मिळत होते.

मुंबई भूदान यज्ञ समितीतर्फे मुंबईच्या निरनिराळ्या भागांत शिबिर, सभा होत होत्या. मी आपली नोकरी सांभाळून मधून मधून या सभा शिबिरात जात असे. भूदान यज्ञ समितीच्या प्रमुख मंडळींचे मार्गदर्शन होत असे. प्रमुख मंडळी पू. केदारनाथजी, श्री. माधवराव देशपांडे, श्री. गणपतीशंकर देसाई यांचा तसा दुरून परिचय झाला होता. त्यांना नावाने ओळखू लागलो होतो. परंतु प्रत्यक्ष भेटीचा किंवा ओळखीचा योग आला नव्हता.

सहा महिन्यानंतर सर्वोदयाचे थोर कार्यकर्ते श्री. नारायणभाई देसाई (कै. महादेवभाई देसाई यांचे सुपुत्र) यांची मुंबईत एक महिना पदयात्रा झाली. मुंबई भूदान समितीनेच आयोजित केली होती. या पदयात्रेच्या वेळी वरील महानुभावांचा प्रत्यक्ष परिचय झाला. वरळी आणि कामगार भागात पदयात्रा आयोजित करण्यात माझा बराच सहभाग होता. वरळीची व्यवस्था. अर्थातच माझ्याकडेच होती. वरळीला पदयात्रा आली. लोकांनी चांगले स्वागत केले. माधवरावही बरोबर होते. पदयात्रीकांची खाण्यापिण्याची, भोजनाची व्यवस्था तेथील सातारकर मंडळींच्या क्लबमध्ये केली होती. भोजनाची व्यवस्था चांगली होती. पण भोजनातील सातारी तिखट सर्व यात्रीकांना जाणवले. श्री. नारायणभाईंना विशेष जाणवले. त्यावेळी श्री. माधवरावांनी सुचविले, "पदयात्रेत किंवा सर्वोदय कार्यक्रमांचे वेळी भोजनाची व्यवस्था करताना तिखट वर्ज किंवा अगदी कमी घालण्यास सांगावे". रात्री या सूचनेचा अर्थातच अमल झाला.

दुपारचे वेळी श्री. माधवरावांचे व माझे बरेच बोलणे झाले. मोकळा वेळ होता. माधवरावांना सर्वच मंडळी दादा म्हणून संबोधित असत. दादांनी माझी खोलवर चौकशी केली, "कोण, कोठला राहणारा?" वगैरे "चाफळ, जिल्हा सातारा" मी म्हणालो. "घरी कोण कोण असते?" मी सर्व सांगितल्यावर, "अरे, मी तुझ्या गावी श्री राम दर्शनाला गेलो होतो. तुझ्या घरी पण गेलो होतो. तुझ्या आजोबांना मी भेटलोही आहे."

बस्स, एवढे दादांनी म्हटल्यावर मला एकदम त्यांचेबद्दल आपुलकी वाटू लागली.

"तू येथे सातारकरांच्या क्लबात सर्वांची भोजनाची व्यवस्था केलीस, तुझा येथील सातारकरांचा परिचय आहे वाटते?"

"होय. येथील डॉ. भोसले यांचेमुळे माझा येथील सातारकरांचा संबंध आला. येथील बीडीडी चाळीत माझा बराच संपर्क आहे. वरळी भागात सातारकर मंडळी बरीच आहेत."

दादांना सातारा, सांगली कडील लोकांबद्दल बरीच आस्था दिसून आली. दादाही त्याच भागातले, म्हणून आस्था असणे साहजिकच आहे. मात्र या भेटीत दादांशी मोकळेपणाने बोलणे होऊन दादांच्या प्रेमळ स्वभावाची ओळख झाली. आरंभी वाटत होते की ही सर्वोदयाची थोर मंडळी माझ्यासारख्या सामान्य माणसाशी मोकळेपणाने बोलतील की नाही, परंतु दादांच्या आजच्या भेटीमुळे मनातील शंका दूर झाली.

वास्तविक दादांचे सुपुत्र श्री. रंगा देशपांडे यांचा परिचय पूर्वीच झाला होता. आम्ही बरोबरच काम करीत असू. त्यावेळी तरुण कार्यकर्त्यांचा चांगला संच होता.

नारायणभाईच्या पदयात्रेच्या समारोपाची सभा मणिभवनमध्ये झाली. हॉल भरला होता. पू. केदारनाथजी, माधवराव, गणपतीभाई, नारायणभाई आदी प्रमुख मंडळी मंचावर होती. या पदयात्रेतील बऱ्याच मंडळींनी आपले अनुभव सांगितले. मी दूर बसलो होतो. मीही आपले अनुभव सांगावेत म्हणून दादांनी माझे नाव पुकारले. खरे म्हणजे माझ्यावर या पदयात्रेचा आणि त्यातील कार्याचा प्रभाव होताच आणि मनात विचार चालू होता की, नोकरीला आता रामराम ठोकावा. असा विचार करीत असतांनाच दादांनी नाव पुकारले. मी उभा राहून आपले प्रेरक अनुभव सांगितले आणि शेवटी घोषणा केली की मी लौकरच नोकरी सोडून देवून या कार्यात पूर्ण वेळ देणार आहे. सर्वांनी जोरदार स्वागत केले. शेवटी पू. केदारनाथजी आणि दादांनी तसा उल्लेखही केला. "पदयात्रेची देन."

थोडयाच दिवसात मी नोकरीला रामराम केला.

दादा कॉर्पोरेटर होते. पुढे आमदारही होते आणि निरनिराळ्या संस्थांमध्ये पदाधिकारीही होते. श्री. गणपतीशंकरभाई हे मुंबईचे मेयर होते. पूर्वी काँग्रेसचे प्रमुखही होते. आणि पू. केदारनाथजी तर म. गांधींच्या आश्रमात राहिलेले आणि गांधींचे सल्लागार होते. श्री. बद्रीनारायण गडोदिया स्वतःला कार्यकर्ता मानीत आणि सतत १७-१८ तास सर्वोदयाचे कामात वावरत. त्यांनी आपल्या मालकीची मिठागरे विनोबांना दान देवून टाकली होती. त्यामुळे त्यांच्या त्यागाला सीमा नव्हती. अशा थोर मंडळींच्या सान्निध्यात राहण्याची संधी मिळाली.

माधवरावांना माहित होते आम्ही कोण, कोठे राहतो ते. एक कार्यकर्ते कै. एकनाथ भगत बहीणीच्या छोटया जागेत, कधी कधी स्टेशनवर झोपत असे, असे म्हणतात. श्री. मधू रावकर हा कुलाबा जिल्ह्यातील तरुण मुंबईत आला आणि सर्वोदय विचाराने भारावून गेला, राहण्यास घर नव्हते, रमाकांत पाटीलकडे राहात होता. श्री. तुळशीराम

कांबळी सर्वोदयाचे काम करावयास लागला; त्यावेळी भावाच्या छोटया जागेत राहत असे आणि मी हिन्दू कॉलनीमध्ये एका टेरेस रूममध्ये रहात असे. असे आम्ही चौघेजण कोठे ना कोठे अर्धवट जागेत कसे तरी राहत असू. अशी आम्हा मंडळीची राहण्याची स्थिती दयनीय होती. श्री. बद्रिनारायण गडोदिया आणि माधवरावांनी एक दिवस मला बोलावून सांगितले की, तुम्हा चौघांची राहण्याची सोय माधवरावांच्या बांद्रयाच्या महात्मा गांधी सेवा मंदिरात केली आहे. चला दाखवतो म्हणून माधवराव, मी आणि बद्रिभाई, बद्रिभाईच्या गाडीतून बांद्रयाला आलो. मी ही जागा प्रथमच पाहिली. कधी येणे या भागात नव्हते. जागा चांगली वाटली. पुढे पटांगण इमारतीत एक मोठा हॉल, वर गच्ची, एका बाजूला खादी वस्त्रागाराची पाटी, मात्र दुकान नव्हते. माधवरावांनी दोन खोल्या दाखविल्या आणि चाव्या माझ्याकडे दिल्या आणि म्हणाले, तुम्ही चौघेजण येथे रहा. आम्ही चौघेजण अविवाहित होतो. तशा खोल्या लहानच होत्या पण दोन खोल्यात चौघांना राहणे सहज शक्य होते. मी भाडयाचे विचारले तेव्हा माधवराव म्हणाले, "तुम्ही त्याचा विचार करावयाचा नाही. आम्ही पाहून घेऊ." मी मनोमन या महानुभावांच्या सहृदयतेला अभिवादन केले.

झाले, दुसरे दिवशीच आम्ही चौघांनी विंचवाचे पाठीवरचे बिऱ्हाड असते तसेच आमचेही होते, ते आणून महात्मा गांधी सेवा मंदिरातील दोन खोल्यात थाटून दिले. अक्षरशः आम्हा चौघांना घर मिळाल्यासारखे वाटले. सफाई आदी कार्याला सुरुवात केली. हॉल मधून मधून बाहेरील कार्यक्रमाला (लग्नाला) दिला जाई. बाकी मोकळाच असे. आमच्या सर्वोदयाची शिबिरे, सभा तेथे होवू लागल्या, मुलांसाठी कथामाला, वाचनालय सुरू केले.

महाराष्ट्रातील किंवा मुंबईतील कार्यकर्त्यांची शिबिरे, सभा होत त्यांचे यजमानपद दादांकडेच असे. खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था ते करीत असत. पुढे महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या कार्यालयालाही दादांनी महात्मा गांधी सेवा मंदिरात जागा दिली. त्यामुळ या वास्तुमध्ये बरीच ये-जा वाढली. यावरून दादांना या कार्याबद्दल किती आस्था होती हे दिसून येते.

दादा विनोबांचे लहानपणापासूनचे सहकारी. विनोबांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभावही त्यांचेवर होता. गांधी विचाराने चालणाऱ्या संस्था—मग त्या खादी ग्रामोद्योगाच्या असो किंवा नशाबंदीच्या असो—दादा त्यांना सर्वोदयाचे कामासाठी जोडण्याचा प्रयत्न करीत. नशाबंदीच्या कार्यकर्त्यांना ते बरेच वेळेला पू. विनोबांकडे नेत असत, परिचय करून देत असत, त्यांचे मार्गदर्शनही घेत असत. तसेच सर्वोदय समाज सम्मेलन भारताच्या निरनिराळया भागात होत असे तेथेही नशाबंदी कार्यकर्त्यांना आपल्या बरोबर घेवून जात असत. अशा प्रकारे दादांनी नेहमी जोडण्याचे कार्य केले. कार्यकर्त्यांना त्यांचा नेहमीच आधार वाटला आहे.

ठाणे जिल्ह्यात ग्रामदान आंदोलनानंतर तेथे ग्रामस्वराज्याचे कार्य व्हावे म्हणून विनोबांनी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना आवाहन केले. बरेच कार्यकर्ते कामाची योजना आखून

कामालाही लागले. दादांनी ठाणे जिल्ह्याच्या कार्यात बरेच लक्ष घातले. कै. आचार्य भिसे, कै. श्री. महाजन गुरुजी आणि दादा यांचे मार्गदर्शन ठाण्याच्या कामात सतत लाभत असे. उतार वयातही ही मंडळी सभा, शिबिराला येत असत. आचार्य भिसे गेले, नंतर महाजन गुरुजीही गेले आणि अगदी अलीकडच्या काळात दादाही गेले. परंतु शेवटपर्यंत ठाण्याच्या कामाची चौकशी करीत असत.

१९७२ मधील गोष्ट. ठाणे जिल्ह्यात जव्हार भागात जेव्हा काम सुरू झाले त्यावेळी निरनिराळ्या भागात नऊ दहा केंद्रे सुरू केली होती. सर्व जंगल भाग, आदिवासी वस्ती. मी आणि माझे २-३ सहकारी ज्या केंद्रावर काम करीत होतो ते केंद्र दूर जंगलात पण जव्हार नाशिक रोडवर होते. दुपारी नदीवरुन आंघोळ करून आम्ही परत येवून पाहतो तो आमच्या झोपडी समोर कार ऊभी होती. माधवराव दोन- तीन आदिवाशींशी गप्पा मारत झाडा-खाली ऊभे होते. त्यांना पाहून आम्हाला आनंद वाटला. बाजूला श्री. नंदूभाई आणि श्रीमती मणिबेन नानावटी हिंडत होत्या. त्यांना नमस्कार करून सर्वांना झोपडीत चटईवर बसविले. मुंबईत काम करीत असताना या सर्वांचा प्रेमळ परिचय होताच. मी मनात म्हटले दादांनी या मंडळीना आणले असणार. मी कामाची माहिती दिली. झोपडी भोवती बरीच आदिवासी गावकरी मंडळी जमली होती. त्यांना शेजारच्या ग्रामपंचायत-च्या ऑफिसमध्ये बसावयास सांगितले आणि आम्ही सर्वच तिकडे गेलो. मी परिचय करून दिला. जमलेल्या मंडळीसमोर दादांनी छोटेसे पण छान भाषण केले. त्यांत प्रारंभी माझ्या निष्काम कार्याची स्तुती आणि बाकी सर्वांना एकजुटीने काम करण्यास आवाहन केले. थोड्या वेळाने ही मंडळी परतली. जातांना आमच्यासाठी आणलेला खाऊ आम्ही जमलेल्या लोकांना देवून सर्वांचे तोंड गोड केले.

दादांना ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात चाललेल्या कार्याबद्दल बरीच आस्था होती. तेथील कार्यासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यास दादा सहकार्य करीत असत. ताकद होती तोपर्यंत ते स्वतः येत असत. पुढे अगदीच थकल्यावर मला बोलावून कार्याची माहिती घेत असत. सगळ्यांची चौकशी करीत असत.

पू. विनोबा आजारी पडले आणि त्यांनी शेवटी अन्न, औषध व पाणी न घेण्याचे ठरविले. त्यावेळी माधवरावांना पू. विनोबांना भेटण्याची तीव्र इच्छा झाली. दादांचे सुपुत्र श्री. बापूसाहेबांनी स्पेशल गाडी करून दादांना पवनारला घेवून जाण्याचे ठरविले. मलाही बरोबर घेतले. त्यावेळचा प्रवासही पितापुत्रांच्या सान्निध्यात छान झाला. आणि विशेष म्हणजे दादांच्यामुळेच मलाही अंतिम दर्शन झाले. दादांना तर विनोबांकडे पाहून गहिवरून आले. त्यांनी विनोबांना प्रदक्षणा घातली तो डोळ्यांची टिपे पुसतच. दुसरे दिवशी विनोबांची अंत्ययात्रा होती. पंतप्रधान इंदिरा गांधीही परदेशातून तेवढ्यासाठी आल्या होत्या. अनेक महानुभाव जमले होते. हजारो लोक अंत्य दर्शनासाठी आले होते. येत होते. अग्नी संस्काराचा कार्यक्रम नाविन्यपूर्ण, शिस्तबद्ध आणि मंत्रोच्चाराच्या गंभीर आवाजात झाला.

***

## २२. दिनांक ७, ८ व १० मे १९५५ साली झालेली चर्चा

**माझी जीवनकथा, खंड २**

**—मोरारजी देसाई १९७८**

**विनोबा :** मला वाटते त्यांना समजत. जगातील इतर लोकांपेक्षा भारतीयांना हे जास्त समजते. आमच्या लोकांमध्ये चांगला समज आहे. आपले जर असे सांगणं असेल की शासनमुक्ततेविषयी कोणी बोलू नये तर ते धर्माच्या विरुद्ध होईल. मला असे वाटते की, या बाबतीत आपण काळजीपूर्वक असावे. जर मी कोठे चुकलो तर लोक त्याविषयी मला सांगतात. माझ्यासारखे लोक शासनमुक्ततेविषयी बोलत राहतील.

**मोरारजी :** तुम्ही खात्रीने तसे करू शकता.

**विनोबा :** याविषयी इतर लोकांची मने वळवायची माझी तयारी आहे. जर आज शासनावर माझा विश्वास नसता, तर मी दारूबंदीच्या कायद्याविषयी बोललो नसतो. या विषयावर आपल्या दोघांत तसा विशेष मतभेद नाही. पण मी माझ्यासमोर हे ध्येय सतत ठेवले पाहिजे. नाही तर फार नुकसान होईल.

**मोरारजी :** हे मला मान्य आहे. आज आपण प्रार्थनेच्या वेळी छत्र्या बंद करायला सांगितले होते. त्यावेळी मी माझी छत्री बंद केली. पण त्यावेळी पाऊस असता तर मला तेथून जावे लागले असते. कारण माझ्याकडे त्यावेळी जास्त कपडे नव्हते. छत्रीखाली राहून परमेश्वरदर्शन होणार नाही हे मला पटत नाही.

**विनोबा :** हा तुमचा विनोद झाला.

**मोरारजी :** पण ही विनोदबुद्धी प्रत्येकाकडे असतेच असे नव्हे.

**नारायण देसाई :** शासनमुक्ततेविषयी दुसऱ्यांनी बोलू नये अशी आपली इच्छा आहे काय ?

**मोरारजी :** मी दुसऱ्यांना कसा प्रतिबंध करू शकेन ?

**नारायण देसाई :** निष्काळजीपणे जर कोणी याचा उल्लेख केला तर तुम्ही तशी सूचना द्यावी.

**मोरारजी :** गैरसमज होणार नसेल तर तशी सूचना मी देऊ शकतो. मी योग्य प्रकारे वागलो की नाही हे मात्र मी काळजीपूर्वक पाहतो.

**विनोबा :** प्रार्थनेमध्येही मी शासन मानलेले आहे. मराठ्यांच्या गोष्टीचा उल्लेख मी केला नाही का ?

**मोरारजी :** तुम्हीही शासक आहात आणि ते सुद्धा सरकारच्या नावाने (हास्य).

**विनोबा :** आपण आतापर्यंत बोलला, तेच मी म्हणतो.

**मोरारजी :** भूदान करण्याविषयीच तुम्ही सर्व लोकांना सांगितले आहे. पण मला

हे योग्य वाटत नाही आणि ते शक्यही नाही. या कामावर ज्यांचा विश्वास आहे, हेच काम करावे असे ज्यांना वाटते, त्यांच्याबद्दल शंका नाही, पण इतर करायच्या गोष्टी कोण करील?

**विनोबा :** निवडणुकीच्या काळात फक्त निवडणुकीसाठीच आपण आपली सर्व शक्ती लावता, तसेच भूदानाच्या कामालासुद्धा आपल्या सर्व शक्तीनिशी आपण चार महिने लागावे.

**मोरारजी :** निवडणुकीचे काम करताना मी इतर कामाकडे लक्ष देण्याचे सोडीत नाही. त्याच वेळी मी माझी ताकद इतर गोष्टींसाठीसुद्धा वापरीत होतो.

**विनोबा :** तितकीच ताकद या कामाला लावली तर काही हरकत नाही.

**मोरारजी :** पण मुंबई प्रांतात विधानसभेमधून सभासदांनी राजीनामे द्यावे म्हणून काही लोक सांगत आहेत. देशपांडे, भोसले यांनी विधानपरिषदेचा राजीनामा दिला. यामुळे पोटनिवडणुका घ्याव्या लागतील व पुन्हा खर्चाचा प्रश्न येईलच. भोसले यांचा मतविभाग असा आहे की, त्या निवडणुकीत कर्नाटक व महाराष्ट्र याचा वाद येणारच. मी म्हणेन की त्यांनी विधानसभेत एक दिवस हजेरी लावावी आणि उरलेल्या मुदतीत भूदानाचे काम करावे.

**विनोबा :** हे दोन वेगवेगळे प्रकार आहेत. एकाने आपले सर्व आयुष्य दान केले आहे, व दुसऱ्याने नाही. पण जर त्याने भूदानाचे काम घेतले तर त्याला त्याबाबतीतले नियम पाळावे लागतील.

**वजूभाई शहा :** विधानसभेमध्ये एक दिवस हजेरी लावून व उरलेल्या काळात दुसरे काम करुन, आपली नैतिक जबाबदारी त्याने पाळली असा दावा कोणी करू शकेल का ?

**मोरारजी:** हो.

**विनोबा :** मला नाही पटत असा परिपाठ असेल.

**मोरारजी :** जयप्रकाशजींनी आपले आयुष्य तुम्हाला दान केले आहे. ते रंगूनला का गेले ?

**विनोबा :** आपल्या आयुष्याचे दान मला करण्यापूर्वी ते गेले नाहीत का ?

**मोरारजी :** मी त्यांच्या आताच्या जाण्याबद्दल बोलतो आहे.

**विनोबा :** मला ते माहीत नाही. पण जर ते तिकडे गेले असतील तर मला वाटते तेथे सुद्धा भूदान व सर्वोदय यांबद्दलच ते बोलत असतील.

**मोरारजी :** त्याबद्दल कोण काय सांगणार? पण पूर्वी मी ज्या व्यक्तीचा उल्लेख केला आहे त्या व्यक्तीकडून जीवनदान मी कसे स्वीकारू ? ते अत्यंत भावनाप्रधान आहेत त्यांनी फक्त तीन वर्षांपूर्वी लग्न केले व त्यांना मुले आहेत. त्यांची काळजी ते कशी घेणार मला माहीत नाही. त्यांच्या दानाशी जर त्यांची पत्नी सहमत नसेल तर ते काय करतील असे मी त्यांना विचारले होते, तेव्हा त्यांनी हा विषय टाळायला सुरुवात केली. बेळगांव जिल्ह्याबद्दल महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यामध्ये वाद आहे. त्यांनी (श्री. भोसले) मला विचारले नाही. पण जेव्हा ते तुमच्याकडे आले तेव्हा त्यांनी तुम्हाला वचन दिले असले पाहिजे. म्हणजे धर्म आणि अधर्म यांमधील हा झगडा आहे. कृपा करून आपले मत द्या.

(हे श्री. भोसले यांच्याबद्दल आहे.)

**विनोबा**: जेव्हा ते आले तेव्हा ते आपणहून आले. हा केवळ वर्षदीडवर्षाचा प्रश्न आहे. नंतर ते सोडून जाऊ शकतात. त्याला काही हरकत नाही. त्यांनी आता सोडले तर मला अडचण निर्माण होईल. म्हणूनच मला मदत करण्याविषयी मी त्यांना विचारले.

**मोरारजी**: मी त्यांना स्पष्टपणे सांगितले आहे की मी राजीनामे स्वीकारणार नाही. दुसऱ्या पक्षातून काँग्रेस पक्षात जर कोणाला यायचे असेल तर त्याने त्या पक्षाचा राजीनामा द्यावा. नंतर काँग्रेसला मिळावे, असे मी त्यांना सांगेन. तामिळनाडूमधून काँग्रेसचे लोक त्रावणकोर-कोचीन मध्ये घेतले गेले, हे मला योग्य वाटत नाही. एखाद्याची संन्यासी होण्याची पूर्ण तयारी असल्याशिवाय त्याला कोणी संन्यासी बनवू नये.

**विनोबा**: व्यक्तीशः मी कोणाला विनंती केलेली नाही.

**मोरारजी**: (वलसाडजवळील पारनेरा टेकडीवरील एका साधूची गोष्ट मी सांगितली.) संन्यासी होणाऱ्याची अशा प्रकारे परीक्षा घ्यावी.

**विनोबा**: आपली पण परीक्षा घेतली जाईल.

**मोरारजी**: बापूंनी लोकांना शपथा घ्यायला लावल्या होत्या. पण त्यांच्याबरोबर दांडीला गेलेल्या ऐंशी लोकांमध्ये फारतर चार-पाच लोकांनी या शपथेचे पालन करणे चालू ठेवले होते. अशा उदाहरणामुळे सवसाधारण लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होते.

**विनोबा**: ते काहीही असो, पण या श्रद्धेमुळेच बापूंनी मातीचे सोने केले.

**मोरारजी**: मी ते पूर्ण मान्य करतो. आजची ताकद मला त्यांच्याशिवाय कशी मिळाली असती? मुंबई प्रांतातील पोलिसांनी केलेल्या गोळीबाराविषयी तुम्ही असमाधानी आहात असे मी ऐकले आहे. त्यामुळे त्याबाबतीत मी जरा तपशिलाने बोलतो. मी गृह मंत्री असताना एकदा दंगे झाले होते. त्यावेळी बापूंनी मला सैन्य व कामावरील पोलिस काढून घ्यायला सांगितले व मी माझे बलिदान करावे म्हणून सुचविले. त्यांनी उपदेश करताना शेवटी मला सांगितले होते की माझ्या ताकदीप्रमाणे मी वागावे. त्यांच्या संध्याकाळच्या प्रार्थनेत पण त्यांनी हेच सांगितले. मी माझी परीक्षा घेतली. अशा पद्धतीने बलिदान करण्यात मला आनंद वाटला नाही. अशा बलिदानाचा अपेक्षित परिणाम होईल असे मला वाटेना. जर मी पोलीस व सैन्य काढून घेतले तर मीच मारला जाईन. परंतु मी मेल्यावरसुद्धा सैन्याने पूर्वीप्रमाणेच आपले काम केले असते. त्यामुळे माझ्या ताकदीप्रमाणे मला जेथपर्यंत जाणे शक्य होते तेथपर्यंत मी जाण्याचा प्रयत्न केला. सकाळपासून एकशेचव्वेचाळीस कलम मी स्थगित केले व दंगलग्रस्त भागातून हिंडलो. हजारो लोक मला भेटले. एका ठिकाणी माझ्या अंगावर दगड पडला पण मी त्याची पर्वा केली नाही. त्याचा फार चांगला परिणाम झाला. वातावरणातील तणाव नाहीसा झाला. हे सर्व मी बापूंच्या कानावर घातले. ते मला म्हणाले की मी योग्य तऱ्हेने वागलो. बापूंनी असा उपदेश मला का केला असे विचारण्याइतकी माझळणकरांची मजल गेली. असा उपदेश करण्यात आपले काही चुकले का असे बापूंनी नंतर मला विचारले.

असा प्रश्न बापूंनी मला का टाकला अशी मी त्यांच्याकडे विचारणा केली. त्यांनी मला सर्व काही स्पष्ट करून सांगितले. मी म्हणालो, "तुम्ही मला योग्य मार्गदर्शन केले होते. माझ्यावर तुम्ही विश्वासही टाकला होता. त्याप्रमाणे मी जर वागलो नसेन तर तो माझा कमकुवतपणा. मी तुमच्याकडून मला पाहिजे तसा उपदेश घ्यायला आलो नव्हतो. कारण मी माझ्या अहिंसेच्या ताकदीप्रमाणेच तो प्रत्यक्षात आणणार होतो. सत्य मला पूर्णपणे सापडले आहे असा माझा दावा नाही. असे असते तर सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवला असता. काही लोक माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत याचा अर्थच असा की माझ्यात काहीतरी असत्य असले पाहिजे".

**विनोबा**: निदर्शकांच्या काही मर्यादा असतात. त्या मर्यादांमध्येच ते काम करतात.

**मोरारजी**: कायद्याने गोवधबंदी करण्याबद्दल आपल्या मागणीसंबंधी माझा दृष्टीकोन मी आपल्यापुढे मांडतो. उपयुक्त व तरुण प्राण्यांना न मारण्याबद्दलचा कायदा मुंबईत आहे. म्हातारी व निरुपयोगी जनावरे मारण्याला बंदी नाही. अशा कायद्यात दोन अडचणी आहेत. असे प्राणी फक्त शेतकरी विकतात. आपण ते कोणाला विकीत आहोत हे त्यांना माहीत असते. ते न विकण्याबद्दल त्यांचे मन वळविले तर हे काम सोपे जाईल, नाही तर ते कठीण पडेल. म्हाताऱ्या जनावरांची ते पर्वा करणार नाहीत व ते ठेवणारही नाहीत. अशी निरुपयोगी जनावरे सरकारने सांभाळण्याचे ठरविले तर ते फार खर्चाचे होईल व सध्यातरी ते शक्य नाही. जेथे शासन म्हाताऱ्या माणसांची देखभाल करू शकत नाही, तेथे म्हाताऱ्या जनावरांबद्दल काय बोलणार? अशी म्हातारी जनावरे विकण्याची मुभा जर शेतकऱ्यांना दिली नाही तर तेही जनावरे मोकाट सोडतील.

(मा. जी. खंड २.२६.)

***

A-75—13-B·

# दादांचे संकलित लेखन

# २३. दादांचे संकलित लेखन

## संत गाडगे महाराज यांचे पुण्यस्मरण

—माधवराव देशपांडे,
मुंबई

संत गाडगे बाबा यांच्याशी माझा परिचय गेली पंचवीस वर्षे होता. बाबा प्रथमदर्शनी एखाद्या अवलिया-फकीरासारखे वाटत. त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज झाकत नसे. आपल्याच साधनेत किंवा भक्तीत तल्लीन असणारा हा एखादा मस्त फकीर असावा असे वाटे. परंतु त्यांचा परिचय जसजसा वाढत जाई तसतसा हा एखादा सामान्य साधु नसून यांत काही वेगळेच तेज आहे याची खात्री होई.

बाबांना लिहितां वाचतां येत नसे. अध्ययन फारसे नव्हते. पण ते अत्यंत व्यवहारदक्ष असून माणसांची त्यांना चांगली पारख असे. आपल्या कामाला कोण उपयोगी पडू शकेल हे ते हेरत व त्या माणसाशी संबंध जोडीत व त्याचा उपयोग करून घेत. स्वतःसाठी त्यांना कसलीच गरज नव्हती.

देहसुखाबद्दल अत्यंत बेपर्वाई किंवा उदासीनपणा त्यांच्या ठिकाणी असे. कधी पंक्तीत बसून जेवले नाहीत, किंवा एखादा पदार्थ रूचि घेत त्यांनी खाल्ला नाही. गांधीजींनी त्यांना एकदा आग्रहपूर्वक आपले पंक्तीस शेजारी बसून भोजन करण्याची विनंती केली. पण त्यांनी तसे केले नाही. उभ्या उभ्या थोडेसे काही हातावर घेतले व खाल्ले. निजण्याचे बाबतीत त्यांचे तसेच. "करतल-भिक्षा तरुतल-वास :" असे त्यांचे जीवन गेली ४० वर्षे तरी लोकांनी पाहिलेले आहे.

गरिबांच्या दुःखानें ते दुःखी होत. व त्यांचा त्यांना कळवळा असे. पंढरीला-आळंदील. जाणाऱ्या गरीब वारकऱ्यांचे हाल त्यांना पाहवेनात म्हणून बाबांनी स्वतः लाखो रुपये जमवून टोलेजंग प्रासादतुल्य धर्मशाळा पंढरी, आळंदी, नाशिक इत्यादि ठिकाणी बांधल्या. स्वतः ते या धर्मशाळेत कधीच राहिले नाहीत. भांडीं-कुंडी, कपडा-लत्ता, इत्यादि सर्व साधनांनी सुसज्ज या धर्मशाळा आहेत. भांडीं वापरावयास दिली म्हणजे डिपॉझिट वगैरे ठेवण्याची पद्धत असते. पण बाबांच्या धर्मशाळेंत डिपॉझिट नाही, काही नाही. भांडी घ्यावीत व ज्याने त्याने विश्वासाने आणून द्यावीत. बाबा म्हणत "जनतेच्याच या वस्तु आहेत व जनतेवर माझा विश्वास आहे." धर्मशाळेतील भांडी या पद्धतीमुळे गेल्याचे ऐकिवात नाही.

पंढरपूर-आळंदीस नियमितपणे बाबा जात. पण देवळांत दर्शनासाठी गेल्याचे त्यांना कोणी पाहिलेले नाही. रूढ कल्पनांना त्यांचेजवळ थारा नव्हता. त्यांचे किर्तन वेगळ्या पद्धतीचे असे. वारकरी किर्तनांत ५-५० टाळकरी व किर्तनकार असतो. बाबांच्या

किर्तनात ते स्वत: व ५-६ टाळकरी. त्यांच्या किर्तनाची पद्धती व अभंग म्हणण्याची पद्धती वेगळीच. आज बाबांच्या पद्धतीची अभंग म्हणण्याची रीत व कीर्तनें आता महाराष्ट्रांत रूढ झाली आहेत.

बाबा कीर्तनांत मुख्य भर हरिनाम व भजन यावर देत. वेदांतनिरुपणाच्या भानगडीत ते कधीच पडत नसत. स्वत: ते मूर्तिमंत संत होते व देव देवळात नसून जनतेत आहे हे ते पटवीत. " मांसाशन करू नका, हुंडा घेऊ नका, कन्या-विक्रय करू नका, पंढरीस येण्यासाठी सुद्धा कर्ज करू नका, भुताखेतांवर विश्वास ठेवू नका " असे ते लोकांचे मनावर बिंबवीत. हरिजनांवर त्यांचे फार प्रेम. पहिली धर्मशाळा त्यांनी हरिजनांसाठी बांधली. महारोग्यांची सेवा ते करीत असत व त्यांच्या अन्नवस्त्रादींची व्यवस्था प्रथम ते करीत. गावात गेल्यास गावचे सर्व उकिरडे ते स्वत: व त्यांचे बरोबरची मंडळी साफ करीत. गावातून भाकरी मागून आणून त्यांचे भोजन होई. लोकांकडून मिळालेल्या पैन पैचा हिशेब धर्मशाळेत स्वतंत्रपणे वेगळा ठेवला जाई. महाराष्ट्रभर आज शेंकडो लोक स्वत:ला बाबांचे शिष्य म्हणतात. पण त्यांनी कोणाला शिष्य केले नाही. असा हा अत्यंत थोर महापुरुष होता. त्यांच्यात संताचे सर्व गुण समाविष्ट झाले होते. त्यांचे पुण्य-स्मृतीस अनेकश: प्रणाम.

('सेवक' १-२-१९५७, वर्ष-१०, क्र. १०८)

***

## विरक्त

—माधवराव देशपांडे

पूज्य अप्पासाहेब पटवर्धन यांचे नाव गांधीजींच्या १९२१ आंदोलनापासून मी ऐकत होतो. अत्यंत तेजस्वी, बुद्धिमान व गांधीनिष्ठ असे हे थोर गृहस्थ आहेत अशी मनावर छाप होती. परंतु त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय १९३२ चे सुमारास झाला. पूर्वीच्या सातारा जिल्ह्यातील शिराळे पेटयातील आरळे हे आमचे गाव व त्यासाठी एक आश्रम किंवा सेवाकेंद्र सुरू करावे असे माझे मनात पुष्कळ दिवसापासून होते. त्यासाठी एखादा मनुष्य मला द्या असे पू. विनोबाजींना मी सांगितले होते. पण त्यांनी सांगितले की, तुमचा मनुष्य तुम्ही वर्धा आश्रमात आणून ठेवा. म्हणजे तो तयार होईल. माझेजवळचा मनुष्य मी देऊ शकणार नाही त्यामुळे माझे मित्र व सहकारी श्री. रामचंद्र महादेव जोशी उर्फ जोशी काका यांचे माझे त्यासंबंधी बोलणे झाले. त्यांचे मनात पण सेवाकार्य करण्याची इच्छाहोती. श्री. जोशी यांना घेऊन मी वर्ध्याला गेलो. विनोबांचेबरोबर त्यांचा परिचय करून दिला. ते तेथे राहिले. सुमारे दोन वर्षे ते वर्धा येथे आश्रमात असावेत. दोन वर्षांनी त्यांना परत करावे अशी मागणी विनोबांकडे केली व त्याप्रमाणे श्री. जोशी वर्धा आश्रमातून आले व लगेच ते व मी आरळे येथे जाऊन तेथे आमचे घरात 'ग्रामसेवक आरळे आश्रम' सुरू केला.

श्री. जोशी मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातले राहणारे व श्री. अप्पासाहेबही रत्नागिरीचे. मी अप्पांना आरळ्याच्या आश्रमाबद्दल माहिती दिली व आश्रमाला भेट देण्याचे अप्पांनी मान्य केले. माझ्या सोबत आरळ्यास येऊन ३-४ दिवस अप्पा आश्रमात राहिले. त्या विभागात हिंडून त्यांनी व्याख्याने दिली व शिक्षणासाठी एक मेळावा घेतला. पू. अप्पासाहेबांच्या सन्मानार्थ आम्ही एक भोजन समारंभ आयोजित केला होता. अप्पांचे व्रत ग्रामोद्योगी वस्तु व गाईचे दूध वगैरे असल्यामुळे सर्व भोजनाची त्याप्रमाणे व्यवस्था केली. गाईचे दूध विरजून श्रीखंड केले. अप्पांची श्रीखंडाला हरकत राहणार नाही असे वाटले कारण सर्वांच्यासाठीच ते होते. परंतु दही आणि साखर हे मुद्दाम स्वाद वाढविण्यासाठी एकत्र मिसळविणे त्यांना पसंत पडले नाही. अस्वाद व्रतात ते बसू शकत नाही. त्यामुळे त्यांनी श्रीखंड घेतले नाही. गाईचे दूध, विरजलेले दही भोजनात घेतले, निरनिराळे पदार्थ एकत्र मिसळून रुची वाढविण्यासाठी त्याचे पदार्थ बनविणे व्रत निष्ठेत बसू शकत नाही असे असावे. परंतु खरी स्थिती अशी होती की, अप्पासाहेबांचे हाडामासात अस्वाद व्रत होते. त्यांच्या ते अंगवळणी पडले होते. 'पडिले वळण इंद्रिया सकळा' अशी त्यांची वृत्ती होती. ते महापुरुष होते. त्यामुळे त्यांची इंद्रिये सुखावह कधीच होत नसत. आपण काही वेगळे करतो आहे याचे त्यांना भानच नसे. खाणे, पिणे, पोशाख या बाबतीत शौक किंवा भोग ही वृत्ती त्यांची नव्हती.

जेव्हा त्यांच्या लग्नाचा प्रश्न उत्पन्न झाला तेव्हा आपल्या आईला कष्ट पडू नयेत, मदत व्हावी म्हणून लग्न करण्यास संमती दिली. परंतु आपण आजन्म ब्रम्हचारी व्रताचे पालन करू असा आपला विचार पण आईजवळ सांगितला. आईला अप्पांचा दृढ स्वभाव व बोलण्यासारखे वागण्याची वृत्ती माहित होती. त्यामुळे माझ्यासाठी कोणाच्या मुलीचे नुकसान होऊ नये म्हणून स्वत: होऊन अप्पांना लग्न न करण्याच्या निश्चयाला तिने मदत केली. अप्पासाहेबांना वैराग्याचे परमभाग्य लाभले होते. त्यांचे ठिकाणी विषयलोलुपता, ऐहिक भोग भोगण्याची वृत्ती बिलकुल नव्हती. श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'ऐहिकांचे कां स्वर्गीचे। भोग पाईक झालिया इच्छेचे। परि ते भोगावे हे न रूचे। मनामाजी' अशा तऱ्हेच्या वृत्तीचे ते संत होते.

(अप्पा स्मृती ग्रंथ १९७३, परंधाम प्रकाशन)

***

## कृष्णा काठ (खंड १)

(यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र)

आमची ही निवडणूक १९४६ च्या मार्च महिन्यात झाली आणि मार्चच्या ३० तारखेला काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची सभा मुंबईला प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात भरणार आहे असे निमंत्रण मिळाले. आमच्या सातारा जिल्ह्यातून निवडून आलेले बहुतेक सर्व उमेदवार एकत्र जमलो आणि सर्वजण मिळून मुंबईला निघालो. आमच्या निवडणुकीसाठी जी मोटार आम्ही भाड्याने ठरविली होती, ती तोपर्यंत आमच्याच ताब्यात होती. तेव्हा ती मोटार घेऊनच आम्ही मुंबईस गेलो. बरोबर आमच्या जिल्ह्यातील वृद्ध पुढारी श्री. भाऊसाहेब सोमण हे अत्यंत अगत्याने आले आणि आम्ही त्यांच्यासह सातारा ते मुंबई प्रवास मोठ्या आनंदात केला.

मुंबईत आल्यानंतर आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी राहायला गेलो. श्री. के. डी पाटील, श्री. सिंहासने आणि मी मात्र 'माधवाश्रमात' मुक्कामाला गेलो.

पक्षाची सभा ही एक औपचारिक सभा होती. श्री. बाळासाहेब खेरांची पक्षनेता म्हणून औपचारिक निवड झाली. त्यावेळी सरदार पटेल हजर होते. त्यांनी आशिर्वादात्मक भाषण केले आणि सभा संपली. दुसऱ्या दिवसापासून आम्ही पुन्हा मुंबईमध्ये भटकंती करायला सुरुवात केली. मंत्रिमंडळ बनविण्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. पण त्यामध्ये श्री. बाळासाहेब खेरांशी जाऊन भेटावे व बोलावे, असे माझ्या मनातही आले नाही. कारण त्यांची माझी ओळखही नव्हती. श्री. भाऊसाहेब सोमण जे आले होते, ते आमचे हरिजन उमेदवार श्री. गणपतराव तपासे यांच्यासाठी प्रयत्न करण्यासाठी आले होते, असे त्यांनीच मला सांगितले होते. त्यामुळे त्यांनी माझ्यासाठी कुणाला सांगावे, बोलावे, असा प्रश्नच निर्माण झाला नाही. पण श्री. के. डी. पाटील यांची मात्र इच्छा होती, की आपण काही प्रयत्न करावा. त्यांची आणि श्री. मोरारजीभाई देसाईंची येरवडा जेलमधली दाट ओळख होती. श्री. मोरारजीभाईंना भेटावे, असे त्यांच्या मनात आले. पण मी त्यांना आवरले. मी त्यांना सांगितले,

"आपले काम आणि नावे पुढाऱ्यांना माहीत असली पाहिजेत. नाही तर ते पुढारी कसले? आपण कृपा करून माझ्यासाठी प्रयत्न करण्यासाठी जाऊ नका. तुम्हाला स्वतःसाठी जाऊन प्रयत्न करावयाचा असेल तर जरूर करा."

ते म्हणाले,

"मला मंत्रिमंडळात जाण्याची मुळीच इच्छा नाही. प्रयत्न करावयाचा असेल, तर तो तुमच्यासाठी."

असाच एक दिवस गेल्यानंतर आमच्या जिल्ह्यातून निवडून आलेले आमदार श्री. बाबासाहेब शिंदे आणि आमच्या शिराळा पेट्यातील मुंबईत वकिली करीत असलेले श्री. माधवराव देशपांडे हे माधवाश्रमात आमचा शोध करीत आले. श्री. के. डी. पाटील कुठे तरी बाहेर गेले होते. म्हणून मी एकटाच तेथे होतो. श्री. बाबासाहेबांनी मला आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह केला. ते म्हणाले,

" श्री. माधवराव देशपांडे हे तुम्हाला नेण्यासाठी आले आहेत. त्यांच्याबरोबर आपण जाऊ या. "

कशासाठी ? कुठे ? असे मी त्यांना विचारले, पण त्यांनी उत्तर देण्याची टाळाटाळ केली. ते गाडी घेऊन आले असल्यामुळे त्यांच्या गाडीतूनच मी गेलो. मला वाटले, कुठेतरी जवळपास प्रवास असेल. गाडी बराच वेळ उत्तरेच्या दिशेने पुढे पुढे जात राहिली, तेव्हा मी जरा आग्रहाने त्या मंडळींना विचारले,

" आपण कुठे चाललो आहोत ? "

श्री. माधवराव म्हणाले,

" आपण उपनगरात चाललो आहोत. श्री. बाळासाहेब खेरांनी तुम्हाला बोलावून आणायला सांगितले आहे. म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे. "

ह्या वेळपर्यंत आम्ही श्री. बाळासाहेबांच्या बंगल्याच्या दाराशी पोहोचलो होतो. मी काहीसा आश्चर्यचकित झालो होतो व काहीसा गोंधळून गेलो होतो. माझ्या बरोबरच्या या दोन ज्येष्ठ मित्रांबरोबर मी त्या घरात प्रवेश केला आणि आम्ही बाळासाहेबांच्या बैठकीत जाऊन उभे राहिलो. तो साध्या पोशाखातील श्री. बाळासाहेब खेर नेहमीप्रमाणे हसून नमस्कार करीत पुढे आले आणि म्हणाले,

" या. चव्हाण, या. बसा. "

आम्ही बसलो. नंतर त्यांनी माझ्याकडे वळून सांगितले,

" मी तुम्हाला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही. पण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मी तुमची निवड केली आहे. "

हे सर्व मला अगदीच अनपेक्षित होते, त्यामुळे आपण काय बोलावे, हे चटकन माझ्या लक्षात आले नाही. म्हटले,

" ठीक आहे. मी घरी जाऊन येतो. मी काही तातडीने हजर होणार नाही. "

आज जेव्हा मी या घटनेचा विचार करतो, तेव्हा पार्लमन्टरी सेक्रेटरीपद मला दिले, या संबंधाने मला काही फारसे बरे वाटले नव्हते, ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. माझे काम आणि माझी जाण यांच्या तुलनेने हे किरकोळ काम आहे, अशी माझी भावना झाली.

पण या बाबतीत तेथेच चर्चा न करता आम्ही तेथून निघालो. श्री. बाळासाहेबांचे मी आभार मानले. माझ्या दोन्ही मित्रांचेही आभार मानले.

श्री. बाबासाहेब शिंदे यांना माझी मनःस्थिती समजली असावी. बाहेर आल्यानंतर ते मला म्हणाले,

"यशवंतराव. चूक कराल हं ? नाही म्हणू नका, तुमच्या सवडीने का होईना, पण येऊन हजर व्हा."

बाबासाहेबांचा माझ्यावर फार वर्षांचा लोभ होता. मी त्यांचेही आभार मानले आणि टॅक्सी करून परत माधवाश्रमात आलो. श्री. के. डी. तेथे परत आले होते. त्यांना मी झालेला सर्व वृत्तान्त सांगितला. श्री. के. डी. हा मोठा व्यवहारी मनुष्य होता. मी त्यांच्याजवळ माझी भावना स्पष्ट केली. तेव्हा ते म्हणाले,

"तुमची भावना मी समजू शकतो; परंतु श्री. बाबासाहेब शिंदे यांनी दिलेला सल्ला मानून चालू या."

मला त्यांचे सर्व काही बोलणे समजत होते, पण पटत नव्हते. मी सांगितले,

"मला या बाबतीत विचार केला पाहिजे. मी काही घाईघाईने हजर होणार नाही. आपण तूर्त परत जाऊ या."

श्री. बाळासाहेबांनी नावांची घोषणा केली. त्यामध्ये माझे नाव पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून प्रसिद्ध झाले आणि या प्रसिद्धीच्या वातावरणात मी दुसऱ्या दिवशी कराडला पोहोचलो.

श्री. गणपतरावांचीही काहीशी निराशा झालेली दिसली. मी त्यांना, मला काय वाटत होते, ते सांगितले. त्यांनीही बाबासाहेबांचा सल्लाच मान, असे मत व्यक्त केले.

त्यानंतर जवळ जवळ दहा दिवस मी कराडमध्ये होतो आणि इतर मित्रांशी चर्चा करीत होतो. सर्वांचा मनोदय, मी जावे, असाच मला दिसला.

सौ. वेणूबाईच्या मनात काय आहे, हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला. ती म्हणाली,

"आजपर्यंत एवढे कठीण निर्णय घेतलेत, तेव्हा तुमच्या मनात चलबिचल नव्हती; मग आताच असे का ?"

मी याचा अर्थ समजलो.

मी माझ्या आईला शेवटी विचारले. ती म्हणाली,

"मला तुझ्या राजकारणातले काही समजत नाही. पण तुला काही नवे काम करायची संधी आली आहे, तर आता नको म्हणू नकोस."

माझ्यासाठी हा आमच्या वरिष्ठ न्यायालयाचा आदेश होता. त्यामुळे मी मुंबईस निघण्याचा निर्णय केला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सर्वांचा निरोप घेऊन, आईच्या पायांवर मस्तक ठेवून मी घराबाहेर पडलो आणि पुणे मार्गे रेल्वेने मुंबईच्या वाटेला लागलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुणे स्टेशनवर त्या गाडीला जोडून असणारी मुंबईला जाणारी डेक्कन क्वीन गाठली आणि त्या गाडीत जाऊन बसलो.

गाडीत निवांत बसल्यानंतर माझ्या विचारांचे काहूर उठले. भूतकाळातील सुख-दुःखांची धूसर क्षणचित्रे डोळ्यांपुढे येऊ लागली. त्याचप्रमाणे अनोळखी पण रंगतदार भविष्याची बोटेही आपल्याला पालवताहेत, असे वाटले. माझ्या मनात येऊन गेले, की

माझ्या जीवनात मोठा बदल झाला आहे. कृष्णाकाठी वाढलो. हिंडलो, फिरलो, झगडलो. अनेक नवी कामे केली, मैत्री केली, माणसे जोडली, मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता. आता मी कृष्णाकाठ सोडून नव्या क्षितिजाकडे चाललो आहे. आता ती क्षितिजे रंगीबेरंगी दिसत आहेत. परंतु प्रत्यक्षात तेथे पोहोचेपर्यंत ती तशीच राहतील का?

(७-२-१९८४)

१९५६-५७ सालाकरिता म. प्र. भूदान समिती निवडण्यात आली आहे. अ. भा. सर्व सेवा संघाने या समितीला मान्यताही दिली.

——मा. कृ. देशपांडे

(५ जुलै १९५६ भूदान यज्ञ पान ८)

२८ जानेवारी १९५७ बालूभाई महेतांच्या अधिपत्याखाली बैठक कुरुंदवाड, येथे झाली. तंत्रमुक्ती जरी झाली असली, तरी कामात सुसूत्रता असावी, काही स्वनिर्मित शिस्त असावी याकरता श्री. रावसाहेब पटवर्धन यांनी १९५७ सालाकरता एक कार्यपद्धती सूचविली. जमलेल्या कार्यकर्त्यांत श्री. विनोबांच्या व्याख्येप्रमाणे जे 'लोकसेवक' झाले आहेत त्यांनी जिल्हावार आपल्यातून एक जिल्हासेवक (आपल्या स्वतःच्या इच्छेने तयार झालेला) त्या जिल्हामंडळीचा 'निमंत्रक' म्हणून द्यावा, अशा निमंत्रकांची मिळून एक प्रांतीय सल्लागार समिती असावी. प्रांतसेवक म्हणून त्यांच्याकडे कामात सुसूत्रता आणि शिस्त आणण्याचे काम सोपवावे. अशी थोडक्यात योजना आहे. त्यानुसार प्रांतीय सल्लागार समिती निवडण्यात आली.

——श्री. मा. कृ. दे. (भूदान यज्ञ ७-२-१९५७ पान ८)

## बालपणींच सर्वज्ञता वरी तयातें

### सर्वोदयसाधना : १० सप्टेंबर १९६३

—माधवराव देशपांडे

**हायस्कूलमध्यें विनोबा पहिले आले. बक्षिसाच्या रकमेंतून त्यांनी ज्ञानेश्वरी व दासबोध ग्रंथ मागितले. पुढे मोरोपंत त्यांचे आवडीचे झाले. दासबोध व ज्ञानेश्वरी त्यांना मुखोद्गतच झाली. त्यातील सुंदर उतारे म्हणत ते तन्मय होऊन जायचे आणि गीतेच्या दुधावर आपण मोठे झालो अशी त्यांची भावना आहे. वेद त्यांच्या सोबतच असतात.**

विनोबाजींचें लहानपण व पुढील सर्व शिक्षण गुजराथेत बडोद्यास झाले. बडोद्याची जी मंडळी आज सार्वजनिक सेवेत आहेत, त्यापैकींच ते आहेत, असे जाणती माणसे समजतात. परंतु त्यांचा जन्म महाराष्ट्रात झाला आहे. सातारा--वाईचे लोक विनोबांना वाईचेच समजतात; कारण भावे कुटुंबाने वाई येथे कोटेश्वराचे, शंकराचे सुप्रसिद्ध देवालय बांधले आहे व आजही भावे घराण्यातील कांही मंडळी वाईत आहेत. विनोबाजींनाही कृष्णाकाठ व वाईची आवड खरी. त्यामुळे संस्कृत महाभाष्यांचा अभ्यास करण्यासाठीं त्यांनीं वाईच पसंत केली. तेथे श्री. नारायणशास्त्री मराठे यांचेकडे प्राज्ञपाठशाळेंत ते काही काल राहिले.

**प्रज्ञावान पुरुष**

श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानदेव व श्रीरामदासस्वामी यांच्या ग्रंथांचा त्यांचे मनावर फार परिणाम झाला आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'बालपणीच सर्वज्ञता वरी तयातें' अशी प्रतिभा, बुद्धि, स्मरणशक्ति विनोबाजींच्या ठिकाणी आहे. त्यांच्या प्रतिभेचे रोज नवे नवे उन्मेष दिसतात. वयाच्या १८-२० वर्षांपासून त्यांचे सहवासात जे आहेत, हायस्कूलमधील व विशेषतः कॉलेजमध्ये ते असतांनाही त्यांची विद्यार्थी मंडळां-तील व्याख्याने व चर्चा ज्यांनी ऐकली ते त्यांच्या स्वतंत्र विचाराने व प्रतिभेच्या झेपेने त्या-वेळीही स्तंभित होत. लोकमान्य टिळकांचा तो काळ होता. सर्व लोक एकच एक महा-पुरुष म्हणून लोकमान्य टिळकांकडे पाहत असत, पण विनोबाजींना त्यावेळीं ज्यांनी पाहिले होते व त्यांची भाषणे ऐकली होती त्यांना विनोबाजी हे पुढेमागे टिळकांचा नांवलौकिक व लोकप्रियता संपादन करतील असे वाटत असे.

## बालपणचे अध्ययन

गणित विषय विनोबांच्या अत्यंत आवडीचा. मूळची कुशाग्र बुद्धि, त्यामुळे रँगलरसाठी त्यांना परदेशात पाठवावे, अशी घरच्या मंडळींची इच्छा. त्यासाठी हायस्कूलमध्यें दूसरी भाषा म्हणून संस्कृतऐवजीं त्यांना फ्रेंच घ्यायला लावले. परंतु संस्कृत भाषेचे अध्ययन विनोबाजींनीं स्वतंत्रपणे नंतर केले व त्यांत पांडित्य मिळविले. वेद, उपनिषदे व गीता यांचा त्यांचा अभ्यास फार खोल आहे. वेदांची पुस्तके त्यांच्या पदयात्रेत आजही त्यांच्या निवडक पुस्तकांत त्यांचेबरोबर असतात व 'गीतेच्या दुधावर मी मोठा झालो' असे ते म्हणतात.

## हिमालयाची लालसा

विनोबा कॉलेजमध्यें असतांना गीतारहस्य ग्रंथ प्रसिद्ध झाला. चार आठ दिवसांत यांनी सर्व ग्रंथाचे रहस्य ग्रहण केले. गीतारहस्यातील टिळकांचे सिद्धांत व श्रीशंकराचार्यांचे सिद्धांत यांचेबद्दल ते तासन्तास मित्रमंडळीत चर्चा करीत. न्यायमूर्ती रानडे यांचेबद्दल त्यांना फारच प्रेम व आदर होता. त्यांना ते महापुरुष म्हणत.

शिक्षणाबद्दल विनोबाजींचे विचार पहिल्यापासूनच स्वतंत्र आहेत. शाळेत शिक्षण दिले जाते त्यांत त्यांना फारसे गम्य वाटले नाही. कीर्ति, मोठेपणा, धनदौलत मिळवावी किंवा ऐहिक भोग भोगावे, ही वासना त्यांच्यात प्रथमपासून केव्हाच नव्हती. मोहाचे स्वाधीन ते झाले नाहीत किंवा मोहाचा मोह त्यांना कधीच खटकला नाही. उपजतच एकप्रकारचे ज्ञान व धगधगीत वैराग्य त्यांचे ठिकाणी होते. त्यांच्या मित्रांनाही प्रसंगविशेषी त्यांचा दरारा व भीती वाटत असे. अर्थातच आज त्यांच्या ठिकाणी तो दरारा किंवा भीती कोणास वाटत नाही. त्यांचे हृदय सर्व मानवजातीबद्दल प्रेमाने अत्यंत आर्द्र झाले आहे. आत्मज्ञानाची तळमळ, ईशदर्शनाची उत्कंठा व स्वदेशभक्ती यांचाच त्यांना ध्यास लागला होता. इंटरच्या परीक्षेस मुंबईस जाण्यासाठी ते घराबाहेर पडले व सुरतेहून परत फिरून परीक्षेसाठी मुंबईस न जाता त्यांनी प्रथम काशी गाठली तेथून हिमालयांत जाण्याचा त्यांचा बेत होता.

काशींत बनारस विद्यापीठाचा पदवीदान समारंभ होता. अध्यक्ष म्हणून बेझंटबाई होत्या व गांधीजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ईश्वरी इच्छा म्हणून विनोबाजी त्या समारंभाला गेले. गांधीजींचे भाषण त्यांनी ऐकले. आपल्या विचारांशी गांधीजीचे विचार जुळतात; या पुरुषांत काही विशेष तेज आहे असे विनोबाजींना त्यावेळी वाटले. गांधीजींच्याबरोबर त्यांनी पत्रव्यवहार केला व त्याचा परिणाम म्हणून विनोबाजींनी हिमालयात जाण्याचे रहित करून अहमदाबादेस गांधीजींच्याकडे जाण्याचे ठरवले. लगेच अहमदाबादच्या कोचरब आश्रमात जाऊन ते दाखल झाले. साबरमती आश्रम नंतर निघाला.

गांधीजींचा पूर्ण प्रेमाशीर्वाद विनोबांना मिळाला. आश्रम व गांधीजी विनोबांचे पसंतीस उतरले तर उलट गांधीजी विनोबाजींच्यामुळे आपला आश्रम पावन होत आहे असे मानीत. गांधीजींनी विनोबाजींना पुढे एका पत्रात लिहिले आहे, "तुझ्यासाठीं कोणते विशेषण लावावे हे मला सुचत नाही. तुझे प्रेम व चारित्र्य मला मोहून टाकीत आहे." अहमदाबादेहून पुढे ते काही दिवस वाईला गेले व १९२१ सालीं गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर ते गांधीजींच्या सांगण्यावरून व श्री. जमनालालजींच्या आग्रहाखातर वर्ध्यास येऊन राहिले. तेव्हापासुन १९६१ पर्यंत जवळ जवळ ३१ वर्षे, जेलमध्ये जात असत तेवढी मुदत सोडून वर्ध्याच्या पंचक्रोशीत ते राहिले. या दीर्घ मुदतीत त्यांची साधना अखंड चालूच होती. अनेक वर्षे जवळच्या खेडचांत जाऊन भंगीकाम करणे, सूतकताईचे वेगवेगळे प्रयोग स्वतः करणे, स्वतः श्रम करून जी मजुरी मिळेल तेवढचावर उदरनिर्वाह चालविणे वगैरे त्यांचे प्रयोग चालू असत. बाहेरच्या जगाला पूर्णपणे विसरून अध्यात्मचिंतनाच्या आनंदात व सेवेच्या कर्मयोगात ते दंग होते. १९४० साली महात्माजींनी त्यांना पहिले सत्याग्रही म्हणून पसंत केले त्यावेळीं विनोबा कोण व काय हे जगाला प्रथम समजले.

गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर गांधीपरिवाराच्या मार्गदर्शनाची जबाबदारी आपोआप आली. सर्वोदय समाजाची व त्यानंतर अखिल भारत सर्व सेवा संघाची स्थापना त्यांच्याच प्रेरणेने झाली.

## १९५१ नंतर—

१९५१ मध्ये हैद्राबादला जे सर्वोदय सम्मेलन झाले त्याला विनोबाजींनी यावे असा कार्यकर्त्यांचा फार आग्रह पडला व ते वर्ध्याहून पदयात्रेने हैद्राबादला सम्मेलनाला आले. तेथून तेलंगणात गेले. गरिबांचे कैवारी म्हणून गरीब लोक त्यांना ठिकठिकाणी येऊन भेटत व आपली दुःखे सांगत. अशा एका सभेत हरिजनांनी आपली दुःखद कहाणी त्यांच्यापुढे मांडली. विनोबाजींना त्यांचा कळवळा आला व त्यांनी कळवळचाने जनतेकडे हरिजनांना देण्यासाठी म्हणून जमिनीचे दान मागितले. ईश्वरी योगायोग होता. ईश्वराने ती हाक ऐकली व त्यांना १८ एप्रिल १९५१ ला पहिले भूदान मिळाले. भूदान य ची गंगोत्री सुरू झाली. ईश्वरी संकेत या दानाच्या मागे आहे, असे त्यांना वाटले. मागितले तर ईश्वर देईल अशी श्रद्धा त्यांना वाटली व भूदान-यज्ञ सुरू झाला. व्याधाने पक्षाचा वध केला. त्याने आद्यकवी वाल्मीकीचे हृदय दुःखाने कळवळले व रामायण महाकाव्य अवतरले. भूमिहीन दुःखितांच्या दुःखाने विनोबाजींचे हृदय हेलावले व विनोबाजींनी पोचमपल्ली येथे कळवळून जनतेकडे मदतीची हाक मारली! भूदान यज्ञाची गंगा प्रगट झाली!

## हा आधुनिक ज्ञानेश्वर!

भूदान यज्ञाचा इतिहास ताजाच आहे. तेव्हापासून गेली अकरा वर्षे विनोबाजींची भूतदयेने प्रेरित झालेली भूदान पदयात्रा ऊन, पाऊस, हवा, पाणी याची पर्वा न करता अखंड

चालू आहे. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे "दुरितांचे तिमिर जावो ! विश्व स्वधर्म सूर्य पाहो" यासाठी हा आधुनिक ज्ञानेश्वर जीवाच्या तळवटी आपला जीव आंथरत आहे व कणाकणाने क्षणोक्षणीं आपला देह झिजवत आहे.

(कल्याणयात्रा)

***

शामुना -ए-७५--मरासासंमं.म--७-८८-१,१२५-पीए ५ *